# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## विशेष महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १४

## सभावृत्तांत

दिनांक – १९.०३.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च-२०१३ची विशेष मा.महापालिका सभा मंगळवार दि.१९.०३.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२१. मा.उल्हास शेट्टी
२२.मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२३.मा.पवार संगीता शाम
२४.मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२५.मा.तानाजी विठ्ठल खाडे
२६.मा.बो-हाडे शुभांगी संजय
२७.मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२८.मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२९.मा.भारती फरांदे
३०.मा.आर.एस.कुमार
३१. मा.जावेद रमजान शेख
३२.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३३.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३४.मा.पांढरकर निलेश शंकरराव
३५.मा.नंदा विकास ताकवणे
३६.मा.नेटके सुमन राजेंद्र
३७.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३८.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३९.मा.मोरेश्वर महादू भोंडवे
४०.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
४१. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४२.मा.लोंढे गणेश नारायण
४३.मा.शमीम पठाण
४४.मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
४५.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४६.मा.अपर्णा निलेश डोके
४७.मा.अनंत सुभाष को-हाळे
४८.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४९.मा.जयश्री वसंत गावडे
५०.मा.पवार मनीषा काळूराम
५१.मा.प्रसाद शेट्टी

५२. मा.अविनाश (दादा) टेकावडे
५३. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५४. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५५. मा.शेख अस्लम शैकत
५६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५८. मा.मडिगेरी वर्षा विलास
५९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
६०. सौ.गवळी सुनिता (ताई) पांडूरंग
६१. मा.सुपे आशा रविंद्र
६२. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६३. मा.अजित दामोदर गव्हाणे
६४. मा.गोफणे अनुराधा देविदास
६५. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६७. मा.महेशदादा किसन लांडगे
६८. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६९. मा.लोंढे शुभांगी संतोष
७०. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
७१. मा.ननवरे जितेंद्र बाबा
७२. मा.सावळे सिमा रविंद्र
७३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७४. मा.पालांडे सुजाता सुनिल
७५. मा.बहल योगेश मंगलसेन
७६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७७. मा.गिता सुशील मंचरकर
७८. मा.कैलास महादेव कदम
७९. मा.छाया जगन्नाथ साबळे
८०. मा.आसवानी सविता धनराज
८१. मा.वाघेरे सुनिता राजेश
८२. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम

८३. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

८४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८६. मा.काळे विमल रमेश

८७. मा.पाडाळे निता विलास

८८. मा.कैलास गबाजी थोपटे

८९. मा.विमलताई सुरेश जगताप

९०. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९१. मा.बारणे निलेश हिरामण

९२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९३. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

९४. मा.बारणे माया संतोष

९५. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९८. मा.कलाटे स्वाती मयुर

९९. मा.नांदगुडे विलास एकनाथ

१००. मा.चौंधे आरती सुरेश

१०१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०४. मा.जवळकर वैशाली राहुल

१०५. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

१०६. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०७. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०८. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

११०. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१११. मा.जम सोनाली पोपट

११२. मा.प्रशांत शितोळे

११३. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

११४. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
११५. मा.गायकवाड संध्या सुरदास
११६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११७. मा.शेंडगे आशा सुखदेव
११८. मा.मोटे किरण बाळासाहेब
११९. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१२०. मा.संजय केशवराव काटे
१२१. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१२२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१२३. मा.पाटील सुजित वसंत
१२४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१२५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सहआयुक्त,मा.कुलकर्णी, मा.टेकाळे,मा.दुरगुडे–सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर-प्र.नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-सहशहरअभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.गायकवाड-प्र.आरोग्य वैद्य. अधिकारी, मा.डॉ.पवन साळवे-अति.वैद्य.अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.ढगे, मा.निकम, मा.पाटील, मा.चव्हाण,मा.शरद जाधव, मा.साळवी,मा.पठाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.पिरजादे,मा.दांगट-कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.माछरे-विशेष अधिकारी,मा.गावडे-अग्निशामक अधिकारी,मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी, मा.पाटील-प्राचार्य आयटीआय मोरवाडी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर :-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.प्र.नगरसचिव :-** मा.महापौर यांनी विहीत केल्याप्रमाणे विशेष सभेतील कामकाजाचा क्रम पुढीलप्रमाणे असेल.

१) अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" संबंधिचे मा.सभापती, स्थायी समिति यांचे निवेदन,

२) अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" यावर चर्चा,

३) चर्चा समाप्तीनंतर अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" यावरील ठराव मांडणे – अनुमोदन देणे,

४) अंदाजपत्रकावरील ठरावास सुधारणा/फेरबदलच्या सूचना मांडल्या गेल्यास त्यांची वैधता-ग्राह्य-अग्राह्यता तपासण्याकरीता किमान पूर्ण २ दिवस सभा कामकाज तहकूब करणे –

५) एका सदस्यास एकच सुधारणा/फेरबदल सूचना मांडता येईल किंवा त्यांस अनुमोदन देता येईल. मांडण्यात येणारी सूचना कितीही मोठी असू शकेल.

६) अंदाजपत्रकातील खर्चाची तरतूद वाढवावयाची असेल किंवा नवीन तरतूद करावयाची असेल तर कोणत्या खर्चाची तरतूद तेवढ्या प्रमाणात कमी करावयाची किंवा कोणत्या जमेत वाढवावयाची हे फेरबदलाची सूचना ग्राह्य होण्यासाठी नमूद असणे आवश्यक राहील.

**मा.प्र.नगरसचिव :-** **विषय क्र.१ :-** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने तयार केलेले सन २०१२–१३ चे सुधारित व सन २०१३–१४ चे मुळ अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच जेएनएनयुआरएम अंतर्गत महानगरपालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे अंदाजपत्रक "प" विचारासाठी- मा.सभापती स्थायी समिति अंदाजपत्रकावरील निवेदन/मनोगत व्यक्त करतील.

(मा.सभापती स्थायी समिति यांनी अंदाजपत्रक " अ" व "क" वरील निवेदन सादर केले.)

**मा.महापौर** – अंदाजपत्रकावर चर्चा चालू करण्यात यावी.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, आत्ताच नगरसचिव साहेबांनी काही सूचना दिल्या असल्यांचे सांगितले आहे. सभागृह नेत्यांना विनंती आहे, जर सूचना स्विकारणार असाल तर महापौरांकडे देणार असाल तर सगळ्या नगरसेवकांना आधी माहिती द्यायला पाहीजे. कोणाकोणाला काही निधी वाढवायला पाहीजे, बदल करायचा असेल तर आम्हाला विश्वासात घेऊन सूचना घेतल्या पाहीजेत. कोणाच्याही टेबलवर

पुस्तक नाही. मागच्या मागे गतवर्षीच्या रितीने केले असेल तर ते योग्य होणार नाही. सर्व गटनेत्यांनी यासंदर्भात सूचना द्यायला पाहीजेत. त्यासाठी सगळ्यांना विश्वासात घेऊन सूचना द्या. सूचना घेतल्यानंतर काही फरक पडत नाही. सभागृहाच्या वतीने विनंती करते, रात्री जेव्हा मिटींग संपली तेव्हा सूचना देण्यात आल्या, विचारणा करण्यात आली नाहीतर बाकी सदस्यांवर अन्याय होईल यांची नोंद घ्यावी.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा २०१२-१३ चा सुधारीत व १३वा मूळ अर्थसंकल्प स्थायी समिती अध्यक्ष मा.जगदीश शेट्टी यांनी सादर केलेला आहे. २०२४.१४ कोटींचे अंदाजपत्रक आहे. त्याचबरोबर जेएनएनयूआरएमसाठी १२२४ कोटींचे अंदाजपत्रक आहे असे मिळून ३२४८.१४ कोटींचा अर्थसंकल्प सभेत सादर केलेला आहे. हा ३८वा अर्थसंकल्प आहे. तो मांडताना जमा बाजूला आरंभीची शिल्लक ९७.८२ कोटी दाखवली आहे. मला सांगायचे आहे की, जवळजवळ १०० कोटी अंदाजपत्रकातील तरतूद खर्च केलेली नाही. अनेक वेळा सभागृहात चर्चा झाली. विकास कामे होत नाहीत, भांडवली खर्च होत नाही. सरळसरळ दिसते आहे, जवळजवळ १०० कोटी खर्च केलेला नाही, म्हणून ही आरंभीची शिल्लक राहीली आहे. जेएनएनयूआरएमचे ५११ कोटी शिल्लक दाखवले आहेत. महापालिकेचे १०० कोटी, जेएनएनयूआरएमचे ५११ कोटी रुपये असे जास्तीत जास्त ६११ कोटी खर्च झालेले आहेत. जी विकास कामे प्रभागात झाली असती, परंतू ते खर्च केलेले नाहीत. गेल्यावर्षात भांडवली खर्चात म्हणून आरंभ रकमेत खर्च होत नाही. मा.कैलास कदम यांनी, मा.भाऊसाहेब भोईर यांनी प्रश्न विचारलेले आहेत. सभागृहात मोठ्या प्रमाणात चर्चा झाली आहे. ६१४ कोटी काय लहान रक्कम नाही. दुसरी गोष्ट या वर्षी १२०० कोटी उत्पन्न गृहीत धरले आहेत. जकात हा महापालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत आहे. एकूण बजेटच्या जवळजवळ ६० टक्के निधी जकातीपासून मिळणार आहे. गेल्या वर्षी १३०० कोटींची तरतूद केली होती. मध्यंतरीच्या काळात अपेक्षेप्रमाणे मिळालेली १०५० कोटींची जकात मूळ अंदाजपत्रकात धरली आहे. केवळ २५० कोटींची तूट येणार आहे. LBT सुरु होणार आहे. नवीन आहे. व्यापारी याला विरोध करीत आहेत. १४ मार्च रोजी आपण मिटींग घेतली होती त्यावेळी व्यापा-यांनी मोठ्या प्रमाणावर विरोध केला होता. व्यापारी बचाव, LBT हटाव अशा घोषणा केल्यातरी LBT भरणार नाही असे सांगण्यात आले होते. विशेषतः लोकप्रिय खासदार गजानन बाबर यांनी या

व्यापा-यांचे नेतृत्व केले होते LBT असो, जकात असो स्थानिक स्वराज्य संस्थेला उत्पन्न मिळाले नाहीतर विकास कसा करणार? श्री. गजानन बाबर हे १५ वर्षे नगरसेवक, १० वर्षे आमदार आत्ता खासदार झाले आहेत. शहराच्या विकास कामांचा त्यांनी विचार केला पाहीजे. जनतेने त्यांना खासदार म्हणून निवडून दिलेले आहे. महाराष्ट्राच्या नेत्यांनी केंद्र सरकारकडे बाजू मांडली पाहीजे, ते तिथे काहीच बोलत नाहीत. खासदार बाबर यांनी दिल्लीत लक्ष घातले पाहीजे. राजकारण करण्यासाठी सुलभा ताईंसारखे सक्षम नेत्या असताना त्यांनी यात लक्ष घालू नये. जकात बंद होऊन LBT सुरु होणार आहे. वास्तविक पाहता, हा विषय महापालिका सभेत यायला पाहीजे होता. जकात बंद होऊन LBT हा धोरणात्मक निर्णय आहे. महापालिका सभेत आमची मान्यता घ्यायला पाहीजे होती. LBT म्हणजे काय आम्हाला माहित नाही. पत्र पाठवून आम्हाला याविषयी माहिती दिलेली आहे. परंतू आम्हाला काहीच माहिती नाही. याठिकाणी हा विषय महापालिका सभेत यायला पाहीजे होता. तो याठिकाणी आयुक्त साहेबांनी घेतला नाही. १२०० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. इथे एस्कॉर्टस् ला परवानगी नाही. ते घेऊ शकणार नाही. यात ४० कोटी मिळणार म्हटले आहे. याला परमिशन नसेल तर ते १२०० – ४० = ११६० कोटी फक्त LBT म्हणून मिळणार आहे. दुसरे करसंकलनमधून २५० कोटी अपेक्षित धरले आहेत. गेल्या वर्षी १७० कोटींचा अंदाज होता. मूळ अंदाजाच्या १९६ कोटी जमा होतील. कर संकलनमध्ये २६ कोटींची वाढ झालेली आहे. शहरात २,९१,००० अधिकृत मिळकती व १,३४,००० अनधिकृत बांधकामे आहेत. त्यांच्या नोंदी बंद केलेल्या आहेत. महिला वर्गासाठी धोरण जाहीर झाले आहे. २०१२ पर्यंतच्या बांधकामांमधून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल. त्या मिळकतींची नोंद केली तरी अनेकांनी ३१ मार्च २०१२ पूर्वी घर बांधले आहे पण नोंद केलेली नाही अशांची एक हजाराच्या घरात संख्या आहे. या नोंदी झाल्यातरी कर संकलनमध्ये वाढ होईल. बांधकाम परवानगी विभागाला महापालिकेच्या उत्पन्नात प्रमुख स्थान आहे. २५७ कोटी मिळणार आहेत. २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात १६५ कोटी अपेक्षित धरले होते. प्रत्यक्षात २१० कोटी मिळाले आहेत. बांधकाम परवानग्यांमधून ४५ कोटींची वाढ होणार आहे. पिंपरी चिंचवड शहर महानगर होऊ लागले आहे. इथून मागे अतिशय चांगल्या प्रकारच्या आपण सुविधा दिल्या आहेत. पाणीपुरवठा, ड्रेनेज सुविधा चांगली केलेली आहे. इन्फ्रास्ट्रक्टर अतिशय चांगल्या पद्धतीने झालेले आहे. शहरात पुण्यामुंबईचे लोक यायला लागले आहेत. बिल्डरच्या चांगल्या, मोठमोठ्या स्किमस्, टाऊनशिप्स्, टॉवर्स व्हायला लागल्या आहेत. म्हणून बांधकाम परवानगी

विभागात उत्पन्नात वाढ होऊ लागली असल्यामुळे डी.सी. रुल्स् मध्ये बदल करणे आवश्यक आहे. १/२ गुंठ्यामध्ये घर बांधण्यासाठी शासन पातळीवर प्रयत्न होणे अतिशय गरजेचे आहे. त्याची मोजणी करणे, साईड मार्जिन सोडणे याचा खर्च परवडत नाही. साईड मार्जिन सोडून टोटल एफ.एस.आय. देतो. अशा पद्धतीने गुंठा दोन गुंठ्यामध्ये घर बांधण्यासाठी नियमांत बदल घडवून आणले तर त्याचा फायदा निश्चितच बांधकाम परवाना विभागात उत्पन्न वाढ होऊ शकेल. पाणीपट्टी मध्ये जमेच्या बाजूत ५८,५०,००,०००/- उत्पन्न अपेक्षित धरले आहे. नळजोडामध्ये अनधिकृत नळजोडांची संख्या खूप आहे. मात्र ते बसवले तरी अभय योजनेला फारसा प्रतिसाद मिळत नाही. ४० टक्केच मिळाला आहे. नागरीकांना २४X७ पाणी देणार या योजनेचे स्वागत करतो. आपण २४ तास पाणी देऊ शकणार नाही. या पूर्वीदेखील श्री.दिलीप बंड यांनी सुद्धा २४ तास पाणी देऊ असे आश्वासन दिले होते. २४ तास पाणी देत असाल तर अतिशय आनंदाची बाब आहे. निश्चित आपण प्रयत्न करावा. सगळे नगरसेवक तुमच्य पाठीशी आहेत. भांडवली जमा मिळून २०२४ कोटी अशा पद्धतीने जमा होणार आहेत. महसूली खर्चात आपण ९११ कोटींची तरतूद केलेली आहे. यात आस्थापना खर्च ४०२ कोटी, एकूण बजेटच्या ४५ टक्के महसूली खर्च आहे. गेल्या आर्थिक वर्षात महसूली खर्च ६४५ कोटी म्हणजे १०० कोटींनी वाढ झालेली आहे. त्यासाठी भविष्यात यावर आळा घालणे गरजेचे आहे. भांडवली खर्चावर १०५४ कोटी अशी भरीव तरतूद केलेली आहे. प्रभागात व शहरात विकास कामे होत असतात. यात प्रामुख्याने स्थापत्य, जलनिस्सारण, विद्युत विभाग, पर्यावरण या वर अतिशय चांगली तरतूद केलेली आहे. हा भांडवली खर्च होतो का नाही हे पाहणे गरजेचे आहे. ही तरतूद ख-या अर्थाने खर्च झालीतर विकास कामे होऊ शकतात. भूसंपादनावर १०० कोटी बी.आर.टी. रस्ता ताब्यात घेण्यासाठी तरतूद अपूरी पडलेली आहे. विशेष योजनांवर २४१ कोटी तरतूद केलेली आहे. यात निश्चतपणे काही चांगल्या योजना आहेत. यात मगर स्टेडियम विकासासाठी ४० लाख ठेवेलेले आहेत. २० वर्षांपासून मगर स्टेडीयमचा विकास करतोय. प्रत्येक बजेटमध्ये याकरिता काही रक्कम लेखाशिर्षात ठेवली जाते. परंतू मगर स्टेडियमचा अद्याप विकास झालेला नाही. एवढे मोठे स्टेडीयम असून यात लक्ष घातले गेले पाहीजे. स्विमिंग पूल, इनडोअर गेम्स्, कबड्डी मैदान, खो-खो मैदान करता येईल.
मध्यंतरी वाचनालये – याकरिता ४५ कोटींची तरतूद चांगल्या पद्धतीने केलेली आहे. शहरात कुठेतरी मध्यंतरी वाचनालय नाही. युपीएससी, एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसाठी याचा निश्चितपणे चांगला उपयोग होईल. कला केंद्र उभारणे –

यासाठी १ कोटींची तरतूद केली आहे. पुण्यातील गणेश कलाक्रिडा केंद्राच्या धर्तीवर ४ ते ५ हजार लोक बसू शकतील अशा प्रकारे बांधण्यासाठी चांगली तरतूद केलेली आहे. पिंपरी चिंचवड हे मोरया गोसावींच्या पदस्पर्शाने पावन झालेले शहर आहे. या कलाकेंद्राला त्यांचे नाव दिले तर चांगले होण्यासारखे आहे. वाहतूक सुधारणा विषयक–पार्कीगच्या जागा विकसित करण्यासाठी ४५,७६,००,०००/- तरतूद केलेली आहे. अनेक रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत असल्यामुळे शहरात पार्किंगची समस्या झालेली आहे. शहरात चांगले रस्ते केलेले आहेत. पिंपरी पासून चिंचवड स्टेशनपर्यंत व्यापारी केंद्र, बँकींग सेवा मोठ्या प्रमाणात दिल्या जात असल्यातरी तिथे पार्कीगची व्यवस्था नाही. ही देखील तरतूद निश्चितपणे जास्त ठरणार नाही. शहरात मैदाने, संकुले उभारून उद्योगनगरी क्रिडानगरी झाली पाहीजे. शहरात अनेक चांगले खेळाडू तयार होत आहेत. त्यांच्यासाठी चांगल्या पद्धतीने मैदाने, क्रिडा संकुले शहरात निर्माण व्हावीत याचा विचार करुन रु.९,८७,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे. शहरात पर्यटन विकास ही अतिशय चांगली योजना आणली आहे. दळणवळण, प्रेक्षणीय स्थळे विकसीत केली जावीत. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आर्किटेक्ट दास यांनी १६ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विकासाच्या योजना केलेल्या आहेत. बोटक्लब इ.चा यात समावेश आहे. निश्चितपणे शहराच्या विकासात भर घालणार यात शंका नाही. शहरात वाहतूक व्यवस्थेची समस्या भेडसावत चाललेली आहे. लोकसंख्येच्या मानाने ती कमी पडू शकेल. मेट्रो करणे ही काळाची गरज आहे. पुणे व पिंपरी चिंचवड या दोन महापालिकांच्या संयुक्त विद्यमाने ही योजना पूर्ण होणार आहे आपल्या शहरातून ७.१५ कि.मी. इतक्या भागातून ती जाणार आहे. दिल्ली मेट्रो कॉर्पोरेशन बरोबर करार केलेला आहे. प्रभागात चार सेंटर्स सुरु करणार, त्यासाठी ४ कोटींची तरतूद केली आहे. प्रत्येक वेळी महापालिकेच्या वरील अंदाजे खर्चाच्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध होत असतील तर शासनाच्या सुविधा पाणीपट्टी, घरपट्टी भरणे यासाठी चांगल्या प्रकारच्या सोयी देऊ शकतो. चारही प्रभागांत ४ वॉर्डांत अशी सेंटर्स सुरु करण्यासाठी चांगली तरतूद केली आहे. शौचालये – यासाठी रु.३,७१,००,०००/- तरतूद केली आहे. नॉर्मस् प्रमाणे जवळजवळ ४२६२ सिटस् ची गरज आहे. सध्या २२४८ सिटस् उपलब्ध आहेत. आणखी २,००० ची आवश्यकता आहे. या तरतूदीतून बांधणार आहोत. ते स्वच्छ व्हायला पाहीजेत. महापालिकेची प्रभाग कार्यालये सोडली तर, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता नसते. गार्डनमध्ये अतिशय घाण असते. स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे. अंदाजपत्रकात ६३६ कोटी ठेवले आहेत. शहरातील गरीब, झोपडपट्टीवासियांना रस्ते, पाणीपुरवठा पुरवणे, त्यांचा आर्थिक,

सामाजिक स्तर वाढवण्यासाठी या ६३६ कोटी तरतूदीचे नियोजन केलेले आहे. २ कोटी महापौर विकास निधी, अपंग कल्याणकारी योजना, महिला बालकल्याण योजना, विशेष योजनेतील तरतूद इथे केलेली आहे. मध्यवर्ती भांडार कोठी विभागासाठी १४,१६,००,०००/- तरतूद आहे. छपाईसाठी १,१०,००,०००/-, ३० लाख, विद्युत साईट साठी ४ कोटी, खर्चाची तरतूद केल्यानंतर डायरेक्ट टेंडर काढतो. या खर्चाला प्रशासकीय मान्यता घेतला जात नाही. निविदा काढून डायरेक्ट खरेदी होते. भ्रष्टाचार होतो. पैसे खाल्ले जातात. यासाठी खर्चाची प्रशासकीय मान्यता घेणे अतिशय गरजेचे आहे. हा खर्च करता येऊ नये असे मला वाटते. वैद्यकीय विभागासाठी १७० कोटींची तरतूद केली आहे. वाय.सी.एम. हॉस्पीटल, एक्सरे फिल्म खरेदी, रु.३,७५,००,०००/-, मशीनरी उपकरणे खरेदीसाठी ५० लाख, औषधे खरेदी, जैववैद्यकीय, कर्मचारी लावणेसाठी २,४०,००,०००/- खरेदीसाठी वायसीएमला तरतूद कमी नाही. या खरेदीचा प्रशासकीय मान्यतेसाठी विषय असतो. एक कोटींपर्यंतचे विषय महासभेकडे आले पाहीजेत. प्रशासकीय मान्यतेसाठी विषय सभागृहापुढे आल्यावर त्यावर चर्चा होते. एस्टीमेट बरोबर आहे का नाही ते समजले जाते. खरेदी प्रकरणे पारदर्शक असली पाहीजेत. खरेदी प्रकरणे समजली पाहिजेत. एच.बी. हिशोबात आलातरी पेशंटचे ऑपरेशन इथेच झालेले असते. कोणतेही चुकीचे काम होऊ नये. निविदा भांडार खर्चाला प्रशासकीय मान्यता घेणे अतिशय गरजेचे आहे. हीच परिस्थिती कार्यशाळेची. ४,१७,००,०००/- तरतूद आहे. स्पेअरपार्टस् खरेदी जेएनएनयूआरएम वाहन खरेदी ८० लाख, प्रशासकीय खर्च ७५ लाख, स्पेअर पार्ट खरेदी २१५.१५ लाख, एवढे काय खरेदी करतात. आत्ताच्या गाड्यांची क्वालिटी इतकी चांगली असते. २५/३० लाखांच्या गाड्यांना काय खर्च येऊ शकतो. यात २१५य१५ फक्त स्पेअरपार्टसाठी खर्च करतात. प्रशासकीय मान्यतेसाठी विशेष समितीकडे असायला पाहीजे असे वाटते. आम्ही इथे बजेटला मंजूरी देत असताना एकंदरीत प्रशासकीय मान्यता देणार. गेल्यावर्षापासून एकंदरीत भांडवली खर्चाला मान्यता घेत असतो. त्यामुळे कोणताही विषय असो, प्रभाग समितीतून नामकरणाशिवाय दुसरा विषय नाही. प्रशासकीय मान्यतेसाठी विषय आल्यावर एस्टीमेट बरोबर आहे का चुकीचे आहे का यावर चर्चा होऊ शकते. एकंदरीत प्रशासकीय मान्यता घेत असल्यामुळे आम्हाला काहीच गरज नाही. स्थायी समितीमध्ये विषय येतात ते वाट बघत असतात. कधी आमच्याकडे विषय येतात. चुकीची कामे होऊ नयेत म्हणून प्रशासकीय मान्यता या बजेटला देणार नाही. अर्थसंकल्पात केलेली तरतूद खर्ची पडली तरी बजेट शहराच्या विकासाला चालना

देणारे ठरणार आहे. नाहीतर हा नुसताच आकडेवारीचा खेळ ठरणार आहे असे मला वाटते.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, २०१३-२०१४ चे बजेट आहे. किती कामे होणार ते मात्र सांगता येणार नाही. गेल्या वर्षी असेच बजेट दिले होते. त्याचे रिझल्ट बघितले तरी ५१.२६ कोटी खर्च झाले. त्यामध्ये ४६.७७ टक्के खर्च केला. प्रभागांत ८.५७ कोटी खर्च झाला म्हणजे ४.११% खर्च झाला. विधी समितीचे १ कोटी ३३ लाखांचे बजेट आहे. त्यातील ५० लाख खर्च झाले आहेत. ब बजेट – ५३.३ लाखापैकी २०.५७ लाख म्हणजे ३८%, पी बजेट – ३६.६० लाखापैकी १०.३३ म्हणजे ३% , क बजेट – ५४.३६ पैकी २५ कोटी म्हणजे ४८%, पी बजेट – ८.२७ पैकी २ कोटी म्हणजे २५%, ड प्रभाग – ५३.३ कोटीपैकी ५२ कोटी खर्च केले म्हणजे ४६%,  प्रभाग – १० कोटींपैकी २ कोटी म्हणजे १९% खर्च झालेले आहेत. विशेष योजना – १०० कोटी म्हणजे ५०% खर्च केला. स्थापत्य – १० मार्च पर्यंत ४६.१० कोटी खर्च झालेला आहे. ५% वाढला तरी ५०%, जेएनएनयूआरएम – टोटल १०८० कोटींपैकी २८६.५७ खर्च झालेला आहे म्हणजेच फक्त २७% खर्च केला. औंध-रावेत रस्त्यासाठी ७४ कोटींपैकी ३१ कोटी, आळंदी रस्त्यासाठी २१ कोटी, नाशिक फाटा - ३५% खर्च झाला.  ४४% खर्च झाला. स्टॉर्म वॉटरसाठी ५० कोटींपैकी फक्त १२ कोटी खर्च झाला आहे. ड्रेनेज टप्पा-५ साठी ३० कोटींपैकी २० कोटी. पाणीपुरवठा – १५७ कोटींपैकी २ कोटी खर्च झाले आहेत. फेज २ साठी ९.७० खर्च झाला. झोनिपुसाठी ११.९० खर्च झाले. ईडब्ल्यूएससाठी – २१४ कोटी मधील फक्त ८० कोटी खर्च झाले.  १ कोटी सुद्धा खर्च करु शकलो नाही. यावर्षी बजेटचे चांगल्या प्रकारे सादरीकरण केलेले आहे. एक्झिक्युशन काय ते वाचून दाखवले आहे. वर्ष संपले पण वर्क ऑर्डर दिलेल्या नाहीत. वर्क ऑर्डर देऊन कामे व्हायला पाहीजेत. ते झालेले नाही. अलार्मिंग अस्पेक्ट आहे. पाणीपुरवठ्याचे २६.७ कोटी यात मशिनचे डिसेंबरमध्ये टेंडर दिलेले होते. फायनल झालेले होते. डिसेंबरमध्ये टेंडर दिले पण बीआरटी डिसेंबरमध्ये दिले पाहीजे. फेब्रुवारी महिना पूर्ण झाला. कोठल्याही कामांना प्राधान्य देत नाहीत. मोठी कामे ताबडतोब होतात. डिसेंबरमध्ये दोन टेंडर आले होते. पाणीपुरवठा व बीआरटी. बीआरटीचे टेंडर फायनल झाले आहे. पण पाणीपुरवठ्याचे टेंडर अजून फायनल झालेले नाही. मी आयुक्त साहेबांचे कौतुक करतो, त्यांची पोझिशन त्यांनी एक्सप्लेन केली आहे. यात एकंदरीत बीआरटी येतात. टेंडर आल्याबरोबर कि.मी.ला ४ ते ५ कोटी जास्त रेट यायला पाहीजे होता.

त्यावेळी डीएसआर रेट ३५% बिलो होता. तरी ४/५ कोटी जास्त आलेले आहेत. उदाहरण देतो – बीआरटीएसची विकास कामे देताना झालेल्या कामांच्या निविदेसाठी ९ मध्ये पाणी सार्वजनिक विकास सूचना वापरण्यात आली आहे. दरसूचीत ९ च्या तुलनेत ३५ पेक्षा वाढ आहे. डॉ.परदेशी यांनी विशेष लक्ष घातले त्यामुळे साडेचार कोटी कमी दराने काम दिले. पूर्वी अशा पद्धतीने कोटींमध्ये झालेल्या खर्चाची चौकशी व्हायला पाहीजे हे सांगतो. संबंधित अधिकारी, कन्सल्टंट यांच्याकडून व्यवस्था केली आहे. अनेक कि.मी. रस्त्याचे काम केले पाहीजे. त्यांना पनीशमेंट मिळायला पाहीजे. परदेशी साहेबांनी साहित्य दरात ३५ टक्के वाढ होऊन सुद्धा त्यांनी आकडेवारीचा खर्च कमी दाखवला. काळेवाडीत १.६ कि.मी. ला ३१.१२ लाखाचे काम देण्यात आले. प्रती कि.मी. १९.३५ दर हा १.४ कि.मी. लांबीचा रस्ता २५ कोटी रेटने देण्यात आला. प्रति कि.मी. १८ लाख आहे. चौथ्या टप्प्याचे ३५ कि.मी.चे काम डिसेंबरमध्ये ४८ लाखाला देण्यात आले. ९-१० या काळात शर्मा आयुक्त होते. २०१२ मध्ये परदेशी आयुक्त झाले. औंध-रावेत रस्त्याचे कामात पहिला टप्पा २ कि.मी., जुलै २००८ मध्ये ३८ कोटी देण्यात आले. प्रती कि.मी. १९.३५ लाख, तिसरा टप्पा २ कि.मी., २००८ मध्ये ३७.६२ ला देण्यात आले. प्रती. कि.मी. ४.५ करोड जास्त देण्यात आले. माझी विनंती आहे, कॉन्ट्रॅक्टर्सवर कारवाई व्हायला पाहीजे. या काळात ४.५ करोडस् जास्त दिले, त्यात लक्षात आले. सिनिअर ऑफिसर मनपातून रिटायर्ड झाले. त्यांना सिंध कॉलनीत कॉन्ट्रॅक्टर्र मोठा बंगला बांधून देतो आहे. ४.५ स्क्वे.कि.मी.चे बांधकाम चालू असताना त्याचे अधिकारी तिथेच होते. त्याचे पेमेण्ट अधिका-यांना त्या ठेकेदाराने बंगल्यात पाठवून दिले होते. याबद्दल डेप्युटी सी.एम. यांना कम्प्लेण्ट करा. तुम्हाला माहिती असायला पाहीजे. या सर्वांनी अशा प्रकारे महापालिकेचा पैसा लुटला आहे. त्यासाठी पनिशमेंट व्हायला पाहीजे. †डमिनिस्ट्रेशन अप्रूव्हल ४५ दिवसांत व्हायला पाहीजे. टेंडर प्रपोजल ६० दिवसांत व्हायला पाहीजे. एक्झिक्युटिव्ह स्टोअर प्रोसेसला २ महिन्यांच्या कामाला ९/१० महिने लावतात. ५०टक्के सुद्धा बजेट खर्च होते आहे का? अकाऊंटॅबिलिटी पाहीजे. प्रोसेसमध्ये कागदपत्रे गहाळ करणा-या अधिका-यावर कारवाई केली पाहीजे. किती इंजिनिअर्स आहेत. प्रत्येक भागात सुपरवायझर,जे.ई.,डेप्युटी इंजिनिअर, एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर काम करतात. प्रत्येक विभागात काय करतात. माझ्या भागात २५ लाखांचे डांबरीकरणाचे काम होते. टेक्निकल रिझन अप्रूव्हड झाले नाही. टेंडर परत रिकॉल केले पाहीजे, मान्यता घेतली पाहीजे. असेच ठेवले आहे अशी अनेक उदाहरणे आहेत. सिमेंटबरोबर ग्रीड वापरतात, क्वालिटी नाही. कुठेही

प्लास्टरींग केलेतरी पिंपरी चिंचवड परिसरात इंटरलॉकींग फूटपट्टी करतो. प्लास्टरींग महिनाभरात सुद्धा टिकत नाही. ग्रीड वापरतात. वाळू वापरत नाहीत. हे कुठेतरी सुधारले पाहीजे. जिथे-जिथे काँक्रीटींग आहे तिथे-तिथे काम सुधारले पाहीजे. ५/६ वर्षांत कार्पेटींग व डांबरीकरण याची एकंदरीत डांबराची टक्केवारी कमी केलेली आहे. पीडब्ल्यूडीमध्ये अजूनही प्रोसेसला ६:६ टक्के डांबर वापरतात. आपल्याकडे ५:१ असे प्रमाण केलेले आहे. त्यामुळे क्वालिटी मिळत नाही. मी संपूर्ण पिंपरी चिंचवडबद्दल बोलतोय. माझ्या वॉर्डाबद्दल बोलत नाही. बाहेर ६:६ प्रमाण असेलतर कशाला कमी टाकायचे? तुम्ही .५ म्हटलेतरी पार्टी ४.५ टाकले तरी डांबर कशासाठी कमी करायचे? याबाबत चौकशी करा. असे काम का केलेले आहे? महाराष्ट्र सरकार पाणीपुरवठा, पी.डब्ल्यू.डी. हे डांबराची टक्केवारी वापरतात तेवढे आपण वापरले पाहीजे. क्वालिटीबद्दल सांगायचे असेलतर एच.जी.एस.ची क्वालिटी आम्हाला कशाला सांगताय? एच.जी.एस. बघत नसाल तर तो सुद्धा अर्धा टक्का, एक टक्का सर्टिफाय करतोय. अधिकारी म्हणतात, एच.जी.एस. बघतात. If the quality is bad, officer is responsible. ते काढून टाका, कशाला पाहीजे. त्यांची क्वालिटी, आपला अधिकारी देणार नाही. झोपडपट्टी पुनर्वसन – साठी तरतूद २६९.२० कोटी आहे. १८,६०० गाळे बांधून देणार होतो. पाच वर्षांत काम पूर्ण होणार होते. २००७ ते २०१२ या काळाकरीता जेएनएनयूआरएम मधून ४३६८ प्लॉटस् इनश्यूअर केलेले आहेत. १००८ निवासी गाळे तयार आहेत. मी १९८४ पासून इथे निवडून येतो आहे. १९८६ मध्ये नेत्यांनी सांगितले होते, दहा वर्षांत झोपडपट्टी पुनर्वसन होईल. १० वर्षांत ५ टक्के सुद्धा काम झालेले नाही. १९९७ मध्ये १० वर्षांत झोपडपट्टी पुनर्वसन करणार होतो. ते करु शकलो नाहीतर पाच वर्षांत १८,००० गाळ्यांचे पुनर्वसन करु शकणार नाही. बाकी वर्षांत पूर्ण झाले पाहीजे. ५०% सुद्धा पूर्ण करु शकलो नाही. कॉन्ट्रॅक्टर, कार्पोरेटर,कॉर्पोरेशनचे अधिकारी, सगळ्यांचे कोऑपरेशन आहे तरीसुद्धा होत नाही. विलपॉवर नाही असे वाटते. १३५०० घरांचे बांधकाम करुन देणार, त्यापैकी मला वाटत नाही एकही घर ताब्यात दिलेले आहे. घरकुल योजनेसाठी नगरविकास प्राधिकरणाने १०८ कोटी दिलेले आहेत. राज्य शासनाने निर्णय घेतलेला नाही. शहरातील गोरगरीबांचे पैसे अडकले आहेत. श्री.दिलीप बंड यांच्या काळात शहरातील आर्थिक दुर्बळ घटकांसाठी घरे बांधून देणार असे म्हटले होते. आजपर्यंत एकही घर दिलेले आहे का. ६७०० घरांचे बांधकाम चालू आहे. बाकीच्यांचा पत्ता नाही. च-होली इथे हा प्रकल्प करणार आहोत. त्यामुळे जागांचे भाव वाढणार. याला कोण जबाबदार आहे. लोकांना स्वप्न दाखवून देणार नंतर ते

पूर्ण करु शकत नाही. अतिशय वाईट गोष्ट आहे. सरकारमध्ये असून सुद्धा काही करु शकत नाही. जेएनएनयूआरएमचे प्रकल्प २००७-२०१२ या कालावधीत पूर्ण करु शकलो नसताना मॅनपॉवर वापरतो, फॉलोअप होतो. फेज १ पूर्णपणे पूर्ण करु शकलो नाही. तरीसुद्धा आपल्याला अवॉर्ड मिळाले आहे. अशा परिस्थितीत अवॉर्ड मिळते म्हणजे बाकी लोकांची किती बेकार परिस्थीती असेल. आपण केंद्राला पैसे देऊन अवॉर्ड आणले आहे. अ,ब,क व ड या चारही प्रभागांपैकी दोन प्रभागांत दीड वर्षांत चालू केले. बाकी ठिकाणी सुरु केले नाही. दोन ठिकाणी आमदार पॉवरफुल आहेत. म्हणून क प्रभाग व ड प्रभाग इथे चालू केले आहे. ५० कोटी अलोकेट केले होते. अ व ब प्रभागाचे काय. आम्हाला कोणी वाली नाही काय. ५० कोटी डिव्हाईड करुन १० कोटी केले. ते मनपात मंजूर केलेले नाहीत. दोन आमदार पॉवरफूल आहेत. कोणीतरी तोंड बघून काम करतो हे निश्चित आहे. अ व ब प्रभागामध्ये सुद्धा स्टॉर्म वॉटर ड्रेनेजचे काम करताना क्वालिटी असली पाहीजे. एका ठिकाणी प्रभागांत जास्त पैसे देणे चुकीचे आहे. व्हिजन २००५ मध्ये पुणे एक्सप्रेस हायवे ४५ कि.मी. करण्याबद्दल कितीवेळा चर्चा केली. १५ वर्षांत टेंडर काढले आहे. या वर्षीसुद्धा आम्हाला या रस्त्याची गरज आहे म्हणून १५ वर्षांपासून चर्चा होते. आम्हाला माहिती द्या. हे प्रोजेक्ट या वर्षी होऊ द्या.

विशेष योजनेत – मगर स्टेडीयमसाठी ४० लाखांची अलॉटमेंट केलेली आहे. शहरात दुसरे मदनलाल धिंग्रा स्टेडीयम आहे. यासाठी काहीच तरतूद दिसत नाही. दिलिप वेंगसरकर †Ûú›ÍÖला देण्याची चर्चा चालू आहे. यांना दिलेतर ते १००/१५० लोक चूज करुन घेणार. याच भागातून रोज सकाळी जरी १०० लोक येतात, त्यांच्यावर अन्याय होईल. स्थानिक लोकांना प्राधान्य मिळाले पाहीजे. थेरगाव इथे जागा दिलेली आहे. आमचे पक्षनेते मा.योगेश बहल यांना विनंती करेल की, स्टेडीयम तरी दिलिप वेंगसरकर †Ûú›ÍÖला देऊ नका. स्थानिक लोकांसाठी राखून ठेवा. लोकांचा विरोध आहे. Govt. is of the people, by the people, for the people. लोकांचा विरोध असताना देणे बरोबर नाही. देऊ नका म्हणून विनंती आहे. वाहन खरेदी करता २०१३-२०१४ मध्ये ८ करोड ठेवले आहेत. अनेक वाहने खरेदी केलीतरी परत ८ कोटी कशासाठी ते कळत नाही.

कम्प्यूटर डिपार्टमेंट – २००६ मध्ये ड्रिम पाहिले होते. मनपात पेपरलेस ऑफीस आणायचे होते. १६ वर्षांनंतर सुद्धा ते झालेले नाही. १९९० मध्ये कम्प्यूटर आले नंतर नेट सुविधा घेतली. आधी सांगितल्याप्रमाणे इतक्या वर्षांत काम करु शकलो नाही. कनेक्टीव्हीटी केली मग होत का नाही. नेत्यांनी,पोमण

साहेबांनी वाय-फाय देणार, शहर वाय-फाय होणार असे सांगितले होते. प्रत्येक सहा महिन्यांत विचारायचे, दोन वर्षांनंतर तुमच्यासमोर विचारायचे. ते म्हणाले we would not give. ते सुद्धा आमच्या नेत्यांच्या तोंडातून दिलेले आहे. तुम्ही फक्त ऑफीसमध्ये केलेले आहे. आम्हाला सगळ्या ठिकाणी पाहीजे. इंटरनेट सुविधा मुलांना वापरु द्या. आपली मुले यु.पी.एस.सी एम.पी.एस.सी. पास होण्याची शक्यता वाढेल. प्रत्येक टेबलवर मॉनिटर पाहीजे. Every officer shold be operate computer. They should be connected to all the departments. प्रभागातून विषयपत्र यायला अनेक दिवस लागतात. प्रत्यक्षात तुमच्याकडे यायला दीड महिना लागतो. सिस्टिम वापरात असावी. प्रत्येक इंजिनिअरींगचा निर्णय फक्त एक तासात होतो. त्यासाठी महिना लागतो. सिस्टीममधून काम केले पाहीजे. नवीन सिस्टीम फॉर्म करताना पैसा कमवायला मिळणार नाही. म्हणून ही सिस्टीम वापरात येत नाही. तुम्ही वेगळे अधिकारी आहात. तुम्ही दाखवून दिले, तुम्ही सर्वांना नवीन सिस्टीम दाखवून द्या. प्रत्यक्ष एक तासात निर्णय घेता येईल. प्रत्येक टेबलचे करप्शन बंद होईल.

वायसीएमएचचे बिल्डींग कन्स्ट्रक्शन चांगले, मेकॅनिकल चांगले, इन्फ्रास्ट्रक्चर चांगले, तरीसुद्धा चांगली सेवा मिळत नाही. आय.सी.यू.मध्ये एकच डॉक्टर आहे. दोन बेडसाठी एक नर्स असते. आय.सी.यू.मध्ये सेवा कमी मिळते म्हणून लोक वायसीएममध्ये नको म्हणतात. ५० खाटांसाठी एक नर्स असेल तर काय सर्वीस मिळणार. स्टाफ मेंबर रिक्रिएट करा.

जकात – ७७ लाखांची मशीनरी घेतली आहे, चर्चा करा. ७५/७६ लाखांच्या बिलाला ४५ लाखांचे बिल देतो. ज्यासाठी जकात भरली आहे, त्यासाठी ५० टक्के पेमेण्ट १.३९ करोड केलेले आहे. पेमेण्ट करताना सुपरीटेंडण्ट, डेप्युटी सुपरीटेंडण्ट, अकाऊंट असिस्टंट, विद्युत डिपार्टमेंट चेक करणारे डिपार्टमेंट यांनी बघितले नाही. जकात किती भरली, कोण पार्टी आहे. आपले नुकसान होते. २,७६,००,०००/- मशीनरीसाठी १,७५,००,०००/- दाखवले. मनाली एंटरप्रायजेस नाव आहे. फौजदारी गुन्हा दाखल करा. जकातमध्ये प्लॅन असतो. मुंढे साहेब काम करत असतील तरी कुठपर्यंत लक्ष ठेवणार. तो मनुष्य म्हणतो, कमी जकात भरतोय. तो लिहितोय, ४५ लाख, ५० लाख त्यावर जकात भरतोय. ५० लाखांसाठी १ लाख पार्टीला, १ लाख आपल्या डिपार्टमेंटला, यावर किती वेळा महासभेत बोललो आहे. यासाठी आत्ता माझ्याकडे पुरावा आहे. तुम्ही ७७ लाख घेतले. सर्वांसमोर महापालिकेचा पैसा बुडवून चिटींग करणार. कोणताही सप्लायर असू द्या. त्याच्यावर फौजदारी गुन्हा

दाखल व्हायला पाहीजे. महिला बालकल्याण – २४.६५% अलॉटमेंट खर्च किती, ३,६३,००,०००/- झाला. १५% खर्च झाला.

संगणक शिक्षण – १५ कोटी, सुईंग मशीन – २०१०-११ मध्ये अर्धे अनुदान वाटप केलेतरी पैसे असतानाही १५% वाटप केलेले आहे. का केले नाही. कशासाठी लोक आमच्याकडे रोज सकाळी सकाळी येतात. चक्कर मारतात. मला समजत नाही या विभागात काय चालले आहे. टेक्निकल एज्युकेशनसाठी – ९ लाख, फॉरेन एज्युकेशन स्कॉलरशीपसाठी ९.१० लाख, पवनाथडी, किंडर – ८४ हजार, फॅमिली प्लॅनिंग – २० हजार, मुलगी दत्तक योजना ९० लाख, मुलांना मोफत सायकल वाटप - , ट्रेनिंग प्रोग्राम – ९४ लाख, इतके पैसे देऊन सुद्धा लोकांपर्यंत या गोष्टी पोहोचत नाहीत. आम्ही म्हणतो, महिला बालकल्याण खर्च करते. या हेडवर हजारो कोटी खर्च करतो, याकडे लक्ष घाला. आपल्या पाचशे कोटींच्या एफ.डी. आहेत. आम्हाला एफ.डी. नको आहे. एवढ्या ठेवून काय करायचे आहे. आम्हाला खर्च करणारा अधिकारी पाहीजे. We want development, done work. तुम्ही काम केले नाहीतर का केले नाही विचारले पाहीजे. टक्केवारी वाढणार. डेप्युटीचा एक्झिक्युटीव्ह होणार. ३८ वर्षे काम केल्यावर का होऊ शकत नाही. आम्हाला ५ वर्षांतून एकदा कुत्र्यांचे लायसन रिन्यू करतात तसे आम्हाला रिन्यू करावे लागते. माणसे असून, पैसे असून डेव्हलपमेंट करत नाहीत. आम्हाला लाज वाटते. ५ वेळा नगरसेवक म्हणून निवडून येऊन सुद्धा भिक मागावी लागते. तुम्हाला काम दाखवले नाहीतर मेमो मिळतो, आम्हाला काम दाखवले नाहीतर घरी बसावे लागते. कामे शंभर टक्के पूर्ण करावी लागतात. नगरसेवक म्हणून विनंती करतो. टेबल टू टेबल काम पुशअप करावे. त्याशिवाय कामे होणार नाहीत. आम्हाला परत निवडून यायचे असेल तर ज्युनिअर पासून सगळ्यांना पुश करा. सिटी इंजिनिअर यांना पुश करा. कोणाचेही सहकार्य मिळाले नाही. आयुक्तांकडे चांगले काम करण्यासाठी फॉलोअप करायला पाहीजे. त्याशिवाय काही पर्याय नाही. १५% बीलो ऑर्डर देऊ नका. ते काम करु शकत नाहीत. अनेक पार्टींना ४०% बीलो दिले तर कोणती कंपनी काम करु शकते. हे मी ऑटोक्लस्टरमध्ये सुद्धा सांगितले होते. ३५% बिलो ऑर्डर दिली तर १०% आपल्या अधिका-यांना, फक्त २५% मध्ये पार्टी सेवा पुरवते. चाळीस रुपयाचे काम एक रुपयात होणार का, होऊ शकत नाही. तो काहीतरी फायदा करणारच. इतके बीलो काम घेऊन काम होणार नाही एवढीच विनंती करतो.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, काका व मा.आर.एस.कुमार यांनी आकडेवारी मांडली आहे. सुलभाताईंनी सांगितल्याप्रमाणे उपसूचना घेणार का नाही. आम्हाला सुद्धा पक्षनेत्यांकडून आदेश आला की तुमच्या वॉर्डातील हेड ओपन करा. आकडेवारी पहा. विचार करुन फक्त समावेश करावा. वेळ आमच्यावर आलेली नाही. एक वर्षात आपण ब-याचशा मिटींग्ज् घेतल्या. अधिका-यांचे स्वभावगुण, कर्तृत्व बघितले आहे. ब-याचशा लोकांच्या प्रमोशन, बदल्या केलेल्या होत्या. ज्याला-ज्याला वाटते त्या पद्धतीने स्कॉड तयार केले आहे. माझ्या वॉर्ड़ात एकाच प्रभागात इंगळे साहेब गेले, सय्यद आले, निंबाळकर गेले कुदळे आले. प्रत्येकासाठी वेगवेगळी कॅसेट फिरवत गेली की, नवीन वॉर्ड आहे. अमुक-अमुक पद्धतीने काम केले पाहीजे. पाठपुरावा करत गेलोतरी आत्ताच सय्यद यांच्याशी चर्चा केली. त्यांना परत तीच कॅसेट सुरु केली. हे प्रकल्प राबवले पाहीजेत. बजेट चांगले सादर केलेले आहे. बरेचशे नेते आकडेवारीसंदर्भात चर्चा करतील, बोलतील. उपसूचना सुद्धा देतील. प्रभागासंदर्भात बोलायचे झाले तर आकुर्डी, तुळजाई वस्ती, दत्तवाडी प्रभागातून काम करतोय. ज्याठिकाणी आरक्षण नव्हते, तिथे दोन/चार आरक्षणे डेव्हलप व्हावीत. माझी प्रामुख्याने मागणी आहे, यासंदर्भात निश्चित पत्रव्यवहार, चर्चा केलेली आहे. अधिका-यांशी चर्चा करत असताना कळाले, जोपर्यंत जागेचा ताबा नाही तोपर्य़ंत तरतूद करुन उपयोग नाही. १० वर्षे काम करत असताना फक्त रस्ते, लाईटची व्यवस्थाच करायची का हा प्रश्न प़डला आहे. लोकांची अपेक्षा आहे. भरीव कामे करावीत. चांगली गार्डन करावी. फूटबॉल लॉन करावा. बॅडमिंटन कोर्ट करावे. काही गोष्टी टाऊन प्लॅनिंगमध्ये डेव्हलप होत नाहीत. त्यांच्याशी चर्चा करत असताना माझा आरोप नाही पण त्याठिकाणी डेव्हलपमेंट करत असताना बाकी मंजूरी नाही ती ही कामे जास्त चालतात. आमच्यासारखा नगरसेवक आरक्षणे ताब्यात येण्यासाठी काम करत असतो. अभिप्रायासाठी बराचसा वेळ लागतो. तुम्हाला सांगायची गरज नाही. कोणकोणत्या विभागांत कसे काम होते आम्हाला माहिती आहे. शहरात नगरसेवक म्हणून याठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते की, शहर चांगल्या पद्धतीने डेव्हलप होते आहे. सर्वच नगरसेवकांकडून अपेक्षा आहे चांगली डेव्हलपमेंट व्हावी. त्याप्रमाणे भाजीमंडई असू द्या, वायसीएमसारखा प्रश्न असू द्या. शहर कसे डेव्हलप व्हावे. नागरीकांना सुविधा कशा मिळतील. पीएमपीएमएल बसमधून प्रवास करणे सोप्पे कसे होईल. पार्कींगसारखा महत्वाचा विषय आहे. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. अप्पूघरसारखे सिकयुनीट रिझर्व होत नाही. ब-याचशा नगरसेवकांनी चर्चा केली. हरनामसिंग आयुक्त असताना त्यांनी त्यावेळी

गोरगरीबांसाठी हे डेव्हलप केले होते. पिंपरी चिंचवडमध्ये चांगला पिकनिक स्पॉट होईल या भावनेतून डेव्हलप झालेतरी सुद्धा ते कुठे खूप अडले आहे. त्याला ब्रेक लागेल. बरेचशे कोटी खर्च केलेतरी कोणाची अडचण माहित नाही. तुम्हीच तिथे डेव्हलप करावे. परिसरातील गोरगरीब नागरीकांसाठी एंटरटेनमेंट दिल्ली धर्तीवर होईल. आवर्जून वाटते, याठिकाणी काय बघायचे. पाहुणे मंडळी आल्यानंतर काय दाखवले पाहीजे. आमचे शहर डेव्हलप होते. एक रस्ता केलातरी मी स्वतःचे समाधान करुन घ्यायचे. २/३ नाट्यगृह केलेतरी मी खूप मोठे चांगले काम केले असे समाधान करुन घ्यायचे. बाहेर पूर्वेत गेलो तर खरोखरच वाईट वाटते. खूप मोठे प्रश्नचिन्ह पडते. साडेतीन हजार कोटी सँक्शन करत असताना या बजेटमध्ये रोड, लाईट संदर्भात चर्चा होते. मदनलाल धिंग्रा स्टेडीयम इथे कोणीतरी ते हायजॅक करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासंदर्भात पत्र दिलेले आहे. गोरगरीब विद्यार्थी, खेळाडूंना चांगले संकूल उभे करावे. आयडेंटीफीकेशन उभे करावे. अजितदादा, सर्व नगरसेवक यांचे पिंपरी चिंचवड हे मॉडेल शहर बनवण्याचे स्वप्न आहे. त्यासाठी तुमच्यासारखे कर्तृत्ववान आयुक्त आहेत. महिला बालकल्याण यात फक्त लक्ष देऊन, आमच्या सारख्यांची मागणी असताना रस्ते बांधणे, यापेक्षा दरवर्षी बाहेर देशांत नवीन प्रकल्प राबवितो. तुमच्या कारकीर्दीत कुठेतरी एक चांगला एंटरटेनिंग स्पॉट करुन आयडेंटीटी निर्माण करावी. लोक आपल्याकडे पहायला आले पाहीजेत. स्टेट लेवल, नॅशनल लेवलमधून फंड आणावेत. सिटी सेंटर सारखा प्रकल्प करतोय. तो पुढे जात नाही. अडचण काय माहिती नाही. आम्हाला पर्सनल इंटरेस्ट नाही. तुमच्या लेवलवर काय करायचे ते करा. सिटी सेंटरसारखा प्रकल्प राबवावा जेणेकरुन शहर चांगले होण्याच्या दृष्टीकोणातून पाऊल उचलावे. अप्पूघरसंदर्भात व्हिजिट करा. एवढा मोठ्ठा एरिया असताना सुद्धा डेव्हलप का करु शकत नाही. अधिकारी दिशाभूल करतात, या गोष्टीकडे लक्ष ठेवावे. हैद्राबाद, पुणे इथे बॉम्बस्फोट झाले. शहराला अतिरेक्यांचा धोका आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसवा म्हणून आरडाओरडा करत असतो. पंधरा दिवसांनंतर पुन्हा आहे तसे होते. नेते मंडळींची चर्चा झाली. चांगल्या स्पॉटमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत म्हणून ***XYZ*** मनुष्य डेमोला आला होता. त्याने सादरीकरण केले. पीसीएमसीमध्ये मोफत कॅमेरे बसवायचा प्रस्ताव ठेवला. पण त्याला सुद्धा ब्रेक लागला. याचा काय अर्थ आहे. आम्हाला त्याच्याशी देणेघेणे नाही. शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले पाहीजेत. पाण्याच्या टाकीवर सीसीटीव्ही बसवायचा सव्वा करोडचा प्रस्ताव आहे. शहरात मोफत बसवले असले तरी अडचण काय असायला पाहीजे. यात कोणताही पर्सनल

इंटरेस्ट असायची गरज काय. एक रुपया सुद्धा खर्च करायचा नाही. ड्रेनेजमधून वायर टाकून बसवायचे असलेतरी काय अडचण असलीतरी काहीच कारण नाही. कोणाचा पर्सनल इंटरेस्ट असेल नसेल सीसीटीव्ही बसवणे खूप गरजेचे आहे. मगर स्टेडीयमजवळ खेळाडूंसाठी होस्टेल बांधावे. महापौर चषक स्पर्धा, कुस्ती स्पर्धा, बॉक्सिंग स्पर्धा असे अनेक चांगले प्रकल्प राबवतो. त्यावेळी स्पर्धेत भाग घेण्यासाठी आलेल्या खेळाडूंच्या होस्टेलसाठी प्रायव्हेट प्रिमायसेसमध्ये सोय करण्यासाठी लाखो रुपये खर्च करतो. असे फुकट पैसे जात असताना तिथे होस्टेल बांधू शकत नाही का याचे आश्चर्य वाटते. गोरगरीबांना महापौर निधीतून पाच हजार मदत देतो. आपल्या हातून चांगले काम होते आहे. शहरातील गोरगरीबा रुग्णांना पाच हजार ही रक्कम खूप कमी आहे. स्टेटलेवलवर चर्चा करतोय. पाठपुरावा करतोय. गोरगरीब रुग्ण खाजगी हॉस्पीटलमध्ये गेले तर 10,000 बील येते. तीन दिवस ओपीडीत गेले तरी 10,000 बील लावतात. म्हणून पाच हजार ऐवजी दहा हजार करावेत अशी सूचना करतो. त्यांना खूप मोठे सहकार्य मिळेल. पार्कींग – रोडलेवलला भरपूर ओपन स्पेसेस आहेत. आरोग्य अधिका-यांना सुद्धा सांगितले होते. पार्कींग व टॉयलेट केले तर स्वच्छता राहील. दापोडी क्रॉस केल्यावर हायवेला एक सुद्धा टॉयलेट नाही. इमर्जन्सी फ्लशिंग होण्यासाठी सुलभच्या, स्वच्छच्या माध्यमातून का करु शकत नाही. बीआरटी, अजंठानगर रोड भरपूर प्रिमायसेस आपल्या ताब्यात आहेत. इंटर्नल परमिशन दिलीतरी लोकप्रतिनिधी यांना सुद्धा विश्वासात घ्या. मग लोकल अडचणी येणार नाहीत. आम्ही तुमच्याबरोबर डेव्हलपमेंटसाठी आहोत. कोणीही नेता असू द्या, मंगला कदम, योगेश बहल, सुलभा ऊबाळे, भाऊसाहेब भोईर असू द्या, डेव्हलपमेंट करा अशीच सगळ्यांची मागणी आहे. अजंठानगरमध्ये परिस्थीती पाहिलीतर त्याठिकाणी 15 वर्षे तसाच प्रॉब्लेम होता. माझ्या वॉर्डात व्हिजिट मारली तर तुम्ही डोक्यावर हात माराल. आतमध्ये सुलभ शौचालय नाही, गार्डन नाही, समाजमंदीर नाही, रस्ता नाही. आपण म्हणतो शहर खूप डेव्हलप झालेले आहे. अजंठानगर इथे अजिबात डेव्हलपमेंट नाही. तुमच्याकडून बरीचशी अपेक्षा आहे. स्वच्छतेसंदर्भात खूप काळजीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे. बीव्हीजी सारख्या संस्था, सुलभ शौचालय यांना कामे देऊन त्यांच्यावर कंट्रोल नाही. मागील वर्षी ड्रेनेज संदर्भात तक्रार आली नाही. टेंडर घेताना पळतात, कामे घेतात, नंतर दुर्लक्ष करतात. शहराची परिस्थीती अशीच आहे. लक्ष देणे गरजेचे आहे. तुमच्यासमोर व्यथा मांडली आहे. माझ्या वॉर्डात दोन तीन आरक्षणे ठेवलेली आहेत. ती ताब्यात मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत. टीडीआर केलातरी मोठ्या प्रमाणात

जागा ताब्यात आल्याशिवाय डेव्हलपमेंट होणार नाही. नवीन पॅनल तयार केला तरी त्यांच्यासाठी डी.सी.रुल बघूनच होतो. आपल्याकडून विषय झाला असेलतर, आपल्याकडून ओ.के. आले असेल तर जागा ताब्यात घ्यायला काय हरकत आहे. परत डी.सी. रुल बघून करायला चार चार महिने लागतात. त्यामुळे प्रॉपर्टी ताब्यात नाहीत. माझ्या वॉर्डात एकही डेव्हलपमेंट नाही. चार आरक्षणे आहेत. गार्डन करुन द्या. बॅडमिंटन कोर्ट करुन द्या. लोकांना कळू दे. निवडून आल्यानंतर काहीतरी करतो. ठोस निर्णय घेण्यासाठी कळकळीची विनंती करतो. महिला बालकल्याण विभागाबाबत मा.आर.एस.कुमार यांनी सांगितल्याप्रमाणे खूप वाईट परिस्थिती आहे. दरवर्षी शिलाई मशीनसाठी महिलांना चकरा मारायला लावतात. टेंडर काढायला देऊन टाकले पाहिजे. कोर्स करतो. अधिकारी फक्त कोड पाळतात. किरकोळ गोष्टीसाठी शिलाई मशीनसाठी महिला भगिनींना आशेला लावतो. या गोष्टी थोडक्यात कराव्यात अशी विनंती आहे. पार्कींग व टॉयलेट या गोष्टींचा विचार करावा. पीएमपीएलचा मोठा प्रश्न आपल्यासमोर आहे. माझ्या परिसरात एकही बसस्टॉप नाही. गेले 5 वर्षे बोलतोय. बीव्हीजीचा बसस्टॉप अस ईटीज आहे. ज्येष्ठ नागरिक, मुले उन्हात उभे राहतात. त्यांच्याकडे बघून खूप दया येते. तुम्ही आम्ही ए.सी. कारमधून फिरत असतो. एक दिवस आपले शहर मॉडेल शहर होईल म्हणून अभिमान वाटेल. यासाठी छोट्याछोट्या गोष्टींकडे लक्ष द्यावे. शहराची डेव्हलपमेंट व्हावी. आपल्याकडे असलेले कर्तृत्व, धमक, आम्हाला विश्वास आहे तुम्ही आम्हाला निराश करणार नाही. खेळाडूंना अभिमान वाटेल मी पिंपरी चिंचवड शहराचा खेळाडू आहे. कोणीही असलातरी त्याला वाटेल मी पिंपरी चिंचवड शहराचा नागरिक आहे. दोन वर्षांत ते फुलफील व्हावे. बंड साहेब ग्रेड सेपरेटर करुन गेलेतर लोकांनी विचारल्यावर त्यांचे नाव घेतो. पुढे सभागृहात असो नसो, तुमचे नाव भविष्यात सभागृहात घेण्यात यावे अशी विनंती आहे. मला बोलायला संधी दिलीत त्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, २०१३-२०१४ या वर्षाच्या अंदाजपत्रकावर सभागृहात चर्चा होत असताना काही नगरसेवकांनी सूचना मांडली. हे अंदाजपत्रक नागरीकांच्या कररुपी पैशातून जमा होणा-या पैशाचा, उत्पन्नाचा विनियोग नेमका कशा पद्धतीने केला जाणार त्याचे पुढील वर्षात नियोजन काय करणार याचे चित्र या अंदाजपत्रकात आहे. आयुक्त साहेबांनी पदभार स्विकारल्यानंतर प्रशासनावरील वचक व घेतलेल अनेक चांगले निर्णय यामुळे नागरीकांच्या अपेक्षा उंचावल्या

आहेत. महापालिका स्थापनेपासून १५ वर्षांत लेखापरिक्षण झाले नव्हते. उच्च न्यायालयात जेव्हा ही बाब निर्णयाला आली, त्यांना आश्यर्य वाटले. महापालिकेचे कामकाज कसे चालते, ती बरखास्त का करु नये असे विचारलेले आहे. लेखापरिक्षण झाल्यावर ३५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले. आत्ता सुद्धा कोट्यावधींची कागदपत्रे गहाळ आहेत. हा सर्व गैरव्यवहार पालिकेला मिळणा-या नागरीकांच्या पैशांतून झालेला आहे. नवीन आर्थिक वर्ष संपले. अंदाजपत्रक सभागृहापुढे आले. स्थापनेपासून नागरीकांचा कररुपी पैसा लेखापरीक्षणातून ३५० कोटींचा गैरव्यवहार उघडकीस आला. आजही दोषी अधिका-यांवर कारवाई झालेली नाही. दरवर्षी अंदाजपत्रक मार्गी लावताना अधिकारांचा दुरुपयोग करुन सदर अंदाजपत्रकाची अंमलबजावणी माध्यमातून मनमानी, अनागोंदी कारभार केला यावर कारवाई काय होणार याचा खुलासा करावा हा प्रश्न आहे. शहरातील नागरीकांना विकासाचे जे खोटे रुप कित्येक वर्षे दाखवले, प्रथम आमची मागणी आहे, ३५० कोटींचा गैरव्यवहार त्याची कागदपत्रे गहाळ आहेत, त्याची चौकशी करावी. अधिका-यांवर कारवाई करावी अशी मागणी आहे.

**मा.राजेंद्र काटे** – मा.महापौर साहेब, अंदाजपत्रकावर चर्चा होत असताना शहर पातळीवर बोलत नाही. आयुक्त साहेबांच्या बोलण्यात आले आहे. नवीन कामांना चांगले बजेट मिळाले. पिंपरी चिंचवडमधील १८ गावांपैकी दापोडी एक गाव आहे. अनेक सुविधा अपूर्ण स्वरुपात इथे आहेत. डी.पी. पाहीलातर एकूण क्षेत्रापैकी ६० ते ६५% आरक्षण इथे आहे. आरक्षणे ताब्यात घेतली नाहीत, काही करत नाहीत. कमीत कमी आरक्षणे तरी ताब्यात घ्यावीत. सुविधा दिल्या असतील, बजेटमध्ये तरतूद केली असेल तर एकत्रित पाहीले तर दापोडी भागात सध्या मोठ्या प्रमाणात आरक्षण टाकले आहे. ते ताब्यात घेऊन घोषणा करण्यासाठी या बजेटमध्ये प्रयत्न व्हायला पाहीजे होते. मागील वर्षी बजेटवर, पाणी प्रश्नावर बोललो असेल तर पाण्याच्या टाकीची आवश्यकता आहे. याबाबत दादांच्या मिटींगमध्ये विषय झालातरी इथे अनेक वेळा विषय होऊन सुद्धा काम पूर्ण नाही. पाण्याच्या टाकीचा इथे तीन प्रभागांत उपयोग होणार आहे. ६१,६२,६४ इथे तीन प्रभागांत टाकीचे पाणी जाणार आहे. जागा ताब्यात असताना याला बजेट नाही हे विशेष आहे. संपवेल योजनेसाठी १६ लाखांची तरतूद दिलेली आहे. मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा.संजय काटे, मा.रोहीत काटे यांना विचारले, तिथे पाण्याची आवश्यकता काय आहे. बाकी तरतूद करणार नसाल तर पुन्हा वर्षभर त्यांनी सहन करायचे का? आरक्षणे ताब्यात

घेत असताना खेळाच्या मैदानाचे आरक्षण ताब्यात आहे, पण त्यासाठी तरतूद नाही. नागरीकांना फक्त कर भरायचा. वर्षभर वाट बघायची का? प्रत्यक्ष स्वरुपात विचार केलातरी पी.डब्ल्यू.डी., एस.टी.चा तिथे वर्कशॉप आहे. महापालिकेला कर स्वरुपात पैसा मिळत असतो. त्यांनी कर भरायचा मग त्यांना सुखसुविधा नको का? आकडेवारीवरुन अनेक गोष्टी दिसत आहेत. माझ्या लक्षात आहे, बारीक विचार केलातर फक्त १ कोटी पुरणार आहेत का? अनेक वेळा पत्रव्यवहार केला. इथे पाण्याच्या टाकीची गरज खरेच आहे का नाही? ड्रेनेजचे काम पाहीले तर, सातत्याने पाहीले तर आतमध्ये काम सविस्तर करत नाहीत. बजेट कशासाठी करतो? याठिकाणी गेले ५ वर्षांत अनेक जागा ताब्यात घेतल्या आहेत, त्या जागा मालकांना मोबदला दिला गेलेला नाही. त्यांचा विचार व्हायला पाहीजे आहे. इथला डिपी. पहायला घेतला तर एवढा कलरफुल डी.पी कोणाचा नसेल. उपसूचना घेऊन दुरुस्ती करण्यात आली असली तरी दापोडीकरांवर मोठा अन्याय होणार आहे. सगळ्या सुविधा मिळाल्यातर करदाता खुशीने कर भरेल, कर वाढवेल त्या रेटने तो द्यायला तयार आहे. आम्हाला काही मिळणार नसेल तर त्यांचा विचार कोण करणार? कोटींचे बजेट आहे. जलपर्णी काढायचे छोटेसे टेंडर दिले होते. संध्याकाळी एक चक्कर मारा. १० मिनिटे एका ठिकाणी उभे रहा. मच्छर चालू होतात. जलपर्णीकडे दुर्लक्ष का करतो. शहराच्या आरोग्याच्या दृष्टीने विचार करा. एवढे दुर्लक्ष का आहे. पवना नदीत व्हिडोओ कॅमेरा चालू केला, तिथे अजूनही पाला मोठ्या प्रमाणात आहे. मोठ्या प्रमाणात मच्छर आहेत. लहानांपासून मोठ्यांना आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही गोष्टी नजरेत आणून दिलेल्या आहेत. माझ्या प्रभागाबद्दल महत्वाचा विषय आहे. पाण्याची टाकी अत्यावश्यक आहे. गेली ३५ वर्षांपासून फेस करतोय. आमच्या लोकांना दुखणे माहिती आहे, त्यासाठी तिथे तरतूद करण्यात यावी.

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा १३ वा अर्थसंकल्प आमच्यासमोर आला असताना शहरात विविध प्रोजेक्टस् मोठ्या प्रमाणात झाले आहेत. भविष्यातही होतील. याप्रसंगी हा अर्थसंकल्प खरोखर चांगला आहे. त्याचे अभिनंदन करावेसे वाटते. सर्वसामान्य नागरीकांना यातून काय जास्त चांगले देऊ शकतो. खरेतर सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे महिला बालकल्याण योजनेअंतर्गत महिलांना लघु उद्योगांसाठी चालना मिळावी म्हणून वेगवेगळ्या योजना आखल्या आहेत. गेली कित्येक वर्षे या योजना बंद आहेत. बचत गटांना

प्राधान्य देता येईल. शहरात चांगल्या रितीने बचत गटांतील महिलांना पाठबळ देण्यासाठी, आर्थिक सक्षम होण्यासाठी चांगली योजना आणावी अशी विनंती करेल. निश्चितच महिला स्वच्छतागृहांचा प्रश्न ऐरणीवर मांडला आहे. गेल्या वर्षी सुद्धा मागणी केली होती, शहरात कुठेच स्वच्छतागृहे नाहीत. शहराची चांगली वाटचाल होत असताना महिला बालकल्याण विभागाला त्यांचे दुःख समजत नाही. त्या-त्या वर्षांत योजनांची अनुदाने लाभार्थ्यांना मिळत नाहीत. आम्हाला सुद्धा लोकांना तोंड द्यावे लागते. आधार कार्डाची समस्या अजूनही तशीच आहे. आधार कार्ड नागरीकांना पेन्शनसाठी लागते. नागरीकांच्या समस्या लक्षात घेऊन त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कसा मार्गी लावता येईल. रोजच्या समस्यांसाठी सर्व नगरसेवक-नगरसेविकांना लोकांसमोर जावे लागते. त्यासाठी प्राध्यान्य देण्यात यावे. घरकूल योजना झोपडपट्टी पुनर्वसन योजना असेल, आग लागल्यावर अग्निशामक विभागाचे महत्व लक्षात येते. संपूर्ण शहरी भागात एक अग्निशामकची गाडी असणार, त्याचे विभाग असणे महत्वाचे आहे. चिंचवड गावामध्ये आग लागली तर संत तुकाराम नगर मधून अग्निशामकची गाडी येण्यासाठी किती वेळ जाणार. याकरिता शहरामध्ये विविध ठिकाणी अग्निशामक केंद्रे असावीत, ही सर्वात मोठी आवश्यक बाब आहे. हॉस्पीटल असेल, पाण्याची समस्या असेल, पाण्याची समस्या ही महिलांची मोठी समस्या आहे. आता उन्हाळा आला आहे. राज्यावर दुष्काळाचे सावट आहे. गावाकडून शहरात माणसांचे लोंढे येतात. त्यांच्यासाठी काय तरतूद केलेली आहे. शहरात पाणी गळती आहे. पाणी गळती थांबवलीतर निश्चित उपयोग होईल. नदी सुधारणा प्रकल्प – त्याची आजची परिस्थीती पाहीली तर नदीत जलपर्णी का जलपर्णीत नदी असे इथे प्रथमच बघतेय. डासांचा त्रास वाढला आहे. आजची परिस्थीती भयानक आहे. आधार कार्ड, कचरा समस्या, डासांची समस्या या रोजच्या समस्या आहेत. याकडे प्राधान्याने बघितले जावे. पिंपरी चिंचवड हे आगळेवेगळे शहर हे. भविष्यात चांगला आलेख निर्माण होणार आहे. नागरीकांच्या समस्यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. महिलांसाठी समोपदेशन केंद्राची आवश्यकता आहे. त्यांची परिस्थीती बघितली तर शहरात याला प्राधान्य देण्यात यावे. भविष्यात शहरात हा प्रोजेक्ट मार्गी लागेल हा विश्वास व्यक्त करते व माझे दोन शब्द संपवते.

**मा.शेखर ओव्हाळ** – मा.महापौर साहेब, मला महत्वाच्या विषयावर बोलायचे आहे. माझ्या वॉर्डात काळा खडक झोपडपट्टीत अंडरग्राऊंड पाईपलाईन एका पोलवर लाईट शॉर्ट सर्कीट झाल्यामुळे बरीच घरे जळाली. तुम्ही व्हिजिट द्या. नेसत्या कपड्यानिशी

लोक घराबाहेर पडले. दुर्दैवी घटना घडली आहे. लोकांना कसा प्रॉब्लेम होतो. आजच घटना घडली आहे, तुम्ही जाऊन आलात तर कळेल. लोक अक्षरशः रडत होते. बघून आल्यावर कळेल झोपडपट्टीतले लोक कसे राहतात. जायला-यायला रस्ता आहे का. जरी गावे महापालिकेत समाविष्ट आहेत, त्यांना आज नाही उद्या तरी काहीतरी मिळेल. गेल्यावर्षी साहेबांनी व्हिजिट दिलीतर चांगल्या प्रकारे रस्ता झाला. लोकांना खुशी झाली. तुमचे खरोखरच आभार आहे. पुन्हा व्हिजिट द्या, खरोखरच लोकांच्या अपेक्षा चांगल्या प्रकारे पूर्ण होतात.

**मा.राहूल जाधव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब यांचे आभार मानतो. समाविष्ट गावांना जास्त प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिली. त्याबद्दर पहिल्यांदा अभिनंदन करतो. समाविष्ट गावांत विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध आहेत. गट नंबर ५३९ मध्ये ८५ एकरचे गायरान आहे. प्राधिकरणाकडे आहे. महापालिकेकडे हस्तांतरीत केले तर तिथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडीयम होऊ शकते. समाविष्ट गावे असल्यामुळे तिथे शेतकरी आहेत. माझी विनंती आहे की, अधिकारी शेतक-यांना चार गोष्टी समजून सांगतील तर या आरक्षणाच्या जागा महापालिकेच्या ताब्यात येऊ शकतील. ज्याप्रमाणे आपण निधी वाढवून दिलेला आहे. समाविष्ट गावांतील जागांची व्यवस्थितरित्या विल्हेवाट लागेल, त्यांचा चांगला विकास होईल. अधिका-यांनी व्यवस्थित समजून सांगणे महत्वाचे आहे. त्याचप्रकारे गार्डनचा विषय आहे. समाविष्ट गावांतील प्रभागांत एकही गार्डन नाही. खेळाच्या मैदानाची आवश्यकता आहे. गट नंबर ५३९ मध्ये मोठ्या प्रमाणात जागा आहे. माझ्या प्रभागात ४२ आरक्षणे आहेत. आरक्षण बदलून तिथे हॉस्पीटल निर्माण करावे. वायसीएमसारखे हॉस्पीटल होऊ शकेल. जेणेकरुन रोजच्या रोज हॉस्पीटलमध्ये डिलिव्हरी होतील. महिला, माता-भगिनींचे हाल होणार नाहीत ही विनंती आहे. कुदळवाडीतील शाळेचा विषय एक वर्षापासून मांडतोय. आजपर्यंत जिल्हा परिषदेची शाळेत आमचे विद्यार्थी जातात. लवकरात लवकर इमारत मोठी करुन तिथे शाळा उभारावी अशी विनंती करतो. प्राधिकरणाच्या ओपन स्पेसवर भाजी मंडई व खेळाचे मैदान होऊ शकते. महापालिकेकडे ओपन स्पेस हस्तांतरीत करुन भाजी मंडई, खेळाचे मैदान, छोटेसे हॉस्पीटल होईल. आपल्याकडे मागणी करतो. त्याचप्रमाणे कुदळवाडी हा कामगारांचा एरिया ओळखला जातो. सोळा दिवसांपूर्वी तिथे आग लागली होती. तिथे अग्निशामक केंद्र उभारणे खूप गरजेचे आहे. जागा सुद्धा आहे. तीन वर्षांपासून अग्निशामक केंद्राची मागणी करतोय. ते

होऊ शकले नाही. ते उभारावे अशी विनंती करतो. नैसर्गिक ओढ्याची परिस्थिती पाहीलीतर, त्यात छोटछोट्या वर्कशॉपचे केमिकल जाते. पाणी पूर्णपणे काळे होऊन ते पुढे इंद्रायणी नदीत जाते. इंद्रायणी नदीची परिस्थीती एवढी खराब आहे. हेच पाणी आळंदी तिर्थक्षेत्र इथे जाते. तिर्थ म्हणून लोक ते पाणी पितात. उद्योजकांवर पर्यावरण विभागाने योग्य प्रकारे कारवाई करावी अशी मागणी आपल्याकडे करतो. अ प्रभागात स्थापत्य विभागात व्हिजिट केली. कनिष्ठ अभियंता यांच्या बदल्या केल्या. नगरसेवकांची मागणी आहे, त्याप्रमाणे उपअभियंता यांच्या बदल्या केल्या. आमची मागणी आहे. इंगळे साहेब मेन कॅप्टन यांची बदली केली. सय्यद साहेब टिमचे सचिन तेंडूलकर आहेत, ते ८ महिन्यात रिटायर्ड होतील. आम्ही नक्की न्याय कोणाकडे मागायचा. या अधिका-यांना प्रभागांची माहिती आहे, तेवढी नवीन अधिका-यंना माहिती नाही. त्यांनी लवकरात लवकर माहिती करुन घेऊन समाविष्ट गावे असल्यामुळे परिस्थिती जाणून घेणे खूप महत्वाचे आहे. सात कलमी कार्यक्रमाचे पत्रक काढले, त्याचा समाविष्ट गावांना काही फायदा नाही. ग्राऊंड नाही, गार्डन नाही. याच्यासाठी काय ती मागणी करतो. समाविष्ट गावांना निधी दिलेला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आभार व्यक्त करतो. जयहिंद, जय महाराष्ट्र*!*

**मा.अश्विनी मराठे** – मा.महापौर साहेब, सर्वप्रथम २०१३-१४ चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. आयुक्तसाहेब, तुमचे अभिनंदन करु इच्छिते. बीआरटीएस मधील खर्चाची कपात केलीतर बजेट कमी झालेले आहे. शास्ती कराबद्दल नागरिकांमध्ये खूप संभ्रम आहे. प्रत्येक वेळी नागरिक आमच्याकडे येऊन विचारणा करत असतात. शास्तीकर भरुन त्यांची बांधकामे अधिकृत होणार का नाही, त्याबद्दल नागरिकांमध्ये माहिती असायला पाहीजे. ४० ते ५०,००० कर आलेला आहे. तो भरायला मुश्किल झालेली आहे. एवढे भरुन सुद्धा घर अनधिकृत रहात असेल तर त्याचा काही फायदा होणार नाही. किती वर्षे कर भरावा लागेल, ते क्लिअर असले पाहीजे. अनधिकृत बांधकाम होईल. ते भरावयाचा प्रयत्न करतील. प्रत्येक वेळी ही तक्रार माझ्याकडे येत असते. स्वच्छतागृहासाठी सदस्यांनी आधी सूचना दिली होती. माझे म्हणणे आहे, स्वच्छतागृह असायला पाहीजे. कमीत कमी पैसे घेऊन स्वच्छता करु शकतो. त्याचा पाच/दहा रुपयांचा फायदा होईल व स्वच्छता सुद्धा राहील एवढी विनंती आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृहामध्ये सन २०१३-२०१४ चे बजेट डॉ.आयुक्तांनी सादर केले आहे. निश्चितच ऑपरेशन चांगले केलेले आहे. काही ठिकाणी टाके घालायचे राहिले आहेत. तेवढ्या सूचना करणार आहे. बजेट सादर करताना ज्यावेळी स्थायी समितीत सादर केले. त्याआधी १० ते १५ दिवस आधी बजेटचे माहिती पुस्तिका मिळणे अपेक्षित होते. ते मागावे लागले, परंतू ते मिळाले नाही. भोसले साहेबांकडून घ्यावे लागले. शनिवारी आम्हाला दिले. वाचल्यानंतर असे लक्षात आले की, ब-याचशा त्रुटी आल्या आहेत. काही विभागांची माहिती घ्यायची आहे. जेणेकरुन सभागृहात बोलताना आकडेवारीच्या संदर्भात चूक व्हायला नको. विभाग प्रमुखांना माहिती मागविली तर विभागप्रमुखांनी हात वर केले. या बजेटच्या पुस्तकाच्या झेरॉक्सचे एकच पान द्यायचे. मागील वर्षी काय खर्च केला, कसा खर्च करणार आहोत हे बजेटमध्ये दिलेले आहे. ते म्हणायला अवाढव्य आहे. आयुक्तांनी एका पानावर बजेट मंजूर केले. आयुक्त साहेबांकडे गेलो, हेड सांगितला, रक्कम सांगितली व आयुक्त साहेबांनी मंजूर केले. माहिती घेतल्यानंतर लक्षात आले विभाग प्रमुखांना त्यांनी विश्वासात घेतले नाही. काहीं अधिकारी म्हणतात, एक आठवड्यानंतर माहिती देतो. खास करुन उल्लेख करते तो श्री.सतिश कुलकर्णी यांचा, त्यांच्याकडे माहिती मागितली/मागिल दोन वर्षांत काय खर्च केला, आत्ता काय करणार याचे सुद्धा बायफरकेशन द्या. हो म्हणायला काय देणार. तुम्ही आत्ताच फोन केला, पुस्तक छापून आले आहे व तुम्ही ते आत्ता द्या. तुमच्याकडे फाईल तयार असली पाहीजे. इतक्या तुटक शब्दांत ते म्हणाले, आत्ताच फोन केला आहे, आत्ताच कसे काय मागता. स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. तुम्ही महापालिका सभेत मान्यता दिली पाहीजे. सोमवार उजाडला, हो नाही करत करत, त्यांचा लेखापाल लवकर घरी गेला. तो सापडला नाही. अक्षरशः सगळ्या विभागांच्या दारात जाऊन दारोदार जाऊन माहिती गोळा करावी लागली. मला व्यक्तिशः वाटते, आपण चांगले काम करता. आम्ही खेटे घालतो यावर साहेब आपला अंकुश असला पाहीजे. अधिका-यांकडे येऊन तरतूदीसंदर्भात कसलीही माहिती विचारली तर ती तुमच्याकडे रेडी असली पाहीजे. तसे होत नाही. या दोन दिवसांत टाळाटाळीचा प्रकार अनुभवला आहे. मा.महापौर साहेब, बीपीएमसी ॲक्ट मध्ये तरतूद आहे. बजेटची माहिती यासंदर्भात बजेटचे पुस्तक ८ ते १० दिवस अगोदर दाखवले पाहिजे. परंतू ते तीन दिवस आधी दिले गेल्यामुळे यावर काय बोलायचे हा खरा प्रश्न आहे. आम्ही अज्ञानी आहोत. आमचे ज्ञान खूप कमी आहे. दोन अधिक दोन चार होतात हे कळत नाही. काही लोक हुशार आहेत. काही

लोकांना प्रॉब्लेम नसलातरी निश्चितच आम्हाला फार मोठे प्रोब्लेम आहेत. मा.महापौर साहेब, २०१०-२०११ चे महापालिकेचे उत्पन्न सुमारे १३१६ कोटी होते. त्यामध्ये आत्ता फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. जवळपास सातशे कोटीने उत्पन्न वाढले आहे. म्हणून बजेट सुद्धा वाढले आहे. जकात, करसंकलन व बांधकाम परवाना या तीन विभागांकडून ८५ टक्के उत्पन्न मिळाले आहे. जकात विभागाचे मुंढे साहेब अत्यंत चांगले काम करतात. असा सक्षम अधिकारी किती काळ महापालिकेत राहणार हा प्रश्न आहे. ते प्रतिनियुक्तीवर आले आहेत. आज उद्या त्यांना परत जावे लागेल. १ एप्रिल पासून एलबीटी लागू करतोय. त्यावेळी मुंढे साहेब असणार किंवा नसणार हा मोठा प्रश्न आहे. त्यांनी जावे अशी माझी इच्छा नाही. नियमाप्रमाणे त्यांना जावे लागेल. जकात विभागाने चांगले काम केल्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात ४०० ते ५०० कोटींची वाढ झाली. मी नगरसेविका झाल्यापासून ७५० कोटींवरुन १२०० कोटींवर उत्पन्न गेले आहे. त्यांनी अतिशय चांगले काम केलेले आहे. तत्कालीन आयुक्त शर्मा यांनी मुंढे साहेबांना दिलेला फ्री हॅंड, वेळोवेळी आपण त्यांचे पाठीशी उभे राहीलात म्हणून याठिकाणी मुंढे साहेबांचे मी अभिनंदन करते. एलबीटीच्या आधारे हे बजेट तयार केलेले आहे. आजच्या पेपरमध्ये वाचले, आपल्या कामगार संघटनेचे पदाधिकारी हायकोर्टात जाणार आहेत. इतर महापालिकांत सर्वच न्यायालयात गेल्यामुळे एलबीटी उद्या लागू झाली नाही तर काय? जकात चालू ठेवणार का किंवा एलबीटीसाठी प्रयत्न करणार का? याचा विचार होणे फार गरजेचे आहे. करसंकलन विभागाने अतिशय चांगले काम केलेले आहे. सन २००९-२०१० साली यांचे उत्पन्न १०० ते १२५ कोटी होते. ते २०१२-२०१३ मध्ये २५० कोटींवर आलेले आहे. यात सूचना कराविशी वाटते, जुने बांधकाम आहे. पुर्वी १ मजला होता आता तीन मजली इमारती झाल्या आहेत. परंतू त्यावर घरपटटी लावली जात नाही. याचे वार्षिक सर्वेक्षण केले पाहीजे. उत्पन्नाचे स्त्रोत वाढण्यासाठी दोन/तीन विभागांकडून खरोखरच उत्पन्न वाढू शकते. अशा मिळकतीवर आपण लक्ष ठेवून त्यांच्यावर वार्षिक सर्वेक्षण केले तर निश्चित वाढ होणार आहे. ब-याचशा शैक्षणिक संस्था कोर्टात गेलेल्या आहेत. हजारो कोटींचा कर संकलन विभागाचा टॅक्स पेंडींग आहे. त्यात समक्ष लक्ष घालून विषय मार्गी लावला पाहीजे. बांधकाम परवानगी विभागाने अतिशय चांगले काम केलेले आहे. ४० ते ५० टक्के महसूल मिळवून दिला आहे. त्याचा तपशील विभागाकडून घेतला आहे. बांधकाम परवाना व विकास शुल्क यातून १६०० कोटी अपेक्षित असून प्रशमन शुल्कातून ४० ते ५० कोटी अपेक्षित आहेत. इमारतीचा जिना, पोटमाळा

विनापरवाना बांधला असेल तर दंडाची रक्कम वेगळी लागेल. ती वाढवली पाहीजे. विकास शुल्कात वेगवेगळे स्लॉट न ठेवता दंड विकास शुल्क व प्रशमन शुल्क एकच केलेले पाहिजे. खरा घोळ तिथेच आहे. प्रशमन शुल्काला सभागृहाने मान्यता दिलेली आहे. परंतू दंडाचे काय? जे.ई. मोजणी करतो. इमारतीचे बांधकाम करताना हजार फुटांच्या जागेवर दीड हजार फुटांचे बांधकाम केलेतर, अनधिकृत बांधकाम केले असेल तर त्या त्या विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडे पर्मिसिबल ठेका असतो. तिथे मोठ्या प्रमाणात करप्शन होण्याचे ठिकाण आहे. हे वेगवेगळे केले तर खूप चांगले होईल. या विभागाचे सुद्धा अभिनंदन करते. त्यांनी खूप चांगले काम केलेले आहे. पाणीपट्टी हा उत्पन्नाचा एक स्त्रोत आहे. २०११ मध्ये ५१ कोटी उत्पन्न होते. २०११-२०१२ मध्ये निवडणूका असल्यामुळे पाणीपुरवठा विभागाने पाणीपटटी बाबत पुर्णपणे कानाडोळा केला होता. यावेळी २० कोटी उत्पन्न घटले होते. ३१ कोटी रुपयाची फक्त वसुली झाली होती. २०१२-१३ मध्ये ४९ कोटी अपेक्षित वसूली आहे. २०१३-१४ साठी ५८ कोटींचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे हे आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. घरपट्टीतून उत्पन्न वाढत असताना पाणीपट्टीचे उत्पन्न काही प्रमाणात तरी वाढले पाहीजे. असे होताना दिसत नाही. घर बांधताना नळ कनेक्शन घ्यायची वेळ येतेच. इथे नक्कीच काहीतरी चुकते आहे. एकूण मिळकतींचे प्रमाण वाढलेतर आपोआप नळ कनेक्शनचे सुद्धा वाढणार. तरीसुद्धा विसंगत अवस्था का आहे हा न समजणारा विषय आहे. गेल्या चार वर्षात दोन्ही प्रकारची हजारो अनधिकृत व अधिकृत बांधकामे झाली. त्यांना पाणी लागणार. ते कुठून आणले? हजारो नळ कनेक्शन त्यांनी पाणी कुठून आणले? त्यांनी आपल्याकडून पाणी घेतले असेल तर पाणीपट्टी वाढली पाहीजे, ती वाढली नाही. तिथे सुद्धा साटेलोटे झालेले आहे. इंद्रायणीनगरमध्ये प्राधिकरण असल्यामुळे विसावलेला भाग आहे. टाकी सुरु करुन मोठ्या बिल्डरला पॉवर लाईन दिलेल्या आहेत. त्यांना २४ तास पाणी असते. दोन्ही बांधकामे अधिकृत किंवा अनधिकृत झाली आहेत, त्यांना महापालिकेचे कर्मचारी व बिल्डर मिळून परस्पर नळ जोड देतात. परिणामी नागरिक मीटर बसवून घेतो. मीटरचे पैसे भरावेत म्हणून तगादा लावतात. जो चोरी करतो त्याला सुद्धा कुठेतरी शास्ती झाली पाहीजे, दंड झाला पाहीजे. याव्यतिरिक्त महापालिकेच्या भूमि आणि जिंदगी विभागाला अतिशय चांगला अधिकारी दिलेला आहे. पवार साहेबांकडून खुप अपेक्षा आहेत. उत्पन्न वाढणार. करसंकलनमध्ये सुद्धा त्यांनी चांगले काम केले आहे. वार्षिक सर्वेक्षण केले पाहीजे. महानगरपालिकेच्या मिळकती आहेत त्या अत्यंत अल्प दराने भाडयाने दिल्या

आहेत. त्यांचे वार्षिक सर्वेक्षण केलेतर निश्चितपणे आपोआप उत्पन्न वाढू शकेल. आकाशचिन्ह परवाना विभाग म्हणजे थेंबे थेंबे तळे साचे. निश्चितपणे इथे उत्पन्नात भर पडेल. विभागप्रमुख बदलले म्हणून खरेतर हा विभाग झोपलेला आहे. मा.सतिश कुलकर्णी यांच्या चांगल्या कामाचे सुद्धा कौतुक करावे. जास्तीत जास्त चांगले निर्णय घेण्याची त्यांची क्षमता चांगली आहे. याठिकाणी अधिकृत फ्लेक्स लावण्याचे नियम सुटसुटीत केलेतर अधिकृत फ्लेक्स लावल्यानंतर उत्पन्नात चांगला फरक पडू शकतो. उद्योगधंदा परवाना विभागाचे एच.ओ.डी. यांना सूचना करावी. त्यांचे कर्मचारी कायम बोकळलेले असतात. त्यांच्याकडे सुद्धा लक्ष द्यावे. महापालिकेत जमा होणारा एक एक रुपया कसा खर्च होणार याचे बजेट मांडण्यात आले आहे. या बजेटमध्ये बीआरटीएस, जेएनएनयूआरएम करिता १०५३ कोटी रुपयांचे बजेट मांडले गेले. श्री.राजन पाटील यांच्याकडे हे काम आहे. आयुक्त तुम्ही स्वतः होऊन हा चार्ज दिलेला आहे. १०५३ कोटींची कामे त्यांना एकट्यांना दिलेली आहेत. महापालिकेत ते एकच सक्षम अधिकारी आहेत असे मला वाटायला लागले आहे. खरेतर महापालिकेचे श्री.राजन पाटील जेएनएनयूआरएमचे काम पाहतात. २००७ पासून मी सुद्धा इथे आहे. तुम्ही केलेले तुमचे सगळे प्रकल्प फसलेले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी २६९ कोटींची तरतूद करण्यात आली. वेताळनगर, मिलिंदनगर, सेक्टर २२, पत्राशेड लिंग रोड याचा यात समावेश आहे. याठिकाणी लिंकरोडचा प्रकल्प हा एकच वेगळा फ्लॅट पद्धतीने प्रकल्प झालेला आहे. सेक्टर २२ तिथे रेड झोनचा नकाशा आहे. याठिकाणी असणारे जेएनएनयूआरएमचे सल्लागार नेमले आहेत ते अत्यंत बोगस आहेत. त्यांना लाथा मारुन बाहेर काढले पाहीजे. त्यांना १००/१२५ कोटींचे काम दिले आहे. पी.ए. वसूल केलेला आहे. त्यामुळे आपले प्रकल्प फसलेले आहेत. डिसेंबर २००७ मध्ये वर्क ऑर्डर दिल्यानंतर ६ वर्षे झाली, ३०% सुद्धा काम झालेले नाही. प्रत्येक प्रभागामध्ये काही ना काही अडचणी आहेत. सल्लागार नेमले आहेत, त्यांचे हितसंबंधी अधिकारीच आहेत. अकार्यक्षम अधिकारी व हवेत असणारे सल्लागार यांच्या एकाधिकारीशाहीमुळे प्रकल्प थांबलेले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत १८,७०० गाळे बांधलेले आहेत. त्यापैकी सेक्टर २२ मध्ये ७७०० गाळे बांधणार आहोत. ते बांधू शकणार आहोत का नाही. उच्च न्यायालयात आपल्या बाजूने निर्णय दिला तरी नक्कीच आनंद असणार आहे. उर्वरीत ६५% झोपडपट्टी पुनर्वसन होणे याठिकाणी शक्य नाही. २००७ मध्ये वेताळनगर, मिलिंदनगरच्या वर्कऑर्डर दिल्यातरी आजही ३०% सुद्धा काम पूर्ण झालेले नाही. माहित नाही. जेएनएनयूआरएमची फेज १ संपली आहे. म्हणून

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी केलेली २३९ कोटींची तरतूद पूर्णतः फसलेली आहे. त्याप्रमाणे घरकुल योजनेसाठी ५७ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. चिखली येथील सेक्टर १७ मध्ये ६७२० सदनिका बांधायचे काम चालू आहे. जागा दुस-याची बांधकाम आपण केले, यात सुद्धा संबंधित सल्लागारच आहे. आपले हजारो कोटींचे प्रोजेक्ट बसवून ठेवले आहेत. त्याला १०० कोटींचा दंड का मारत नाही. फेब्रुवारी २००९ मध्ये वर्क ऑर्डर देऊन सुद्धा आजपर्यंत ६० सदनिकांचे काम चालू आहे. २१८ सदनिका बांधून तयार आहेत. अजूनही प्राधिकरणाला देणे बाकी आहे. कंप्लिशन मिळत नाही म्हणून आपण देऊ शकत नाही. २.५ एफ.एस.आय.चा प्रश्न अजून सुटलेला नाही. च-होली, डुडुळगाव इथे ११३४ सदनिका बांधायचे नियोजन आहे. आत्तापर्यंत टप्पा २ साठी पर्यावरण विभागाचे काम चालू होण्यासाठी पूर्वपरवानगीसाठी अर्ज दाखल केलेला नाही. म्हणून काम सुरु करु शकत नाही. का नाही याबद्दल साशंकता आहे. केलेली २०५.६० कोटी तरतूद फसली आहे. पाणीपुरवठा टप्पा क्रमांक १ बंद पाईपलाईन योजना अक्षरशः रखडली आहे. ६ कि.मी.ची लाईन टाकली आहे. शहर हद्दीत पुढे काही करु शकलो नाहीतर ठेकेदार दिलेले १००/१२५ कोटी बीनव्याजी वापरतोय. परत कोर्टात सुद्धा जातोय. त्याला डिसक्वालिफाय केले पाहीजे तर त्याला क्वालिफाय केलेले आहे. ठेकेदाराची मागील हिस्टरी सुद्धा बघितली पाहीजे. यात कोणकोण सामील आहेत. घाई का केली. शहराला इथे बंद पाईप योजनेची आवश्यकता असताना मावळामध्ये शेतक-यांवर झालेला गोळीबार यामुळे ही योजना पूर्णपणे फसलेली आहे. २३९ कोटींची तरतूद निकामी झालेली आहे. दुसरा प्रकल्प बीआरटीएस राबवतोय. मुंबई-पुणे रस्ता ७० कोटी, औंध-रावेत रस्ता ४५ कोटी, आळंदी-वाकड रस्ता २० कोटी, एसयुटीपी १४ कोटी अशी २१९ कोटींची तरतूद केलेली आहे. मुंबई-पुणे रस्ता करताना बीआरटीएसचे डिजाईन चुकले आहे. कोणताही अभ्यास न करता घाईघाईने विषय आलेला असल्यामुळे घाईघाईने आपण काम केले आहे. त्याचा विचार आपल्याला करावा लागणार आहे. याचे प्रेझेंटेशन आपल्याला दिलेले आहे. याचे प्रेझेंटेशन दिलेले नाही. बीआरटीएस राबवताना बससाठी जाताना जो मार्ग आऊट ठेवला आहे, त्यात अनेकांचा बळी जाणार आहे. नागरीकांच्या जिवीताची काळजी घेणे आपले काम आहे. यावर उपाययोजना सूचवल्या तर त्यावर विचार करा. नाहीतर हा प्रोजेक्ट करा असे सांगितले तरी याठिकाणी देहू-आळंदी रोड, काळेवाडी फाटा उड्डाणपूलाचे काम किती वर्षे रखडलेले आहे. काळेवाडी फाट्याचे भूसंपादनाचे काम झालेले आहे. प्रोजेक्ट चालू केलेला आहे. बीआरटीएसचे चालू प्रोजेक्ट थांबवतात. भूसंपादन

कारवाई आधी केली पाहीजे नाहीतर प्रोजेक्ट तरी पूर्ण केला पाहीजे. आम्हाला माहित आहे की, अति घाई संकटात जाई. पाणीपुरवठा, बीआरटीएस,ईडब्ल्यूएस या तीन प्रकल्पांवर तरतूद करण्यात आलेली आहे. तरतूद खूप फसवी आहे. आपण काम करु शकणार नाही हे आपल्याला माहीत आहे. बजेटच्या ४८.९% तरतूद प्रत्यक्षात खर्ची होणार नाही. मला आपल्याला क्रिटीसाईज करायचे नाही. आयुक्त साहेब, आपण यांच्यात सामील होऊ नका, तुमच्याकडून खूप अपेक्षा आहेत. तुम्ही श्रीकर आहात, खरे सांगणार, खरे पाळणार, खरे करणार. आपण यांच्या भूलथापांना बळी पडला आहात. तुम्ही मनपात कोणाचे काय सांगू नका. आत्ताच शंका विचारावी लागेल. चुका निस्तरण्यात किती वेळ जातोय. वाय.सी.एम.मधील योजनेसाठी २४ कोटींची तरतूद नमूद करण्यात आलेली आहे. १५ वर्षापूर्वी वाय.सी.एम. बांधले. आज त्या हॉस्पिटलमध्ये येणा-या रुग्णांची संख्या खूप जास्त असल्यामुळे त्याच्यावरील ताण वाढला आहे. खरेतर आपण स्वतः डॉक्टर आहात. मला वाटते, बजेटमध्ये कुठेतरी समाविष्ट गावांत नवीन दवाखाना, मोठे हॉस्पीटल किंवा असलेल्या दवाखान्याचे विस्तारीकरण असे कुठेतरी तरतूद दिली असे आढळलेले नाही. पुढील वर्षाच्या बजेटमध्ये तरतूद करताना निश्चितपणे याचा विचार करावा. विशेष योजना – पुणे व पिंपरी चिंचवड या दोन महापालिकांच्या संयुक्त विद्यमाने दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्या सहाय्याने योजनेसाठी ५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. हा प्रकल्प पाहीला. रिंग रोड, रिंग रेल्वे, बीआरटीएस, ट्रामवे प्रत्येक आयुक्तांनी वेगवेगळे प्रोजेक्ट आणले. मा.दिलीप बंड व मा.आशिष शर्मा यांनी स्वप्न दाखवले. त्याची पूर्तता झाली नाही. प्रकल्पांची घोषणा झाली. पुढे त्याचे काय झाले कोणाला माहित नाही. आम्ही देखील ऑटोक्लस्टरमध्ये थंड हवेत प्रेझेंटेशन पाहीले. परत ६ महिन्यांत एक प्रोजेक्ट आला. त्याचे पुढे काय झाले ते कळाले नाही. डी.पी.मध्ये खरेतर ३५ मी. रस्त्याची तरतूद आहे. तो झाला तर ट्रॅफीकची समस्या काही प्रमाणात तरी निश्चित सुटेल. नवीन नवीन प्रकल्प घोषित करतो. प्रत्येकवेळी नवीन सल्लागार नेमायचा. प्रकल्पासाठी सल्लागार का सल्लागारासाठी प्रकल्प हा खरा विचार करण्याचा विषय आहे. दिल्ली मेट्रो कॉर्पोरेशन यांच्याकडे मेल टाकली होती. पिंपरी चिंचवड महापालिकेसंदर्भात आपल्याला काय माहिती आहे. रिपोर्ट सादर झाला आहे का? त्यांनी मेल पाठवली यात आपल्या शहराचे नाव नाही. पिंपरी चिंचवड म्हणून मेट्रो प्रकल्पात कुठेही उल्लेख नाही हे सुद्धा आपल्या निदर्शनास आणून देते. विशेष योजनेत समाविष्ट गावांत एकसुद्धा प्रकल्प किंवा योजना केलेली नाही. वैद्यकीय, अभियांत्रिकी

शिक्षणासाठी इथून पुण्यामध्ये आपले विद्यार्थी जातात. इथे मोठे कॉलेज, युनीव्हर्सिटी नाही. खरेतर मोठी नामांकीत संस्था आपल्याकडे आल्यातर विद्यार्थी इथेच शिकू शकतील, त्यांच्या जाण्यायेण्याचा खर्च वाचेल. पाण्याची गरज लक्षात घेऊन एखादी योजना हाती घ्यायला पाहीजे होती. महापौरांचे स्टेटमेंट वाचले. आपली घोषणा ऐकली आहे. ज्या पूर्ण क्षमतेने पाणी उचलणे आवश्यक आहे त्याप्रमाणे ते उचलेले गेलेले नाही, ऐकू येत नाही. शहरातील पिण्याच्या पाण्याव्यतिरीक्त वापरात येणारे पाणी उदा. औद्योगिक वापर करताना मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करतात. मैला शुद्धीकरण प्रकल्पातून स्वच्छ झालेले पाणी नदीत डायरेक्ट सोडतो. त्या पाण्याच्या पुनर्वापरासाठी योजना हाती घेतली असती तर आपल्याकडे दुष्काळी भागातून, विदर्भ मराठवाड्यातून, भारत देशातून नागरीक मोठ्या प्रमाणात येत आहेत ते कुठे जाऊ शकतात. पिंपरी चिंचवड सोयीस्कर असेल म्हणून इथे आले. आपल्याबरोबर त्यांची सुद्धा तहान भागवली जाऊ शकते. त्यासाठी पाण्याचा पुर्नवापर कसा करता येईल याचा सुद्धा आपल्या अधिका-यांकडून विचार झाला नाही. सल्लागार सापडला नसेल. खरेतर सर्वात श्रीमंत व बेस्ट सिटीची प्रौढी मिरवतो. परंतू महापालिकेच्या शौचालयांची परिस्थीती अतिशय गंभीर आहे. शहरातील ७१ झोपडपट्टयांतील लोकसंख्येच्या निकषानुसार ४२०० सिटस् ची गरज आहे. मात्र प्रत्यक्षात २२०० सिटस् उपलब्ध आहेत. २ हजार सिटची आवश्यकता आहे. वस्तुतः २,००० सिट बांधायचा विषय समाविष्ट करायला पाहीजे होता. मी स्वतः झोपडपट्टीतील भागाचे नेतृत्व करतो. त्याठिकाणी पक्क्या स्वरुपाते टॉयलेटला जागा ठेवलीतर बांधू शकतो. तात्पुरत्या स्वरुपात निश्चित गाड्या देऊ शकतो. जेणेकरुन रस्त्यावरील होणारी घाण थांबू शकते. विशेष योजना – वाचली. महापालिकेच्या मध्यवर्ती ठिकाणी ८५ शौचालये यांची तरतूद करण्यात आली आहे. सिटी इंजिनिअर यांच्याकडे चौकशी केलीतर मिटींगमध्ये आहेत, साईट व्हिजिट असल्यामुळे दुस-या अधिका-याला सांगितले. अशा जागा अद्यापपर्यंत निश्चित केलेल्या नाहीत. आपण मध्यवर्ती वाचनालयाची उभारणी करणार आहेत. नांदेडला मध्यवर्ती वाचनालय उभारले. आय.ए.एस., आय.पी.एस.च्या विद्यार्थ्यांना जागा उपलब्ध केली. महापालिकेच्या समोरची जागा उपलब्ध आहे. कमला आर्केड इथे उभारणार नाहीतर ते स्वप्नच राहणार आहे. बजेटमध्ये १० कलमी कार्यक्रमाचा उल्लेख केलेला आहे. फंडींग, ई-गव्हर्नन्स, कपॅसिटी बिल्डींग, ऑफीस इमप्रुव्हमेंट, खरेतर खूप चांगला प्रयत्न आहे. मॉनिटरींग सेल संदर्भात सांगायचे आहे. अधिकारी नेमताना त्याठिकाणी अधिका-याचा खरोखरच भ्रष्टाचारात सहभाग नाही. त्याचे काम

चांगले होते का नाही याची सुद्धा पडताळणी केली पाहीजे. नाव घेणार आहे. अत्यंत भ्रष्टाचारी अधिकारी तिथे नेमला आहे. कालच यासंदर्भात पत्र दिलेले आहे. माझी विनंती आहे, याची खरी शहानिशा करायची असेल तर त्यांनी जागेवर बसायला शिकले पाहीजे. आपली खरेतर दिशाभूल केलेली आहे किंवा झालेली आहे. महिला बालकल्याण संदर्भात ३२.३४ कोटींची तरतूद केलेली आहे. २०१२-१३ मध्ये सगळ्या महिलांनी पोटतिडकीने सांगितले आहे. इलेक्शनच्या वेळी लोकांना खूप आश्वासने दिली. शिलाई यंत्रे दिलेच नाही. टेंडर काढले आहे त्यात लिबर्टी कंपनीच्या मशीनवर काजेबटण लावायला शिकवत नाहीत. ब्लाऊज फिटींग व ड्रेसेस एवढेच शिकवतात. त्यासाठी ५,५०० मशिनस् घ्यायच्या आहेत. माझ्याकडे याठिकाणी महापालिकेची यादी आहे. या यादीत आत्ता मशीन घेणार, त्यात दुप्पट मशीन आल्या पाहीजेत. राजेश, उषा, नॉव्हेल यांची दुकाने समोरच आहेत. मशीन घ्यायचीच असेल चांगल्या रेप्युटेड कंपनीकडून का घेत नाही. त्यांच्याकडून न घेता अशा मशिनींबद्दल आमच्या भगिनीने सभागृहात तक्रार केली, त्यांचे पँडेल तुटलेले आहे. दिल्लीमधील मशीन असल्याचे सांगीतले, ती मशीन लुधियाना इथून आणली आहे. कंपनीकडे चौकशी केलीतर त्याचे गौडबंगाल समोर येईल. मशीन कुठून आणतो. महिला बचत गटांना प्रोत्साहन देतो. त्यासाठी त्यांच्यावर किती खर्च करतो यावर काही मर्यादा आहे का नाही. याठिकाणी त्यांना रोजगार मिळवून द्यायचा आहे. माझी विनंती आहे, महिला बालकल्याण मधून किती महिलांना रोजगार मिळेल हे सुद्धा बजेट संदर्भात कृपया नमूद करावे. रोजगार मिळत नाही. महिला सक्षमीकरणाची पूर्णतः हालबोल अवस्था आहे. हिंजवडी सारख्या भागात अनेक महिला नोकरीसाठी जातात. महिलांना चार चाकी वाहने चालवण्याचे प्रशिक्षण दिले तर त्यांना रोजगार उपलब्ध होईल. त्या ख-या अर्थाने सक्षम होतील. वायसीएमएच – याबद्दल जास्त सांगणार आहे. मोठमोठ्या खरेदीवर फार मोठा भर असतो. छोटी-छोटी कामे सर्वसामान्यांशी निगडीत असतात. गरीब भगिनींना वायसीएमसाठी ठेवलेल्या बजेटची गरज आहे. आम्हाला आदित्य बिर्ला हॉस्पीटल आहे. ज्यांना गरज आहे, त्यांच्यासाठी काय केलेले आहे? रोग निदान शिबिरासाठी ३ लाखाची तरतूद सन २०१२-१३ मध्ये केली. झिरो खर्च झालेला आहे. मग शिबीर घ्यायचे का नाही का वायसीएमवरील ताण वाढला आहे हाच शब्द जाणून काम करायची गरज आहे. कष्ट पडले म्हणून डॉक्टर्स किंवा संबंधित विभागप्रमुख काम करत नाहीत म्हणून गरीबांना फायदा मिळत नाही. रक्तदान शिबिरासाठी २ लाख तरतूद केली आहे. त्यासाठी झिरो खर्च झालेला आहे. एकीकडे रक्ताच्या बाटल्यावरील रेट स्टँडींगमध्ये वाढवले. महापालिका सभेने

मान्यता दिली. रक्तदान शिबिर घेतले तर गोरगरीब जनतेला मोफत रक्क देऊ शकतो. ते सुद्धा पुण्याचे काम आपण करत नाही. गरीबांच्या जिवीताशी खेळू नका याची सुद्धा काळजी घ्या अशी आपल्याकडून अपेक्षा आहे. टी.बी. निर्मूलनाचा विषय आहे. तालेरा रुग्णालयावर ही जबाबदारी सोपवणार आहेत. आजही लोकांना वायसीएमलाच घेऊन येतो. तिथे आल्यानंतर रुग्णाचा मेंदूवरील ताबा गेल्यानंतर रुग्ण दगावण्याची शक्यता जास्त असते. यासंदर्भात जनजागृती केली नाही, तरतूद सुद्धा केली नाही. रुग्णाच्या जिवीताशी आपल्याला काही देणेघेणे आहे का नाही याचा सुद्धा याठिकाणी विचार करावा. जैववैद्यकीय घनकच-याची विल्हेवाट – बॉडी पार्टस् ची विल्हेवाट वायसीएममध्ये करतो. आपण डॉक्टर आहात. त्याला वर्ष झाले. मोशी कचरा डेपो इथे अजूनही हलवला नाही. मोशी कचरा डेपो इथे लवकरात लवकर हा प्रकल्प हलवावा. हेल्थकार्ड हे सगळ्य़ात चांगले काम केले आहे. कोट्यावधी रुपयांची बिले दिलेली आहेत. हे काम करत असताना त्याचा फायदा झोपडपट्टीतील नागरीकांना कशासाठी घेतात. परत गेल्यानंतर केसपेपर काढला नाही पाहीजे. कार्ड दाखवल्यानंतर मागील हिस्टरी कॉम्प्यूटरच्या स्क्रीनवर आली पाहीजे. नाहीतर नवीन केसपेपर काढावा लागेल. नसेलतर आपण काय करणार हिस्टरी सांगायची. संगणक विभागाच्या बजेटमध्ये मोठी तरतूद केलेली आहे. मी स्वतः जन्म-मृत्यू दाखले दिलेले आहेत. कुठेतरी नंबर लॉक झाला पाहीजे. तारीख डुप्लिकेट निघून आली पाहीजे. त्याचबरोबर त्याचा क्रमांक प्रमाणपत्राच्या त्याच्या नावापुढे लॉक झाली पाहीजे, या त्यात त्रुटी आहेत. मला बोलायला संधी दिली त्याबद्दल आपले मनापासून आभार मानते. आपण बजेट सादर केले यात सांगायचे आहे, बीएसयुपी, बीआरटीएस हे सगळे प्रकल्प पूर्ण फेल आहेत. यात पुढील वर्षी निश्चितपणे सुधारणा करावी. आपल्याकडून अशी अपेक्षा करते. जयहिंद, जयमहाराष्ट्र!

**मा.विनया तापकीर** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, विशेषकरुन आयुक्त साहेबांचे अभिनंदन करते. समाविष्ट गावांसाठी वाढीव निधी उपलब्ध करुन दिला. समाविष्ट गावांच्या डेव्हलपमेंटसाठी भविष्यात निधीची गरज लागणार आहे. उंच पाणाच्या टाकीचे आरक्षण असून सुद्धा यावर कोणताही हेड नाही. आत्ताच ओरडा होतो. भविष्यात वाढ होणार असल्यामुळे १२६ जागा आरक्षणात आहेत. कोणत्याही जागेवर डिमार्केशन नाही. आरक्षणे विकसित नाहीत. गार्डन, प्लेग्राऊंड नाही. याच ठिकाणी अशा गावांना १५ वर्षे वाळीत टाकले आहे. टाऊन प्लॅनिग, भूसंपादन यात

विशेष हालचाली नाहीत. च-होलीपासून आळंदी क्षेत्र हाकेच्या अंतरावर आहे. हजारो लोक दर्शनासाठी येतात. आरक्षणे विकसित करावीत. तर हजारो लोक पर्यटन स्थळांना भेटी देतील. त्यातून महापालिकेचे उत्पन्न वाढेल. आजूबाजुची डेव्हलपमेंटची स्थिती पाहता २१ एमएलटीचा प्रकल्प उभारलेला आहे. वाढीव क्षेत्रात उभारण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन मलनिस्सारणाचा प्रश्न कायम सुटेल. त्याचप्रमाणे च-होली, मोशी, दिघी, बोपखेल येथे अद्यायावत, सुसज्ज हॉस्पिटल नाही. त्यासाठी तरतूद ठेवलेली नाही. माझी विनंती आहे, आमच्या भागातील नागरीकांना वायसीएमला हेलपाटे घालावे लागतात. म्हणून हॉस्पिटलसाठी तरतूद ठेवावी.

**मा.वैशाली जवळकर** – मा.महापौर साहेब, प्र.क्र.५६ वैदूवस्ती मधील आरक्षण ताब्यात घेऊन विकसित करावे. पाण्याच्या टाकीची मान्यता आहे. लवकरात लवकर बांधून सुरु करावे ही विनंती आहे.

**मा.सुनिता वाघेरे** – मा.महापौर साहेब, सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात नगररचना विभागाला ११० कोटींची तरतूद केलेली आहे. इतकीच विनंती करेल, सगळ्या नगरसेवकांची सगळी आरक्षणे ताब्यात घेऊ शकत नाही. मेन मेन आरक्षणे माझ्या वॉर्डातला डी.पी. रोडचा १० लाखांचा प्रश्न आहे. माझ्या वॉर्डातले आरक्षण ताब्यात घेतले तर माझ्या वॉर्डातला डी.पी. रोड होईल. पिंपरी गावात पूल बांधून तयार झालेला आहे तो का चालू केला नाही ते माहित नाही. जिजामाता हॉस्पिटल मेन चौकात आहे. त्याला जेवढ्या सुविधा पाहीजेत, तेवढ्या नाहीत. बचत गटांना रु.५०००/- अनुदान देण्याचे कबूल केले आहे. दुबार कशावरुन आहे ते कळवले नाही. त्यांना पत्र पाठवावे कोणते बचत गट दुबार आहेत. म्हणजे महिलांचे प्रश्न अडणार नाहीत. म्हणजे तरतूद खर्च होईल. वारंवार लोकांना तोंड देण्याची वेळ येणार नाही.

**मा.संगिता पवार** – मा.महापौर साहेब, सेक्टर २२ मध्ये संजय गांधी नगर, मिलिंद नगर मध्ये गेली १० वर्षे साधे दुरुस्तीचे सुद्धा काम झालेले नाही. आत्ता तरी नवीन होणार का नाही. आयुक्त साहेबांना व्हिजिटला बोलवतोय तरी अजून आले नाहीत. कालच एक मुलगा करंट लागून मेला. तरी यात लक्ष घालावे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, सन २०१३-१४ चे अंदाजपत्रक मांडले आहे. मा.स्थायी समितीने ते जसेच्या तसे मंजूर करुन महापालिका सभेकडे पाठवले आहे. याचे याठिकाणी स्वागत करतो. आयुक्त साहेबांचे अभिनंदन करते. ब-याचशा विषयांवर ब-याचशा कामांसाठी अत्यंत योग्य निधी इथे दिलेला आहे. तिथे आम्हाला समजले आहे ते थोडक्यात सांगायचे आहे. माझ्या आधी सिमाताईंनी सदस्य या नात्याने या विषयाला हात घातला आहे. पहिला मुद्दा या शहरातील बरेचसे प्रकल्प फेल गेलेले आहेत. आपले शहर उभे करतोय. आपल्या बजेटचे एकुण १/३ म्हटलेतरी वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी खर्च करतो. हे खर्च करत असताना प्रकल्प फेल जातात, अडचणीत येतात. नक्कीच ते उभे करण्यासाठी कोणाकोणाचे प्रयत्न आहेत. या प्रकल्पांसाठी जे लोक नेमतात, त्यांना कोट्यावधी रुपये देतो. नेमके कशासाठी नेमतो. आपल्या अधिका-यांनी ज्या कोणाचे परीक्षण दिले, माहिती घेऊन अधिका-यामार्फत प्रकल्प राबविले तरी चांगले होऊ शकते असे वाटते. कन्सल्टंट नेमणार आहोत. सल्लागारांवर आणखी कोण सल्लागार आहेत याची सुद्धा कृपा करुन तपासणी करा. जिथे जिथे सल्लागार नेमले आहेत, ते ७५ टक्के प्रकल्प फेल गेले आहेत. नेमके ते नेमायचे का नाही याचा सुद्धा विचार होणे अपेक्षित आहे. महापालिकेने पैसे देऊन ब-याच वॉर्डांत अंडरग्राऊंड केबलचे काम केलेले आहे. मागील २ वर्षांत आपल्याकडे पैसे नसल्यामुळे एमएसईबी यांना पैसे दिलेले नाहीत. ब-याच ठिकाणी अर्ध्या वॉर्डात अंडरग्राऊंड केबल झालेली आहे, अर्ध्या वॉर्डात केबल लटकलेली दिसते. त्याप्रमाणे भूसंपादनासाठी बरेचसे पैसे ठेवले आहेत. त्याबद्दल तुमचे अभिनंदन. प्रकल्प राबवण्यासाठी जागा ताब्यात पाहीजे. टेक्निकल सल्लागार व जागा ताब्यात घेण्यासाठी पैसे दिलेतर कामाची सुरुवात चांगली होते. किमान जागा यावर्षी ताब्यात घेऊ शकतो. याबद्दल आपले अभिनंदन करते. दापोडीमधील डी.पी.रोड 1985 पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून नकाशात असूनसुद्धा आजपर्यंत होत नाही. त्याचे कारण माहित नाही. तो रोड असतातर झोपडपट्टीतून रोड गेलेला आहे. समोर उभा पुतळा आहे. रोड झाल्यामुळे खूप मोठा ट्रॅफीक जाम होतो. आरक्षण जे आहे त्याची अंमलबजावणी केलीतर बरे होईल. राजीव आवास योजनेबद्दल अभिनंदन करते. त्याची तरतूद 1 कोटी दिलेली आहे. याचा नकाशा देणे गरजेचे आहे. किमान हेड ओपन केलेतरी ते असे सर्वसामान्यांपर्यंत पाहणे गरजेचे आहे. याची माहिती नगरसेवकांना दिली तर बरे होईल. वॉर्ड सुधार केंद्र 10 कलमी योजनेत नगरसेवक व अधिकारी सुद्धा बसतात. त्यांचा टाईमचा दर काय असणार तो दिलातर बरे होईल. अतिशय महत्वाची गोष्ट आहे. पिंपरी चिंचवड महापालिका

महाराष्ट्रातील एकमेव मनपा असेल, यात सर्वात चांगली ठेकेदारी पद्धतीने कामे केली जातात. त्यामुळे महापालिकेचे चार पैसे वाचत असतील तोपर्यंत कामाची गुणवत्ता काय आहे. तो कसे काम करतो हे सुद्धा पाहणे गरजेचे आहे. काही ठेकेदार पोसले जातात. पुढील काळात मोफत करु शकतो अशी भावना काही राज्यकर्त्यांच्या ठिकाणी असू शकते. हे कसे काम करणार ते बघितले पाहिजे. ही कामे जास्तीत जास्त महिलांना देता येतील. संस्थेला देण्यापेक्षा निदान निराधार मुली महिलांना दिले तर बरे होईल. ठेकेदार पद्धतीवर लक्ष दिले तर याच्यासाठी ठेकेदार पद्धत काही प्रमाणात बंद केलीतर जास्त बरे होणार आहे. नोकर भरती केलीतर फार मोठे काम होईल. चतुर्थ श्रेणीच्या जागा रिकाम्या आहेत. नोकर भरती केल्यानंतर १५,००० पगार देत असाल तर ठेकेदारामार्फत ३ ते ४ हजार पगार देतो. ८ ते १० हजारात ते पर्मनंट लोकांपेक्षा जास्त काम करु शकतात. त्यांना कामावरुन काढायची भिती असते म्हणून ते जास्त काम करतात. ठेकेदाराचा माणूस जास्त काम करतो. समाधान मिळेल अशा पद्धतीने नागरीकांना सुविधा देऊ शकत नाही म्हणून चतुर्थ श्रेणी नोकरभरती, डॉक्टर्स, नर्सेस, समूहसंघटक हे करणे गरजेचे आहे. झोपडपट्टी पुनर्वसन आरक्षणे तपासून काम करणे गरजेचे आहे. आपल्याला बेस्ट सिटी अवॉर्ड मिळाला आहे. ही बातमी दिली पूर्ण केली नाही. पूर्ण झोपडपट्टी पुनर्वसन केले ते सुद्धा रेड झोनमध्ये आले आहे. ही बातमी लांबपर्यंत गेली. अनधिकृत बांधकामे पाडली ही बातमी लांबपर्यंत गेली. जास्तीत जास्त प्रकल्प अडचणीत आले आहेत. याचे तज्ञ सल्लागार तुम्ही एकदा तपासणे गरजेचे आहे. अपंगांसाठी बजेटमध्ये तरतूद केली आहे. अपंगांसाठी अतिशय चांगले बजेट वापरले जाते. अपंगांना कर्ज देऊ शकतो. तुम्ही पाहीले ५% सुद्धा बजेट अपंगांसाठी खर्ची पडले असेल असे वाटत नाही. यासाठी तज्ञ सल्लागार सुद्धा नेमावेत. अपंगांसाठी काय करु शकतो – एकतर १० लाखाची संस्था काढली. एखादा प्रकल्प करायची संधी दिली. भाडेपट्टीवर जागा दिली. कारखाना काढून दिला. अंध अपंग मागासवर्गीयांसाठी जी तरतूद ठेवली आहे ती खर्ची पडलेली नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी चांगल्या योजना राबविणे गरजेचे आहे. त्यांना उद्योगधंदे काढून दिले पाहीजेत. व्यक्ती बेसिसवर कर्ज द्या. महिला बालकल्याण योजनेसाठी – १५% रक्कम खर्ची झाली. मागील ५ वर्षांत खूप मागणी केली आहे. अनेकींना चांगले कोर्सेस देऊ शकतो. एरिया हॉस्पीटॅलिटी, हॉटेल मॅनेजमेंट, नर्सिंग या सारखे कोर्सेस महिलांना उपयोगी पडत असतात. आपल्याकडे शिवण क्लास, ब्युटी पार्लर तेचतेच कोर्सेस आहेत. २० वर्षांपूर्वी हिंदी चित्रपटात बघत होतो. हिरोची आई शिलाई मशिनवर कपडे शिवून त्याला मोठे

करते. आपल्या शिवण क्लासमध्ये बदल केला जात नाही. त्यापुढेही जाऊन काय शिकवता येईल हे बजेटमध्ये येते. चांगले बजेट दिलेले आहे. एरिया हॉस्पिटॅलिटी, हॉटेल मॅनेजमेंट याला शासनाची मान्यता नसेल तर त्याला महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावा. युपीएससी, एमपीएससी स्पर्धात्मक परीक्षांचे सेंटर्स आपल्याकडे सुरु करणे गरजेचे आहे. शहरात गुन्हेगारी वाढते आहे. अनेक वाईट गोष्टी घडत आहेत. सगळ्या लोकांसाठी प्रतिनिधी केंद्र सुरु केलेतर चांगली सुरुवात होऊ शकेल. बीपीएलसाठी ज्यांची नावे आहेत, त्यांना महाराष्ट्र सरकारमार्फत २ लाखांपर्यंत कर्ज देतात. याची अंमलबजावणी करावी. आपल्याकडे माहिती देण्यासाठी लोक फार कमी आहेत. लोकांपर्यंत बाबी पोहचत नाहीत. जास्तीत जास्त नियमित करुन याची अंमलबजावणी कशी करता येईल याकडे लक्ष द्यावे. पुणे महापालिकेने मागील ३ वर्षांपासून सीएनजी केंद्रांना कनेक्शनसाठी अनुदान दिलेले आहे. प्रत्येक रिक्षावाल्याला रु.१२,०००/- अनुदान दिलेले आहे. आजपर्यंत ७,००० लोकांना अनुदान दिलेले आहे. १२,००० लोकांना अनुदान देण्याचे प्रयोजन आहे. मा.मंगलाताई, मा.आप्पा बारणे असतील, यांच्याकडे रिक्षावाल्यांनी मागणी केली आहे. यांना सीएनजीचे कनेक्शन दिले तर शहरातील प्रदूषण कमी व्हायला मदत होणार आहे. रिक्षावाल्यांसाठी बजेटमध्ये तरतूद करावी अशी विनंती करते. बजेट अतिशय चांगले आहे.

**मा.नंदा ताकवणे** – मा.महापौर साहेब, अतिशय चांगले बजेट आहे. आयुक्त साहेबांचे अभिनंदन करते. मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले, महिला बालकल्याण साठी १५% रक्कम खर्च झालेली आहे. ३ कोटी खर्च झालेले आहेत. या वर्षी ३२ कोटींची तरतूद आहे. मतीमंद मुली, महिलांना एक हजाराची मदत करतो. अपंग मुलींना एक हजाराची मदत करतो. महिलांना दोन कोर्सेस दिले जात होते. यावर्षी एकच कोर्सची सोय दिली जाईल. त्यांच्यासाठी सुद्धा तरतूद करावी. नवीन वाचनालय मध्यवर्ती ठिकाणी करा असे सांगितले आहे. जुनी वाचनालये अद्ययावत करण्यात यावीत. वायसीएममध्ये एमबीबीएस, एमएस कोर्स सुरु करण्यात येईल असे आयुक्त साहेबांनी म्हटले आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते. जलपर्णीबाबत उपाययोजना करण्याबाबत लक्ष द्यावे. शहरात कलाप्रेम खूप आहे. आर्ट गॅलरी सुरु करण्याची कार्यवाही करावी.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, आज पिंपरी चिंचवड महापालिकेचे सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकावर चर्चा करतोय. आयुक्त साहेब, महापौर साहेबांचे कौतुक करावेसे वाटते. अतिशय चांगल्या प्रकारे बजेट मांडले आहे. परंतु आपण जर माध्यमिक शिक्षण मंडळाचा कारभार पाहीला तर जाणवेल, ते गरीब, गरजू विद्यार्थ्यांसाठी आहे. तुमच्यामुळे इथल्या परिसरातील आर्थिक मागास विद्यार्थ्यांना शिक्षण मिळते. याचा रास्त अभिमान निश्चितच माझ्या मनात आहे. याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. यासाठी ३८ कोटी ३४ लाखांची तरतूद अंदाजपत्रकात केलेली आहे. हा खर्च जितका वाढलातरी, फ्रि शिक्षण देण्याचा तुमचा मानस असेल, आमच्या सर्वांची इच्छा राहील तरी वर्षानुवर्षे पाहतो, पुस्तकांची किती वाईट, फाटकी अवस्था आहे. २० लाखांची पुस्तके वाटतोय. ही पुस्तके मिळत असताना साधारणतः ऑगस्टमध्ये मिळतात. दिवाळीची सुट्‌टी लागते. पाने निघायला लागतात. परीक्षेच्या वेळी मुलांकडे पुस्तक नसते. सक्षम अधिकारी असताना पिंपरी चिंचवडकरांच्या खूप मोठ्या अपेक्षा आहेत. यावर्षी जूनमध्ये सगळ्या गोष्टी आवश्यकतेप्रमाणे मिळतील अशी निश्चित अपेक्षा करते. पेपरमध्ये मोठमोठ्या बातम्या येणार नाहीत. पावसाळ्यातला रेनकोट उन्हाळ्यात असे काही होणार नाही याची निश्चित अपेक्षा व्यक्त करते. याबाबत साफसफाईचे ४.५ कोटींचे टेंडर करुन घेतो. सुरक्षेचे काम कोणाकडे दिले आहे. पिंपरी चिंचवड शहराला माहित आहे. अत्यंत नावाजलेल्या बीव्हीजी संस्थेला हे काम दिलेले आहे. जेवढी नावाने मोठी कंपनी तेवढी कामात अतिशय खोटी संस्था आहे. या संस्थेच्या करारनाम्यात वाचले, मशीनरीने स्वच्छता अपेक्षित आहे. वर्षातून एकदा सुद्धा मशीन चाललेली नाही. वर्षातून एकदा शाळा धुणे अपेक्षित आहे. महिनोन् महिने पाणीच लागले नाही. दर्जेदार शिक्षण मिळते का नाही. हा आपल्या कर्तव्याचा महत्वाचा भाग ठरतो. बेकार वास येतो, तिथे मनपाची शाळा सापडेल असे चित्र पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये निर्माण झालेले आहे. मुतारी शेजारी पाण्याची टाकी बांधली आहे. तुम्ही आपल्या मुलांना पाणी प्यायला द्याल का असे आपल्याला स्वतःला विचारावे. अशा घाणेरड्या ठिकाणचे पाणी शाळेतील मुलांना प्यायला देतो. काय खर्च देतो. आणखी खर्च करायला हरकत नाही. किती दर्जेदार सुविधा दिल्या आहेत? मुर्खांच्या जगामधून कुठेतरी उद्याच्या भारताचे विद्यार्थी घडतात. वास्तवात आपण त्यांना दर्जेदार सुविधा दिल्या पाहीजेत. बीव्हीजीकडे कर्मचा-यांबाबत मागणी केली तर त्यांच्याकडे ७० टक्के लोक साठीच्या पुढील आहेत. त्यांच्या शिक्षणासाठी कोणतातरी शिक्षक नेमावा लागेल. अधिकारी नेमावा लागेल. शाळांना भगदाड

पडलेले आहेत. बोळांची अवस्था अतिशय खराब असते. क्रिडा प्रबोधिनी आपला मान सन्मान आहे. सध्यातरी दोनच क्रिडा प्रकार खेळतात. खेळाडू उभे रहावेत म्हणून शाळा उभी केली. यासाठी दर वर्षी ३० लाख खर्च करतो. त्यांच्याबद्दल आक्षेप नाही. तिथे साधारणतः ३०० प्रवेश घ्यावेत. आजपर्यंत २२५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. मुलांना खाद्य पदार्थ पुरवतो. प्रत्येक विद्यार्थ्यावर महिना १०,००० खर्च करायची प्रथा आहे. रेसिडेन्शियल स्कूल नाही. विद्यार्थी सकाळी ७ वा. येतो, संध्याकाळी ६.३० वा. घराकडे निघतो. हा सगळा खर्च आपण करतो हे योग्य आहे का. याकडे बारकाईने लक्ष द्यावे. मोरवाडी आय.टी.आय.मध्ये, कासारवाडी इथे प्रशिक्षण देतो. १५ लाख तरतूद खर्च केलेली आहे. २०१२-१३ मध्ये त्यांना विचारले गेले, त्यात नेमके काय घेतले. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना एमएससीआयटी कोर्समधून संगणकाचे प्राथमिक ज्ञान मिळावे. ही योजना त्यांनी ५ विद्यार्थ्यांमध्ये राबवली. ६ ट्रेनर्स नेमले होते. विचारणा केली असता, आमच्याकडे साधारणतः २,००० लोकांनी यामधून प्रशिक्षणाचा लाभ घेतल्याचे सांगितले. तीन महिन्यांत संगणकाचे किती ज्ञान मिळणार यावर विचार केला पाहीजे. एकीकडे हाच कोर्स अध्यापक २ वर्ष कालावधीत शिकवतो. हे ३ महिन्यांत शिकवतात. नेमके काय करतो. शिकवण्याचा आव आणतो. त्यांचे कौतुक करावेसे वाटते. १० ठिकाणी सेंटर्स करुन ६ ऐवजी १२ ट्रेनर करावेत. ६ ट्रेनरवरील खर्च किती होईल. १५ लाख कसे मंजूर केले किंवा दिले याचा विचार आपण करावा. दोन्ही आयटीआय कासारवाडी व मोरवाडी इथे मिळून एकच प्राचार्य का नेमला आहे हे गूढ रहस्य उलगडले नाही. खर्चात काटछाट आहे का दुसरा योग्य एमप्लॉयी आपल्याकडे नाही हा विचार आपण करावा. पाटील साहेब म्हणतात, मला पुरेसा वेळ देता येत नाही. काही ठिकाणी आपल्याला हवे तसे चांगल्या प्रकारचे विद्यार्थी तयार होतील असे कुठेतरी घडत नाही याचा विचार आपण केला पाहीजे. पाण्याचा टँकरबाबत अ,ब,क,ड प्रभागांबाबत अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. ज्यावेळी आकडेवारी काढायला सुरुवात केली, त्यावेळी अंदाजपत्रकातून आकडे काढले. अ प्रभागात २ लाख २६ हजारांची तरतूद आहे. ब प्रभागासाठी पाण्याच्या टँकरसाठी शून्य तरतूद आहे. ब प्रभागातील कुठेतरी टँकर्स असतील. ड प्रभागात किती किती पटींत टँकर दिले पाहीजेत. भूकबळी म्हटले तर सोमालिया देशाची आठवण होते. दुष्काळ म्हटला तर राजस्थान तसे ड प्रभाग म्हटले तर ३०/२५ हजार प्रति टँकरच्या व्यवस्थेची तरतूद केलेली आहे. खरेतर माहिती घेतली, संपूर्ण शहरात पाण्याच्या टाक्या ८५ असताना ड प्रभागांत २७ पाण्याच्या टाक्या आहेत. नेमके काय गणगोत आहे याचा विचार करावा.

जलपर्णीची ही अवस्था. १४ लाखांचे टेंडर काढले. पिंपरी चिंचवड शहराला अपेक्षा आहे, नेमकी जलपर्णी कुठून आली. आज किती खर्च झाला. अधिकारी नेमला. त्यांना विचारले किती जलपर्णी काढली. नदीत पाणी कुठे दिसत नाही. सगळे हिरवी जाळी दिसते. एका वर्षात सगळी जलपर्णी निघाली पाहीजे. टेंडर काय घेतो. जलपर्णी पाण्याबरोबर वाहून जाते. आपण सगळ्या गोष्टींकडे गांभिर्याने लक्ष द्यावे अशी अपेक्षा करते.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, अनेक नवीन सदस्यांना या बजेट संदर्भात एक उत्सुकता आहे. आपण सुचविलेली कामे आणि या बजेट संदर्भातील चर्चा याबाबत एक चांगल्या प्रकारची उत्सुकता आहे. याठिकाणी सभागृहात नवीन सभासद आहेत. परंतु प्रत्यक्षात पाहीले तर जसे वर्ष संपू लागले आहे सभागृह ओस पडू लागले आहे. मुद्दा मांडताना खरेतर प्रत्येक सभासदाने बजेटमध्ये भाग घेणे गरजेचे आहे. अनेक ज्येष्ठ नगरसेवकांनी चांगल्या प्रकारे अभ्यास करुन मुद्दा मांडला आहे. प्रामुख्याने मा.सिमा सावळे, मा.योगेश बहल, मा.आप्पा बारणे यांनी चांगल्या पद्धतीने इथे बोलले. नवीन सभासद म्हणून इथे लक्ष देणे गरजेचे आहे. मा.राहूल जाधव यांनी म्हटल्याप्रमाणे समाविष्ट नवीन गावांना दिलासा देणारे बजेट आहे. प्रत्यक्षात पाहीले तर आकड्यांचा फुगवटा आहे. गेले १५ वर्षांपासून या भागाचा विकास किती प्रमाणात खोळंबलेला आहे. सर्वांना चांगल्या पद्धतीने माहित आहे. च-होलीपासून पुनावळे गावापर्यंत सर्वात जास्त आरक्षणे इथे आहेत. ५% सुद्धा आरक्षणे ताब्यात नाहीत. आपल्या यंत्रणेचा महत्वाचा भाग समजला जातो. नगररचना विभागाची क्षमता इथे लक्षात येईल. १५ वर्षांपूर्वी समाविष्ट गावांचे त्याठिकाणचे आरक्षण माझ्या प्रभागात जास्तीत जास्त १२५ विविध आरक्षणांपैकी ५ आरक्षणे ताब्यात आलेली आहेत. आर्थिक तरतूद नेमकी कुठे वापरणार आहोत. मोशीला मुख्य कचरा डेपो आहे. त्याठिकाणी ५०० मी.चा बफर झोन आहे. २००९ मध्ये शासनाने डी.पी. जाहीर झाल्यावर बफर झोन ठेवण्यात आला. हा प्रस्ताव शासनाकडे आजही प्रलंबित आहे. निर्णय झालेला नाही. मागील वर्षी बजेटमध्ये त्या भागातील जनतेसाठी बजेट ठेवले गेले. त्याचा एक रुपया सुद्धा वापरला गेला नाही. सन्मा.आयुक्तांनी पत्र मंजूरीनंतर विकसित क्षेत्र असल्यामुळे त्या भागाला विकासासाठी ठेवलेली तरतूद मान्य नाही असे प्रशासनाला सांगितले. २००९ मध्ये डी.पी. जाहीर झाला. त्यापूर्वी विकास आराखड्यात ५०० मी. बफर झोनमध्ये रेसिडेन्शियल भागात ५०० मी.चे आरक्षण तिथे आहे. असे असताना तिथे बफर

झोन टाकतो. एकीकडे प्रशासन रहिवासी झोन मंजूर करते. ११ विविध प्रकारची आरक्षणे मंजूर करते. तिथेच बफर झोन टाकतात. कायद्याची चूक आहे. हे नागरीकांना भोगावे लागते आहे. अनेक इमारतींना परमिशन दिलेली आहे. तिथे जवळजवळ ३,००० कुटूंबे राहतात. आजपर्यंत नागरीकांना एक सुद्धा सुविधा मिळालेली नाही. केवळ प्रशासनाच्या चुकीमुळे एकही सुविधा मिळालेली नाही. प्रशासनाची चूक झालीतरी अधिकारी मात्र बाजूला जातात. सर्वसामान्य नागरीक बळी जातो, हे इथे पाहीले पाहीजे. बजेटमध्ये कोट्यावधींची तरतूद केलेली आहे. शासनाचा निर्णय झालेला नाही. आपण आपल्या स्तरावर शासनाकडे लवकरात लवकर पत्रव्यवहार करा. पूर्वी ५०० मी. बफर झोनमध्ये कचरा डंपींग केला जाऊन ठेवण्यात आला आहे. आज तिथे परिस्थीती आहे, कचरा विघटनाचा प्रकल्प तिथे आहे. दुर्गंधीचा त्रास कमी झालेला आहे. प्रशासन माध्यमातून तिथे मोठ्या प्रमाणात पाठपुरावा करावा. लवकरात लवकर बफर झोन करावा. नागरीक १५ वर्षांपासून नागरी सुविधांपासून वंचित आहेत. ख-या अर्थाने हे बजेट उपयोगात, वापरात आणले असेल. त्याठिकाणचा बफर झोन सुटला पाहीजे. ५% आरक्षणे ताब्यात आली आहेत. भूसंपादन प्रक्रिया दीर्घ स्वरुपाची आहे. ब-याच नगरसेवकांना मला स्वतःला भूसंपादन प्रक्रियेची अजिबात माहिती नाही. विनंती करतो, अनेक विषयांसाठी प्रयोगशाळा घेतो. भूसंपादन कसे होते. लवकर कसे करावे अशी प्रयोगशाळा आपण करावी. भूसंपादन केले नाहीतर शहराचा विकास होणार नाही. केवळ आकडेवारीचा खेळ होईल. ३२ कोटींचे मोठ्या प्रमाणात बजेट पाहतो. जर आपल्याला खर्च करायचा असेल तर अनेक प्रकारचा रेड झोन, बफर झोन असेल तर अनेक प्रकारचे न्यायालयीन प्रश्न असतील, याठिकाणी ते बजेट वापरता येणार नाही. भूसंपादनाकडे लक्ष द्या. एक वर्षात कितीही आरक्षणे असली तरी ती प्राधान्याने ताब्यात घेणे अत्यंत गरजेचे आहे. टीडीआर माध्यमातून आरक्षणातील रस्ते ताब्यात घेतो, त्यावेळी प्रत्यक्षात शेतकरी टीडीआर घेण्याचा प्रयत्न करतो. शेतक-याला त्रास होतो. संहिता पद्धतीने त्या शेतक-याला टीडीआर उपलब्ध झाला पाहीजे. सुरुवातीला मोजणी असेलतर डब्ल्यू.बी.एम. चार्जेस शेतक-यांवर लावले जातात. एका बाजूला शहराच्या विकासासाठी जागा द्यायची, शेतक-याला स्वतःला भूमिहीनांच्या यादीत जावे लागते. दुसरीकडे डब्ल्यू.बी.एम. चार्जेस भरावे लागतात. हे अत्यंत अन्यायकारक आहे. टीडीआर प्रक्रिया अत्यंत स्लिम पद्धतीने कमी वेळात करावी. कमीतकमी ७ महिन्यांत टीडीआर फाईल नगररचना विभागात फिरत असते. कोणताही निर्णय होत नाही. आपण या बाबींकडे लक्ष द्यावे. नगररचना

विभागाकडून नोटीस पाठवल्यानंतर फक्त विभागाची संमती घेऊन प्रत्येक विभागातून भूसंपादन करण्याचे सहकार्य करण्याची अत्यंत गरज आहे. मला वाटते पर्यावरण संदर्भात अनेकांनी मुद्दे उपस्थित केला. शेंडगेताईंनी जलपर्णीचा विषय मांडला. खरोखरच हास्यास्पद विषय झाला आहे. गेले ३ वर्षांपासून जे टेंडर काढले गेले. प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली त्यावेळी मोठा पूर आला होता. जलपर्णी वाहून गेली. सगळी रक्कम ठेकेदाराच्या खिशात गेली. हा प्रकार लक्षात आणून दिल्यानंतर ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले. पुन्हा पुन्हा हाच प्रकार घडतोय. प्रत्यक्षात इंद्रायणी नदीत काम सुरु आहे. कामाची गती, ५% सुद्धा काम झालेले नाही. प्रत्येक वेळी जलपर्णी वाहून जाईल, ठेकेदाराच्या खिशात पैसे जातील. ९ लाखाचे टेंडर काढले. ज्या कामासाठी रक्कम कमी पडतेय, मग ठेकेदार पळून जातोय का अशी भिती वाटते आहे. प्रत्यक्षात १० वर्षांपासून काम सुरु केलेले आहे. काम अजिबात दिसत नाही. केवळ ५,००० चौ.मी. काम दिसते आहे. एवढे काम करायला किती वेळ लागेल. पर्यावरण विभागच सापडलेला नाही. त्या विभागाचा अधिकारीच खरेतर अनभिज्ञ आहे असे समजते. यात सखोल चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी करतो. या माध्यमातून अनेक गोष्टी उजेडात येणार आहेत. बीआरटी संदर्भात आमच्या भागात रस्ता सुरु आहे. शाळेत प्रामुख्याने काही रस्त्यांची परिस्थिती पाहतोय काय आहे. सिमा सावळे ताईंनी सूक्ष्म पद्धतीने अभ्यासपूर्ण परिस्थिती मांडली आहे. सामान्यपणे नागरीकांना हे सातत्याने दिसते आहे, ते मांडायचा प्रयत्न करतोय. स्वारगेट-हडपसर बीआरटी रस्ता पूर्णपणे येथील रस्ता खोल आहे. नागरीकांना रस्ता क्रॉस करताना जीव मुठीत घेऊन बसस्टॉपपर्यंत जावे लागते. दुसरा रस्ता तुडूंब भरलेला आहे. करायला जातो एक, होते दुसरेच. असा बीआरटीचा आपण आग्रह धरतो. दिल्ली येथील हा प्रोजेक्ट रद्दबादल केलेला आहे. यातील त्रुटी दूर करणे अत्यंत गरजेचे आहे. अशा प्रकारची वाहतूक गट इथे निर्माण करुन घेणार यात शंका वाटत नाही. ग्रामीण भागात समाधानकारक असेल तर फार मोठा आनंद निर्माण व्हावा असे बजेट नाही. ग्रामीण भागातली परिस्थीती अत्यंत गंभीर आहे. मोठ्या प्रमाणात आरक्षणे उपलब्ध करुन दिलीतर विकास होईल. रेड झोनसंदर्भात सर्व नगरसेवक जीव मुठीत घेऊन बसले आहेत. आपला विकास होणार का नाही. याठिकाणी कोणताही निर्णय घेतला जात नाही. यासंदर्भात लवकरात लवकर रेडझोन संदर्भात निर्णय घ्यावा अशी विनंती करतो.

**मा.अजय सायकर** – मा.महापौर साहेब, बजेटमध्ये घेतलेले आहे. स्पाईन रोडमध्ये दोन/तीन महिन्यांपासून पाठपुरावा करतोय. पत्रव्यवहार केला होता, तसा घेतला असता तर बरे झाले असते. उपसंचालक भदाणे मॅडम यांना सांगितले, चार एकरचे दोन/तीन मोकळे प्लॉट आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नावलौकिकात भर पडेल. समाधानकारकपणे कंपनीचे मोठे काम होईल असे सांगितले होते. २४ तास पाणी करायचे म्हणतो. २/३ महिन्यांपासून फॉलोअप करतोय. स्पाईन रोड भागात पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात आहे. नेवाळे वस्ती शाळा नंबर २८ आरक्षणातील जागा अजून ताब्यात घेतलेली नाही. लहान लहान मुले शाळेच्या मंदीरात बसलेली असतात. शाळा बांधली गेलीतर हा प्रश्न मार्गी लागू शकेल.

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** – मा.महापौर साहेब,आज या अंदाजपत्रकात विकास अंतर्गत महिलांसाठी विविध योजनांसाठी तरतूद केलेली आहे. चिंचवड गावात महिलांसाठी अद्ययावत व्यायामशाळा व्हावी. पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी तरतूद केलेली आहे. चिंचवडमधील मोरया गोसावी मंदीराचा परिसर पर्यटन विकास म्हणून घोषित करा. तिथे भाविक लोक भरपूर येत असतात, ते तिथे एकदातरी टेकतात. मोरया गोसावी मंदीराच्या एकाच बाजूला नदीपात्रात कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधला आहे. मागील महापालिका सभेमध्ये पत्र देण्यात आले, तिथे बोटींग चालू करावे. तिथे अजूनही बोटींग चालू नाही. बंधा-याचे काम करुन बोटींग चालू करावे. चिंचवड गावात चाफेकर शाळा आहे, त्याचे स्ट्रक्चर ऑडीट करुन अद्ययावत इमार बांधायची तरतूद वापरली गेली नाही. कामाला सुरुवात केलेली नाही. चिंचवड गावातील स्मशानभूमीचा विषय लवकरात लवकर मार्गी लावावा. वेताळनगर पुनर्वसनाचा भाग, तिथल्या लोकांना विद्युतविषयक सुविधा, आरोग्यविषयक सुविधा पुरवल्या जात नाहीत. जेव्हा फोन करु तेव्हा दखल घेतली जाते. चिंचवड गावात आरक्षण क्रमांक २११ मध्ये व्यापारी केंद्र विकसित करण्यात येणार आहे. महापालिकेने स्वतः करावे किंवा बीओटी तत्वावर बांधावे. ते अर्धवट अवस्थेत आहेत. जागेचा गैरवापर होतो आहे यात लक्ष घालावे.

**मा.शारदा बाबर** – मा.महापौर साहेब, मी पहिल्यांदा बजेट पाहते आहे. पहिलेच वर्ष आहे. काही प्रश्न आहेत. अज्ञानापोटी येथे विचारते आहे. आपला वॉर्ड मॉडेल वॉर्ड म्हणून लिहीला आहे. तो एकच वॉर्ड मॉडेल वॉर्ड म्हणून करायचा, झोपडपट्टी भाग जास्तीत जास्त डेव्हलप करुन तो मॉडेल वॉर्ड होऊ शकतो. पूर्ण पिंपरी चिंचवड

शहरच मॉडेल का होऊ शकत नाही. हा माझा अज्ञानी प्रश्न आहे. दुसरे असे बोलले गेले, खासदार व्यापा-यांची बाजू घेतात. दिल्लीत बसायचे तर ते गल्लीतच दिसतात. ते गल्लीतले प्रश्न सोडवल्यामुळेच दिल्लीत गेले आहेत. पहिले गल्लीतले प्रश्न नंतर दिल्लीतले. मा.नारायण बहिरवाडे यांना अजूनही समजले नसेल. आमचा जवळचा शेजार आहे. त्यांना समजले नसले तरी बाबर साहेबांपर्यंत पोहचवण्याचे काम करते. मनापासून सांगावेसे वाटते आहे, पिंपरी चिंचवड जास्तीत जास्त चांगले कसे होईल. बजेट या विषयावर बरेचजण बोलणार आहेत. नगरसेवकांना काम करायला ३ वर्षेच मिळतात. नगरसेवकांना ३ वर्षांत बजेट ही तीन अक्षरेच समजतात. त्यानंतरच तुम्ही बोलू शकाल.

**मा.संगिता भोंडवे** – मा.महापौर साहेब, रावेत नव्याने डेव्हलप होते आहे. बरेच प्रकल्प पहिले आलेले आहेत. माझ्या वॉर्डात विरंगुळा केंद्र नाही, बसस्टॉप नाही, पोहण्याचा तलाव, व्यायामशाळा, खेळाचे मैदान, बगीचा काही नाही. डि.पी. रस्ता लवकरात लवकर करण्याचा विचार करावी असी विनंती राहील. माझा वॉर्ड सुद्धा मॉडेल वॉर्ड व्हावा अशी मा.आयुक्त साहेबांना विनंती करते.

**मा.शांताराम भालेकर** – मा.महापौर साहेब, भारत देशात बहुमान मिळवणारी आपली महापालिका हिच्या नावलौकीकात भर पडेल असे काम करण्याची अपेक्षा आपल्या Dear आयुक्त साहेबांकडून आहे. Dear हा शब्द वापरायला लागल्यापासून सगळे मला Dear म्हणायला लागले आहेत. पिंपरी चिंचवड शहराला बेस्ट सिटी पुरस्कार मिळाला आहे. तांत्रिक अडचणींत अडकलेले Dear Park होऊ शकत नाही का. कार्यक्षम आयुक्त आहेत. आमच्याकडे थोडे लक्ष द्यावे. नामदार अजितदादा म्हणतात, हा प्रश्न मार्गी लावला पाहीजे. तुमच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्न करणार. खरोखर कार्यक्षम अधिकारी, Dear अधिकारी असताना माझ्या दृष्टीने Dear आहेत, संबंधित अधिका-यांनी ६/७ वर्षांपासून दाखवून दिलेले आहे. तुकाराम महाराज टाळ घेऊन भंडा-यावर जेव्हा देहू गावात आले होते. एकंदरीत ३५० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आज देहू गाव रेड झोनमध्ये आहे. एकंदरीत तुम्ही मदत करता, चांगल्या प्रकारे सहकार्य करता. हे काम करत असताना Dear Park सुद्धा आपण मार्गी लावावे अशी विनंती करतो. मानवाच्या शरीरात रक्तवाहिन्या महत्वाच्या आहेत. तसे माझा प्रभाग रेडझोनमध्ये असला तरी तिथे डेव्हलपमेंट जोरात चालू आहे. रस्ते कसे का होऊ द्या. चितळवाडीत २४ मी.चा रस्ता लवकरात

लवकर विकसित करावा अशी विनंती करतो. डी.पी. रस्ता विकसित करण्यासाठी डिमार्केशन मंजूर करा. रस्ता हाच अतिशय महत्वाचा भाग आहे. भविष्यकाळात बाकी सुविधा नक्की देऊ. खरेतर आम्हाला वाळीत टाकले का काय कळत नाही. वर्षभरात काहीच काम नाही. साधे डांबर सुद्धा नाही. काहीतरी अज्ञानाने सांगितले जाते. ठेकेदार किंवा बजेट याच्यासाठी नेमके काय कळत नाही. नेमके कशामुळे यात लक्ष घाला. व्हिजिटसाठी वेळ द्या. माझ्या प्रभागात गेले ४ वर्षांपासून एक अतिशय सुंदर शाळा आहे. तुम्ही व्हिजिट केलीतर निदर्शनास येईल. दोन/तीन वेळा बोललो. वॉर्डात व्हिजिटसाठी वेळ द्या. वॉर्डातली खरी परिस्थिती विरुद्ध आहे. मागील वर्षी व्हिजिट झाली होती. रेड झोन असल्यामुळे जवळपास सगळ्यांना शास्ती कर लावून कारण नसताना भूर्दंड भरावा लागतोय. वेगळा मार्ग काढू असे आपण आश्वासन दिले पाहीजे. यावर कुठेतरी शासन बसवा. रेड झोन असल्यामुळे सगळी घरे अनधिकृतमध्येच पडतात. पूर्वीची पारंपारीक घरे/इमारती यांच्यावर सुद्धा शास्ती कर बसवला आहे. कृपया या गोष्टींमध्ये लक्ष घालावे. प्रश्न मार्गी लावावा. माझ्या वॉर्डात लक्ष घालावे अशी विनंती करतो.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब, या संपूर्ण बजेटमध्ये अभ्यास करत असताना मला जाणवले, जी आक्रमकता आहे. पहिल्यांदा मनात आले, ज्या पद्धतीने डिसीजन घेतला, वाईट केले. आक्रमकतेने धोरण राबविले. स्थानिक नेत्यांच्या गुंडगिरीमुळे तुमची आक्रमकता बोथट झाली का काय असे मला वाटायला लागले आहे. बजेटच्या १५/२० दिवस दररोज सकाळी पाहतोय. पिंपळे निलखसाठी असलेल्या तरतूदी काढून टाकल्या आहेत. एवढे मोठे निवेदन अजितदादांना दिले. सर्वांनी दिले. त्या निवदनाचा काहीच उपयोग झाला नाही. निवेदन देऊन सुद्धा बजेटमध्ये तरतूद होत नसेल तर, दमबाजी देऊन बजेटमध्ये तरतूद होत असेल तर या बजेटचा मी निषेध करतोय. या ज्या काही उल्लेखनीय दोन/चार गोष्टी असतील, पहिले अ+ब+क पूर्ण बजेट मिळवून पाहीले तर जास्तीत जास्त रु.२०२४.१३,९४,४०० जमेच्या बाजुला. महसुली व भांडवली खर्च २०,२१,७५,६७१०० होईल. शिल्लक बाजूला रु.०२,३८,२७,३००/- याठिकाणी दाखवले आहेत. आस्थापना खर्च याचा सुद्धा आवर्जून उल्लेख केला पाहीजे. तो फक्त ४४० कोटी ७५ लाख आहे. यात सहाव्या वेतन आयोगाची रक्कम अधिक केलीतर त्याचे टोटल टक्केवारी २२.८८% येते. आऊट सोर्सिंगची टक्केवारी अधिक केलीतर ६६ कोटी ८७ लाख, ३.४७ म्हणजे २६.३५% एवढा आस्थापना खर्च करतोय. २८% खर्च व्हायला पाहीजे. त्याच्या

आतमध्ये खर्च करतोय. ही सुद्धा उल्लेखनीय बाब आहे. तिसरे म्हणजे ग्रेड रेटींग, बाजारातील आपली पत ए+ एए+ अशी पतमापन आपल्याला मिळाले आहे. कोठेही जगाच्या बाजारपेठेत गेलोतरी कर्ज किंवा अनुदान याठिकाणी मिळणार आहे. चवथे – करसंकलन व बांधकाम परवानगी विभागाला जे टार्गेट दिले आहे. करसंकलन विभागाला २०१२-१३ मध्ये १७० कोटींचे टार्गेट दिले होते. त्यांनी १९६ कोटी म्हणजे २६ कोटी जास्त गोळा केलेले आहेत. बिल्डींग परमिशन – १६५ कोटींचे टार्गेट असताना २०९ कोटी मिळवले आहेत. दोन्ही विभागांनी चांगल्या पद्धतीने काम केलेले आहे. याचा याठिकाणी मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. वैद्यकीय विभाग – एमएमबीबीएम नंतरचे शिक्षण सुरु करतोय. एमडीएमएसचा कोर्स सुरु करतोय हे अभिमानास्पद आहे. तुम्ही डॉक्टर असल्यामुळे ताबडतोब कार्यवाही केलेली आहे. उल्लेखनीय बाब आहे. पाणीपुरवठा- स्काडा प्रणालीचा उपयोग करुन पिंपरी चिंचवडमध्ये कुठे किती पाणीपुरवठा झाला आहे ते समजते. हे ताबडतोब केले गेले आहे ही सुद्धा चांगली बाब आहे. बीआरटीएस रोडसाठी १४३ कोटी ७० लाखांची तरतूद केलेली आहे. दापोडी ते निगडी जाणारा  रस्ता १४ला सुरु करणार असे बजेटच्या पुस्तकात सांगितले आहे. औंध-रावेत रस्ता मार्च १४ला सुरु करणार हे अतिशय खात्रीपूर्वक सांगितले होते. त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन करतो. मेट्रो प्रकल्प – हा प्रकल्प दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने तयार केलेला आहे. कोणीतरी सभासदाने विचारल्यानंतर त्याला सांगितले, या प्रकल्पात पिंपरी चिंचवडचे नाव नाही. पुणे-पिंपरी चिंचवड मेट्रो प्रोजेक्ट असे नाव दिलेतर निश्चितच शहराचे नाव दिल्लीपर्यंत पोहोचेल हा सुद्धा विचार करावा. पहिल्या टप्प्यात ३१ कि.मी. लांबीचा पल्ला तयार करतोय. स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड असा १६ कि.मी.चा रनवे यात ७ कि.मी. पिंपरी चिंचवडमध्ये येतो आहे. पूर्ण प्रोजेक्टसाठी ६,००० कोटींची तरतूद आहे. पिंपरी चिंचवडसाठी १४२४ कोटी खर्च येतो आहे. १०% कॉन्ट्रीब्युशन बघितले तर १४ कोटी २४ लाख पैकी आत्ता आपण ५ कोटी तरतूद केलेली आहे. २८ जानेवारी २०१३ला सांगितले, केंद्र शासनाला राज्य शासनाने पूर्ण प्रस्ताव सबमिट केला आहे. आपण फॉलोअप केला. निश्चित आपल्या काळात मेट्रो रेल्वेचे काम सुरु होईल. या चांगल्या गोष्टींचे अभिनंदन इथे करतोय. यात काही त्रुटी आहेत, त्यांचा उल्लेख इथे करतोय. जेणेकरुन पुढील बजेटमध्ये त्रुटी राहील्या नाही पाहीजेत. ७ महिन्यांत २%  शास्ती म्हणून चार्ज करतोय. २% प्रमाणे १२X२=२४% व्याज लावतोय. वार्षिक व्याज सुद्धा १२% धरतो. तुम्ही बीलावर २४% चार्ज करताय याचा तुम्ही विचार केला पाहीजे. हास्यास्पद वाटते, आपल्या वेबसाईटला आधुनिक स्वरुप

करताय. ते महिन्याला अपडेट केले पाहीजे. वेगळे काय करणार. वेबसाईट प्रत्येक महिन्याला अपडेट झाली पाहीजे हे महत्वाचे आहे. बील वाटप आदेश – आपल्याच कर्मचा-याला बील वाटप करायला दिले आहेत. कामाच्या वेळेत बील वाटप करणार असाल तर काम करायला सांगायचे याचे परीक्षण करा. कामाच्या वेळेत आपले कर्मचारी बील वाटप करत आहेत हा मुद्दा निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. रोड स्वीपर- महापालिकेच्या एकूण रोडची लांबी २०२० कि.मी. आहे. त्यात ४५० कि.मी. चे रोड स्वीपरने क्लीन करतो. तिथलीच धूळ काढतो व आजूबाजूच्या घरांवर टाकतो तेव्हा डोळ्याला कोणाला पुढचे काय दिसत नाही. २/४ अक्सीडंट झाले आहेत. त्याचा उपयोग झाला आहे का? शौचालय युनीट बांधण्यासाठी ३ कोटींची तरतूद आहे. हे युनीट झोपडपट्टीत बांधा. चांगल्या वस्तीत कशाला बांधता. त्यांच्याकडे खरोखर शौचालय करायला जागा असेल तर त्या माणसाला कंपल्सरी करा नाहीतर टॅक्समध्ये टक्केवारी वाढवा किंवा शौचालय करण्यासाठी अनुदान देत होते तसे अनुदान देता येते का याचा सुद्धा विचार करा. संपूर्ण बजेटचे पुस्तक पाहताना सोलरचा कुठेही वापर नाही. त्याचा दिवे वापरताना वीजबचत होईल. पर्यावरणावर बराच खर्च करतोय. निश्चित याचा फायदा नंतरच्या बजेटमध्ये होईल. अधिकारी व कर्मचारी वर्गांना घरे बांधण्यासाठी २० लाख कर्ज देतात. यात झोपडी सुद्धा मिळत नाही. पिंपरी चिंचवडमध्ये अधिकारी घर घेऊ शकत नाहीततर कामगार कसे घेणार? त्यांची मर्यादा ५० लाखापर्यंत वाढवली पाहीजे. या मर्यादेचे पॅनल जाहीर करावी अशी विनंती आहे. ग्राऊंडींग बिल्डींग रेटींग सिस्टीम – २५०० चौ.मीटर क्षेत्रासाठी त्याला सामान्य करात ५ किंवा १०% सूट देणार. मोठे घर, संकुल असेल तर देणा-याच्या करात सूट दिली जाणार आहे. २०७० ते ८९ फूटांपर्यंत ग्रीड करतील त्याचा सुद्धा आपण विचार करावा. ही सुद्धा माझी याठिकाणी विनंती आहे. वायसीएमचा भार कमी करण्यासाठी तालेरा, जिजामाता या रुग्णालयांचे सक्षमीकरण करणार आहोत. आख्खी बिल्डींग ५,००० स्क्वे. फूटांची आहे, तिथे सुद्धा दवाखाना वाढवता आलातर त्याचा सुद्धा आपण विचार करावा. उद्यान – यात काय नाविन्य आहे. मा.दिलीप बंड साहेब असताना पूर्ण रोडवर हिरवळ दिसत होती. आज जिकडे नजर टाकतो तिकडे हिरवळ सुकली आहे. उद्यानच्या अधिका-यांनी बारामतीला जमिन घेतली आहे. इथे हजेरी लावायची, तिथे पाणी मारायला जायचे. मला, उद्यान कर्मचा-यांनी पार्टीला बोलवले होते. मी सुद्धा त्या अधिका-याच्या पार्टीला गेलो होतो. २/४ मित्र घेतले. काय सेट केला होता तो पाहीला. सगळा सेट अतिशय उत्तम केला होता. त्या माणसाने पार्टी सुद्धा चांगली

केली होती. त्यानंतर आम्ही परत आलो. प्रत्येक वेळी गार्डन करताना फोन करायचा. पिंपळे निलखमध्ये गार्डन का करत नाही. ५/६ महिने इथे हजेरी लावायची. बारामतीला जायचे. मला जरी पार्टी दिली तरी या अधिका-याला बदलून टाका. उद्यानांची इतकी बेकार अवस्था आहे, त्याबद्दल तक्रार करु नये म्हणून पार्टी दिली हे नंतर माझ्या लक्षात आले. पीएमपीएमच्या कामासाठी ३८ कोटींची तरतूद आहे. पिंपळे निलखला बस टर्मिनन्सचे आरक्षण आहे. प्रत्येक सभागृहात हे आपल्या निदर्शनास आणून दिले आहे. दुसरेच ऐकले. बस टर्मिनन्ससाठी जागा रिझर्व ठेवतोय. स्टँडींग चेअरमन असताना बस टर्मिनन्सचे टेंडर निघाले त्यावेळी अडचणी आल्या. पैसा नव्हता नंतर आला. धोरण ठरविले. पीएमपीएमएलने करायचे तर त्यांच्याकडे पैसा नव्हता. आज तिथे झोपडपट्टी झाली आहे. कोणी डेव्हलप करायचे. तुम्ही सुद्धा पुन्हा विचार करा. अजूनही त्यांच्याकडे पैसा येणार नाही. त्यांचे बस टर्मिनन्स आपण स्वतः डेव्हलप करावे अशी विनंती आहे. बंद पाईप लाईन पाणीपुरवठ्यासाठी तरतूद २९३ कोटी ४ लाख आहे. ही सगळ्यांची जबाबदारी आहे. लोकप्रतिनिधी यांचीसुद्धा आहे. बंद पाईप लाईनमधून शहराला पाणी आणणार होते. त्यासाठी मोर्चा गेला. अनेक गैरसमज निर्माण केले गेले. इकडे एक बोलायचे, तिकडे एक बोलायचे. आज संपूर्ण काम बंद पडले आहे. शेतक-यांचा बळी गेला. या योजनेसाठी २९३ कोटी मोजायला लागले आहेत. सर्वसामान्य मनुष्याची व्यथा-कथा मांडावी लागते आहे. आपल्या नेत्यांना समजून सांगू की, ही बंद पाईप लाईन कशी सुरु करता येईल याचा प्राधान्याने विचार झाला पाहीजे. शिक्षणावर खर्च करतोय. १०५ कोटी २८ लाखांपैकी पिंपरी चिंचवड ६२ कोटी ५४ लाख खर्च करतेय. महाराष्ट्र सरकार ४२ कोटी ७४ लाख खर्च करतेय. महाराष्ट्र शासनाच्या चवथ्या वित्त आयोगाचे वृत्त सांगितले आहे. जो काही शिक्षण कर गोळा करतोय. सन २०११-१२ मध्ये ३०,८१,३९,०००/- गोळा केला. त्यापैकी २ टक्के महापालिकेला मिळतात. २ टक्के ऐवजी १० टक्के अनुदान मिळाले पाहीजे असे सूचवले आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. चांगला पर्याय मांडला आहे. त्याप्रमाणे शिक्षण मंडळाला महाराष्ट्र शासनाकडून १२ टक्के अनुदान देतो, ते सुद्धा मिळाले नाही. त्याची सुद्धा मर्यादा ५० टक्के वाढवावी ही सुद्धा चांगली मागणी केलेली आहे. हे सगळे असताना दुसरीकडे इन्कम बजेट वाढवायचा प्रयत्न करतोय. विद्यार्थी कमी झालेतरी त्याला जबाबदार कोण. शाळांमध्ये विद्यार्थी कशा पद्धतीने वाढले पाहीजेत. शासन पूर्ण वर्ष परीक्षा घेत नाही. कशा पद्धतीने घेतल्या गेल्या पाहीजेत. आपल्या शाळांची स्थिती कशा पद्धतीने सुधारली पाहीजे. याकडे लक्ष केंद्रीत करावे. ई-लर्निंगसाठी ५० लाखांची

तरतूद केलेली आहे. त्यासाठी एका शाळेसाठी ५ लाख खर्च येतो. २ कोटींपर्यंत ही तरतूद वाढवावी. ई-लर्निंगच्या माध्यमातून शिक्षण दिलेतर निश्चितच फायदा होईल. आपली मुले हुशार होतील. यात तिळमात्र शंका नाही. जकातीला पर्याय म्हणून एलबीटी सुरु करण्याचे शासकीय धोरण आहे. जकातीमधून मागील वर्षी १३०० कोटींचे टार्गेट असताना १०५० कोटी जमले. एलबीटीचे टार्गेट १२३० कोटी धरले तरी ते मिळतीलच याची गॅरंटी नाही. अनिश्चितता आहे. एलबीटीच्या माध्यमातून कर वाढवतोय. निवासी करांची टक्केवारी वाढवतोय. प्रॉपर्टी टॅक्स वाढवतोय. बांधकाम परवानगीमध्ये कर वाढवतोय. जिथे खरी आवश्यकता आहे तिथे टॅक्स वाढवला पाहीजे. भूमि आणि जिंदगी विभागात वाढला पाहीजे. २०१३-१४ मध्ये ३ कोटी अपेक्षित असताना ३८,२५,०००/- मिळाले होते. जोपर्यंत २०० कोटींचे २५० कोटी टॅक्स मिळणार नाही, तोपर्यंत ख-या अर्थाने प्रशासन अधिकारी काम करत आहेत असे मला वाटत नाही. एवढा टॅक्स तिथे मिळणार आहे. अनधिकृत बांधकामांची स्थिती सुधारली पाहीजे. ही गोष्ट साधली पाहीजे. त्यासाठी टॅक्स लावला पाहीजे. होर्डींग बोर्डवरील टॅक्स – एका बोर्डच्या ठिकाणी ८ बोर्ड रस्त्यावर उभे राहतात त्याचे कॅल्क्युलेशन केले पाहीजे. हे सुद्धा चांगल्या पद्धतीने नियोजन केले पाहीजे. हॉकर्स झोन केले पाहीजेत. त्यामुळे टॅक्स वाढेल. भाजी मंडई, आधुनिक पद्धतीच्या व्यायामशाळा सुरु केल्या पाहीजेत. वाचनालये, अनेक प्रकल्प माध्यमातून टॅक्स वाढलातरी त्यावर खर्च सुध्दा केले पाहीजे. प्रामाणिकपणे टॅक्स भरतात, त्यांच्या मनगटावर अजून बोजा टाकायचा हे बरे नाही. पर्यटन विकास आराखड्यात रु.४५,२७,००,०००/- तरतूद केलेली आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आर्किटेक्ट पी.के.दास यांच्या मदतीने डिझाईन तयार केले आहे. यात १६ स्थळे विकसित करणार आहोत. ४५ कोटी १६ स्थळांवर खर्च केलेतरी पर्यटन स्थळे होणार नाहीत. स्थानिक पॅचेस डेव्हलप केल्यासारखे होईल. पहिले हे काम केले पाहीजे. नदी कडेने रस्ता डेव्हलप केला पाहीजे. अक्विझिशन केले पाहीजे. कनेक्टीव्हीटी अतिशय महत्वाची आहे. दुसरे म्हणजे शहरातून जेवढ्या नद्या वाहत जातात. पवना, मुळा नदीचे पाणी प्रथम अडवून गतीने पाईपलाईन टाकली पाहीजे. एखाद्या नेत्याने सांगितले, माझ्या वॉर्डातले पर्यटन स्थळ डेव्हलप करा. येण्याजाण्यासाठी रस्ता मग निश्चितपणे नदीकडेचा रस्ता नंतर केला नाही पाहीजे याकडे लक्ष केंद्रीत करा. नगररचनासाठी केलेली तरतूद कमी पडणार आहे. जेवढे मागाल तेवढी तरतूद दिली पाहीजे. शिक्षण मंडळावर जेवढा खर्च करता येईल, तेवढा केला पाहीजे. उद्या तयार होणारे मूल पिंपरी चिंचवडचा सूचक असेल. म्हणून नगररचनामध्ये तेवढी तरतूद

लागेल. या विभागात गेलोतर बसायला जागा नाही. सर्वेअर नाहीत. त्यांची म्हणावी तेवढी साथ नाही. विभाग प्रमुखांकडे दोन भागांचा चार्ज आहे. त्यामुळे त्या पूर्ण वेळ काम करु शकत नाहीत. तिथे पूर्णवेळ सक्षम अधिकारी पाहीजे. प्रामाणिकपणे काम करतो त्याच्यावर मोठा भार. बाकी वाट बघतात, कोण येतोय. कधी झोनिंग करायला देतोय. मला पैसे कसे मिळतील. १५/२० वर्षांत आरक्षणे पडून आहेत. ३५,०००/- पगार देतो. फक्त पिंपरी निगडीचे आरक्षण ताब्यात घ्यायचे. कुठे प्रॉब्लेम आहे. फाईल अडली तरी आपले अधिकारी एकदाही फिरकत नाहीत. सध्या कोणासाठी प्रकरणे अडून आहेत. पत्राला साधे उत्तर नाही. अशी नगररचनाची परिस्थिती आहे. यात आपण लक्ष घालावे अशी विनंती आहे. मा.आर.एस.कुमार यांनी सांगीतले, आपल्या मनपात पैसे गोळा करुन डिपॉजिट करण्यासाठी महापालिका आहे. डिपॉजिट ठेवल्यानंतर किती व्याज मिळते. केवळ ५४ कोटींवर २ कोटी व्याज मिळेल. जास्तीत जास्त १० टक्के मिळतात. प्रोजेक्ट कॉस्टमध्ये दरवर्षी २० टक्के वाढतात. एवढे मोठे नुकसान आहे. नुसते डिपॉजिट ठेवू नका. प्रत्येक पैसा प्रोजेक्टवर खर्च झाला पाहीजे याचे नियोजन आपण करावे. बजेट आम्ही चाळले. २० टक्के नेत्यांनी ८० ते ७० टक्के बजेट पळवले आहे. ८० टक्के नगरसेवकांच्या वाट्याला फक्त ३० टक्के बजेट आले आहे. मोठमोठे प्रोजेक्ट जुना नगरसेवक त्यांचा वचक, दमबाजी करुन त्याच्या ठिकाणी करतो. ज्या ठिकाणी गरज आहे तिथे मोठे प्रोजेक्ट नाहीत. आत्ता जागा ताब्यात आहेत. मोठ्या बजेटबद्दल मा.प्रशांत शितोळे यांचा प्रश्न होता. त्यावर सांगितले, 50 टक्के जागा ताब्यात असेल तर बजेटमध्ये तरतूद करतो. पिंपळे निलखमध्ये 100 टक्के जागा ताब्यात आहे. तरीपण तरतूद नाही. अशा पद्धतीने शहराचे नियोजन होणार नाही. जिथे गरज आहे, तिथे पैसा खर्च केला पाहीजे. शहराचे समान नियोजन झाले पाहीजे. सभागृहाची परंपरा आहे. अभ्यास करावा लागेल. ते अभ्यास करतील. अभ्यास करुन ह्याच व्यक्ती दगड मारायला सुरुवात करतील. प्रत्येकाला वाटते हे करावे, ते करावे. काहीतरी नाविण्य निर्माण करावे. त्यांची सुरुवातीची एन्ट्री सिंघमसारखी असते. स्थानिक लोक त्याचे चिंगम करुन टाकतात. हे आयुक्त वेगळे आहेत. हरनामसिंग हे आयुक्त होते, ते एकटे पळत होते. इतका त्यांचा चालायचा स्पीड होता. दिलीप बंड या माणसाने एवढे मोठे काम केले. स्थानिक लोकांचा विरोध असताना जागोजागची अतिक्रमणे काढून टाकली. संपूर्ण पिंपरी चिंचवड हिरवेगार केले. कोणत्याही लहान मुलाला विचारले तर तो सांगतो. हरनामसिंग व दुसरे आयुक्त दिलीप बंड यांनी 20 वर्षांत 41 मी. रस्ता 61 मी. करावा म्हणून

ठराव केला तरी तो रस्ता होऊ देत नव्हते. या माणसाने कोणाचेही ऐकले नाही. मंगलाताई महापौर असताना सुद्धा त्यांची बिल्डींग काढली. आज रस्ता मोठा केला आहे. आज डेक्कनला गेलोतर कुठल्याही नगरसेवकाला ऐकायला मिळते की, तुमचे पिंपरी चिंचवडचे रस्ते किती सुंदर झाले आहेत. पुण्याला जाणारा पिंपरी चिंचवडमध्ये आला होता. माझ्या भागात शाहरुख खानच्या मिसेसनी फ्लॅट घेतला आहे. सिंघम सारखे चला, तुमचे चिंगम करु नका एवढे सांगतो.

**मा.अरुण बो-हाडे** – मा.महापौर साहेब, खोलात न जाता मत व्यक्त केले आहे. या वर्षी या सभागृहात नवीन आलेल्या नगरसेवकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे लक्षात घेता हे बजेट नेमके काय, कसे काय याविषयी आज सकाळी 12.00 वा. बैठक लावली. अनेक नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. नेमकी चर्चा करायची आहे का नाही अशी द्विधा अवस्था आहे. 4/8 दिवस अगोदर चर्चा करता आली असती तरी नवीन लोकांना काहीतरी घेता आले असते. मा.श्रीरंग बारणे याचविषयी कठोर होते. याच्या पुढील काळात नवीन नगरसेवकांबाबतीत काळजी घेणे गरजेचे आहे. दोन हजार कोटींचे बजेटमध्ये शहरातील सर्वसामान्य नागरीक कुठे आहे. कष्टकरी कामगार नेमका कुठे आहे. याचे उत्तर शोधून सापडत नाही. सार्वजनिक आरोग्यासारखा विषय या शहरात जेवढा मोठा आहे, त्याच्या अनुषंगाने एमआयडीसीतील लहान उद्योजक, त्यात काम करणारे लाखो कामगारांसाठी वायसीएम सारखे मोठे हॉस्पीटल आहे. यात इतर हॉस्पीटल्स् डेव्हलप करायचे ठरवले आहे. सर्वसामान्य कामगारांसाठी एमआयडीसीत चांगल्या, आधुनिक सुविधा देणे गरजेचे आहे. असंघटीत कामगार, मोठ्या इंडस्ट्रीजमधील कामगार यांचा विचार करणे गरजेचे आहे. शहराचा विकास करताना आर्थिक आकडेवारीत जाणार नाही. मा.विलास नांदगुडे खूप छान बोलले आहेत. शहराच्या पर्यटन, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासासाठी पाहणे गरजेचे आहे. इतिहाससारखा पर्यटक तज्ञ नेमला आहे, त्याचा अहवाल सभागृहापुढे यावा. मा.शांताराम भालेकर म्हणाले त्याप्रमाणे डिअर पार्क आकारण्याची गरज आहे. तो संपूर्ण पट्टा चिंचवड, च-होलीपासून स्त्रोत उपलब्ध आहे. पर्यटनाच्या दृष्टीने गांभिर्याने पहावे. चिंचवड इथे ऐतिहासिक राजवट आहे. राजघराण्यांकडे त्याची खाजगी मालकी आहे. सांगवी इथे शिवसृष्टीत रुपांतर केलेले आहे. शासनाच्या मदतीने म्हणा, महापालिकेच्या पदाधिका-यांना घेऊन म्हणा, ऐतिहासिक जागृतीचे काम करता येईल. मोरवाडी इथे पेशवे काळातील जुने तळे आहे. पाणी व्यवस्थेत पर्यटनासाठी त्याचा उपयोग करता येईल का. तिथे नवीन

काही करता येणार नाही. मूळ स्त्रोत नसताना करतो. रुपये खर्च करावे लागले तर त्याचे ऐतिहासिक महत्व जाते. करताना त्याला आधुनिकतेची जोड देऊन आपल्याला पेशवाई काळातील पर्यटन केंद्र म्हणून परिसर विकसित करता येईल. च-होलीचा परिसर अतिशय सुंदर आहे. डोंगरद-यांनी वेढलेला परिसर आहे. हा परिसर पर्यटनासाठी सिलेक्ट करता येईल. कै.रामकृष्ण मोरे यांनी सफारी पार्क योजना सांगितली होती. तो विषय पुढे झाला नाही. एकिकडे जागा नाही म्हणून ओरडतो. पण निश्चितपणे इथे करायला वाव आहे. सांस्कृतिक बाबतीत मध्यवर्ती वाचनालयासारखी योजना आहे. मध्यंतरी सांस्कृतिक चळवळीची बैठक घेतली होती. निश्चितपणे शहराच्या विकासाचे गाणे गातो आहोत. म्हणून काहीही करायचे. पिंपरीमध्ये, चिंचवडमध्ये असे करण्याऐवजी शहर ज्यापद्धतीने विकसित होते आहे, त्या दृष्टीने केवळ मध्यवर्ती न करता म्हणून सर्व ठिकाणी असे केल्या पाहीजेत. चार प्रभागांत अ,ब,क व ड मध्ये प्रत्येक ठिकाणी पिंपळे गुरव, च-होली असे चार दिशांना एक असे केले पाहीजेत. सांस्कृतिक चळवळ, नाट्य चळवळ, वाचनालय चळवळ या दृष्टीने विचार केला पाहीजे. मध्यंतरी एका महिला भगिनीने सांगितले, तुमचाच वॉर्ड मॉडेल वॉर्ड कसा, मॉडेल वॉर्ड करताना चार ठिकाणी करा. नवीन समाविष्ट भागात नदी पलिकडे चार प्रभागांत अशा पद्तीने तरतूद करुन त्या-त्या भागांत करायला वाव आहे. ते करावे ही खरेतर चांगली कल्पना आहे. जलपर्णी या विषयावर लक्ष वेधून घेऊ इच्छितो की, मुळा, मुठा, इंद्रायणी नदी, हा विषय नेमका काय आहे. केवळ ठेकेदार नेमून त्याने जलपर्णी काढून टाकून त्याचे मूळ कुठून येते. पुण्यात एन.सी.एल.ची लॅब आहे. इन्स्टिट्युट आहे. प्रत्येक ठिकाणी रिसर्च सेंटर आहे. तिथल्या शास्त्रज्ञांना कॉल करुन त्यांना या प्रक्रियेत सहभागी करुन घ्या. ते काढण्याऐवजी त्याचा उगम होणार नाही याचा या शास्त्रज्ञांना संपर्क साधून त्यांना काम दिले व चांगल्या पद्धतीने नवीन संशोधन होईल. त्याचा पिंपरी चिंचवड शहराला उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही. मनपा निधासाठी 2 कोटींची तरतूद ठेवतो. वाढत्या महागाईत ही तरतूद कमी आहे. मला आठवते आहे, महापालिकेच्या सुरुवातीपासून ही तरतूद त्या त्या निधितून देतो आहोत. ह्रद्य शस्त्रक्रिटेसाठी रु.5,000/- 15 वर्षांपासून हीच रक्कम देतो आहोत. सर्वसामान्य रुग्णाला वरवरच्या तपासण्यांसाठी 40,000 लागतात. या 2 कोटी रकमेत 25,000 वाढवले पण 2 कोटींऐवजी 10 कोटी तरतूद केलीतर ख-या अर्थाने त्याला न्याय दिला, दिलासा दिला असा त्याचा अर्थ होईल. मेट्रो प्रकल्प त्याची कूटनिति झाली. त्या मानाने खूप आहे. आपला वाटा फक्त 7 कि.मी.चा आहे. किमान पहिल्या टप्प्यात

पुण्यासाठी 31 कि.मी. ठेवले आहेत. किमान पिंपरी ऐवजी निगडीपर्यंत जाण्यासाठी संयुक्त प्रयत्न करण्याची गरज आहे. मोशी इथे ग्रामीण आरोग्य केंद्र आहे. जिल्हा परिषद काळातील हे आरोग्य केंद्र काढून तिथे चांगले सुसज्ज हॉस्पीटल बांधायला स्कोप आहे, त्या दृष्टीकोणातून अर्थसंकल्पात तरतूद करता आलीतर ती जरुर करावी. आत्ता एक भगीनीने सांगितले त्या मताशी मी सहमत आहे. महिला बालकल्याण – अजूनही शिवण क्लासवर चालवायचे का. संगणकाचाही उपयोग महिलांना करता आला पाहीजे. शिवण क्लास किवा मशीनसाठी असलेले अनुदान चालू ठेवावे. लॅपटॉप, कम्प्यूटर खरेदीची व्यवस्था करता आलीतर भरीव तरतूद करावी. कम्प्यूटर्स उपलब्ध करुन देता येतील असे पाहिले पाहीजे. हे वर्ष आदरणीय कै. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांची दूरदृष्टीमुळे, कै.आण्णासाहेब मगर यांच्या प्रयत्नांमुळे हे शहर उभे राहीले. त्यांच्या प्रयत्नामुळे हे शहर म्हणून नावारुपास आले. औद्योगिकरण झाले, याचा या निमित्ताने अभिमान ठेवला पाहीजे. यांचे चित्र वास्तव नाही याची खंत वाटते. सुधारणा करता येईल. कै.यशवंतराव चव्हाण यांना प्रणाम करतो. पिडलेल्यांना त्यांनी आधार दिला म्हणून प्रणाम करत आलोतर तो कृतज्ञतेचा भाग म्हणून राहील. योगायोगाने एका कारखान्याचे गेटटूगेदर झाले. त्याचे डायरेक्टर यांचे स्वच्छतेसंदर्भात उदाहरण द्यावयाचे आहे. दरवर्षी पुण्यामध्ये बालगंधर्व किंवा टिळक स्मारक मंदीर इथे त्यांचा कार्यक्रम असतो. माझ्या प्रभागात भोसरीमध्ये अंकुश लांडगे सभागृह आहे तिथे ऑडीटोरीअममध्ये गेटटुगेदर करायचे सुचवले. तिथे यांचे गेटटुगेदर झाले. त्यांना बोलवून घेतले तेव्हा तिथे इतकी अस्वच्छता होती की त्यांनी लोक आणून स्वच्छता करुन घेतली. तिथे कोणाचे लक्ष आहे? तेथे ठेकेदार ठेवला आहे. ज्याचा कार्यक्रम त्यानेच स्वच्छता करायची असे असेलतर लाखो रुपये खर्च करुन आपल्या लोकांना पुण्यामध्ये कार्यक्रम ठेवावे लागतात. आपल्या ठेकेदारांवर स्वच्छतेसाठी कोणाचे कंट्रोल नाही. ओव्हरऑल पाहिलेतर स्वच्छता कशा पद्धतीने व्हायला पाहीजे. हे पैसे कुठे जातील ते पाहिले पाहिजे. महिला बालकल्याण अंतर्गत महिलांच्या प्रशिक्षणावर खर्च करतो. त्याच पद्धतीने महिलांच्या स्वसंरक्षणासाठी त्यांना प्रशिक्षण देता येईल का. कन्सीडरेशन मनपाने बंधनकारक घ्यावे त्या पद्धतीने तरतूद करता आली पाहीजे. मा.धनंजय आल्हाट यांनी सांगितले, ग्रामीण भागात आरक्षण नाही म्हणून विकास नाही म्हणून योजना नाहीत म्हणून अंतर्गत ही घाण झाली. हा संपूर्ण पट्टा केला तरी अनेक वर्षे याच कारणासाठी विकास होत नाही. यावर्षी एखादे वर्ष पाहून आरक्षणांवर भर देऊन जास्तीत जास्त आरक्षणे कशी ताब्यात येतील त्यासाठी

तेवढी तरतूद करत असालतर तेवढी करावी. अधिकाधिक आरक्षणे ताब्यात घ्यावीत. पुढे जाऊन मनपाचा पैसा संपला म्हणून या भागात विकास संपला आहे अशी वेळ येऊ नये. अधिकाधिक लक्ष घालून आरक्षणे ताब्यात घ्यावी लागतात. गावाचे शहरीकरण करताना अंधानुकरण करताना गावाचे गावपण जपले जावे. अंदाजपत्रकात नवीन भागात अधिक लक्ष वेधून अधिक बजेट वापरले जावे. पर्यटन, सांस्कृतिक, शैक्षणिक व सर्वसामान्य कामगारांना दिलासा देण्यासाठी बजेट वापरावे एवढीच सूचना करतो.

**मा.नितीन लांडगे** – मा.महापौर साहेब, आरक्षणाद्वारे भोसरीचा बराच मोठा एरिया सर्वे नं. 430, 431, 438 मोठा परिसर ताब्यात असताना आरक्षणे विकसित करताना तरतूद झालेली नाही. प्रभाग बैठकीत रुग्णालयाबद्दल चर्चा केली. बरेच धुणे मांडले. वायसीएमवरील ताण कमी करावा. रुग्णालय विकसित करण्यासाठी माझ्या परिसरात एक एकर जागेत रुग्णालयाचे आरक्षण आहे. ते विकसित करण्यासाठी तरतूद करण्यासाठी लक्ष द्यावे. वॉर्ड सेंटरसाठी एक जागा आहे. ही जागा विकसित करण्यासाठी सुद्धा या अंदाजपत्रकात तरतूद करणे गरजेचे आहे.

**मा.विमल जगताप** – मा.महापौर साहेब, सन 2013-14 चे अंदाजपत्रक आहे. आपण शाळेतील मुलांसाठी पोषक आहार देतो, तो मुलांकडून सगळा टाकण्यात येतो. मुलांना घ्यायचे जेवण बंडल पाण्यासारखे, कुत्री जेवून जातात. मी स्वतः प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केलेली आहे. शाळेतल्या मुलांनादेखील चांगला पोषक आहार मिळाला पाहीजे.

**मा.अतुल शितोळे** – मा.महापौर साहेब, सांगवी पुरता विचार करायचा तर सर्वे नं.59 मध्ये गार्डनसाठी 50 लाखांची तरतूद झाली तशीच टाकी बांधण्यासाठी 50 लाखांची तरतूद झाली आहे. पोहण्याच्या तलावासाठी 40 लाखांची तरतूद झाली आहे त्याबद्दल सांगवीकरांच्या वतीने आपले आभार मानतो व ही कामे लवकरात लवकर व्हावीत अशी विनंती करतो.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, ही चर्चा होत असताना प्रत्येक सभासद वेगवेगळ्या प्रकारे आपले मत मांडतोय. कोणी अभिनंदन करतोय, कोणी निषेध करतोय. माझ्या प्रभागात एकच तरतूद केलेली आहे त्याबद्दल समाधान आहे. अधिक तरतूद केली असती तर अधिक आनंद झाला असता. मा.उल्हास शेट्टी

यांनी विषय सांगितला, शहरात सिटी सेंटरचा चांगला प्रकल्प होतो आहे. मी त्यांच्या मताशी सहमत आहे. अशी आरक्षणे विकसित झाली पाहीजेत. आरक्षणे विकसित होत असताना सभागृहाच्या निदर्शनास कोण आणून देऊ इच्छितो. पूर्वी या जागांसाठी वेगळे आरक्षण होते ते बदलून सिटी सेंटरचे आरक्षण आणले आहे. त्यासाठी सूचना हरकतींमध्ये मी सुद्धा जमिनीचा मूळ मालक म्हणून सूचना हरकत दिलेली होती. त्यावर अजून काहीच झालेले नाही. आमच्या सूचनांचा निश्चित विचार केला जावा. त्याचप्रमाणे सर्व सदस्यांच्या प्रभागांत जास्तीत जास्त कामे होतील. याच वर्षात प्रभागाचा चेहरामोहरा बदलेल असे दिसते आहे. साहजिकच आहे, प्रत्येकाला वाटते माझ्या प्रभागाचे चित्र बदलले पाहीजे. मागील वर्षाचे बजेट उशीरा आले मग नवीन सूचना देता आल्या नाहीत. काम करत निवडून आलोतरी एक वर्ष वाया गेलेले आहे. नवीन वर्षांत बजेट सादर केले. आयुक्त साहेबांनी प्रशासनावर चांगल्या प्रकारे कंट्रोल ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. निश्चित गोष्ट लक्षात येते. अंदाजे मिळवून उत्पन्नाचा अंदाज करुन केलेली तरतूद उत्पन्न कमी झालेतर तरतूदीचे काय. मी सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो की, ¾ वर्षांपूर्वी सर्वांनी ऐकले होते, वॅटचा कायदा आला तर जकात बंद होणार आहे सगळ्यांना माहिती होते. त्यातून पैसे मिळतील का, द्विधा मनःस्थितीत लोक होते. त्यासाठी पर्यायी साधने असतील का असा विचार सुरु झाला. जकात बंद झाली नाही. वॅट अस्तित्वात आला, त्याला सुधारुन एलबीटी कायदा 1 एप्रिलपासून लागू होतो हे. ज्यावेळी एलबीटी येतो आहे, त्यातून पैसे कमी मिळाले तरी वॅट माध्यमातून पैसा गोळा करत होतो तो शासनाकडे मागावा असा ठराव करावा. हक्काचा पैसा शासनाकडून घ्यावा. एलबीटी + वॅट असेलतर आपला विकास शंभर टक्के झाल्याशिवाय राहणार नाही.

**मा.संपत पवार** – मा.महापौर साहेब, थेरगाव सर्वे नं.9 महापालिकेच्या ताब्यात आहे. तिथे नागरीकांसाठी उद्यान नाही. खेळण्यासाठी पार्क नाही. त्यामुळे कचरा टाकण्यात येतो. सर्वे नं.9ला कंपाऊंड करावे. परंतू वॉर्ड प्राधिकरणात येतो आहे म्हणून तिथे आजपर्यंत काहीच सुधारणा झालेल्या नाहीत. कोणतेही आरक्षण नाही. सर्वे नं.9 मध्ये उद्यान व हॉस्पीटल करावे. पाण्याच्या टाक्या आहेत. आमच्या नागरीकांना पिण्यासाठी पाणी नाही. थेरगावात 12/13 टाक्या असूनसुद्धा पाणी नसल्यामुळे नागरीकांचे हाल होतात. पावसाळ्यात ड्रेनेज फूल होते, चोक-अप होते. पाणी जाण्यासाठी मार्ग नाही. बोअर 40/50 फूट खोल असून सुद्धा त्यात ड्रेनेजचे पाणी जाते. नळ कनेक्शनमध्ये ड्रेनेजचे पाणी जाते याची दखल घ्यावी.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, 2 वर्षांपासून आम्ही नवीन नगरसेवक आहोत. बजेट खूप सुंदर केलेले आहे. त्याचे इम्प्लिमेंटेशन कोणत्या पद्धतीने केले गेरे, काय झाले हे नंतर पुढील वर्षी समजणार आहे. एकंदरीत लक्षात आले आहे. ज्येष्ठ नागरीकांसाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. लहान मुलांसाठी इतक्या योजना सांगितल्या होत्या. खेळाडूंसाठी योजनेसाठी 20 लाख तरतूद केली आहे. कमीत कमी चार ते साडेचार लाख मुले विविध खेळ खेळतात, त्यांच्यासाठी फक्त 20 लाख तरतूद बरोबर नाही. माझ्या वॉर्डामध्ये कमी तरतूद आहे. लहान मुले समाजाचा बॅकबोन आहेत. त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे तितकेच महत्वाचे आहे. ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र निर्मिती, चार प्रभागांतून एकतरी बालउद्यानाची निर्मिती व्हावी. महिला बालकल्याण कडून अनेक विविध अनुदान योजना असतात. शहरातील 6,000 निराधार महिलांसाठी योजना आहेत. बाकी शाळांत वेगवेगळ्या योजना कोणतीही अटी शर्ती न लावता कार्यान्वित केलेल्या आहेत. माझी महापौर साहेब, आयुक्त साहेबांना विनंती आहे, ज्या पद्धतीने निराधार महिलांसाठी योजना आहेत, त्याचप्रमाणे शहरात अनेक निराधार नागरीक दांपत्य आहेत, त्यांच्यासाठी योजना लागू करावी. अतिशय उत्तम गोष्ट होईल. बजेटमधील 2 टक्के निधी पीएमपीएलसाठी वापरतात, त्यांच्याकडून वॉर्डामधील सर्व रोडवरुन बस उपलब्ध आहेत का हे सुद्धा पाहणे अतिशय गरजेची गोष्ट आहे. या छोट्याछोट्या गोष्टींकडे लक्ष द्यावे. तरच आमच्या मते खरे बजेट खूप सुंदर होईल असे वाटते.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, सर्व सभागृह नेते, गेले 4/5 तास अंदाजपत्रकावर चर्चा चालू आहे. याठिकाणी महापौर साहेब व आयुक्त साहेब यांचे ब-याच लोकांनी अभिनंदन केलेले आहे. याठिकाणी अंदाजपत्रक सादर केलेले आहे. यासंदर्भात ब-याचशा लोकांनी अभिनंदन केलेले आहे. यात मी देखील सहभागी आहे. याठिकाणी सर्वांना वाटते, शहरात अनुसूचित जमातीचे 3 नगरसेवक आहेत. इथे पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनुसूचित जमाजाची लोकसंख्या 30 ते 40 हजारापर्यंत आहे. तरीदेखील अनुसूचित जमातीसाठी अंदाजपत्रक पाहीलेतर कोणत्याही प्रकारची तरतूद झिरो भोपळा आहे. याची आयुक्त साहेबांनी दखल घ्यावी. शहरात सर्वे करावा. त्याची तरतूद कशी करावी याचे निश्चित धोरण ठरवून करणे गरजेचे आहे. पुणे महापालिकेत संत ज्ञानेश्वर हॉस्पीटल अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या विद्यार्जनासाठी आहे. परंतू इथे असे अनुसूचित जमातीसाठी कोणतेही

हॉस्पीटल अस्तित्वात नाही. याठिकाणी प्रामुख्याने अनेक गोष्टी बोलायच्या झाल्यातरी वर्षभर काम करत असताना प्रशासन माध्यमातून अनुकंपाच्या केसेस, शिक्षण मंडळ, आरोग्य विभागाचे प्रश्न असतील, वॉर्डातील प्रश्नांसंदर्भात संपर्क साधला असतानादेखील 8 ते 10 महिने पेंडींग असतात. अनुकंपाच्या केसेसे आहेत, त्यासुद्धा अशा माध्यमातून अनुसूचित जमातीवर अन्याय होतो का असा प्रस्न निर्माण होतो. दोन शिक्षकांच्या केसेस पेंडींग आहेत. त्यांचे कुटूंब रस्त्यावर आले आहे. हे निदर्शनास आणून दिले आहे, त्याची दखल प्रशासनाने घेतली नाही. आपण एक सक्षम आयुक्त आहात. आपण यात प्राधान्याने लक्ष घालावे. कुटुंब रस्त्यावर आले आहेत. त्यांना शहरात कुठेतरी अनुकंपा तत्वावर घेऊन दोन/ चार जागा बघून त्यांच्या परिस्थीतीत सुधारणा होईल अशी आशा व्यक्त करतो. क प्रभागातील वॉर्ड क्र.56 मध्ये वर्षभर सर्वे नं.94 मध्ये शेवंताबाई प्राथमिक शाळेचे आरक्षण झाले. मुले शिकतात. बसायला जागा नाही. वारंवार प्रभाग कार्यालय, शिक्षण मंडळात संपर्क साधला तरी दखल घेतली नाही. 1994 पासून जागा ताब्यात हे. आरक्षण आहे. तरी विकसित होत नाही. मुले शिक्षणापासून वंचित होत आहेत. शिक्षणासंदर्भात बराच वेळ चर्चा झाली होती. मा.आयुक्त साहेबांना विनंती करतो की, शिक्षण मंडळाचे 105 कोटींचे बजेट दिलेले आहे. मला वाटते मुलांना बसायला जागा नाही, बजेटमध्ये यासाठी तरतूद नाही. याठिकाणी तरतूद वळवलीतर त्याठिकाणी सुंदर इमारत उभी केलीतर तिथे अनेक विद्यार्थी डॉक्टर, वकील होतील. याचे श्रेय पिंपरी चिंचवड महापालिकेला मिळेल. याठिकाणी बीआरटीएस संदर्भात ख-या अर्थाने चांगल्या पद्धतीने सहकार्य केलेले आहे. माझ्या परीसरात बीआरटीएस रस्ता जातो. 55 लोकांवर कारवाई झाली. लोक बेघर झाले. त्यांना मोबदला मात्र मिळण्यासाठी नगररचना विभागाकडे रोजच्या रोज हेलपाटे मारतोय. आपल्याला कळकळीची विनंती आहे, शहरात यांची दुसरी प्रॉपर्टी नाही. त्यांची घरे उद्ध्वस्त केली. पालिकेचा रस्त्याचे काम झाले. घरकुल योजनेतून त्यांना लवकरात लवकर घर ताब्यात द्यावे अशी विनंती करतो.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, याठिकाणी स्थायी समीतीच्या वतीने व प्रशासनाच्या वतीने सभागृहात सन 2013-14 चे बजेट सादर करण्यात आले त्यानुसार यावर्षी जेएनएनयूआरएम व आपल्या मनपाचे मिळून एकूण बजेट सादर करण्यात आले आहे. जवळपास 3248.14 कोटी एवढे मागील काळात या महापालिकेत बजेट सादर होत असताना दोन तीन वर्षांपूर्वी वॉर्डात एखाद्याने काम

सूचवले तरी लगेच नगरसेवकाचे काम होत होते. परंतू बदलत्या काळाप्रमाणे याठिकाणी कामाची गरज लक्षात घेता प्रत्यक्षात काम करताना बजेटच्या हेडमध्ये तरतूद असेलतर तरतूदीप्रमाणे काम करावे अशी सुधारणा मागील तीन चार वर्षांपासून झाली. ख-या अर्थाने नगरसेवकाला काम करताना अडचणी निर्माण झाल्या. हे बजेट सादर होत असताना मागील वर्षाचा विचार केला तर मागे मा.संजय काटे यांनी उल्लेख केला, निवडणूका झाल्यानंतर खूप अपेक्षा ठेवून इथे आलो. नवीन नगरसेवकांच्या खूप अपेक्षा होत्या. निवडणूकीत लोकांना आश्वासने दिली होती. माझ्या प्रभागात हे काम करु. मागील वर्षी सभागृहात चार आयुक्त आले. आपण चवथे आयुक्त आहात. काही काळ प्रशिक्षणामध्ये गेल्यामुळे नागरीकांना तुमच्याकडून जी अपेक्षित कामे आहेत, ती कामे वर्षभरात होऊ शकली नाहीत. याठिकाणी बराच काळ आहोत. प्रशासन व एकूण महापालिकेवर चांगल्या प्रकारचा वचक बसला आहे. पिंपरी चिंचवड शहराचे चांगल्या पद्धतीने डेव्हलपमेंट झाले हे. प्रमुख मुद्दा जाणवतो की, तुम्ही शिस्त लावताय, चांगले काम करताय. कुठेतरी सुरुवात होत चालली आहे. अधिका-यांचे मोरल, काम करण्याची मानसिकता खच्ची होत चालली आहे. तुम्हाला सपोर्ट आहे. शिस्त लावताना कुठेतरी तुमच्याबरोबर काम करणा-या अधिका-यांची मानसिकता खच्ची होत चालली आहे. अधिका-यांची नकारात्मक भूमिका पहायला मिळते आहे. त्यांच्याकडून सांगितले जाते, हे काम असे नियमांत होऊ शकत नाही. बरीच कामे अमुक अमुक नियमाप्रमाणे काम करता येत नाही. नागरीकांची आमच्याकडून, प्रशासनाकडून अपेक्षा आहे. नियमांत बसून काम करत असाल तर याकडे अधिका-यांची सकारात्मक दृष्टी पाहीजे. शंभर टक्के सगळे अधिकारी कर्मचारी वाईट नाहीत. नक्कीच बाहेरून आलेले अधिकारी सुद्धा चांगले काम करतात. हे बजेट सादर करत असताना आमच्यापुढे आकडेवारी मांडली आहे. प्रत्यक्षात बजेट खर्च करण्याबाबत प्रयत्न करावा लागेल, पहावे लागले. टेंडर प्रोसिजर कशी शॉर्ट करत असाल तर ती एवढी लेंदी असते. त्यामुळे सुचवलेले काम वाढते. वर्कऑर्डर मिळायला सहा महिने आठ महिने लागतात. या प्रकारचे हे बजेट लॅप्स झाले नाहीतर पुढील वर्षात हे काम जाते. आम्ही नगरसेवक झाल्यापासून वाटते, आमच्या वॉर्डात एक वर्षात विकास झाला पाहीजे. एक वर्षात पूर्ण विकास होणार नाही. पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने प्रभागाचा विकास झाला पाहीजे. नियोजनबद्ध काम असले पाहीजे हीच आमची सुद्धा मानसिकता आहे. पिंपरी चिंचवड शहर तीन विभागांत विभागलेले आहे. नदी पलीकडील भाग, पवना नदीचा भागा, मुंबई-पुणे रोड

पलीकडील, अलिकडील परिसरासाठी तीन टप्प्यांमध्ये विभागणी करावी लागले. वेगवेगळ्या कॅटेगरीतील लोक, नदी पलीकडेला खूप मोठा भाग विकसित होतो आहे. मधला भाग चांगल्या पद्धतीने विकसित झाला पाहीजे. आमच्या ग्रामीण पट्टा इथे पुढील काळात काम करणे गरजेचे आहे. विशेषतः ग्रामीण भागात पिंपरी चिंचवड शहर समाविष्ट होत असताना असावेत का नसावेत, कायदा होतो, आंदोलने होतात. मा.दत्ता साने असतील, त्यांचा गाव महापालिकेत समाविष्ट करण्यासाठी विरोध असल्यामुळे ५ वर्षांत तिथे कोणतेही काम होऊ शकले नाही. च-होली,दिघी, मोशी, डुडुळवाडी गाव इथे म्हणावा तसा विकास ७/८ वर्षांत विकास झाला नाही. आपण चांगला निर्णय घेतला आहे. नवीन गावांत जास्तीचा निधी उपलब्ध करुन देण्याचे काम केलेले आहे. प्रत्यक्षात याची अंमलबजावणी झाली पाहीजे. विशेषतः मुलभूत सुविधांचे कामकाज या परिसरात अधिक सुविधा निर्माण कराव्या लागतील. भविष्यात, आमच्या सगळ्या विनंती यांचे प्रभागाच्या वतीने आश्वासन दिलेले आहे. आगामी काळात आरक्षणे विकसित करुन ग्रामीण भागात आरक्षणे ताब्यात आलेली नाहीत, त्या दृष्टीकोणातून प्रयत्न झाला पाहीजे. नगररचना विभागाला भूसंपादनासाठी तरतूद दिलेली आहे. अनेक आरक्षणे ताब्यात येत आहेत. त्या दृष्टीकोणातून प्रयत्न केले पाहीजेत. नागरीकांची मागणी आहे. नगरसेवकांची मागणी आहे. प्रायोरीटी लिस्ट प्राधान्याने घेतली पाहीजे. खरेतर ही लिस्ट नसावी. जागा ताब्यात येत असताना आर्थिक नुकसान होत असेल तर किंवा संबंधित जागा मालक/ मनुष्य आरक्षणाची जागा ताब्यात देत असतो. नगरसेवकाच्या मागणीप्रमाणे किमान एक वॉर्ड एक गार्डन विकसित झाली पाहीजे. त्यापद्धतीने आमचा प्रयत्न आहे. सकारात्मक भूमिका घेऊन ६४ प्रभागांत किमान २ आरक्षणे दरवर्षी विकसित झाली पाहीजेत. नागरीकांसाठी खुले झाले पाहीजेत. नागरीकांसाठी चांगल्या प्रकारच्या सुविधा झाल्या पाहीजेत. पर्यटनासाठी विशेष लक्ष देण्याचे ठरवले. कन्सल्टंट चांगल्या व्यक्ती अपॉईंट केल्या. अनेकजण परदेशात जात असतात. भारतात अनेक शहरे आहेत. पर्यटनाच्या दृष्टीकोणातून प्रयत्न केले जातात. भविष्यकाळात या दृष्टीकोणातून तुमचा प्रयत्न आहे तो निश्चितपणे जास्त लक्ष द्यावे. अधिक चांगल्या पद्धतीने पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकिक वाढावा. खरी वस्तुस्थिती आहे. मा.विलास नांदगुडे यांनी सांगितले, पिंपरी चिंचवड शहराचा खूप चांगला विकास झाला आहे. पुण्यातील लोक सांगतात. यासाठी आमच्या नेत्यांनी, सत्ताधारी पक्षाने चांगली भूमिका घेतली म्हणून शहराला बेस्ट सिटी अवॉर्ड मिळाले. यात सगळ्यांचे फार मोठे योगदान आहे. पिंपरी चिंचवड शहर हे बेस्ट सिटी म्हणून

जगापुढे आले. आणखी चांगले कसे होईल. पर्यटनाच्या दृष्टीकोणातून जगातील लोक, देशातील लोक इथे आले पाहीजेत. सायन्स पार्क सुरु केले. महापालिकेकडून खूप चांगले काम संग्रहालय होणार आहे. सिटी सेंटर प्रकल्प हाती घेतला आहे. यावर्षात ते व्हावे. जेणेकरुन पिंपरी चिंचवड शहरातील नावलौकिकात भर पडेल असे चांगले काम उभे राहू शकते. या निमित्ताने बजेट पाहिलेतर जकात हाच उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. करसंकलन, बांधकाम परवाना, पाणीपुरवठा हे सुद्धा उत्पन्नाचे स्त्रोत आहेत. बजेटमध्ये जकातीचे उत्पन्न अपेक्षित धरलेतरी एलबीटी सुरु होणार. शासनाच्या गाईडलाईन्स आहेत. त्यासाठी शहरात जो काही ओरडा होतो आहे. यानिमित्ताने प्रशासन व आमच्या सर्वांपुढे आव्हान राहणार हे. हा कायदा करत असताना शहरातील व्यापा-यांची मानसिकता होता कामा नये. अन्याय होता कामा नये, भावना होता कामा नये. एलबीटीमुळे अन्याय होतो आहे. हा कायदा सुटसुटीत व्हावा. चो-या करायची शक्यता नसावी. मुंढे साहेब व त्यांची टिम काम करतील. एलबीटीचा कायदा चांगल्या पद्धतीने कायदा करतील असा विश्वास आहे. आपण त्याची चांगल्या पद्धतीने अंमलबजावणी करावी. करसंकलनमधून अतिशय मोठ्या प्रमाणात उत्पन्न वाढू शकते. अनेक मिळकतींची नोंदणी केली नाही. शासनाची भूमिका आहे. याच्यामुळे शहरातील अनधिकृत बांधकामे वाढणार आहेत. भविष्यकाळात बांधकामे अधिकृत होण्याच्या दृष्टीकोणातून प्रयत्न करावा लागणार आहे. तुमची व प्रशासनाची भूमिका अतिशय महत्वाची असणार आहे. सामान्य मनुष्याला अधिकृत घर बांधताना किती अडचणी येतात. यूएलसी कायदा रद्द झाला. अनेक सदस्यांना मोजणी करताना अडचणी येतात. यूएलसीची एनओसी आणावी लागते. एन.ए.साठी फाईल गेल्यानंतर यूएलसी आणायला जावे लागते. सर्वसामान्य मनुष्य घडत नाही. भविष्यात अधिकृत बांधकामे करण्यासाठी नियमांत बदल करावे लागतली. हे महापालिका स्तरावरील काम नाही. प्रत्येक महापालिकेने अशी भूमिका घेतलीतर शासनाला विनंती केलीतर. पुणे व पिंपरी चिंचवड मध्ये १० कि.मी. चे मॉडेल केले. कोणतीही मोजणी न करता, पॉईंट आऊट न करता जेव्हा पैसे स्पेण्ड करुन मिळणार. सर्वसामान्य मनुष्य अधिकृत घर बांधू शकतो अशा प्रकारची योजना पिंपरी चिंचवडमध्ये आणता आलीतर सर्वसामान्य मनुष्याला अधिकृत घर बांधायला प्रोत्साहन दिले तर बिल्डींग परमिशन विभागाचे देखील उत्पन्न वाढेल. अधिका-याचे घर बांधत असताना एखाद्या कॉलनीत स्वतःचा फ्लॅट असतो हे सांगत असतात. सर्व नियम पाळून घर बांधून अधिकारी सांगतात, तुमच्या कॉलनीत १५ ते २० फूटांचा रोड जी लांबी गृहीत धरतो, ४० फूटांचा रस्ता पाहीजे. एका बाजूला

अनधिकृत बांधकाम करुन द्यावयाचे नाही, त्यांची मानसिकता असताना तुम्ही सांगायचे, तुमचा प्लॅन पास होऊ शकत नाही. याबाबत पुरावा द्यावा लागेल. निश्चित निर्णय घ्यावा लागेल. तो मनुष्य आख्ख्या कॉलनीला सांगू शकत नाही. २० फूटांचा रोड असतो. अशा परिस्थितीत तो आपल्याकडे येतो. त्यावेळी बिल्डींग परमिशन विभागाला योग्य ती माहिती दिली पाहीजे. सहकार्याची भूमिका ठेवली पाहीजे. या दृष्टीकोणातून सकारात्मक भूमिका ठेवली पाहीजे. अधिकृत घरे बांधतात, त्यांना माहिती असेल. ज्यावेळी बांधकाम केले जायचे, १०% बाल्कनीसाठी प्रोव्हीजन सक्तीच्या केलेल्या आहेत. शहरात अनेक बांधकामे होणार आहेत. मागील आयुक्तांनी परमिशन दिलेली होती. आत्ता या आयुक्तांनी भूमिका घेतली आहे की, वाढीव बांधकामे झाले असेलतर दंड भरुन कम्प्लिशन होऊ शकते. अशा प्रकारचे कोणतेही बांधकाम कम्प्लिशन देणार नाहीत. माझी विनंती आहे, अशा प्रकारची भूमिका घेऊ नका. सगळ्या आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेऊन कम्प्लिशन दिलेले आहे. दंड माध्यमातून चांगले उत्पन्न मिळाले आहे. या माध्यमातून त्याची अंमलबजावणी करावी. अशा प्रकारचे बंधन घातले तर हजारो बांधकामांना कम्प्लिशन मिळू शकणार नाही. या दृष्टीकोणातून विचार करावा. बिल्डिंग परमिशन विभाग मोठे उत्पन्न देणारा विभाग राहणार आहे. त्या दृष्टिकोणातून मोठे उत्पन्न मिळू शकते. बीआरटीबाबतीत १० ते १२ रस्त्यांचा प्लॅन पास करताना कोणी आपल्याकडे येत नाहीत. सभागृहाकडून जी काही चूकीची मान्यता दिली गेली, चुकीच्या पद्धतीने प्रिमियम लावायची भूमिका घेतली. कोणताही मनुष्य रस्त्यासाठी बिल्डींग परमिशन मागू शकत नाही. शासनाकडून ठराव मागवला, ठरावात दुरुस्ती केली. या दृष्टीकोणातून बिल्डींग परमिशन थांबलेल्या आहेत. या दृष्टीकोणातून सकारात्मक दृष्टीकोणातून शासन स्तरावर प्रयत्न करुन जे काही रुल्स् मध्ये चेंजेस करायचे, पार्किंग प्रिमियम अटी त्यासाठी आगामी काळात प्रयत्न केले पाहीजेत. प्रॉपर्टी डेव्हलप केली. खाजगी संस्थांकडून प्रत्यक्षात अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. पार्कींग सर्वे केलातर निश्चितपणे या माध्यमातून खूप चांगल्या प्रकारचे उत्पन्न मिळू शकते. पाणीपुरवठ्याबाबत शंभर टक्के अजूनही अधिकृत कनेक्शन्स नाहीत. अजूनही शंभर टक्के बिलाला खरे बजेट मिळत नाही. दर दोन वर्षांनी २० हजार/२५ हजार/ ३० हजार बील मिळते. सर्व नगरसेवकांना उद्या काम आहे. २५ ते ३० हजाराच्या बीलाच्या तरतूदीचे अधिका-यांना रोजचे काम आहे. ६४ प्रभागांतून लोक जात असतात. या गोष्टीकडे बारकाईने लक्ष द्या. इथे अनेक तक्रारी आहेत. कुटूंबात ४ ते ६ माणसे असतात. २५ ते ३० हजाराचे बील असते. अनेक अडचणी येतात.

निर्णय झाले आहेत. प्रत्येक माणसाला शंभर टक्के बील खर्चाचे कसे बजेट मिळेल, सर्व कनेक्शन्स कशा अधिकृत होतील. अनेक गोष्टींनी उत्पन्न वाढवत असाल तर पुणे महापालिकेप्रमाणे बंद पाईप योजनेला फार मोठा विरोध झाल्यामुळे ती सुरु करु शकलो नाही. यात प्रशासन व लोकप्रतिनीधी यांच्या सकारात्मक भूमिकेतून काम केलेतर बंद पाईप योजना मार्गी लागू शकले असे वाटते. वाढती लोकसंख्या असताना बंद पाईप योजनेच्या माध्यमातून खूप चांगल्या प्रकारे पाणी मिळू शकते. भाक्रा चे प्रत्यक्ष कागदावर काम आहे. आम्हाला माहित नाही. भामा आस्केड चे पाणी ऑलरेडी शहराला देण्याचे ठरले आहे. तरतूद कागदावरच राहू शकते. भविष्यात, आपले पाणी वापरु शकतो. फार मोठा प्रश्न आहे. शहर झपाट्याने वाढते आहे. एक वर्षभरात १०० ते २०० एमएलटी पाणी घेण्याची योजना, खरेतर त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी आणण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करावा लागेल. आपण सर्वांना बरोबर विश्वासात घेऊन लवकरात लवकर यात लक्ष घालावे. आत्ता पाण्याचा जो पुरवठा केला जातो. शहरात आज सुद्धा मोठ्या प्रमाणात ओरड होते आहे. यात नियोजनाचा अभाव आहे. त्याचमुळे पिंपरी चिंचवड शहरात आज पाणी असून सुद्धा मोठ्या प्रमाणात ओरड होते. विशेषतः सेक्टर नं.२३ मध्ये लडकत यांची नेमणूक केलेली आहे. तिथे अतिशय महत्वाच्या ठिकाणी एक्झिक्युटीव्ह नेमले आहेत. दोन डेप्युटी इंजिनिअर दिले आहेत. काय पद्धतीने कामे करु शकतो. एक महिला डेप्युटी इंजिनिअर हे. एक अपंग डेप्युटी इंजिनिअर आहे. कसा काय पाणीपुरवठा व्यवस्थित देऊ शकतो. मा.आर.एस.कुमार तिथे गेले होते. माझ्या प्रभागात असा असा प्रॉब्लेम आहे. माझ्याकडे एक अपंग व एक महिला डेप्युटी इंजिनिअर आहे. अपंग व्यक्ती साईटवर जाऊ शकत नाही. अशाप्रकारे चांगले काम करणा-या अधिका-यांची मानसिकता खच्ची करतो. प्रशासनाने यात लक्ष घातले पाहीजे. चांगला अधिकारी दिला नाहीतर पाणीपुरवठा विस्कळित झाल्याशिवाय राहणार नाही. फक्त शंभर रुपये देण्यासाठी विद्युत डिपार्टमेंटला प्रशासनाने वर्ष दोन वर्षे लावली. हे दिल्यामुळे अर्धा/एक तास लाईट जायची. अख्ख्या शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत व्हायचा. पाणीपुरवठ्यासारख्या महत्वाच्या विषयात प्रशासनाकडून दुर्लक्ष झाले. पिंपरी चिंचवड शहरात चांगल्या प्रकारचा पाणीपुरवठा कसा होईल या दृष्टीकोणातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. आमच्या परिसरात डी.पी. प्लॅनची जास्तीत जास्त अंमलबजावणी कशी होईल, रस्त्यांची आरक्षणे कशी विकसित होतील. कोट्यावधी रुपये खर्च करुन आरक्षणे विकसित झाली नाहीत. कोणत्याही प्रकारची सिक्युरीटी नसते. आपली नव्याने विकसित आरक्षणे नाहीत.

जागेचा धंदा चालतो. नगरसेवकांना लक्ष घालावे लागते. अशा प्रकारचे महापालिकेचे धोरण घेतले गेले पाहीजे. यात आपण लक्ष घालावे. कोट्यावधी रुपये खर्च करुन आरक्षणे विकसित करतो. यासाठी दखल घ्या. करायला कोणा माणूस नसतो. सगळी आरक्षणे विकसित झाली तर सिक्युरीटी अपॉईंट करावेत. चांगल्या सुविधा निर्माण कराव्यात. या वर्षभरात तुम्ही चांगले काम कराल. नागरीकांच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात अशी विनंती या निमित्ताने करतो.

**मा.झामाबाई बारणे** – मा.महापौर साहेब, बजेटवर भरपूर चर्चा झालेली आहे. तो खर्च झाला पाहीजे. अनेक जणांनी उल्लेख केलेला आहे. खर्चाची अपेक्षा आहे. मागील वर्षासारखी शिल्लक नाही राहीली पाहीजे. प्रभागात सुद्धा तेवढी तरतूद खर्च झालेली नाही. आवश्यक त्या नागरी सुविधांबद्दल बोलतो. रस्ता,पाणी, लाईट या मुलभूत गरजा आहे. त्यासाठी प्रथम हा खर्च केला पाहीजे. मोठमोठे प्रकल्प होणार आहेत. नागरीकांचे हाल आहेत. पाणी, लाईट, ड्रेनेजची एवढी परिस्थीती आहे. अक्षरशः पावसाळ्यात घरात पाणी तुंबून मुलांना घेऊन बाहेर उभे रहावे लागते. पावसाळ्यात दगडू पाटील नगर नदीच्या कडेने आहे. पाण्याचा पूर्णपणे निचरा होत नव्हता. ब-याचशा घरांत पाणी जाऊन मुलांना घेऊन थांबावे लागले. त्या-त्या परिसरात ड्रेनेजची अडचण दूर केली गेली पाहीजे. आपल्या परिसरात चार ते पाच पोल आहेत. एमएसईबीने तीन/चार पोल काढल्यामुळे धाकधुक आहे. समोरच्या बिल्डींगला अक्रॉस आहे, विद्यार्थ्याला शॉक बसला. जिवीत हानी होऊ नये म्हणून तरतूद केली आहे का नाही. काही असले तरी एखाद्याचा जीव न जाता अंडरग्राऊंड केबलिंग केले पाहीजे. थेरगाव बोटक्लबमध्ये बोट पलटी झाल्यानंतर जलपर्णीत अडकली. तो मुलगा हुशार म्हणून बोटीतून बाहेर आला. त्याला आधार नसतातर त्याचे सुद्धा प्राण गेले असते. जलपर्णी काढून टाकण्याबद्दल बरीच चर्चा केलेली आहे. मा.अरुण बो-हाडे यांनी सांगितले, हीचा बिमोड कसा होईल हे पाहीले पाहीजे. रस्त्याचे नियोजन केले पाहीजे. जागा सुद्धा सिलेक्ट केली तरीसुद्धा काही झाले नाही. काळेवाडी पुलापासून नदी कडेने रस्ता व्हावा. आरक्षणे सुद्धा बरीचशी चर्चा झाली आहे. कुठली कुठली आरक्षणे ताब्यात घेतली. एका प्रभागात किती आरक्षणे असावीत. शाळा,हॉस्पीटल, रिंग रेल्वे. सर्वे नंबर मधून रोड केला असला तरी आरक्षण असले तरी किती करणार हे सुद्धा बोलायचे आहे. थेरगाव बोट क्लब इथे अनेक त्रुटी आहेत. आपण नक्कीच व्हिजिट द्यावी.

**मा.रमा ओव्हाळ** – मा.महापौर साहेब, दापोडी इथे सर्वांत जास्त आरक्षणे आहेत. भिंत बांधलेली आहे. येणारे जाणारे बघतात. त्यांना वाटते गार्डन आहे. गाडी थांबवतात, तिथे त्यांना कच-याचे, दगडांचे ढीग दिसतात. २००४ पासून फॉलोअप करतोय. अजूनही जागा ताब्यात नाही. शासनाकडे आहे. आयुक्त साहेबांना माहिती आहे. फाईल घेतली आहे. आमचा आग्रह आहे, तिथे आग लागेल. माझी नम्र विनंती आहे, याच्यावरील जागा ताब्यात घेऊन, गार्डन ताब्यात घेऊन मी निवडून आले. माझ्या प्रचारात लहान मुले-मुली होती. ती मला म्हणाली, रमाताई तुम्ही निवडून आल्यानंतर आपल्या दापोडी गावात झोपडपट्टी भागात आम्हाला खेळण्यासाठी गार्डन बांधा. तिथे गार्डनचे काम करा माझी नम्र विनंती आहे. आपण ताबडतोब हे काम हातात घेतले पाहीजे. अजून दुस-या गोष्टी सांगते. झोपडपट्टी हटवण्यात यावी. कालच दोन ट्रक लोक आलेले होते. झोपडपट्टी तयार होण्याचे मटेरिअल घेऊन आले आहेत. माझ्या वॉर्डात देखील उद्यान द्या. मी नाराज नाही, हरकत नाही. आपण खूप बिझी आहात. आपल्याला वेळ नाही. आत्ता झोपडपट्टी तयार आहे. उद्याच्या उद्या काढून टाका. दोन ट्रक आले. माझे समोरच ऑफीस आहे. चो-यामा-या करतात. गुंडगिरी चालली आहे. मला वाटते यात आपण लक्ष द्यावे. गार्डन करावी, फाईल केलेली आहे. त्यात लक्ष द्यावे. आरक्षणे भरपूर आहेत. ताब्यात आहेत. तिथे भिंत बांधलेली आहे. एवढे वाटते, ताबडतोब जागा घ्यावी.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब,सकाळमध्ये वाचले. नवोदित नगरसेवकांसाठी मार्गदर्शनाबरोबरच एक वर्ष झाले निवडून आलो. 14 महिने झाले तरी आम्ही नवोदितच. आमचा नवोदितपणा तुमच्यामुळे गेलेला नाही. मागील वर्षी आप्पा बारणे यांनी सांगितले की, एक वर्ष वाया गेलेले आहे. आम्ही मागणी केली आहे. आपण 1के खाली बजेट घ्या. प्रशासनाच्या दीरंगाईमुळे, त्यांच्या पुढाकारामुळे बजेट घेतले नाही. ते समोर आणले, त्यामध्ये लाखो उपाययोजनांमध्ये ज्या कामासाठी निधी उपलब्ध आहे. तेवढेच काम झाले. त्याबाहेरचे काम करता आले नाही. लोकांना आश्वासने दिली गेली. पिंपरी चिंचवड हे प्रगत शहर आहे. सगळ्यांचा विचार आहे. त्या निविदेचे असलेले काम काढावे. महापालिकेत ते सुरु करण्यासाठी नाही. बजेटमध्ये तरतूद करण्यासाठी त्याची नोंद करण्यासाठी एक वर्ष लागले आहे. दि.२८ फेब्रुवारी २०१२ ला माझे पत्र आहे. आमच्या प्रभागात ही कामे आपल्या बजेटमध्ये घ्यावीत. त्याला आपण प्रशासनाने केराची टोपली दाखवली. माझ्या सारख्या अनेक नगरसेवकांचे हेच झालेले आहे. त्यामुळे आपण निवडून येत नाहीत.

बाबरताई आपण बजेट पाहीलेले आहे. बजेटचे पुस्तक आपल्याला पूर्वीच मिळाले आहे. प्रथमच ५ वर्षांत निवडून आले, त्याला पहिलेच मिळाले आहे. त्यांचा वारसा स्थायी समितीत काही नगरसेवकांनी घेतला आहे. एलबीटी येणार व जकात जाणार, जकात जाणार व एलबीटी येणार यामुळे आधी तुमचे बजेट आयुक्तांनी स्पष्ट करायला हवे होते का. बीपीएमसीच्या नियमांत बजेट लॉक नाही. आपण लॉक केलेले आहे. त्यातून आम्ही आमच्याकडून सांगावयाचे आहे. जे आयुक्त सांगतील, तेवढेच काम करायचे, तेवढेच पैसे उपलब्ध करुन दिले, तेवढ्याच अंदाजात काम बसवायचे आहे. मी चेअरमन असताना १०० कोटींसाठी उपसूचना दिल्या गेल्या होत्या. पुढील वर्षामध्ये जकातीचे उत्पन्न वाढेल. या अपेक्षेवर बजेट वाढवले आहे. उपसूचना घेणार आहेत तरी केल्या आहेत. बजेट कोणी लॉक केले. ठराविक गोष्टी दिल्या. काल विचार केला. भयगंड निर्माण केलेला आहे. आपली एलबीटी कमी असेल म्हणून आधीचे १०० कोटी कमीच दाखवले होते. एलबीटी हा जकातीसारखा नसेल तर जाहीरपणे आपल्या लोकांनी अधिक परिश्रम प्रामाणिकपणे घेतले. त्याचा वसा सर्वांनी चालवला. तोच वसा पुढे चालवला. नवी मुंबई यांना फायदा झाला आहे. भयगंड तयार केलेला आहे. भितीयुक्त वातावरण तयार केलेले आहे. त्यामुळे एलबीटीमुळे कमी उत्पन्न मिळाले. त्या भितीपोटी नेत्यांनी कामे कमीतकमी करायची आहेत. १ कोटी लागतात तिथे २५ लाखांची तरतूद करायला लावली आहे. ५ कोटी काढले त्यात ५ लाखांचे हेड ओपन केलेले आहे. स्थायी समितीची मंजूरी झाली. त्यांची कृपा झाली. काम सुरु करता येईल. एस.आर.ए. झोपडपट्टी वसाहती शहरात आपल्याला आहे, अशा प्रकारचा विचार केलेला आहे. मला वाटते ही घोषणा आपल्याला देखील फलदायी ठरणार आहे. आत्ता तरी ही घोषणा हवेत विरते आहे. जेजे प्रकल्प संथ गतीने चालले आहेत. वेताळनगर झोपडपट्टी प्रकल्प. पिंपरी चिंचवडमध्ये सर्वांत आधी वेताळनगर झोपडपट्टी उठवण्यासाठी ३३०० गाळे सेक्टर २२ स्किमवर बांधले गेले होते. तेव्हापासून वेताळनगर स्किम प्रत्यक्ष अंदाजपत्रकात नोंदली गेली नाही. आत्ता बांधतो. ही स्किम आत्ता चालली. एक बिल्डींग, एक वर्षात नवी प्रकल्प राबविणार आहोत. त्याआधीचे प्रकल्प सुरु आहेत, ते कसे पूर्ण होतील याकडे लक्ष दिले पाहीजे. एसआरए स्किमबद्दल आधी जाहीर केलेले आहे का? विजयनगर झोपडपट्टीत आपण त्यादिवशी आलात. लोक खूप पुढे आलेले नाहीत. एसआरएमध्ये सगळे वाट बघत आहेत. एसआरए खाली काही करु शकत नाही मग आपण काहीच हस्तक्षेप करत नाही. रेल्वेकडेची झोपडपट्टी आपल्याकडे तरतूद नाही. आपल्याला हद्द नाही. आपल्यासाठी त्यांचे बजेट मंजूर

होत नाहीतरी विकास कामे करावी लागतात. पाणी द्यावे लागते. तुम्ही विचार करताना फक्त पिंपरी चिंचवडचा करतो. पूर्ण देशाचा विचार करत असताना असे आत्ताजरी प्रयत्न केलेतरी, संख्या वाढ केलीतरी आपल्यावर बोजा वाढणार आहे. त्यामुळे बजेट वाढते. कमी कसे होईल या दृष्टीने पाऊले उचलता आली तर ते पहावे. हे आपले नागरीक आहेत हे लक्षात घ्यावे. वायसीएममध्ये एम.एस. व एम.डी. कोर्स सुरु केलेले आहेत. अनामत रक्कम हातोहात परत मिळत नाही. कित्येक लाखो रुपये वायसीएम मध्ये जमा आहेत. कोर्स संपला तरी रक्कम क्रिएट केली गेलेली नाही. किती जमा याची नोंद करावी तशी तक्रार केलेली आहे. नियोजन म्हटले आहे. शौचालये उपलब्ध करुन द्यावीत. आपल्या या स्वच्छतागृह योजनेत निधी उपलब्ध झालेला नाही. अ प्रभागात खर्च ५८ कोटी, ब प्रभागात १५२ कोटी, क प्रभागात २३६ कोटी व ड प्रभागात ३३० कोटी निधी लिहीलेला आहे. बजेटमध्ये निधी उपलब्ध नाही. निवेदन व बजेट याचा ताळमेळ लावायला हवा. ब-याच जणांनी सांगितले, स्वच्छतागृहे पुरवली पाहीजेत. कोणी किती मागणी केलीतरी छोट्या रस्त्यासाठी शक्य होणार नाही. झोपडपट्टी, मॉल्स्, भाजीमंडई, बाजार अशा ठिकाणी उपलब्ध करुन दिलेतर योग्य होईल. फ्लेक्स लावल्यानंतर आपण आदेश देतो. त्याची अंमलबजावणी अशा प्रकारे करावी. यापूर्वीसुद्धा आपण लोक काढत होतो. फ्लेक्ससाठी तरतूद करतो आहोत. कोणाच्या तरी फायद्याच्या कमानी पाडल्यावर अंदाजपत्रकात ही तरतूद का ठेवली आहे. बारकाईने पाहीले आहे का. अशी तरतूद असेलतर बारकाईने पाहीले नाही असा त्याचा अर्थ होतो. डांबरीकरणासाठी पैसे कमी पडत आहेत. रोडसाठी नाही. पंडालांसाठी मुद्दाम ठेवले आहेत. फ्लेक्समुळे शहर बकाल होत असेलतर हे योग्य आहे का नाही याचा विचार करावा. सर्व मंडळांसाठी ५० लाख तरतूद ठेवलेली आहे. ई-लर्निंग एक वर्षात किती खर्च येतो. कम्प्यूटर तरी आधि घ्या. प्रत्येक वर्गात नसेल तर शाळेत एका वर्गासाठी किमान १० कंम्प्यूटर्स पाहीजेत. १/२ तास कंम्प्यूटरसाठी जातील. ५० लाखांची तरतूद १/२ कोटींपर्यंत वाढायला पाहीजे. भूसंपादनासाठी ११० कोटी ७ लाखांची तरतूद ठेवली आहे. तरतूद मात्र खर्ची होत नाही. लोकांना पैसे द्यायची वेळ येत नाही. विकास कामे कधी होतील. लोकांनी आरक्षित जागा दिल्यातर कामे होतील. दिल्यातरी त्यांना पैसे मिळाले पाहीजेत. टीडीआर मिळाला आहे. जरी कायदे झाले, जमिन फोडलीतरी हे सगळे करायची मोठी प्रोसिजर आहे. त्रासदायक आहे, आम्ही मदत केलीतर लोक म्हणतात, काहीतरी उद्योग सुरु केला. काहीतरी कामे होत असताना झारीतले शुक्राचार्य येथे येतात, कामे होत नाहीत. ऐकावे जनाचे

करावे मनाचे. आपण निर्णय घेत असताना कायदा करावा. न्यायालयाचे आदेश पाळावेत. आपण काही उत्तर न्यायालयात लिहून दिले का याचा अभ्यास करावा. मगच निर्णय घ्यावा. सेक्टर नं.२३ प्रमाणे उभारलेले पडले आहे. कानीकपाळी ओरडतात. माझ्या प्रभागात चार झोपडपट्ट्या आहेत. हजारो पाईप कमोडीटी नसलेले आहेत, ते आधी बंद करा. २४ तास कसे पाणी देणार? प्रत्येक वेळी मी सांगत असते. आधी पाण्याची गळती बंद करा. एवढ्या मोठ्या प्रमाणात आहे त्याचा आपण विचार करु शकत नाही. यानंतरही स्काडा सिस्टीम गल्लीत उतरली नाही. तेवढ्यासाठी इतके कोट्यावधी रुपये खर्च केला. हेलियम सिस्टीम, †ŒÃöÃö एखादे वर्षी लिकेज असेलतर नंतर आपल्याला कळवले होते. कुठेतरी लिकेज आहे, तेवढी खोदावे लागणार आहे. तीन बाय चारचा खड्डा लागणार आहे. एवढी मोठी तरतूद ठेवली आहे. स्काडा सिस्टीममुळे टाकी भरली नसेलतर एसएमएस पाठवावेत. चांगले आहे पाण्याची टाकी जास्त भरणार नाही. रात्री १२.०० वा. एक महिला माझ्याकडे आली. पाणी १०.०० वा. येणार नाही. अजून आले नाही. झोपडपट्टीत रात्री १०.०० वा. पाणी जाते. या महिलांना धुण्याभांड्याची कामे करुन त्यांचे अवयव शिथील होतात. स्काडा सिस्टीममुळे कोट्यावधी रुपये खर्च करतो. त्याचा काय उपयोग आहे. तिथे सुद्धा कोड लावला पाहीजे. सीसीटीव्ही कॅमेरे लावणार आहोत. वेळत पाणी कसे मिळेल याची गावात मिटींग घ्या नंतर स्काडा सिस्टीम लावा. पर्यटन विकासाचे स्वप्न नगरीत आहे. आपले बरेचसे विभाग सक्रीय आहेत. चांगले काम करत आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी चांगले काम करतात म्हणूनच आपल्याला एवढा मोठा पुरस्कार मिळाला आहे. १५ लाखांची तरतूद केलेली आहे. १९८५ च्या नॉर्मस् प्रमाणे ५ कि.मी.ला एक याप्रमाणे अग्निशामक दलाची आवश्यकता आहे. आपल्याकडे एवढ्या मोट्या परिसरासाठी फक्त एकच अग्निशामक दल आहे. कधी फोन केलातर आला नाही असे होत नाही. एखाद्या असतोच. वाहनचालक स्टाफ कमी आहे. तेथे फक्च ७ पदे आहेत, २९ मंजूर आहेत. शहरात १२ रक्तपेढ्या आहेत. कोणी रोडवर गेलातर, अपघातामध्ये गेलातर रक्त कमी असते. पदे वाढवली पाहिजेत. ड्रायव्हर पदे त्वरित भरणे आवश्यक आहेत. शहरात उंचउंच इमारती झाल्या आहेत. लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. रावेत, वाकड, मोशी, चिंचवड गाव या ठिकाणी स्वतंत्रपणे अग्निशामक यंत्रणा राबवली पाहीजे. त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. इतकी कमी यंत्रणा असून सुद्धा ते कुठेही पडलेले नाहीत. पर्यटन विकास व मंदिराकडे २ मोठे प्रोजेक्ट वाढत आहेत. २/३ नवीन प्रोजेक्ट नवीन टाकले आहेत. मागील

वर्षीचे बजेट पुस्तक घेतलेतर प्रत्येक ठिकाणी आकड्या ऐवजी शून्य लिहिला आहे. आपल्याला निदान त्याप्रमाणे बजेटमध्ये असंख्या तरतूदी असाव्यात म्हणजे आपल्यावर जसा भरोसा आहे, तसे आपले बजेट भरोसे होईल. तसे काम भरोसे होईल. जसा बेस्टसिटी म्हणुन पुरस्कार मिळाला आहे तसा भरोसा शहर म्हणून पुरस्कार मिळेल.

**मा.निलेश बारणे –** मा.महापौर साहेब, मॉडेल वॉर्ड ठराविक प्रभागात केला आहे. माझ्या प्रभागांत थेरगावमध्ये स्मशानभूमी नाही. स्मशानभूमीचे काम होत नाही. औंध ते रावेत बीआरटीचे काम होत नाही. पिंपरी चिंचवड शहरामध्ये हिंजवडी मध्ये ८ लाख लोकवस्ती आहे. एक ते दीड कि.मी. पर्यंत ट्रॅफिक असते. तेथे रस्ते करावेत. रस्ते नाहीत आणि चौकात स्वच्छतागृह सुद्धा नाही. नदीपात्रात गवत, गाळ व खूप कचरा आहे. ते काढण्याचे काम करणे खूप आवश्यक आहे. सर्व शाळांमधील जे संगणक आहेत ते बंद आहेत. थेरगाव विभागात पाण्याच्या टाक्या आहेत. परंतु एक तास सुद्धा पाणी येत नाही. अंदाजपत्रकात दिल्याप्रमाणे माझ्या वॉर्डमधील कामे होत नाहीत. ती सर्व आवश्यक कामे करावी ही विनंती.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब, प्रत्येकजण काम करत असतो. गेल्यावर्षी गेल्या आयुक्तांनी सांगितले, जीवनावश्यक वस्तू एलबीटीमुळे उपाय योजून खनिज पदार्थ पेट्रोल, डिझेल सारखे खनिज पदार्थ असतील ते जीवनावश्यक यात मोडतात. आम्हाला पंपाबद्दल संप करायचा अधिकार नाही. खनिज पदार्थांत सूट दिलीतरी त्याठिकाणी गळती धरलीतरी एक रुपया जनतेला कमी मिळू शकतो. दीड ते दोन रुपया रेट कमी आहे. कदाचित आपल्या लोकांवर अन्याय होणार नाही. पेट्रोल स्वस्त मिळू शकते. सोन्यावर एक टक्का जकात लावली. काय करतो, महिलांचा प्रश्न आहे, त्याठिकाणी देहू रोडला सोने खरेदी केलीतर एक रुपया कमी पडतो. तसेच हा प्रश्न पेट्रोल, डिझेल यांचा आहे. खनिज पदार्थांना सूट देणे काळाची गरज आहे. सर्व नगरसेवकांनी सूचना मांडली. पेट्रोल, डिझेलसाठी सूट देणार. पिंपरी चिंचवड शहराच्या नागरीकांना स्वस्त दरात पेट्रोल मिळेल. अंदाजपत्रकात चांगल्या सूचना मांडल्या. आयुक्तांना धन्यवाद दिले होते. नगरसेवक नसेल तर तिथे आयुक्तांनी त्याठिकाणी २ कोटी सँक्शन केलेले आहेत. परत एकदा सगळे अंदाजपत्रक बनवताना इतके तास वाया गेलेले आहेत. पुढील वर्षी अंदाजपत्रक बनवताना सॉफ्टवेअर बैठक घ्या. एक्सेप्ट करा. ते जेन्युइन असेलतर त्यावर

कारवाई करा हा पठाणताईंनी चांगला मुद्दा मांडला. ओटा स्किम बनवली. झोपडपट्टीतून जी लोकं गेली, बांग्लादेशी तिथे घुसले आहेत. झोपड्या परत ठेवल्या. प्रत्येक वर्षी झोपड्या बांधून देणार असाल तर तिथे दापोडीच्या रमाताईंनी सांगितले. झोपडपट्टीवर कंट्रोल गरजेचा आहे. शिक्षणासाठी फंड असलातरी तो खर्च करण्यासाठी फंड असणे गरजेचे आहे. झोपडपट्ट्या निवारण झालेतरी ख-या अर्थाने त्याचे नियोजन होणार नाही. परत एकदा अंदाजपत्रकासाठी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब,जवळजवळ सगळे मुद्दे कव्हर झालेले आहेत. तुम्ही मला बोलायला संधी दिली. आयुक्तांनी जो दहा कलमी कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्याबद्दल प्रथमतः अभिनंदन करते. जी योजना केलेली आहे. त्याची अंमलबजावणी करत असताना तुम्हाला लोकांची आवश्यकता आहे त्यात सुद्धा आपण तयारी काय-काय केलेली आहे. नगरसेवकांना सुद्धा कळवावे. ब-याचशा योजना आहेत, त्या सन्मा.नगरसेवकांना समजत नाहीत. दुसरे विशेष महत्वाचे, पिंपरी चिंचवड शहराची पर्यटन नगरी म्हणून आपल्या माध्यमातून नव्याने ओळख होणार आहे. कलासागरमध्ये श्री.कैंट आले होते. विकास आराखडा दाखवला. ऑटोक्लस्टरमध्ये मिटींग घेतली. पी.के.दास यांनी विकास आरखडा तयार केला. आधीच सगळे ठरले आहे. नंतर सदस्यांना माहिती दिली. मा.बो-हाडे यांनी सांगितले, या सूचना आपल्याला पहिल्यांदा प्राप्त झाल्या असता, त्यावेळी 110 नगरसेवकांशी संपर्क साधला असता निश्चित यात नक्कीच बदल झाला असल्याचे यांच्याकडून म्हटले जाते. ठराविक ठिकाणी मॉडेल वॉर्ड करु असे न करता तिथे सुद्धा योजना राबवली गेली पाहीजे. चांगल्या भागावर सुद्धा अन्याय होतो आहे. आमचे मागिल वर्ष वाया गेले आहे ते वर्ष लॉकींग बजेट झालेले होते. काही करायचे म्हटले तरी हातपाय हलवायला जागा नाही. एवढी चर्चा करुन सुद्धा ही चर्चा निष्फळ ठरणार आहे. पर्यायाने विकास आराखड्यात काही नवीन गोष्टी समाविष्ट करता आल्यातर चेंजेस करता आले तर अतिशय कौतुकास्पद काम करायचे ठरले आहे. वॉर्डस्तरावर नागरी सुविधा केंद्र सुरु करण्याआधी प्रत्येक नगरसेवकाला तुम्ही आधी माहित करुन दिले गेलेले आहे. याबद्दल दुमत नाही. प्रभागात काही बिले मिळकत कर भरण्यासाठी जावे लागते. ऑनलाईन कम्प्यूटरवरुन भरु शकत नाही. सगळ्यांना आपआपल्या वॉर्ड सुविधा उपलब्ध होणार आहेत. अत्यंत स्तूत्य उपक्रम आहे. त्याचबरोबर बाकी बजेट उंटावरुन शेळ्या हाकतो असे आहे. जुन्या बजेटची पारंपारीकता पाळत आलेले आहे. मा.दिलीप बंड यांच्या काळापासून सुरु झालेला

प्रोजेक्ट आजपर्यंत पूर्ण होऊ शकला नाही. त्यावेळी अत्यंत मोठा प्रकल्प झाल्यामुळे आमच्या मनपाच्या तिजोरीवर एवढा ताण पडला. एवढा स्वहिस्सा पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम एवढा मोठा असताना एवढी मोठी रक्कम भरावी लागली. महापालिका संपूर्ण कर्ज घेण्याच्या परिस्थीतीत गेली होती. पुढील वर्षी मा.आशिष शर्मा आले नसते तर, सर्वांनी त्यांचे आभार मानले पाहिजेत. त्यांनी जे काटकसरीचे धोरण राबविले तेव्हा महापालिका अत्यंत वाईट परिस्थीतीत होती. मा.शर्मा यांनी महापालिकेला तरले. बजेट लॉकींग केले होते. त्यांच्या धोरणामुळे बाजारात आपली पत पडली होती ती वाढली. आपण आल्यानंतर आपल्याला समजण्यातच एक वर्ष वाया गेलेले आहे. अजूनही आम्ही तुम्हाला समजलो असे आम्हाला अजूनही वाटत नाही. अजूनही आपल्याविषयी एवढे सांगू शकत नाही. आपण एक अभ्यासू व्यक्तिमत्व आहात. नांदेडचे जिल्हाधिकारी असताना आपण जे प्रशासकीय काम केले त्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आपला सत्कार झालेला आहे. हे आम्ही आमचे भाग्य समजतो. आपण जी कार्यपद्धती अवलंबली आहे त्याची आम्हाला सवय नव्हती, नाही. अधिका-यांना सवय नव्हती. करकचून ब्रेक जोरात लावल्यामुळे अक्सीडंट झालेला आहे. विभागवार बैठकीत आम्ही असतोच, आम्हाला कोणी काही सांगत नव्हते. आपण जो कार्यक्रम आखला आहे. विभागवार बैठक घेतल्यानंतर आपण प्लॅनिंग केलेले आहे. टिडीआर याला आत्ताच हात लावला आहे. आपला हेतू स्पष्ट सुद्धा आहे. नागरीकांशी संबंधित विषय नाही, जो उशीरा हाताळलेला आहे. जनतेशी संबंधित विषयांना आधी प्राधान्य दिलेले आहे. एलबीटीसंदर्भात वावगे ठरणार नाही. लोकांनी ठरवले आहे. मुहूर्त बघितला आहे. कार्यालय बघितले आहे. पण नवरीचाच पत्ता नाही. एलबीटी म्हणजे नक्की काय आहे. नवरीचा चेहरा पदर वर करुन बघितला तरी त्याचे चेकींग सुध्दा व्हायला नको. व-हाड तयार आहे. त्यांच्या मागण्या नक्की काय ते कळत नाही. महासंघ कोर्टात जायला तयार आहे. शंभर टक्के व्यापारी वर्गाने शहर बंद केले. पुण्यात सुद्धा बंद केले होते. निश्चित एलबीटी काही प्रकार आहे का. जेणेकरुन विरोध होतो आहे. जाचक अटी/नियम असले पाहिजेत. जकातीमध्ये चोरी होते आहे हे थांबवायचे काम उत्तम प्रशासक म्हणून मुंढे साहेबांनी केले. उत्पन्न वाढवले. एलबीटीबाबत चोरी नाही पण दरोडा पडू शकतो असे म्हटले जातेय. अधिकारी, नगरसेवक आहेत. रिंग आहे. यात नगरसेवक असण्याचे कारण नाही. हायप्रोफाईल चोरी राहील. जेणेकरुन तो बील दाखवणार नाही. दरवर्षी जकातकर लागू शकतो, त्याची सूची बनवतो. कुठल्या कुठल्या गोष्टींना किती एलबीटी आहे, याला स्वरुप देणार आहोत

का. ज्याचे प्रतिदिन रु.275/- उत्पन्न आहे अशा लोकांना सुद्धा एलबीटी लागू पडणार आहे. रस्त्यावरील चप्पल शिवणा-या पासून टप-यांचा सुद्धा यात समावेश असतो. ज्यांच्याकडे शॉप अक्ट लायसन्स आहे, त्यांच्यावर एलबीटी लागू होणार आहे. मुंढे साहेब म्हणतात, उत्पन्न कमी होणार नाही उलट वाढणार आहे. संभ्रम आहे. नगरसेवकांना एलबीटी म्हणजे काय हे सांगायला पाहीजे आहे. नगरसेवकांना पत्ता नाही. आम्हाला काही सांगता येत नाही. जोपर्यंत चित्र स्पष्ट होत नाही, तोपर्यंत एलबीटी लागू करण्यासाठी तयार होऊ नये. आपण शासनाचे सेवक आहात. मुख्यमंत्र्यांनी दिलेला आदेश आपल्याला शिरसावंद्य आहे. पण आम्ही येथिल नागरीकांचे सेवक आहोत. जिथे नागरीकांना त्रास होतो आहे, तिथे वॅट भरण्यासाठी पुण्यात 75 हजार व्यापा-यांची नोंद आहे. तारीख आल्यानंतर रात्रंदिवस काम करतात त्यावेळी हा भरला जातो. एलबीटीसाठी पाच ते सहा लाख लोकांपर्यंत रजिस्ट्रेशन व्हायला पाहीजे. रेट सारखा बघितला तेवढी यंत्रणा आहे का. तेवढे सक्षम लोक आहेत का. उद्या महासंघाला जर स्टे मिळाला तर थोडक्यात जकात नाही, एलबीटी सुद्धा नाही. 1200 कोटी मिळाले ते बजेटच्या 70 टक्के आहेत. 59 टक्के बघितले ते जेएनएनयुआरएम मुळे महापालिकेच्या तिजोरीतील पैसा टाकावा लागला. आत्ता परिस्थिती आहे जेएनएनयूआरएमचा हिस्सा फिक्स्ड डिपॉझिटसाठी ठेवणारा आहोत. जुन्या प्रकल्पात बंद पाईप योजना यात आपण या वर्षात ही योजना केली नाहीतर आपल्याला आलेले केंद्र सरकारचे अनुदान परत द्यावे लागणार आहे. या योजनेला सगळ्या नागरीकांचे प्रतिनिधी म्हणून आमचा निश्चितपणे पाठिंबा आहे. मयत शेतक-यांबाबत ठराव केला होता. मा.अजित पवार यांनी, मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला होता, मयत शेतक-यांचे कुटूंबिय नागरीक इथे दोन्हीकडून तुम्हाला काम करायचे असेल तर विरोध मोडायचा असेल तर महापालिकेत किती वेळा भरती झाली त्यावेळी या लोकांसाठी काही करु शकत नाही. काम तर करायचे नाही. कुठेही कॉम्प्रमाईज करायचे नाही. आज कोट्यावधी रुपये जास्त खर्च झालेला आहे. मिळकत करण्याचे बील पास होते. तुम्ही त्या कोणाला जबाबदार नाही. त्यासाठी काही उपाययोजना सूचवत असूतरी तुम्ही त्यात लिड घेतले पाहीजे. तसे होताना दिसत नाही. सल्लागारांबाबतीत मा.सिमाताईंनी सांगितले. अजून अभ्यास करुन बजेटवर सूचना दिलेली आहे. प्रत्येकजण तुमच्याशी फॉलोअप मध्ये आहे. वेळोवेळी नगरसेवकांच्या सूचना लक्षात घेतल्या असत्यातर काही पुढे येणा-या अडचणी निश्चितपणे येणार नाहीत आज निम्मे प्रकल्प बंद करतात. जर ऐकले असते. चुकीच्या गोष्टी म्हणून कोर्टाने स्टे दिलेला आहे. त्यावेळी आम्ही बंड

साहेबांना सांगत होतो. एक रुपया नाममात्र दराने घेतला आहे. ओरडून ओरडून सांगितले होते. प्राधिकरणाने आपल्याला प्रधान सूचनेप्रमाणे परमिशन दिलेली आहे. आपल्याला गरज नाही. प्राधिकरणाने आपल्याला कंप्लिशनसाठी अडवले. लोकांचा काय दोष. लोकांनी तुमच्याकडे घरकुल मागितले आहे. दीड लाखांची घोषणा बंड साहेबांकडून स्वप्नातील घरकुल अशी योजना केलेली होती. स्वप्न इतके वाईट असेल असे वाटले नव्हते. दीड लाखांवरुन 4 लाखांपर्यंत घराची किंमत गेलेली आहे. हे करुन लोकांनी दरवर्षी 50 हजार भरायचे ठरले आहे. लोकांनी कर्ज काढून 50 हजार भरले आहेत. आज त्यांची अवस्था काय आहे. आज 12 हजार घरे त्यांना देऊ शकतो का. प्राधिकरणाच्या बॉडीवर तुम्ही सुद्धा आहात. सिटी इंजिनिअर आहेत तिथे या गोष्टी का मांडत नाहीत.  तुम्ही त्यांना सांगून प्रश्न सोडवले पाहीजेत. जिथे फाईट करायची गरज आहे, तिथे आपण कमी पडतोय. शहराचे नेतृत्व करणारे कुठे आहेत. त्यांना आमचा खरोखर प्रश्न आहे, बंद पाईपसारखी योजना राजकीय चुकीच्या गोष्टींमुळे बंद पडली आहे. मावळचा प्रश्न सोडवणे अवघड नाही. ज्या लोकांना नोकरीत घ्यायचे आहे त्यांना नगरसेवकाच्या शिफारशीने येत नाहीत. संपूर्ण महाराष्ट्रातील लोक इथे अर्ज करुन येतात. सिलेक्ट होतात. त्यांचा विचार मग कोणी करायचा नाही. तुम्हाला हित कळते आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेचा त्यात प्रश्न सुद्धा नव्हता. होर्डींग हटवायला कोर्टाने सांगितले आहे. न्यायालयाने समान भावनेने केले पाहीजे. प्रत्येक गोष्टीचा सन्मान ठेवण्यासाठी न्यायालयात जायला पाहिजे का यावर सुद्धा विचार केला पाहीजे. अशा प्रकारच्या गोष्टी सामोपचार करुन सोडवल्या पाहीजेत. प्रकरणे अपेक्षित आहेत ती सोडवली पाहीजेत. गुप्ता यांच्या काळात चुकीची कामे करत होते. त्यावेळी चुकीची कामे करणा-याला थांबवायची आमची ताकद होती. रस्त्यावर आम्ही जायचे, कोर्टात आम्ही जायचे. उद्घाटन करायचे काम यांनी राजरोसपणे करायचे. मलई खायचे काम यांनी करायचे. पीएमपीएलला 3 वर्षे पैसे द्यायचे ठरले होते. आजही संस्था रजिस्टर्ड नाही असे कळते. रजिस्टर्ड का होत नाही कळत नाही. कामगारांवर अन्याय होतो. आमचे लोक बाजू मांडण्यासाठी काम पार पाडतात. आजपर्यंत आमच्याकडून १०० कोटी गेले आहेत. पीसीएमटी सांभाळता येत नाही. कामगार लोक आहेत म्हणून खाजगीकरण करायला मंजूरी दिली. जसे खाजगीकरण झाले तिथे वेगळाच आदेश दिले आहेत. उद्या जी.बी.त विषय आहे. पैसे आधीच देऊन झाले आहेत. उद्या हा विषय आलेला आहे. देवून पैसे जमा झाले आहेत. जी.बी.ला काहीच व्हॅल्यू ठेवली नाही. कंपनाचे आरक्षण आहे. त्यांना पैसे लागतात तर त्यांना आरक्षणे डेव्हलप

करायला सांगा. त्यांना त्या माध्यमातून पैसे मिळू शकतात. आपण किती दिवस पैसे द्यायचे आहेत. पवना बेट बंधारा – साठी १ कोटींची तरतूद आहे. स्टेट गव्हर्नमेंटच्या वन टाईम परवानगीची गरज लागत नाही. सिमाताई कोर्टात का जातात. यंत्रणा आहे म्हणून त्या जातात. हे कुठेतरी चुकते आहे. जो चांगले काम करतो, त्याच्या पाठीमागे सगळे लागतात. प्रशासनाने चांगली सुधारणा करत आणली आहे. तुमच्या बंगल्यातील सफाई कामगारही बदलाल असे कोणाला वाटत नव्हते. साधारणतः इथपासून तुम्ही सुरुवात केली आहे. अधिकारी, नगरसेवक सगळे सारखे नाहीत. तुम्ही चांगले आहात. तरी चांगला वागणारा कोणताही अधिकारी नगरसेवकांसाठी दोन मिनिटांच्यावर देखील जास्त बोलत नाही. आपल्या कृपेने नगरसेवकांना अधिका-यांशी बोलायला काही राहीले नाही. सगळी कामे पारदर्शकपणे चालली आहेत. वाईट गोष्ट नाही. प्रेझेंटेशनमध्ये सांगितले होते, पाण्याच्या ७४% तक्रारी नगरसेवकांमार्फत येतात. १९% डायरेक्ट तक्रारी येतात. डायरेक्ट प्रशासन अक्टीव्ह होणार असेल तर कोठेही अडवलेले नाही. तशा पद्धतीने कामे व्हायला पाहीजेत. नुसतीच पुस्तकात नको. कार्यक्रम सक्सेस करताय. तुमच्या मनांत काही नाही. दुस-या बाजूची कल्पना नाही. अनधिकृत बांधकामावरुन तुमचा आमचा वाद झाला, ही गोष्ट लक्षात घेतली. सगळ्यांना पटवून देण्यात यशस्वी झालात. कसे झाले तुम्ही काय केले पाहीजे. जाणीवपूर्वक म्हटले, सिंघमचे चिंगम व्हायला नको. आमची इच्छा आहे, आहे तसा रिझल्टमधील बदल योग्य नाही. सगळीकडे बघताना तुमची कृपादृष्टी एकसारखी ठेवा. एकाच फूटपट्‌टीवर मापू नका. आत्ता तसे होते आहे. मॉडेल वॉर्ड या गोष्टीचा अभ्यास करा. तुम्हाला पण समजेल. सत्ताधारी पक्षात काम करत असताना उपयुक्त त्याच बाजूंना नेमके घ्यावे लागते. म्हणजे बाकी ठिकाणी अजिबात दुर्लक्ष व्हावे योग्य नाही. रेडझोनच्या विषयात डिअर पार्कसाठी आय.टी. केंद्राला परमिशन दिलेली आहे. देवी इन्स्टिट्‌युशनची मोठी इमारत आहे. परमिशन दिलेली आहे. फार मोठे बांधकाम करणार नाही. रेडझोनमध्ये येते. सफारी पार्कचा प्लॅन करणार आहेत. रेडझोनमध्ये येते तिथे बघायचेच नाही असे नाही. तिथे उद्या बॉम्बस्फोट झालातर श्युअरीटी देऊ शकत नाही. खरेतर महापालिकेसमोर बॉम्बस्फोट होणार नाही का. सेक्टर २२ मधले प्रकल्प त्यामुळे अडकले आहेत. पुनर्वसन होणार म्हणून १० वर्षे कामच केले नाही. पुनर्वसन करायचे राहिले, त्या लोकांचे हाल होत आहेत. झोपड्‌यात नाही आणि घरात सुद्धा नाही, त्याठिकाणी व्हिजिटला बोलवतेय. तुम्ही तिथे का येत नाही हे कळत नाही. तुम्ही सकाळी ९ ते रात्री ९ काम करताय. माहिती

मिळतेय. तुमच्या प्रत्येक हालचालीवर आमचे सुद्धा बारीक लक्ष आहे. कोण हे तुम्हाला सुद्धा माहिती आहे. तुम्ही काम करताय. नगरसेवकांना सुद्धा लोकांनी कामासाठी निवडून दिलेले आहे. आम्ही अपेक्षा करतोय, आमच्या वॉर्डात आयुक्त व्हिजिटला आले पाहीजेत. कार्यक्रमाला आले पाहीजेत. त्यासाठी वेळ ठेवला. एक दिवसांत दोन/तीन वॉर्ड होतील. एक प्रभाग एक वॉर्ड आहे. विशेष सांगायचे म्हणजे खरेतर मनपाला बेस्ट सिटी म्हणून,आयएसओ म्हणून प्राईज मिळाले आहे. चांगली कामे झाले म्हणून मिळाले आहे. दुसरा ड्रॉ बाकी आहे. काही ठिकाणी काम झाले आहे. त्याचेच प्रेझेंटेशन केलेले आहे. यमुनानगरमध्ये माझ्या वॉर्डात २४X७ ची यंत्रणा मनपाने राबवली आहे. दोन वर्षांपासून श्री.लडकत व त्यांचा स्टाफ यांना मा.शर्मा साहेब यांनी प्रोत्साहित केलेले होते. मागील वर्षी जेवढे पाणी लागत होते, त्यापेक्षा कमी पाणी लागते आहे. प्रोजेक्ट सक्सेस होतो असे सांगायला आनंद वाटतो. महिला बालकल्याण संदर्भात आत्ता सांगितले देखील. आख्ख्या महाराष्ट्रात कुठे नाही इतके महापौर सदस्य असताना आम्ही प्लॅनिंग केले होते. त्यात मतिमंद मुलीला मदत करण्याची योजना असेल, एका मुलीवर ऑपरेशन केले असले, मुलगी दत्तक घेतली असले, बाळंतविडा योजना असेल, आपण त्याचे सादरीकरण करण्यात फेल्युअर आहात. किती अर्ज आले. नियम/अटी इतक्या जाचक ठेवल्यात. अर्ज येऊ शकत नाही. नियमांत/अटींत करायचे काम प्रशासनाचे आहे. निगेटिव्ह थिंकींग आले. अर्ज आले नाहीत. प्रशासनाबाबतीत व्यवस्थित निविदापूर्ण योजना आल्या नाहीत. त्याच-त्याच योजना येतात. त्याचे आऊटपुट काही नाही. तुमचा टक्का, बजेट कोड, महासंघ याबाबतीत पूर्ण निगेटीव्ह भावना आहे. काही गोष्टी घेतल्या आहेत, त्याच्या खोलात गेले पाहीजे. कोणी घेतल्या, कशामुळे घेतल्या, याच्या खोलात गेले पाहीजे. त्यासाठी उपाययोजना करायचे काम आपण जे करतो ते चुकीचे आहे. चुक सुधारा. आपल्याला काम आहे. त्याकडे लक्ष दिले पाहीजे. कोटींचे बजेट, स्किमकडे लक्ष दिले पाहीजे. मागील वर्षी महिला बालकल्याण माध्यमातून पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट कोर्सेस घेतले गेले. काय चालले आहे. फक्त सभागृह या नात्याने सत्ताधारी नगरसेवकांना कोर्सेसचे निमंत्रण दिले. महिला बालकल्याण मधून त्याचे बील पे झालेले आहे. जसे आपण आपल्या खर्चाने जयपूरला गेलेल्या होत्या. त्यात भेदभाव झाला नाही पाहीजे. सगळ्यांना समाविष्ट करुन घेतले पाहीजे. याच प्रश्नाला डेव्हलप करायची गरज नाही. नवीन नगरसेवकांना गरज आहे. याठिकाणी सुद्धा भेदभाव केला गेला. एक बजेट मांडले. शंभर टक्के बजेट खर्ची झाले पाहीजे. याकडे विशेष लक्ष द्या. ३० ते ४०% बजेट लॅप्स झालेले आहे. मिळकत करात

खरेतर चांगली सुधारणा झाली आहे. एलबीटीचे काय होणार माहित नाही. याचे उत्पन्न किती दिवस राहणार. मिळकत कर, बांधकाम परवाना, पाणीपट्टी, भूमि आणि जिंदगी मधून मिळणारे उत्पन्न काय राहणार आहे. नवीन बांधकामांची नोंदणी थांबवली आहे. अधिकृत नोंदींमधून रेव्हेन्यू मिळतो आहे. शासनाच्या आदेशाप्रमाणे जे काही होईल. आपण आपले उत्पन्न का थांबवले आहे. उगाचच आसपास नाही तसे नाही, शिस्त लावली पाहीजे. जप्तीच्या नोटासा लावतोय. विसंगती दिसतेय. बिल्डींग परमिशनमधून जास्त रेव्हेन्यू मिळतोय. तसे सिमाताईंकडून सांगितले गेले. अधिकृत अनधिकृत वेगळे हेड केलेतर निश्चिती राहील. २०१२ पर्यंत नोंदी केल्या. पाणीपट्टी बिलाशी मॅच केलेतरी कळेल. राहीलेल्या नोंदी अधिकृत का अनधिकृत ते कळेल. सगळे ऑनलाईन आहे. उपलब्ध आहे. तिथे पूर्ण स्कोप आहे. तिथे लक्ष देत नाही. वेळ घालवतोय. समानीकरणात विसंगती आहे. रेटींग वाढवायची गरज आहे. मिळकत करात आम्ही सूचना देतोय. यात लक्ष दिले पाहीजे. बिल्डींग परमिशनबाबतीत ७० मी. उंचीच्या बिल्डींगला परवानगी देणार आहात. सद्या कोणाच्या आहेत. एकमेकांशी कोऑर्डिनेशन आहे. ७० मी.ची शिडी घेतली. ७० मी. वरुन ५४ मी.वर जाता येते. त्यासाठी परत नवीन ५४ मीटरच्या शिडया खरेदी करुन त्या घ्यायचे का. यासारख्या बारीकसारीक गोष्टी आहेत. जसे सांगितले गेले, आज बजेट आहे. तीन दिवसांपूर्वी पुस्तक आले. नवीन नगरसेवकांसाठी कसरतीचा विषय आहे. महापालिकेत आल्यापासून बजेट म्हणजे काय इथपासून सुरुवात झाली. आपल्याकडून सदस्यांच्या सूचनांचा विचार केला गेला पाहीजे अशी विनंती करते. आणि थांबते.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, खरोखर आज आपल्या महापालिकेत हजारोंचे, कोटींचे आकडे तुम्ही आम्ही ऐकतोय. त्यापैकी जवळपास २ हजार कोटी व १२०० कोटी जेएनएनयूआरएमचे असे मिळून एकूण ३२०० कोटींचे बजेट आपण सादर केलेले आहे. त्याच बजेटवर चर्चा करत आहोत. प्रत्यक्ष जमाखर्चाचा तपशिल पाहिला तर एकूण जमा २०२४,१३,९४,४००/- खर्चापोटी २०२१,७५,६७,१००/- जवळपास शिलकीचे बजेट सभागृहासमोर सादर केलेले आहे. आयुक्त साहेबांना एक सूचनावजा विनंती आहे. आपण येऊन ११ महिन्यांचा कालावधी उलटून चालला आहे. आपल्या शेजारी असलेली परंतू मोठा वरचा दर्जा असलेली महापालिका पुणे महापालिका ज्याप्रमाणे त्यांच्याकडे बजेट तयार केले जाते त्याप्रमाणेच मंजुरी दिली जाते. लोकनियुक्त पदाधिकारी, प्रशासन, संबंधित अधिकारी यांच्याबरोबर प्रत्यक्ष

नागरीकांचा सहभाग घेऊन बजेटची मूळ आखणी केली जाते. सन्माननियांकडून ऐकले असेल चार दिवसांअगोदर आम्हाला पुस्तक मिळाले किंवा पुस्तक मिळाले नाही. सभागृहात आल्यानंतर पुस्तक बघायला मिळाले. पदाधिकारी, सर्वपक्षीय प्रमुखांना बरोबर घेऊन बजेटची आखणी केलीतरी तुम्हाला म्हणावे तसे यश आल्याशिवाय राहणार नाही. आपल्याला देखील वाईट, आक्षेपार्ह गोष्टी यात दिसून आलेल्या आहेत. थोडक्यात तुमच्यासमोर मांडणार आहे ते सर्व करत असताना कमी वेळात सदस्यांसमोर आलेले असले तरी शहरात अनेक प्रश्न नव्याने तयार झालेले आहेत. बरीचशा सदस्यांनी बजेट व्यवस्थित वाचले असेल. प्रशासनाची मनातून इच्छा नसताना हेड तयार करावे लागले. अतिक्रमण कारवाईसाठी प्रत्येक प्रभागात बजेट ठेवले आहे. कास्टींग आवडले नाही, वाचताना वाईट वाटले. करदात्या लोकांचे पैसे खर्च करायचे. कुठेना कुठेतरी कोट्यावधी रुपयांच्या बजेटसाठी तरतूद वाढवतोय. त्याला मान्यता देतोय. त्याचप्रमाणे चांगल्या कामासाठी बजेट ठेवण्यात आलेले आहे. छोट्याछोट्या गोष्टी आहेत. उदा.साफसफाईसाठी दंडात्मक शुल्क करतोय. त्याचे जमेचे बजेट १५ लाख. साफसफाईसाठी २० टक्के आपण देतोय. त्याची दंडात्मक रक्कम जवळपास तेवढीच आहे. जेवढे जमेचे बजेट, तेवढेच बक्षिसाचे सुद्धा बजेट आहे. बक्षिसासाठीच दंड करतो का असा प्रश्न माझ्यासारख्याच्या मनात आल्याशिवाय राहत नाही. आज पिंपरी चिंचवड शहरात आपल्या परिसरात जास्त कामे व्हावीत. आपल्या परिसरात माझ्या भागात ती व्हावीत असे प्रत्येक सदस्याला वाटत असते. हे बजेट बारकाईने बघत असताना कमी जास्त फायदा त्याच्या स्वतःच्या प्रगतीत दिसत असतो. हे सर्व होत असताना नियम करुन गरज नसताना होत असतात. अनेक गोष्टी शहराच्या दृष्टीने तेवढ्याच महत्वाच्या आहेत. एकदा सांगितले, पी.के.दास यांनी आराखडा बनवला, आयुक्तांना आवडला. काही दुरुस्त्या व्हाव्यात, सुधारणा व्हाव्यात असे वाटते. माझ्या परिसरात उद्यान का घेतले नाही. अनेक शंका येऊ शकतात. आपण केलेली तरतूद कमी जास्त प्रमाणात असून याचा उल्लेख दिसतो आहे. आपल्याकडे अनेक वेळा तक्रार केली, विनंती केली, सूचना केली. बजेटच्या पुस्तकात शिवसृष्टीचा फोटो दिलेला आहे. त्याबाबत अनेक वेळा तक्रार केली. इथे सामाजिक प्रश्नांवर उद्या निर्णय होऊ नये. कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये याची जाणीव होऊ नये म्हणून काम करताय. कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करताय. अतिशय चांगल्या पद्धतीने उदयान झालेले आहे. खूप सुंदर, आकर्षक झाले आहे. माझे चार कार्यकर्ते तिथे रोज असतात. चुकीची दुर्घटना होऊ नये.

महाराष्ट्र हा फुले, आंबेडकर यांचा महाराष्ट्र आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्र सुधारायला इथे अनेक वाईट घटना घडल्या आहेत. या शहरात अशा प्रकारच्या घटना होऊ नयेत. वाईट प्रकारच्या घटना घडतात, याचे पडसाद दुसरीकडे होऊ नयेत. यासाठी मनापासून तक्रारी केल्या आहेत. त्या करत असताना निविदा प्रक्रिया देखील पूर्ण काळ पुरवा. परंतू फोनवर एसएमएस पर्यंत कशाप्रकारे संकलित करता येईल. याबाबत नियम केला आहे. अनेक गोष्टी देत असताना साहजिकच आहे जे करतो ते चुकीचे करत नाही ते बीनचुक असते. याचा वाईट परिणाम साहजिकच तुमच्या आमच्यावर आहे. जेवढी मोठी खुर्ची तेवढीच जबाबदारी मोठी असते. हे जो त्या खुर्चीवर बसतो त्याला माहित असते. चांगले व्हावे ते डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेण्याचा प्रयत्न करत असतो. त्याला मान्यता देणे या दृष्टीकोणातून यासंदर्भात प्रयत्नशील असतात. शहरात अनेक चांगल्या वाईट गोष्टी आहेत. इथे ब-याच गोष्टींचा विचार केलेला आहे. एसआरए, बीएसयुपी, ईडब्ल्यूएस, एसडीएस आरक्षणांबाबतीत असेल, कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी उच्च उत्पन्न गटातील लोकांकडून टॅक्स पेएबल नागरीकांकडून खालच्या स्तरापासून वरच्या स्तरावरील प्रत्येक घटक विचारात घेऊन हे झालेले आहे. एलबीटी लागू होत असताना त्याचे दुष्परिणाम शहरावर होतील. म्हणून कर्मचारी महासंघाने रिट पिटीशन दाखल केलेले आहे. त्याचे चांगले वाईट परिणाम शहरावर होणार आहेत. शहरावर एलबीटी लागू झाली त्याचे परिणाम उद्या एकंदर चांगले होतील किंवा वाईट होतील. कधीना कधीतरी सामोरे जावे लागणार आहे. शहराला कर लागू करण्यासाठी सूचना आदेश दिल्या असतील तरी नक्कीच लागू करावा लागेल. महिनाभरात दिसणार आहे. कोणत्याही परिस्थितीत शहरातील नागरीक यामुळे त्रस्त होऊ नयेत. आज त्यांच्या खर्चांत भर पडू नये. त्यांना ताण आल्यासारखे वाटू नये. असे मान्यता देणा-या प्रत्येक राजकीय सदस्याला वाटणे साहजिकच आहे. एलबीटी मध्ये कर्मचा-यांना चरायचे कुरण होणार आहे. जकातबाबतीत अनेक बदनाम नगरसेवकांचा अधिका-यांचा सहभाग असतो असे म्हणतात. यानंतर सस्पेण्ड करण्यासाठी तुम्हाला लाईन लागणार आहे. एलबीटीवर कंट्रोल ठेवता येऊ शकेल असे ठोस मानाने वाटत नाही. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर आम्हाला असे वाटत नाही. कर्मचा-यांना अधिका-यांना अधिकार मिळाले आहेत. तुमचे घराचा दरवाजा ठोठावल्यासारखे अधिकार मिळणार आहेत. शॉप अक्टचे उदाहरण आहे. सांगवी, थेरगाव असेल, ट्रेनिंगचा बिझनेस असतो. घरातल्या पट्ट्यावर शॉप अक्ट असतो. घर ठोठवायला जावे लागेल. किती गैरकृत्य होईल. मनपाचे किती उत्पन्न कमी

होईल. याचा अंदाज आखू शकणार नाही. नाशिक इथे ३०% वसूली झाली असली तरी ती जास्त असण्याची शक्यता सांगता येणार नाही. अशा प्रकारचे सोप्या गोष्टींवर नियंत्रण कसे ठेवला येईल. पारपदर्शकपणा ठेवता येईल. जकात नाक्यावर कॅमेरे लावू शकतो. एलबीटीमध्ये प्रत्येक घरावर कॅमेरा कसा लावणार. शंभर टक्के कंट्रोल अवघड आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून वापरा. २,००० कोटींमध्ये चालू वर्षाचे आर्थिक नियंत्रण डळमळते दिसत असले तारी किमान ७० ते ८० ट्क्के विकास शुल्क असेल तर बांधकाम परवानगीकडून उत्पन्न मिळत असेल तर उत्पन्न म्हणून पैसा मिळणार आहे. ही सुविधा असलीतरी खर्चाची दुसरी बाजू तेवढी सक्षम झाली आहे का हे परिक्षण पाहणे गरजेचे आहे. कामे चालू आहेत. ख-या अर्थाने त्याची कंटीन्यूटी राहणार आहे का. अजितदादांनी बैठक घेतली. तुम्ही स्वतः सांगितले, २८ ते २९% मागील बजेट एवढा कोणत्या बजेटला, ३०% बजेटवर खर्च होतो आहे. तुमचे बजेटीवरील ८०% खर्च पडला आहे. नागरीकांचा पैसा तसाच ठेवण्यासाठी दिलेला नाही. १०% व्याजाने पैसे मिळत असतील. २०% आजचा खर्च गृहीत आहे. त्या कामात असणारी टेंटेटीव्ह वाढीव रक्कम २०% आहे. १०% व्याज मिळून काय केले. १००% कामातील भाग सक्षमपणे दिसतो असे माझ्या सारख्याला वाटत नाही. काम करत असताना सर्व गोष्टींचे प्लॅनिंग करायचा प्रयत्न करा. तुम्ही कलेक्टर पदापासून आयुक्त म्हणून इथे रूजू झालात. आज वेगळ्या दर्जाच्या पदावर काम करत असताना कमी वर्षांत जास्त विकास झालेली ही महापालिका आहे. म्हणून वेगळ्या नजरेने पाहतोय. तुमचा वेगळा असा ठसा उमटवता येईल. म्हणून वारंवार घेत असलेल्या विभागवार बैठकीत कायद्याची काटेकोर अंमलबजावणी ठेवताना नकारात्मक असलेले निर्णय असतील तर निर्णय होणार. शहरात अनेक चांगल्या गोष्टी करणे आवश्यक आहे. केवळ अतिक्रमण कारवाई उच्च न्यायालयाने आदेशाचे पालन करताना आपण कुठेतरी चुकता कामा नये. नागरीकांच्या जीवाशी खेळू नये. कायद्याची अंमलबजावणी करताना दुस-या बाजूला महापालिका एक सेवा देणारी संस्था आहे. आपण एक उत्पन्नाची यंत्रणा म्हणून काम करत नाही. शासनाचे एक अंग आहे. सेवा देणे या संस्थेचे प्रथम कर्तव्य आहे. लाईट, पाणी, आरोग्य सुविधा या सुविधा देत असताना प्राधान्याने मुलभूत सुविधांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. एखाद्या घरासाठी इमारतीवर कारवाई करणे आवश्यक आहे. आज त्यांच्या सुविधा खंडीत करायच्या का. आमच्या परिसरातील घटना सांगतो, ५ मी.चा रोड अडला आहे. मध्ये १० गुंठ्यांचा प्लॉट आहे. त्यापेक्षा जास्त भूखंडवाल्याला परमिशन देणार का. अनेक प्रश्न आहेत.

आपल्याकडे प्रोजेक्ट नाही म्हणून अनधिकृत बांधकामांची नोंदणी केली आहे. बांधकाम परमिशनसाठी आल्यानंतर तुम्ही परमिशन देऊ शकणार नाही. गुणवत्तेचे उदाहरण देतो, आजूबाजुच्या अनधिकृत इमारती पाडल्या. प्रत्यक्षात जायला रस्ता नाही. त्याला परमिशन पाहीजे. तुम्ही देऊ शकत नाही. महापालिका म्हणून स्वायत्त अधिकारांचा वापर करणे आपले कर्तव्य आहे. रेड झोनमध्ये असताना सर्व कागदपत्रांची पूर्तता असेल तर तुम्हाला परमिशन दिली गेली पाहीजे. तुमच्याकडे प्रोजेक्ट नाही. म्हणजे अनधिकृत बांधकामांना पाठिंबा आहे. त्यांना कुठल्यातरी नियमांत बसवा. कुठेतरी त्यांना संरक्षण देऊन कामे झाली पाहीजेत. हे सुद्धा महापालिका हद्दीत अधिकृत बंगलेवाले  जे काही प्रपोजल असेल त्याप्रमाणे झाले पाहीजे. अशा प्रकारच्या लाखो अडचणी आहेत. उद्याच्या काळात तुमच्यासमोर येणार आहेत. नागरीक अनधिकृत बांधकामे करत नाहीत. प्रत्यक्ष परिस्थिती आहे. याच्यासारखेच साहजिकच आहे. आम्हाला त्रास कमी झाला आहे. हे सगळे होत असताना नियम ठोस स्वरुपात दिला गेला पाहीजे. हे सर्व बीपीएमसी अक्ट नुसार शासनाने अधिकार प्रदान केले पाहीजेत. आयुक्त म्हणून तुम्हाला अधिकार आहेत. तुमच्या डिस्क्रिप्शनिंग पैशातून तुम्ही वापरत नाही. तुम्हाला कायद्यानुसार दिलेले आहेत. अधिकारी कोणी वापरत नाहीत. सगळ्यांच्या  सूचना आहेत. चांगल्या गोष्टींसाठी, चांगल्या कामांसाठी  वापरत असतो. आमच्यासारख्या नगरसेवकांना १००% सांगायची गरज नाही. डीकशनिंग पॉवर नाहीत. प्रकरण सादर केलेतर ते योग्य असल्याशिवाय ते अधिकारांचा वापर करतील असे मला किंवा संबंधित विभागाला वाटत नाही. शासनाने कायद्याने पॉवर दिलेल्या आहेत. आम्ही सांगून तुम्ही वापरता हा भाग नाही. तुम्ही हे अधिकार वापरायला पाहीजेत. शहरातील एखाद्या प्रश्न डिस्क्रिशन पॉवरमध्ये मोडणार असेल तर तुम्ही ती वापरायला पाहीजे. १०% वाढीव बांधकामे आत्ता झाली मग त्या लोकांचे पैसे परत करणार का. ज्या महापालिकेने १०/१५ वर्षांत कोट्यावधी रुपये घेतले आहेत. आपल्याकडे अनेक लोक पैसे भरण्यासाठी तयार आहेत. कम्लिशन देणार. एकिकडे महापालिकेत १ एफ.एस.आय. वापरण्याचा नियम राहील, ते करत असताना १९९७ मध्ये तत्कालिन आयुक्तांनी परमिशन दिली. अंमलबजावणी करणारे आयुक्त असतीलतर तो निर्णय सभागृहाचा आहे. एवढे पुढे १ एप्रिलपासून लागू करा. १०%  वाढीव बांधकाम असून प्रकरण मंजूर करुन यायचे नाही. प्रथम अर्धवट प्रकरणांना कंप्लिशन देणे तुमचे आमचे काम आहे. तुमचे आमचे नागरीक आहेत. अपार्टमेंट असली तरी कंप्लिशन घेत नसतील तर आमच्यासारख्यांकडे येतात. प्लंबिंग नाही केले, ड्रेनेज लाईन

नियमाप्रमाणे केली नाही, कंप्लिशन दिले तर १००% तक्रार येणार. या गोष्टीच्या बाबतीत वापर करुन, ठोस निर्णय घेऊन नक्की मुख्य वर्षात अपेक्षित आहे. दोन/तीन वर्षांत महापालिकेत बरेचशे नियम आपण बघत नाही. पुणे महापालिकेने डेव्हलपमेंट प्लॅन, टीडीआर बाबत प्रस्ताव सादर केला. त्याची डी.सी. रुलमध्ये प्रोव्हिजन नाही. त्यांनी पर्याय शोधला. शासनाने प्रस्ताव विखंडीत केला. टीडीआरबाबत त्यांनी प्रिमिअम आकारतो तो आकारावा. तो आकारुन परिसराचा, लोकांचा विकास करावा. प्रिमियम येईल तो विकसकाला भरावा लागेल, तो त्या-त्या विभागांत वर्ग करावा. डी.सी. रुल २.४.६ डीसीआर करु शकतो, का करत नाही. आपल्याला त्यांच्याकडे बघायला वास्तव नजरेने पाहता येत नाही. २,००० कोटींचे बजेट दिले. तरीसुद्धा किवळे, मोशी, दिघी, मामुर्डी या नवीन गावांत हजार कोटींचा निधी दिला तो कमीच पडला. ताथवडे चा डी.पी. मंजुरीसाठी ठेवला. तिथली आरक्षणे रस्ता पाहीला. १,००० लागतील. च-होलीचे ८,००० ते ८ १/२ हजार वरील क्षेत्र आहे. १२५ ते १५० आरक्षणे, ९० मी. ३० मी. चा रस्ता खाजगी लोकांकडून विकसित होत असेल, महापालिकेचा पैसा खर्च होणार नसेलतर डी.सी. रुलमध्ये प्रोव्हिजन पाहीजे. अशा प्रकारची मान्यता मिळाली पाहीजे. डेव्हलप होत नाही, सुविधा दिल्या जातात. ड्रेनेजची सुविधा दिली जाते. आपल्याकडे कधी अनधिकृत अधिकृत बांधकामे दिसतात का. मऊ डांबराचे रस्ते आता आपण का घेतात. एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर कांबळे यांनी अतिशय चांगले काम केले. त्यांच्या मागे लागून लागून मॉडेल वॉर्ड तयार केले. ६ लाखांचे काम झाले. आजपर्यंत डांबराचा एक पट्टा सुद्धा टाकला नाही. नियोजनबद्ध काम केले. २००७ ला दुस-या वॉर्डातून निवडून आलात. वॉर्ड बाहेर पाहिल्यानंतर ५ मी.चा रस्ता आहे. कांबळे साहेबांच्या योग्य मार्गदर्शनामुळे, योग्य साथीमुळे हे करु शकलो. कन्सल्टंट घेतला. सगळ्या लोकांनी आम्हाला गाठले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला डांबर टाकले. ७/८ वर्षांत एक रुपया सुद्धा खर्च केलेला नाही. कोणत्या गोष्टीचे नियोजन केले. त्याबाबतीत नियोजन होणे बजेटमध्ये अपेक्षित आहे. टाऊन प्लॅनिगचे एस्टिमेट द्या. उद्यानचे एस्टिमेट असू द्या. नागरवस्ती असू द्या. जनसंपर्क असू द्या. डिक्लेअर केले,जास्त प्रमाणात कनेक्टीव्हीटी करु. सीएफसीकडून हेडऑफीसमध्ये इंटरनेट नव्हते. जिथे अडचण हे तिथे २४X७ इंटरनेट पाहीजे. तिथे डाटा केबल पाहीजे. वायफाय पाहीजे. चांगल्या योजना डोळ्यासमोर ठेवून शहर सुंदर करायचे आहे. काही अडचणी आहेत. टेक्निकल अडचणी असतात. कुठेतरी अडचण येते. प्रत्यक्ष निविदेत अडचण आहे. त्यांनी त्यांनी त्यांच्या त्यांच्या नजरेने समोर मांडायचा प्रयत्न केलेला आहे. महिला

बालकल्याण विभाग – अनेक वर्षांत बरेच नगरसेवक महिला व बालकल्याण विभागाकडून देण्यात येणा-या प्रशिक्षणामुळे निवडून येतात. गेले वर्षभर काहीच कामे केलेली नाहीत. महिला बालकल्याण विभागात अखिल भारतीय संस्थेला प्रशिक्षण देण्याचे काम आहे. इतक्या चुकीच्या अटी करायच्या की महिला आल्या नाही पाहीजेत. ५% तरतूद बजेटमध्ये करतो. जेंडर बजेट खर्ची होत नाही. प्रत्येक अंदाजपत्रकामध्ये खर्च होत नाही. शासनाने दिलेल्या गाईडलाईननुसार खेळांसाठी ५% अमाऊंट ठेवणे बंधनकारक आहे. क्रिडांगणे असतील तर खेळाडू तयार होतील. खूप मोठा उपक्रम काढणे योग्य नाही. निधी दिला पाहीजे. इन्फ्रास्ट्रक्चरचे एस्टिमेट द्या. सुविधा असल्या पाहीजेत. अनेक प्रकारे कामे करण्यासारखी आहेत. अनुभव होण्यासारखा आहे. टेक्निकल अडचणी असतील. निर्णय बिल्कूल होत नसतील तर, प्रत्यक्षात तुमच्यापर्यंत पोहचत नसेल तर त्यामुळे ब-याच गोष्टी राहून जातात. पिंपळे सौदागरचा ४५ मी. चा रस्ता, कासारवाडीचा उड्डाणपूल खाली उतरल्यानंतर हिंजवडीला जाणारा रस्ता. महिन्याला किमान २/३ नागरीक मृत्यूमुखी पडतात. जवळकर ताईंची भावजय इथे अक्सिडेंटमध्ये गेली. श्री.नाना काटे यांनी किती वेळा तक्रार केली. तिथे लाईट लावायचे सौजन्य दाखवत नाहीत. शंभर बळी दिल्यानंतर करणार का. प्रत्येक रस्त्याला ५०/५० बळी दिल्यानंतर सुविधा करणार नाही. त्यात काही अडचणी असतील तर तुम्ही जेव्हापासून महापालिकेचा पदभार स्विकारला मग चांगली वाईट कामे करण्यासाठी आमचा अधिकारी घाबरतो. त्याचा रिझल्ट मात्र कोणत्याही प्रकारचा दिसत नाही असी ठोस खंत हे. अधिका-यांमध्ये मात्र धास्तीचे, भितीचे वातावरण कुठेतरी दूर करण्याचा प्रयत्न करावा अशी विनंती करतो. बोलण्यासारखे खूप आहे. तुम्ही दिलेली सूचना लाखो देतील. प्रत्येक व्यक्तीची जो नगरसेवक सांगेल त्याची योग्य ती सूचना लिहून घेताय. म्हणजे हे बजेट शंभर टक्के रिझल्ट ओरिएंटेड बजेट म्हणायला हरकत नाही. विकास कामे सुधारण्याची उपसूचना आहे. त्यात आर्थिक तरतूदी पाहीजेत. त्या करण्यासाठी विनंती केलेली आहे. कोणत्याही परिस्थितीत पाहीले. कोणतीही सूचना आक्षेपार्ह नसावी. प्रत्येकाच्या बाबतीत समन्वय राहील. भविष्यात आपल्याकडून त्याचा समन्वय होऊ द्या.

**मा.कैलास कदम** – मा.महापौर साहेब, याठिकाणी सर्व सदस्यांनी नमूद केले. अंदाजपत्रकावर चर्चा करत असताना प्रत्येकाने आपआपले मत प्रकट केले. आपला अधिक वेळ न घेता याठिकाणी सूचना करणार आहे. प्रशासनाकडून ज्यावेळी

अर्थसंकल्प सादर केला त्यानुसार अंतिम मान्या मिळून त्या कामांचा कालावधी २ महिने असला पाहीजे. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात बजेट सादर झाले पाहीजे असे मला वाटते. लॉकींग बजेटबाबत पठाणताईंनी सांगितले, यासंदर्भात मार्गदर्शन केले. त्यासाठी सूचना करण्यासाठी कायद्याचा काही आधार आहे का, याची देखील माहिती आपल्या माध्यमातून दिली गेली आहे. बीपीएमसी अक्टमध्ये तशी नोंद आहे का. एकंदरीत निविदा प्रक्रिया न राबविता स्वतंत्र निविदा प्रक्रिया देखील राबवणार. स्वतंत्र निविदा राबवण्यासाठी विनंती करतो. अर्थसंकल्पावर सर्वसाधारण शब्दांत उपसूचना स्विकारणार आहोत का. सुधारीत अर्थसंकल्पाची तशी नोंद घेणार का. त्यासाठी नियम/अटी पद्धती काय आहेत. याची सभागृहातून माहिती दिली गेली पाहीजे. अंदाजपत्रकाच्या एखाद्या विकास कामाची ठरवलेली प्रक्रिया कशी ठरवितात याची तातडीने माहिती दिली गेली पाहीजे. एकाच वेळी संपूर्ण अर्थसंकल्पाला मान्यता मागू नये. नगरसेवकांनी चर्चा करुन कामाचा प्राधान्यक्रम ठरवावा. दरवेळी स्वतंत्र मान्यता घ्यावी अशी विनंती करतो. जेएनएनयूआरएम अंतर्गत निधी कर्ज स्वरुपात मिळावा याची कल्पना सभागृहात दिली गेली पाहीजे. कर्जाची परतफेड प्रक्रिया कशी असेल याची माहिती दिली गेली पाहीजे. विशेष योजना म्हणून सुविधा निधींची तरतूद करण्यात येते. योजना पूर्ण करण्याच्या कालावधीत दुर्लक्ष केले जाते. योजनेचा खर्च आर्थिक फायद्याचा आहे. सामान्य नागरीकांनी कररुपाने भरलेल्या पैशांचा वापर होतो. छोट्या तरतूदींचा विकास कामावर परिणाम होतो आहे. मा.भाऊसाहेब भोईर, मा.महेश लांडगे प्रत्येकाकडून सूचना स्विकारणार. व्हिजन २००५ अंतर्गत काम करुन संरक्षण खात्याच्या जमिनीवर काढायचे काम व्हिजन २००५ – १ एप्रिल नंतर सदस्यांनी वाचलेल्या सूचनांमधील काम असेल तर नवीन हेड ओपन करता येईल का. आत्ताच करावे लागेल हा संभ्रम दूर करावा. हा अर्थसंकल्प आधी याठिकाणी मांडलेला आहे. अ,ब,क व ड प्रभागातील विद्युत वाहिन्या कायमस्वरुपी उभाराव्यात, तशी तरतूद करावी अशी विनंती करतो. स्त्री-पुरुषांसाटी सार्वजनिक जागी चाफेकर चौक, पीसीएमटी भोसरी चौक, काळेवाडी फाटा, डांगे चौक, नवी सांगवी चौक इथे शौचालये उभारावीत. स्वतंत्रपणे सार्वजनिक मंदीर व शौचालये उभी करावीत अशी विनंती करतो. होर्डीग माध्यमातून शहरात जे अधिकृत, अनधिकृत आहेत. प्रत्यक्ष त्यावर १० टक्के कर वाढवणार आहे. इतर त्यात फक्त १० टक्के वाढणार आहेत, हे आपल्या ताब्यात घेतले. मनपाच्या माध्यमातून होर्डींगची पूर्णपणे व्यवस्था केलीतर निश्चितपणे त्या मार्फत चांगला महसूल मिळेल अशी आशा व्यक्त करतो. आपल्याला

व्यवसाय करता येत नसेलतर दुस-याला नेमून ठेकेदारी पद्धतीने हे देऊ शकतो. या मताशी मी ठाम आहे. एलबीटीमधून डिझेल, पेट्रोल वगळण्यात यावे. जेणेकरुन जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी होतील. पिंपरी चिंचवड मधील नागरीकांना दिलासा मिळेल. जो कर आपण लावला त्यात मोठे अनुदान दिले तर ते कर भरतील अशी विनंती करतो. कर्मचारी व अधिकारी यांना २० लाखांपर्यंत घर घेण्यासाठी शासकीय व्याज दराने तरतूद केलेली आहे. पिंपरी चिंचवड या उद्योग नगरीत, कामगार नगरीत महापालिकेच्या माध्यमातून फक्त घरकुल योजना राबवावी. आऊट सोर्सिंगमध्ये काम करणारे कामगार, कंपनी मालक व संबंधित ठेकेदार अशा कामगारांना अशा सगळ्यांना घरकुल योजनेत महापालिकेच्या माध्यमातून योजना राबविली तर निश्चितपणे इथे राहत असलेला कामगार वर्ग, घरकाम करणा-या महिलांना मोठा दिलासा मिळेल. कर्मचारी, अधिकारी यांना २० लाखांची तरतूद केलेली आहे. महिला कामगार भगिनींचा या माध्यमातून विचार व्हावा. त्यातून पिंपरी चिंचवड मनपाच्या तिजोरीत भरपूर महसूल प्राप्त होईल. त्या दृष्टीकोणातून विचार व्हावा. दि. ८/८/१२ रोजी पत्र दिले होते. शहराची लोकसंख्या १८ लाख आहे. मोरवाडी, कासारवाडी आय.टी.आय. साठी ४ ते ५ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. फक्त ४३८ जागा उपलब्ध असतात. कासारवाडी आय.टी.आय. मध्ये १३६ जणांना प्रवेश दिला जातो. दि.८/८/१२ रोजी निवेदन दिलेले आहे. आय.टी.आय इथे भेट दिली. चर्चा करताना जाणवले, अपुरा प्रशिक्षणाचा तांत्रिक स्टाफ जागा अपुरी असल्यामुळे ब-याचशा कामगार मुलांना, दुर्बळ घटकांच्या मुलांना समाविष्ट करुन घेऊ शकत नाही. याचा विचार करावा अशी विनंती करतो. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून ज्या सूचना दिलेल्या आहेत. सन्मा.सदस्यांनी याठिकाणी बरीच काही बजेटवर चर्चा केलेली आहे. जेव्हापासून आपण पिंपरी चिंचवडची सुत्रे स्विकारलेली आहेत, पिंपरी चिंचवड मनपाचा वेगळा चेहरा तयार केलेला आहे. चांगल्या पद्धतीने कामाचा ठसा उमटवला आहे. चांगल्या प्रकारच्या लोकांकडून या माध्यमातून प्राप्त होईल. याबाबत शंका नाही. आपल्याबरोबर आम्ही सगळे आहोत. सगळे सभागृह आपल्याबरोबर आहे. महत्वाच्या बाबींवर निश्चित ज्या सूचना केलेल्या आहेत याचा निश्चित विचार होईल अशी अपेक्षा बोलतो. महापौरांनी बोलायची संधी दिली व वॉर्निंग दिली म्हणून थोडक्यात बोलून थांबतो.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, या सभागृहाचे रेकॉर्ड आहे. साडे नऊ तास सभागृह चालले होते. त्याचे रेकॉर्ड मोडा. सध्या 8 तास झाले. मा.महापौर मॅडमना

धन्यवाद दिले पाहीजेत. हे अंदाजपत्रक सादर होत असताना या सभागृहात निराशेचे वातावरण आहे. सभागृहात जवळपास 35 जणांनी अंदाजपत्रकावर मते व्यक्त केली आहेत. उपस्थितांची संख्या 32 राहीली आहे. जवळपाल 3248 कोटी 14 लाख रुपयांचे अंदाजपत्रक स्थायी समितीचे अध्यक्ष इथे नाहीत, त्यांनी सादर केले. ते आयुक्तांनी तयार केलेले आहे. अध्यक्षांनी तयार केलेले नाही. प्रशासनाने बजेट तयार करुन आपल्यापुढे सादर केले आहे. आपण त्याला मंजूरी देणार आहोत. गेले अनेक वर्षांचा या सभागृहातील माझा स्वतःचा अनुभव आहे, बजेट आयुक्तांनी ठेवलेले असते. या दृष्टीकोणातून संपूर्ण बजेट झाल्यानंतर जवळपास 1382 पानांचे बजेट आहे. त्याची सगळी पाने चाळली आहेत. अतिशय चांगल्या प्रकारचे बजेट केले. मा.नांदगुडे यांनी सांगितल्याप्रमाणे जर एखाद्या भागाला झुकते माप दिले ते देखील मान्य करावे लागेल. काही भागात बजेटमधील सर्वाधिक तरतूद ठेवली आहे. तरतूद वाढवत असताना आपण प्रामुख्याने ग्रामीण भागावर भर दिलेला आहे. माझा त्याला विरोध नाही परंतू ज्या ग्रामीण भागात भर दिला, तिथे करातून येणा-या उत्पन्नाची व्यवस्था का होत नाही. आपण जर यापूर्वीच ग्रामीण भागात पाणीपुरवठा, ड्रेनेजसाठी योजना राबविल्या. तरी जास्त पैसा ग्रामीण भागातून करातून येणारे उत्पन्न 37 कोटी भागापैकी आज शासनाच्या निर्णयानुसार 22 कोटी माफ केलेले आहेत. 50 कोटींवर पाणी सोडले पाहीजे. राज्य शासनाकडून कुठेतरी आम्हाला ते माफ होईल, या संभ्रमावस्थेत नागरीक हा पैसा भरत नाहीत. आपण डॉक्टर असलात तरी याबाबत अतिशय चांगल्या प्रकारचे अंदाजपत्रक केले, त्याबद्दल धन्यवाद देतो. सगळे अंदाजपत्रक होत असताना आपल्याला पुस्तक वाटल्यानंतर लक्षात येते, नाविण्यपूर्ण उपक्रम दिलेला आहे. माझ्या दृष्टीकोणातून नाविण्यापूर्ण उपक्रम कोणताही नाही. १० कलमी कार्यक्रम हा एकमेव नाविण्यपूर्ण उपक्रम वाटतोय. जेणेकरुन भविष्यात तपासणी पथक स्थापन केलेले आहे. १ कोटींचे बक्षीस दिलेले आहे. हे प्रोत्साहन आहे. बक्षीस ठेवले म्हणून अधिकारी काम करतील ही वस्तुस्थिती आहे. तेवढी मानसिकता या महापालिकेतील काम करणारे, प्रशासनातील अधिकारी किंवा कर्मचा-यांची नाही. कामाची सफाई नाही. हे रुटीन लागायला बराच कालावधी जावा लागेल. आपली कसरत होणार आहे. आपल्या कसरतीतून कोणाचा बळी जाऊ नये हे प्रामुख्याने सांगतो. आम्ही इतकी वर्षे जी हाव केली, जी पळापळ केली, इथून पुढे आत्ता मात्र आपल्या अधिका-यांची काम करताना निश्चितपणे पळापळ होणार आहे. पर्यटन विकास आराखडा राबवित असताना तरतूद केली. त्यामध्ये सूचना करायची आहे. पर्यटन विकास आराखडा राबविताना पर्यटनावर भर

देतोय. हे नगर पर्यटन नगर व्हावे. शहराबाहेरील, शहरातील नागरीक आकर्षित व्हावेत. तरतूद कमी केली. कोणत्या भागात केली. यात जायचे नाही. यात सातत्याने अनेक अंदाजपत्रकांत सांगितले. अनेक पर्यटन स्थळे आहेत. दुर्गा टेकडी, बर्ड व्हॅली, भोसली सहल केंद्र, केजुदेवी बोटक्लब, सांगवीतील शिवसृष्टी, सायन्स पार्क असेल नागरीकांना पाहण्यासारखी शहरात किती स्थळे आहेत. शहरात राहणा-या नागरीकांना देखील या स्थळांची कल्पना नाही. गेले अनेक अंदाजपत्रक सभेत चर्चा करत असताना सांगितले होते, शहरात प्रामुख्याने या पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी एक पिंपरी-चिंचवड प्रदर्शन बस चालू करावी. त्यामुळे नागरीक ही पर्यटन स्थळे पाहतील. अंदाजपत्रकावर बोलत असताना काही बजेटमध्ये ब्रेक लावला आहे. खर्चालादेखील ब्रेक लावला पाहीजे. महापालिकेच्या तिजोरीतून येणारा कराचा पैसा नागरीकांच्या हितासाठी आहे. प्रकल्पावर खर्च झाला पाहीजे. उत्पन्नाचे स्त्रोत आहेत. जकात जाऊन एलबीटी येईल. आकाशचिन्ह परवाना आहे. अग्निशामक परवाना विभागाकडून हॉटेलवर होर्डींग लावत असतील. शिक्षण निधी, वृक्षकर, बांधकाम विभागात झेंडा लावण्यासाठी बांधकाम व्यावसायिक जमा करतात. वर्षाकाठी ३ ते साडेतीन कोटी जमा होतात. कोणताही बांधकाम व्यावसायिकाक जे जवळपास १४ कोटी वर्ग करुन घेतले आहेत. २२ कोटी रक्कम जमा करतो. उत्पन्नाचे स्त्रोत पाहीले आहेत. महापालिकेचे उत्पन्न किती २८ फेब्रुवारी २०१३ पर्यंत जकात उत्पन्न जवळपास १०५८ कोटी जमा झालेले आहेत. एका वर्षांत १२०० कोटी जमा होतील. प्रत्यक्षात १२०० कोटी जमा आहेत का नाही याची ३१ मार्च पर्यंत शंका आहे. एलबीटी माध्यमातून दाखवले गेले असेलतर काही प्रमाणात १४०० कोटींपर्यंत उत्पन्न जाणार आहे. म्हणून शहरातील व्यवसायीक कितीही छोटा असेल मोठा असेल, एलबीटी लागू करत असताना आपण कराबाबतीत धोरणात्मक निर्णय घ्यायला पाहीजे. ११०० कोटींचे उत्पन्न जकातीपासून मिळते आहे. पुढे जाऊन १४०० कोटींपर्यंत जाणार असेल तर छोट्या-छोट्या व्यावसायिकांवर अन्याय करतो. म्हणून याबाबत मुंढे साहेब असतील, नियमावली तयार केली असेलतर यात बारकाईने विचार केला पाहीजे. जुलमाचा कर प्रामुख्याने भरता कामा नये. वॅट लागू केल्यानंतर जकात बंद झाली पाहीजे. तो राज्य सरकारचा निर्णय आहे. त्यांनी जकात बंद केली. व्यापा-यांना कर भरायला लावला तर आपल्याला उत्पन्न मिळेल. महापालिकेचे स्त्रोत करत असताना प्रामुख्याने व्यापा-यांवर त्याचा परिणाम होऊ नये. सर्वसामान्य माणसावर परिणाम होणार आहे. त्यात एलबीटीत पैसे भरावे लागतील. तर तेवढी रक्कम त्या मालावर, कंपनीवर वाढवणार. आज बांधकाम

व्यावसायिकांना १% फ्लॅटच्या किंमतीवर १% भरणार. त्यांच्या खिशातून भरणार नाही. सगळ्या विचारातून लागू करताना त्रुटी राहू नये. हा प्रामुख्याने करसंकलनबाबतीत जवळपास २५० कोटी अपेक्षित धरले आहेत. सभागृहात सदस्यांनी सांगितले आहे, ६,००० मिळकती ३१ मार्च पूर्वीचे रेकॉर्ड आहे. महापालिकेत तसे नमूद केलेले आहे. या मिळकती नोंदवून घेतल्यानंतर महापालिकेचा येणारा पैसा, २० कोटी मनपाच्या तिजोरीत पडणार आहेत. त्याची नोंद करावी लागणार आहे. आत्ता नोंदणी करुन घेतली तरी ३१ मार्च पूर्वीचे मनपाला उत्पन्न मिळणार आहे. उत्पन्न कमी पडू नये हाच हेतू आहे. कररुपाने महापालिकेच्या तिजोरीत जमा झालेला बराचसा पैसा वर्ष सहा महिन्यांत घालवून दिलेला आहे. मिळकत कर भरल्यानंतर २% करतो. दंड भरतो. जेणेकरुन मिळकत करात आपण वाढ केलीतरी मागील माहिन्यांत उत्पन्न वाढणार आहे. मध्यंतरीच्या कालावधीत आपण शहरात सुत्रे हाती घेतल्यानंतर राज्य सरकारच्या निर्देशांप्रमाणे बांधकामे पाडली. ती पाडली मात्र आज शहरात जवळपास २०,००० मिळकती आहेत. एखाद्या नागरीकाची मिळकत आहे, तो खाली राहतो व वर तीन/तीन मजले वाढवले तर त्याची नोंद राहत नाही अशा जवळपास १०,००० मिळकती आहेत. लाईटबील, पाणी खाली राहणारे वापरतात. हेच वर राहणारे नागरीक त्याला वेगळे निकष काय नाहीत. जवळपास २५ ते ३० कोटी उत्पन्न वाढेल. आपण शहरात आल्यानंतर बांधकामे पाडायला सुरुवात केली. आयुक्त घरफोडी करणारे आयुक्त अशी शहरात आपली ओळख झाली आहे. एक शेर आहे, उमर गुजर जाती है, एक एक घर बनाने में तुमको देर नहीं लगती, बस्तीयाँ उजाडनेमें ।। २० ते ३०% बांधकामे पाडत असताना राजकीय द्वेषापोटी पाडली आहेत. कोणीही सांगितले, विशिष्ट पक्षाच्या नेत्यांनी सांगितले ते पाडा म्हणून आपण कारवाई केलेली आहे. आपल्या शहरातील माणूस ओळखतो. पुढा-यांना जाणतो. तुमच्याशी ओळख झाली या अंदाजपत्रकाच्या माध्यमातून. एवढा सगळा कारभार करत असताना अतिशय गतिमान, प्रयोगशील अंदाजपत्रक म्हणावे लागते. कोणताही हेतू नाही. आपण जो प्रशासकीय कारभार करता याबद्दल मनात बिलकूल शंका नाही. चुकीच्या पद्धतीने फिडींग करुन एखाद्याचे नुकसान करायचे काम तर आपण करत नाही ना याची खात्री पटवून घ्या. बिल्डींग परमिशन विभागाचे उत्पन्न २०१३-१४ साठी २५० कोटी ९८ लाख अपेक्षित धरले आहे. बांधकाम विभागाचे उत्पन्न येथे आहे. याबरोबरच त्याला लागू असणारे उत्पन्न अग्निशामक विभागाचा नाहरकत दाखला घेतो. अनेक नागरीक २० ते २२ कोटी भरतात. ३ ते ४ कोटी उद्यानासाठी भरतात. पुढील वर्षी जरी स्लॅक असलातरी

२८० कोटींवर जाणार आहे. शहरात मोठ्या प्रमाणात बांधकामे चालू आहेत. मोठमोठ्या इमारती आहेत. बांधकामांना नागरी सुविधा देण्यासाठी कमी पडतो. ड्रेनेज व्यवस्था रास्त झाल्या पाहीजेत. कच-याची मुळात वाट लागली पाहीजे. स्वच्छता साफसफाई झाली पाहीजे. याबाबत कमी पडतोय. या दृष्टीकोणातून निदर्शनास आणून देतो. ७ कोटी १६ लाख उत्पन्न दाखवले आहे. परमिशन देत असताना या शहराला विद्रूप स्वरुप प्राप्त होऊ नये. ब-याच प्रमाणात शहराच्या दर्शनी भागात फलक लावतात. विद्रूप रुप देऊ नये. आमच्यासारखा इतर वॉर्डात चांगले फ्लेक्स लावण्यासाठी रितसर परमिशन द्या. जेणेकरुन जागा निश्चित करा. प्रभाग कार्यालयाकडून परमिशन घेतल्यानंतर उत्पन्न वाढेल. पिंपरी चिंचवड शहरात नाव नसले तरी अनधिकृत फलक, फ्लेक्स प्रत्यक्षात काढायची मोहिम करा. प्रभाग कार्यालयांकडून मोहिम चालू आहे. ज्यांचे कोणी वाली नाही, त्यांचे फ्लेक्स काढले आहेत. ज्यांच्याकडे वरदहस्त आहे, त्यांचे काढले नाहीत. यात भेदभाव होता कामा नये. यात आपल्याकडून समान पातळीवरुन न्याय मिळावा हीच अपेक्षा व्यक्त करतो. अग्निशामक विभागाकडून मोठ्या प्रमाणावर नागरी सुविधा केंद्राकडून पैसा जमा होतो. ५४ मी.च्या शिडीसाठी ८ कोटी ७५ लाख, वाहन खरेदीसाठी १३ लाख ७५ हजार. जे वाहन घेणार त्याची तपासणी करुन घेतले गेले पाहीजे. मागील कालावधीत काही वाहने व यंत्रसामग्री घेताना ते दर्जेदार नव्हते. त्याची नंतर तपासणी करावी लागली. भविष्यात असा प्रकार करु नये. जेणेकरुन शहराच्या भविष्याच्या दृष्टीकोणातून वाहन व त्याची क्षमता तपासून दर्जेदार साहित्य घेण्यासंदर्भात आपण प्रयत्न करावेत. पाणीपुरवठ्याबाबतीत चर्चा झाली. बंद पाईप योजनेबाबत चर्चा झाली. मीदेखली अनेक वेळा बंद पाईप योजनेबाबत चर्चा केली. प्रशासनाने चुकीच्या पद्धतीने योजना राबविली हे नाकारता येणार नाही. आपण यासाठी २९३ कोटी ४१ लाख तरतूद केली. त्याची निविदा निघाली, ती २०.१८% अबोव्ह दराची आहे. ३९.८ टक्के दराची निविदा काढली. संबंधित ठेकेदाराला ५० कोटी अडव्हान्स दिले. २५ कोटी ठेकेदाराकडे आहेत. ते वळते करुन घेतले. या साठीचा अपेक्षित खर्च ३४० कोटी झाला आहे. पाणी उपसा योजनेसाठी बराच खर्च केला. भूसंपादनासाठी २ कोटी, गेटवेल बांधण्यासाठी २०० कोटी लागणार आहे. ६०० कोटींच्या जवळपास जाणार आहे. राज्य शासनाने मध्यंतरी समिती नेमली. जी सिच्युएशन सांगितली. दोन्ही बाजूंवर बांधावे. आज रावेतला जल उपसा केंद्रावर जाऊन बघा. सगळे ड्रेनेजचे पाणी, मैला त्यात जातो. ते साफ करा. ऊर्शाला केंद्राला बांधायला सुरुवात करा. पाणी उचलावे लागणार आहे. शहराला पाणीपुरवठा होतो तो

प्रामुख्याने शुद्ध मिळत असला तरी ते अशुद्धच आहे. परिस्थिती नाजुक आहे. १८ लाख लोकांवर परिणाम होणार आहे. जिवीताच्या दृष्टीकोणातून धोक्याचे होणार आहे. ड्रेनेजचे पाणी त्यात मिसळताना दिसते. पाणी उपसा करुन सुद्धा त्यावर कोट्यावधी रुपये खर्च करतो. आपण भेट दिली. गेटवेल बांधायला कोणाचीच अडचण नाही. ६ कि.मी.ची लाईन टाकताना शेतक-यांशी चर्चा केली तर सामोपचाराने होईल. कायद्याप्रमाणे मिटणार नाही. त्यासाठी कुठेतरी आपल्याकडून बीलातून पुढे गेले पाहीजे. जोपर्यंत बंद पाईप योजनेत बळी गेलेले आहेत, निश्चितपणे मी देखील या लोकांना सहकार्याच्या भूमिकेखाली शहराच्या दृष्टीकोणातून हा प्रश्न मिटला गेला पाहीजे. सामोपचाराने मिटले पाहीजे, भांडून नाही. बंद पाईप योजना करण्यासाठी पोलिस यंत्रणा लावून किती जणांचे बळी घेणार. त्यावेळी पोलिस यंत्रणा नव्हती का. ३ लोकांचा बळी गेलेला पोलिस यंत्रणेवर पोलिसी धाकाने असे कृत्य करुन हा प्रश्न मिटण्यासारखा नाही. सामोपचाराने एकत्र करुन मिटण्यासारखे आहे. सामोपचाराने निर्णय घेतला तर शंभर टक्के प्रश्न सुटेल. पाणीपुरवठा विभागाकडून खर्च करतो. प्रामुख्याने अपेक्षित उत्पन्न धरतो. ५८ कोटी ५२ लाख वाढतात. गेले वर्षांची विक्री काढलीतर चालू वर्षी किती जमा झाले. २० कोटींपेक्षा जास्त जमा झाले नाहीत. करसंकलनची बिले दिली जातात. पाणी उपकर जमा करतो. २२ कोटी ८० लाख जमा करतो. यात पाणी उपकर २ कोटी ५ लाख जमा आहेत. या शहरात शंभर टक्के नागरीक पाणी पट्टी भरतात का. चोरुन कनेक्शन घेत असतील तर, दुस-याच्या नळावरुन घेत असालतर शंभर टक्के या शहरात जेवढ्या मिळकती आहेत, त्याचे पाणी कनेक्शन शोधून वसूली केलीतर आयुक्तांनी मध्यंतरी बैठक घेतली होती. ५ ते १० कोटींची वाढ होणार आहे. महापालिका आयुक्त डिग्गीकर असताना शहरात अनधिकृत नोंदी कनेक्शन्स शोधले होते. त्यावेळी ५ कोटी उत्पन्न मिळवले होते. शोध मोहीम केलीतर प्रामुख्याने सर्व कनेक्शन्स शोधली तरी उत्पन्नात वाढ होईल. शहरात समान पाणीवाटप होत नाही. विशिष्ट भागात पाणीपुरवठा जास्त केला जातो. अधिकारी सेक्टर २३ मध्ये बसतो. त्याच्यावर आरोप होतो. काही भागात पाणी पुरवठा केला जात नाही. थेरगाव, काळेवाडी, वाकड हा भाग असेल तर तिथे आजदेखील लोलोवलप्रमाणे पाणीपुरवठा होतो. विशिष्ट भागात जास्त दाबाने पाणीपुरवठा केला जातो. स्काडा सिस्टीम काही नाही. प्रत्येक मनुष्य ज्ञानी झाला पाहिजे. याची गंभीर दखल घ्या. प्रत्येक मनुष्य सर्वसामान्य करदात्याला समान न्याय मिळावा. पाणी वाटप समान मिळावे. हा या गोष्टींमागील हेतू आहे. पाणीपुरवठ्याबाबत अनेक वेळा कार्यशाळा घेतल्या.

नागरीकांनी निश्चितपणे तक्रारी केल्या पाहीजेत. वस्तीकडे पाणी मिळते का नाही, याची खबर सारखी घेतली पाहीजे. जुन्या लाईनवर त्याला लागू करुन त्याचे सर्वेक्षण केले पाहीजे. ते बदलायचे शिफ्ट करायचे काम केले आहे. जेएनएनयूआरएम योजनेअंतर्गत पाणीपुरवठा लाईन बदली कराव्यात. मागणी केली आहे. आमच्या अधिका-यांनी लाईन पुढे टाकत असतील तर हे सुद्धा आपण तपासले पाहीजे. निविदा काढण्यासाठी लाईन टाकणे गरजेचे नाही. त्याचे सर्वेक्षण केले पाहीजे. कोणत्या ठिकाणी आवश्यकता आहे, ते रेकॉर्डवर घेतले पाहीजे. संबंधित विभाग प्रमुखांनी ठराव केला. यासंदर्भात सांगितले पाहीजे. आज पाणी उचलेले जाते. या शहरात पाणी उचलत असताना माणशी प्रमाण भरपूर आहे. वाटप व्यवस्थित होत नाही. बोअरवेल घेतल्या आहेत. त्याचे सुद्धा सर्वेक्षण केले पाहीजे. पाण्याचे स्त्रोत कमी झाले नाही पाहीजेत. भूगर्भातील पाणी कमी झाले. संपूर्ण मानवजातीवर गंभीर परिणाम होणार आहे. अनेक सोसायट्यांमध्ये बोअरवेल आहे. रस्ते धुण्यासाठी त्याचा वापर करतो. जनमानसांत जागृती केली पाहीजे. महाराष्ट्रातील काही भाग दुष्काळाने होरपळतोय. बोअरवेलचे पाणी रस्ता धुण्यासाठी वापरतोय. जो मनपाचा सर्वज्ञानी आहे, त्याचा चार्ज आकारला गेलातर, मनपाला उत्पन्न होईल. राज्य शासनाने ब-याचशा गावात खाजगी बोअरवेल पिण्याच्या पाण्यासाठी वापरतात. पाणी संपायची, दुष्काळ पडायची वाट बघायची का. राज्य शासनाचा डाटा जेणेकरुन कमी करा. पिंपरी चिंचवड मनपाला आदेश यायची एकंदर प्रक्रिया करुन खाजगी गोष्टी वापरतो का हे पाहून यावर कारवाई करावी. या दृष्टीकोणातून प्रयत्न करावेत. या अंदाजपत्रकात प्रामुख्याने स्थापत्य विभागावर खर्च करतो. नागर सुविधा जास्त मिळाल्या पाहीजेत. पाणीपुरवठा योजनेत २४ कोटी ११ लाख स्थापत्य विभागावर ठेवले आहेत. अंदाजपत्रकात तरतूद ठेवत असताना कामे चांगल्या क्वालिटीची व्हावीत. कामात हलगर्जीपणा होऊ नये हे पाहीले पाहीजे. बीआरटी रोड औंध-रावेत रोड १५ वर्षांमध्ये त्याला विरोध केला होता. १५ वर्षांत खरेदी होणार नाही असे करायचे. ४५ कोटी खर्च केल्यानंतर ४ वर्षांत त्याच्यावर बीआरटीत रस्ता चालू आहे. कोणाच्या खिशातून पैसा गेला. बंड यांच्या खिशातून पैसा गेला नाही. सभागृहाने मान्यता दिली, त्यांच्या खिशातून पैसा गेला नाही. मी विरोध केला होता. त्या रस्त्यावरच डांबरीकरण होते आहे. चुकीच्या धोरणामुळे अनेक आयुक्त येऊन गेले. अनेक सदस्य, सभागृहात आयुक्त सांगत असताना टेक्निकल नॉलेज नसेल तर- त्याच्यापेक्षा अनुभव जास्त आहे. महापालिकेच्या स्थापनेपासून सभागृहात मा.आर.एस.कुमार, मा.योगेश बहल ज्येष्ठ सदस्य आहेत.

जेणेकरुन अंदाजपत्रकावर बोलत असताना अतिशय चांगल्या प्रकारची प्रभावीपणे भाषणे केली. सदस्यांच्या सूचना विचारात घेतल्या तर भविष्यात आर्थिक फटका बसणार नाही. आपण सुद्धा कोणत्या प्रकारचे नियोजन करत असताना त्या जागेच्या याद्या सुद्धा केल्या पाहीजेत. भविष्यात तुम्ही गेल्यानंतर, आयुक्त बदलल्यानंतर जी चुकीची कामे तुम्ही केली होती ती पुढील आयुक्तांनी केली नाही पाहीजेत. चुकीचा खर्च झाला असेलतर तो देखील खर्च आपल्या रेकॉर्डवर ठेवला पाहीजे. आज सभागृहात ग्रेड सेपरेटरचा उल्लेख केला. प्रामुख्याने जो कर भरतो तो ट्रॅफीक सिग्नलला उभा राहतो. १९९७ चे मॉडेल शोधून पहा त्यावेळीच दिले होते. उड्डाणपूल व्हायला पाहिजे होता. निगडी ते फुगेवाडी असा व्हायला पाहीजे होता. ग्रेड सेपरेटर मधून मेट्रो प्रकल्प जाणार नाही. भविष्यात प्लॅनिंग केले असले तरी शहरात ट्रॅफिक जाम होते. परवा एक फोर व्हिलर ग्रेड सेपरेटरमध्ये पलटी झाली. नाहीतर कोणत्याही शहरात नसेल एवढे सुसज्ज रस्ते शहरात झाले आहेत. सगळे होत असताना चुकीच्या पद्धतीने कामे झाली. ती मात्र होऊ नयेत. ग्रेड सेपरेटरचे काम कितीतरी वर्षे थांबले आहे. पेव्हींग ब्लॉकवर प्रामुख्याने प्रभाग कार्यालयावर तरतूद आपण पाहिली पाहीजे. पेव्हींग ब्लॉक किती क्वालिटीचा आहे. गुणवत्ता तपासली पाहीजे. ८ कोटी ५१ लाख याबाबत रोड ट्रान्सपोर्ट सुधारण्यासाठी नदीलगतच्या नदी पात्रात बांधून रस्ता केला. पुणे महापालिकेने ज्याप्रमाणे नदी पात्रालगत केले. भविष्यात ट्रॅफीक क्षेत्रात गेलो. प्रामुख्याने नदी परिसरात हायसिंथ थांबते. रिंगरोडबाबत ६० ते ६५ जागा मिळाल्या. ३० ते ३५% जागा मिळाल्या. शहरातील रिंगरोड मिळालातर शहरातील प्रमुख रस्ता होईल. ७६ लाखांची तरतूद ठेवली आहे. पार्कींगसाठी मोठ्या प्रमाणात प्लॉट नाहीत. काही भागातून ट्रक गेला, लोकांचे अपघात होतात. याबाबत योग्य तो निर्णय तात्काळ घ्यावा. लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावावा लागणार आहे. प्रामुख्याने वैद्यकीय विभागावर मोठ्या प्रमाणावर खर्च करतो. वाय.सी.एम.सारखे रुग्णालय, इतर विभागीय रुग्णालये आपण डॉक्टर आहात, त्या क्षेत्रातील माहीती आहे. खर्च टाळता येईल. वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी 6 कोटी 75 लाख तरतूद ठेवलेली आहे. ही तरतूद कुठेतरी कमी होईल का या दृष्टीकोणातून पाहीले पाहीजे. याबाबत याआधी मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली. वैद्यकीय प्रतिपूर्तीची बिले तपासणी करुन नाहक खर्च होतो. त्याच्यावर देखील आळा घालावा. उपकरण खर्चासाठी 15 कोटी 8 लाख, वायसीएमच्या उपकरण खर्चासाटी 2 कोटी 15 लाख, अशी 17 ½ कोटींची खरेदी केली होती. हे सगळे करत असताना आपण निश्चितपणे आपल्या कारकीर्दीत नियंत्रण आणले आहे.

परंतू गुणवत्ता तपासणी करुन कंट्रोल आणला आहे. आपल्या कालावधीत ठराविक पैसे भरले आहेत. आपण गेल्यानंतर काय. जवळपास किती कोटी तरतुद इन्स्टिट्युट उभी करण्यासाटी लागणार. प्रत्येक आयुक्त महापालिकेत आल्यानंतर त्याच्या नजरेने महापालिका पाहत असतो. तुम्ही गेल्यानंतर एखादा इंजिनिअर आयुक्त येईल, तो म्हणेल हे केलेले काम चुकीचे केलेले आहे. याबाबत आपण करत असताना भविष्यात प्रकल्प बंद पडू नयेत. पैसा मोजपट्टीत खर्च करावा, जेणेकरुन भविष्यात कमतरता राहता कामा नये. महापालिकेला कायम हा पांढरा हत्ती वाटू नये. स्मशानभूमीसाठी १ कोटी ८ लाख तरतूद केली आहे. महापालिकांच्या स्मशानभूमींना एकदा भेट द्या. राज्य शासनाने हगणदारीमुक्त गाव करण्याचा संकल्प केला आहे. बरीचशी खेडेगावे हगणदारीमुक्त झाली आहेत. शहरात याची गरज आहे. स्मशानभूमीत जा काय अवस्था आहे. काळेवाडी स्मशानभूमीत गेल्यावर नरकात गेल्यासारखे वाटते. संध्याकाळी ६ नंतर भाटनगरच्या स्मशानभूमीत जा, अंगावरचा वास जात नाही. रखवालासाठी १ कोटी ६० लाख तरतूद ठेवतो. एक माणूस नेमलेला असतो. आरोग्य कर्मचा-यांकडून स्मशानभूमी साफ करुन घेतो. काम न करता नाहक पैसे जातात. यावर नियंत्रण पाहीजे. त्यात सुधारणा होईल असे वाटत नाही. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, व्यक्तीचा नाश होतो. त्याच्या मानसिकतेचे नाक दाबायचे काम करु नका. माणसाला जाळायला गेल्यावर त्याला नरकात पाठवण्याची व्यवस्था महापालिका करते. परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी काम केले पाहीजे. सगळे चेंबर अंडरग्राऊंड ड्रेनेज झालेले आहेत. येणा-या-जाणा-या नागरीकाला त्याला सोडून जावे लागते. नदीपात्रालगत अंडरग्राऊंड ड्रेनेज चेंबर तपासणी केली. आजदेखील शौचालये २०० mlt पाणी पुरवठ्याची पूर्तता होत नाही. ठेकेदाराचे भले होते. नदीला घाणीचे, नाल्याचे स्वरुप आले आहे. मच्छरांचे राज्य झाले आहे. मच्छर चावल्याने बेजार झाले आहेत. नाहीतर अधिका-यांनी मच्छरावर उपाययोजना करण्याचे बजेट दिले पाहीजे. त्यासाठी तरतूद केली पाहीजे. दवाखान्यावरील खर्च कमी होईल. सुविधा देत असताना शाळेतील नागरीकांचे आरोग्य पहा. पवना, मुळा, इंद्रायणी नदी खराब करायचे काम पिंपरी चिंचवडने केले आहे. २४० mlt पाणी ट्रीट केलेले आहे. बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. यावर नियंत्रण राखायला वेगळी यंत्रणा ठेवा. तुमच्यापर्यंत जे काही होईल,तुमच्या काळात होईल. एकदा वाटते दाखवणारा, सफाई लावणारा माणूस चांगला असेलतर, आरोग्य चांगले ठेवायचे असेलतर ड्रेनेज लाईन जास्त कालावधीच्या झालेल्या आहेत. राहणा-या नागरीकांची संख्या वाढलेली आहे. ज्यावेळी कमी आहे, १०-१५ वर्षांपूर्वी ड्रेनेज लाईनचे काम पाहत आहोत. अनेक

ठेकेदार खूप मोठे झाले आहेत. आम्हाला काम मिळावे म्हणून ४/५ तास बसतो. ४ लाखांसाठी आहे. आत्ता ४/५ कोटींचे काम करतात. चेंबर बांधले. मनपाची परमिशन घेतली नाही. त्याला प्लास्टर अजूनही केलेले नाही. गाळ साठलेला आहे. साफ करताना अनेक खोलीवर लाईन झालेली आहे. वारंवार नागरवस्तीकडे तक्रारी येतात. लाईन बांधण्यासंदर्भात काळजीपूर्वक पुढील महिन्यात निविदा प्रक्रिया झाली पाहीजे. नाहीतर डांबरीकरणाची निविदा प्रक्रिया झाली पाहीजे. पहिले त्या-त्या भागात तक्रारी आहेत. वास्तविक जुन्या लाईन्स आहेत. चेंबरच्या वारंवार तक्रारी येतात. गटारीचे पाणी मिळते. नागरीकांच्या वेळोवेळी तक्रारी येतात. त्या तपासून कामे करावीत. नागरीकांना चांगल्या सुविधा दिल्यातर निश्चितपणे भविष्यात पाण्यासंदर्भातील नागरीकांच्या तक्रारी वाढणार नाहीत. नदीपात्रालगत केलेल्या सगळ्या ड्रेनेज लाईन फोडण्याचे काम जाणीवपूर्वक केले जाते. तक्रारी कमी होतील. नदीपात्र अतिशय चांगल्या प्रकारचे होईल. जेणेकरुन आरोग्यावर शहरात यांत्रिक पद्धतीने कामे करताना ११ कोटी खर्च करतो. या गोष्टीला विरोध नाही. ज्या नागरीकांसाठी खर्च करतो, ज्या व्यक्तींसाठी खर्च करतो, तुमच्यापर्यंत तक्रार घेऊन येत नाहीत. त्यांना समाधान मिळाले पाहीजे. सभागृहात सदस्य येत नाहीत. ही उदासिनता आहे. बजेट ३२४८ कोटींचे आहे. ३/४ कोटी खर्च करुन सदस्य इथे आलेले आहेत. निवडणूका सोप्या राहीलेल्या नाहीत. त्याला कामाशी मतलब आहे. ही कामे करतो का नाही नाहीतर दुसरा आहे. मा.आर.एस.कुमार साहेबांनी सांगितल्याप्रमाणे अधिका-याची फारफारतर बदली करतो. एका विभागाकडून दुस-या विभागांत जाऊ शकतो. जाताना एखादी वसूली आणून चांगली टोटल घेऊ शकतो. याबाबत गांभिर्याने घेतले पाहीजे. प्रभाग कार्यालये व मुख्य कार्यालय आरोग्यावर मोठा खर्च करतात. नदी साफसफाई, गटर व्यवस्थापन, टॉयलेट शौचालय खरेदीसाठी खर्च करतो. अंदाजपत्रकात ३ कोटींची तरतूद दाखवली. शहरात प्रभागस्तरावर टॉयलेट आहेत. त्यांची अवस्था पहा. त्यांची निगा राखली जाते का. कार्यक्रमाचा ठिकाणा लावला. ३/४ दिवस पडून राहते. निगा राखली जात नाही. मुले खेळतात ते टायरमधील हवा सोडायचे काम करतात. जागेत सार्वजनिक मुता-या उभ्या केल्या पाहीजेत. आरोग्य विभागात सांगितले होते. शौचालयाबाबत या शहरात ४२६२ शौचालयांची गरज आहे. २७३१ शौचालये आहेत,त्यांची अवस्था काय आहे. ती वरचेवर साफ केली जातात का. त्यांची निगा राखली जाते का. त्यांचा वास हजारो फुटांवर येतो आहे. महापालिकेच्या इमारतीतून आत घुसताना पुण्याच्या आयुक्तांना वास आला. त्यांना याचा छडा घेतला, मुतारीत घुतले. हे आयुक्तांचे काम

आहे का. हे करुन घेणे अधिका-यांचे काम आहे. आयुक्त स्वतः काम करायला लागले. नागरीकांनी साफ करावे अशी अवस्था का होते. म्हणून सगळे कर भरत असताना प्राथमिक शिक्षण, आरोग्य ही महापालिकेचे प्राथमिक कर्तव्य आहे. त्यांनी केले पाहिजे, त्यांची जबाबदारी आहे. सर्वांसहीत साफसफाईवर ४ कोटी ५० लाख तरतूद ठेवली आहे. शाळेबाबत कोणत्याही सदस्यांना विचारले. या शौचालयांची काय परिस्थिती आहे. इतक्या वर्षांत तक्रार करुन त्यात सुधारणा का होत नाही. यात सुधारणा झाली नाही. प्रामुख्याने शहरात पुरुषांकरीता व स्त्रियांकरीता मुता-या करण्याचे काम वापरायला पाणी मायनर सोयी नसतील तर त्या करा. पाण्याची सोय शंभर टक्के मुता-यांत पाहीजे. २०० mlt पाणी ट्रीट होत असताना मैल शुद्धीकरण केंद्रातून पाणी ट्रीट होते. चांगले पाणी वापरायचे नसेलतर मैलाशुद्धीकरण केंद्रातून ट्रीट झालेले पाणी वापरलेतर नक्की मुता-या स्वच्छ राहतील. आपल्या कारकीर्दीत शहर हगणदारीमुक्त व्हावे. हे काम मात्र कोणताही आयुक्त करत नाही. झोपडपट्टी परिसर असेलतर त्या ठिकाणी सगळे विधीला बसतात. राज्य शासन एखादे गाव हगणदारी मुक्त करत असेल तर असे शहरात सुद्धा होऊ शकते. तुम्हाला धन्यवाद देतो. एखादा संडासला बसला तर त्याला उठवाल का. प्रशासकीय वर्गाने लोकांना प्रोत्साहन देण्याचे काम केले आहे. आमचा देखील हाच हेतू आहे. ही संकल्पना १० वर्षांपूर्वी केली असती तर झाले असते. शासनाने तुम्हाला सांगितले, तुमचा नाईलाज झाला. अशी भूमिका ठेवल्यानंतर शहरातील अनधिकृत बांधकामे थांबली. कोणीही यापुढे रस्त्यावर विधीसाठी बसणार नाही. आरोग्य विभागाकडून सांगताना कारवाई केली पाहीजे. पुढील अंदाजपत्रकात परत बोलणार आहे. अशा प्रकारे घेतले तर त्याचा पंचनामा देखील सभागृहात करणार आहे विद्युत विभागाचे बीलासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करतो. यात कुठेतरी काटछाट करुन कात्री लावून उर्जा बचत करणा-या स्ट्रीट लाईटसाठी ८ कोटी ५५ लाख तरतूद दाखवली. एवढ्या उर्जा बचती स्ट्रीट लाईटसाठी अशा प्रकारचे प्रयोग केलेले आहेत. त्यापासून काय निष्पन्न झाले. उर्जा बचत म्हणून स्ट्रीट लाईटचे पॅनल्स् ई ५-२० ठिकठाक करतात. आम्ही फोन केला तर म्हणतात, गाडी नाही. ठेकेदाराला डोळ्यासमोर ठेवून उर्जाबचत करायचे काम केले नाही पाहीजे. विद्युत बीलाबाबत गांभिर्याने घेतले पाहीजे. अनावश्यक सुविधा आहेत त्या थांबवल्या गेल्या पाहीजेत. हायमास्क लाईटसाठी २ कोटी ६० लाख असून पाणी जास्त प्रमाणात शुद्ध करण्यासाठी खर्च होतो. केमिकलवर खर्च होतो. जल उपसासाठी ११ कोटी २६ लाख खर्च झाला. विद्युतसाठी नवीन तरतूद केली. सायन्स पार्क इथे तारांगण करणार आहोत.

पक्षनेत्यांनी सूचना केल्या. शहरात तारांगण करण्याशी मी सहमत आहे. मी १९९९ साली मा.स्थायी समितीचा अध्यक्ष होतो. अंदाजपत्रकामध्ये ७ कोटी तरतूद तारांगणसाठी ठेवली होती. निविदा प्रक्रिया १० कोटींची केली आहे. जर्मन कंपनीने स्वारस्य दाखवले होते. वर्कऑर्डर सुद्धा दिली होती. अंदाजपत्रकाची मिटींग होती. स्थायी समिती अध्यक्ष श्रीरंग बारणे यांच्या कारकीर्दीत हे काम झाले नाही पाहीजे म्हणून त्यावेळचे सदस्य योगेश बहल, लक्ष्मण जगताप, शाम वाल्हेकर यांनी होड उठवली. मी त्यावेळी सांगितले, पुढे कोण स्थायी समितीचा अध्यक्ष होईल, त्याच्या कारकीर्दीत काम करा. कारकीर्दीत १२ वर्षापूर्वी हे काम झाले नाही. आज त्या कंपनीचे रेट डबल,तिबल झाले असतील. आत्ता विविध योजनांवर खर्च करतो. त्यापेक्षा हा सायन्स पार्क तारांगण वर खर्च होईल. १ लाख तरतूद केलेली आहे. मंगलाताईंची संकल्पना आहे. हा खर्च व्हावा, जेणेकरुन आपल्या शहराची नाविण्यपूर्ण ओळख व्हावी. जेणेकरुन पुण्यामध्ये राहणारे नागरीक या शहराकडे वेगळ्या दृष्टीकोणातून पाहतील. चांगल्या सुविधा मिळतात. शहरात पर्यटन स्थळे विकसित व्हावीत या दृष्टीकोणातून देखील तरतूद केली पाहीजे. या विषयाला सदस्यांनी हात घातला आहे. त्या विषयाच्या अनुषंगाने बोलणार नाही. संगणकावर प्रामुख्याने भर दिलेला आहे. वाय-फायसाठी तरतूद ठेवलेली आहे. शिक्षण मंडळाबाबत जो खर्च करतो. कम्प्यूटर चालू स्थितीत नाहीत. ते वापरात आणावेत, चालू स्थितीत करावेत. या अंदाजपत्रकात अतिक्रमणावर मोठ्या प्रमाणात तरतूद केली आहे. एकिकडे अतिक्रमणाचे निर्मूलन करतोय, दुसरीकडे शहरात भरचौकात हातगाड्या लावतात. हे अतिक्रमण होते. ज्या हॉटेल व्यावसायिकांनी रस्त्यावर बांधकाम केले, वाढवले आहे त्याबाबत कठोर निर्णय घेणार का नाही. प्लॅन सँक्शन केल्यानंतर शॉप अधिक बांधल्यामुळे वाहतुकीला त्रास होतो आहे. तिथे कठोर निर्णय घ्यायला पाहीजे. हे सगळे करत असताना कोणती सुरक्षा व्यवस्था आहे. त्यावर जवळपास २३ कोटी खर्च होतो आहे. १४ कोटी खर्च करुन ठेकेदारांना नेमले जाते. सुरक्षा व्यवस्थेसाठी एजबार झालेले नेमले जातात. गरीब माणसाला नोकरी मिळावी म्हणून संबंधित ठेकेदार त्यांना नेमतात. पण त्याप्रमाणात ते काम करत नाहीत. याबाबत गांभिर्याने गोष्टी घेतल्या पाहीजेत. स्विमिंग टँकसाठी तरतूद केलेली आहे. ब-याचशा प्रमाणात त्याठिकाणी सुविधा आहे. त्यासाठी देखील ध्यान दिले पाहीजे. टूट वेल – मोरया मंदीर ते मिलिटरी हद्दीपर्यंत दोन्ही ठिकाणच्या बंधा-यांत ब-याच प्रमाणात पाण्याचे प्रदूषण वाढले आहे. नक्की जो फरक जाणवला, घरकुल योजनेत झोपडपट्टी पुनर्वसनाबाबत खर्च झाला. मुदत उलटून गेलेली आहे. चुकीचे

काम केले. सदस्य कोर्टात गेले. असे करत असताना मगर स्टेडीयमवर योजनांसाठी जागा दिली. खेळाचे क्रिडांगण म्हणून दिले. इमारत होत असताना त्याठिकाणी ग्रीन बेल्ट आहे. यलो बेल्ट नव्हता. शासनाच्या डोळ्यात धूळफेक केली. आत्ता अण्णासाहेब मगर स्टेडीयमवर भविष्यात योजना राबविण्याच्या दृष्टीकोणातून सिमाबिंत बांधावी, याबाबत लक्ष दिले पाहीजे. घरकुल योजनेत घरांचा ताबा द्यायचा राहीला आहे. प्राधिकरणाने मागणी केलेली आहे. चुकीच्या पद्धतीने पायंडा पाडून काम करतो. काही सूचना करणार आहे. याबाबत गांभिर्याने घ्यावे. रस्त्याच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी भाजीमंडई चालते, गाड्या लावल्या जातात हे राजरोसपणे चालू आहे. सार्वजनिक ठिकाणी पार्किंग केलेतर महापालिकेला अपेक्षित उत्पन्न मिळेल. नागरीक अधिकृतपणे गाड्या लावतील. शहरात जवळपास ९ ते १० हजार गाड्या लावतात. रस्त्याच्या दोन्ही बाजूला रस्त्यावर हातगाड्या उभ्या केल्यातर रु.५०० ते हजार रुपयांपर्यंत मिळतील. महिना रु.२००/- घेतले तरी २० कोटी उत्पन्न या सगळ्यांतून मिळेल. गरीबाला जागा मिळेल. गुंड त्रास देणार नाहीत. वसूली होणार नाही. सर्वसामान्य नागरीकांना जगण्य़ासाठी जागा मिळेल. सार्वजनिक ठिकाणी शौचालये बसवून दंड वसूल करावा. महापालिकेच्या शाळांच्या आजूबाजूला हातगाड्या व टप-यांना बंदी घाला. विद्यार्थ्यांना गुटख्यासारखे उत्तेजित पदार्थ देण्याचे काम होते आहे. शहरात पिंपरी चिंचवड दर्शन बस चालू करावी. विद्यार्थ्यांसाठी मोफत असावे. शहरात अनेक मंगल कार्यालये, हॉटेल्स् अनेक आहेत. अशा ठिकाणी अन्नाची नासाडी होते. पाण्याचा दुरुपयोग होतो. त्याठिकाणी हॉटेलमधील पार्टी अन्न ड्रेनेजमध्ये टाकायचे काम करतात. त्यामुळे दुर्गंधी येते, याबाबत गांभिर्याने लक्ष घालावे. मंगल कार्यालये, हॉटेल्स् इथे पाण्याचा दुरुपयोग, अन्नाची नासाडी होत असेल तर त्यावर दंड आकारण्यात यावा. कार्यालये, हॉटेल्स् इथे पार्कींगची व्यवस्था नसेल तर तिथे सुद्धा दंड आकारुन त्यातून उत्पन्न मिळवाले. नागरीकांची सुद्धा सोय होते. या दृष्टीकोणातून पहावे. मिळकत कर १००% वसूल करावा. बालेवाडी स्टेडीयमला आपण पाणी देतो ते बंद करावे. पुणे शहराकडून त्यांना पाणी देण्यात यावे. पाण्याचे समान वाटप करावे. पिंपरी चिंचवडची महापालिका झाली त्यावेळी शहराची लोकसंख्या ७४,००० होती. आत्ता १८ लाख झाली आहे. पुढे जाऊन कसे होईल याबाबत आराखडा, प्रतिकृती असावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांना, नवीन रहायला आलेल्या नागरीकांना प्रतिकृती पाहता येईल. काही बिल्डर, व्यावसायिकांना चौकांचे सुशोभिकरण, डिव्हायडरचे सुशोभिकरण करायला सुद्धा दिले होते. पण त्यांची निगा राहत नाही. जर कोणी स्वेच्छेने परिसराचे

सुशोभिकरण करत असेलतर त्यावर निर्णय घ्यावा. या अंदाजपत्रकापासून आपण महापालिकेच्या आयुक्ता पदावर आहात तोपर्यंत कार्यक्रम निश्चित करावा. पवना, इंद्रायणी, मुळा या नद्या हायसिंथमुक्त कराव्यात. २ वर्षांत या मनपा क्षेत्रातून वाहणा-या नद्या गटारगंगा होणार  याच्यासारखी खंत नाही. मोबाईल टॉवर्सवर चार्ज करावा. परिपूर्ण सुविधा होईल. पारंपारीक उर्जेवर भर दयावा. अंदाजपत्रक करत असताना बारकाईने विचार करत असताना भविष्यात मा.आर.एस.कुमार यांनी सांगितल्याप्रमाणे ५०% खर्च होतो. निविदा प्रक्रिया करतो यावर बंधन घातले पाहीजे. वर्कऑर्डर देण्यासाठी याचे टाईन ओपन केले पाहीजे. या दृष्टीकोणातून प्रयत्न केले पाहीजेत. निश्चित एकदा सगळ्यांना, उपस्थितांना धन्यवाद देतो. महापौर, आयुक्त सगळ्यांचे धन्यवाद देतो.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन २०१३-१४च्या अंदाजपत्रकावर सगळे चर्चा करत आहोत. इतके सगळे बोलल्यानंतर खरेतर कोणाला उत्साह नाही असे होत नाही. प्रत्येकाला प्रत्येकाच्या वॉर्डाची काळजी आहे. पिंपरी चिंचवडची काळजी आहे. म्हणूनच या अंदाजपत्रकावर बोलण्यासाठी सगळ्यांनी सहभाग घेतला आहे. असे वाटते स्थायी समितीमध्ये बजेट दिल्यानंतर, पूर्वीची प्रथा वेगळी होती. पूर्वी अशी नव्हती. स्थायी समितीमध्ये बजेट मंजूर करायचे. ३५० कोटींचे बजेट असताना सभागृहात होते. त्यावेळी सगळ्या नगरसेवकांना विश्वासात घेऊन स्थायी समितीमध्ये सूचना द्यायची तरतूद काय पाहीजे. नगरसेवक फार खूष असायचे. आत्ता परिस्थीती वेगळी वाटते. काय झाले अशा माध्यमातून बजेट तयार करताना इतके पाणी भरताना खर्चाच्या तासासाठीच कसरत होते का हा प्रश्न आहे. प्रत्येक विभागाकडून बजेट असायचे. इतके पानांचे बजेट तयार करताना कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे. यावर दिवसभर कामे करायची आहेत. इतके सदस्य बोलले आहेत. त्याच्याबद्दल मी मुळात बोलणार नाही. सगळे हुशार आहेत. पैसे खर्च करुन हे सगळे निवडून आलेले आहेत. ही सुद्धा क्षमता असावी लागते. एवढ्या मोठ्या बजेटमध्ये पहिल्यांदा महिला असल्यामुळे पक्षनेते असतील तर महिलांच्या बजेटवर बोललो. ३२ कोटी महिला बालकल्याणसाठी दिलेले असेलतर महिला बालकल्याण म्हणून खूप चांगल्या योजना दिल्या गेल्या पाहीजेत. प्रत्येक वर्षी बोलणार ४ प्रभागांत वर्कशॉपसाठी सुविधा केल्या पाहीजेत. इतके चांगले कोर्सेस देतो. खरेतर प्रॅक्टीकली वर्कशॉप बनवले आहेत का. आकुर्डी इथे मागील आयुक्तांनी वर्कशॉप बोलवला तशी परिस्थिती तिथे

निर्माण झाली नाही. महिलांसाठी ३२ कोटी श्री.श्रीनिवास पाटील आयुक्त असताना डिपॉझिट ठेवले होते. परंतू पैसा पुरवला जातो आहे. या योजनेसाठी मॅप देण्यासाठी त्यांना वाटत होते, पुढील आयुक्त ते करतील कोणी नाही. विविध योजना त्यासाठी सांगणार, काल १,००० चे कोटेशन, त्यासाठी नवी भाजी मंडई, किराणा मालाचे कोटेशन घेताना त्यासाठी रु.५००/- घालवायचे. पहिल्यांदा ही योजना दिसली. आपली निर्णय क्षमता आहे का नाही हा प्रश्न निर्माण होतो. महिन्याला रु.५००/- देणार. कोणीही गरजवंत तोच फॉर्म भरणार. किती वेळा हेलपाटे मारावे लागतात. ही परिस्थीत मनपाला माहित आहे. ते न करता तुम्ही ६ हजारांची योजना आणावी. शिलाई मशीन कोर्स किती वर्षे करायचा आणि द्यायचा. यापुढे चांगल्या पद्धतीचे उपक्रम राबविले गेले पाहीजेत. यासाठी वर्कशॉप पाहीजेत. टेल्को संस्था हिच्यावर पेमेण्ट मिळते. चांगली तरतूद करुन वर्कशॉप करता येतील. महिलांना ट्रेनिंग दया. महिलांकडून वस्तू बनवायला सुरुवात खूप चांगल्या पद्धतीने वस्तू तयार केल्याचे समाधान लाभेल. महिलांसाठी निगडी पासून दापोडी पर्यंत टॉयलेट नाही. डायबेटीस पेशंट असेल तर अशा परिस्थीतीत महिलांसाठी एक, पुरुषांसाठी एक असले पाहीजे. सगळ्या गोष्टी नगरसेवकांना सूचवायच्या मग अधिका-यांनी करायच्या. पुणे तिथे एवढा टॅक्स आहे. आपल्याकडे का नाही. आपल्याकडे चांगले टॉयलेट नाहीत. लोक रस्त्यात कुठून जाणार. हा पहिला प्रश्न आहे. ही योजना अधिका-यांनी केली नाही का. किती वर्षे चर्चा केली पाहीजे. किती वेळा सांगितले पाहीजे. फोर व्हिलर चे ट्रेनिंग द्या. हे पत्र दिले. तुमच्याकडून पत्र आले बरोबर आहे. अशी अंमलबजावणी आणण्यासाठी सूचना केली. बजेट संपले. कुठून सूचना केली. कोणाला ऑर्डर केली. कोणाला मिळाली. महिलांना सक्षम रितीने चार चाकी गाड्या चालविल्या पाहीजेत. महाराष्ट्रातील पिंपरी चिंचवड ही पहिली महापालिका आहे. महिलांसाठी चांगल्या पद्धतीने योजना वापरतो. बजेट मांडताना अनुदानाविषयी काय गोंधळ चालला आहे कळत नाही. नागरीकांच्या पैशांतून अनुदान देतो. २/४ महिलांना टोटल रक्कम जाईल परंतू हे देण्यासाठी इतकी ओढाताण आता चालली आहे. किती वेळा या गोष्टींसाठी बोलावे लागणार आहे. किती योजना पेंडींग आहेत. ७०० कोटी डिपॉझिट असेल तर हजार कोटींचा उद्योग होईल. सगळ्या नगरसेवकांना विश्वासात घेऊन योजना बंद केल्या पाहीजेत. इथून पुढे महिला बालकल्याण योजनेत खूप मोठ्या प्रमाणात दुरुस्ती केली पाहीजे. २५ लाखांची मशिनरी आहे. बचतगट सक्षम आहेत. तुम्ही हे करा. महापालिकेच्या माध्यमातून बचत गटांसाठी उपक्रम राबविले गेले पाहीजेत. ते राबविले तरी महिलांच्या मुखातून पब्लिसिटी होते. आमचे कमिश्नर

चांगले आहेत असेच म्हणणार. आम्ही सुद्धा म्हणणार. त्यापद्धतीनेच त्याची अंमलबजावणी केली पाहीजे. अधिका-यांना आधीच थंडी भरुन आली आहे. मागील वेळी सांगितले होते, रिस्पेक्ट असावा, धाक नसावा. धाक लावायचाच असेल तर मार्ग आहेत. परंतू कंट्रोल राहत नाही. महापालिकेची आर्थिक परिस्थीती खूप चांगली आहे. विश्वास ठेवला नाहीतर किती विश्वासाने सर्व राहतील ही शंका येत नाही. २/३ महिन्यांत बदल्या होतात. इतका प्रॉब्लेम का होतो याचा विचार केला पाहीजे. बालकल्याण विषयी सांगितले होते. महिलांचे प्रमाण याविषयी म्हणायला भूषणावह गोष्ट नाही. स्वयंपाक करताना महिला जळाली तर तिच्यावर काय उपचार होतो का तिला पुण्यामध्ये घेऊन जावे लागते. पिंपरी चिंचवडमध्ये बर्न हॉस्प्टिल झालेच पाहिजे. कमिशनर डॉक्टर आहेत त्यांचेकडून अपेक्षा आहे. कशासाठी त्रास वाटतो. हार्ट स्क्रीनींग सेंटर तयार करताना त्रास वाटला नाही. कॅन्सरचे हॉस्पिटल आपलेकडे आहे. बजेटमध्ये तरतूद आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे कॅन्सरचे प्रमाण किती तरी वाढले आहे. बिर्लाला तपासणीसाठी रुग्ण पाठवावे लागतात. प्रदुषणामुळे कॅन्सरचे प्रमाणे वाढले असल्यामूळे कॅन्सर हॉस्पिटल व्हायला पाहिजे. आय हॉस्पिटल व्हायला पाहिजे. लायन्स क्लब त्यांची २० कोटीची जागा दयायला तयार आहेत. त्यांचे प्रस्तावाला उत्तर दिले का? तिथे मोठी आय बँक करा. उलट तुमचेवर जप्तीची नोटीस करणेत येत आहे असे त्यांना उत्तर पाठविले. एवढे मोठे पिंपरी चिंचवड शहर असताना एवढे मोठे बजेट असताना तीन मोठी हॉस्पिटल बांधू शकत नाही. वाय.सी.एम. सारखे ३५० बेडसचे हॉस्पिटल चालविण्याचे मोरे सरांनी धाडस केले. सगळयांना त्यांची आठवण येते. तुम्ही एम.डी.एम.एस. कोर्सेस चालू करण्याबददल विरोध नाही. महिला बाल कल्याणच्या तरतूदीमधून पैसे घ्या. कोर्सेस चालू करावे तशी मानसिकता तयार नाही. त्याचा पण त्रास होतो. शिक्षण मंडळाकडून १० वी च्या मुलांना व्याख्यानमाला देऊन काही होणार नाही. इतकी लहान मुले आहेत त्यांना ऍबॅकस, मॅथ्स, सायन्स अशाप्रकारचे शिक्षण दिले तर आपल्या मुलांची उन्नती होणार नाही का हस्तांक्षर सुधार स्पर्धा घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. यासाठी योजना राबवितोय का हे बघितले पाहिजे. एखादा ड्रेस कमी घ्या. फाटके घातल्याने काही फरक पडत नाही. महापालिकेच्या शाळा असताना सुध्दा खूप चांगले शिक्षण मिळेल. मॅथ्स, सायन्समधून नासाचे शिक्षण मुलांना मिळेल. आपली मुले चांगल्या पध्दतीने शिकतील. आपले नांव काढतील. भाजीमंडईमध्ये ट्रेलर ट्रक उभे करण्यासाठी पार्किंग ठेवा. ट्रान्झीट कॅम्प लागतात तेंव्हा पार्किंगची व्यवस्था करु शकत नाही. सदस्य समोर आहेत. एक वर्षासाठी कॉन्ट्रॅक्ट घेतले किती वर्षे

झाली. पार्किंगमधून लाखो रुपये कमवितात. लोक रस्त्यावर भाजी मंडई मांडतात. अजंठानगरच्या प्लॉटवर ट्रॉन्झीट कॅम्प टाकला आहे. बिल्डींगमध्ये मल्टीस्टोरेज पार्किंग व्हायला पाहिजे. गर्दीच्या ठिकाणी मल्टीस्टोरेज पार्किंग व्हायला पाहिजे. पे ऍ़ण्ड पार्क करा. रोज गाडी लावणारे भाजीविक्रेते फळवाले यांचेकडून पैसे घेत नाही. त्या त्या भागातील नागरिकांकडून पैसे घेतात. हे बोलायचे धारिष्ट आम्ही करतो. यासाठी काम केले पाहिजे. हॉकर झोनच्या पॉलिसीची जोपर्यंत अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत त्यांनी फुकट येऊ व्यवसाय करायचा व आपण त्यांचेकडे बघत राहायचे. यात कुठे तरी तरतूद केली तर चांगल्या पध्दतीने योजना राबविली तर उत्पन्नाचा स्त्रोत वाढणार आहे. मॉडेल वॉर्ड, मॉडेल वॉर्ड मला वाटते का करु नये. माणसाचे विचार चांगले असले पाहिजे. २४ बाय ७ चा प्रोजेक्ट राबवित आहोत. ९० सदस्य असले तर एकानेही सांगितले नाही माझ्या इथे चालू पाहिजे असे समजू नका कोणतीही गोष्ट बंद करण्याची पण हिम्मत राखतो. यांच्या वॉर्डमधील नगरसेवक रस्त्यावर टपरी टाकू देत नाही. मग सोसायटीच्या हददीत टाका. माझे वॉर्डात सगळया गोष्टी आहेत तिथे मॉडेल वॉर्ड करणे सोपे जाणार आहे. एखादया प्रोजेक्ट विषयी आम्हाला दिलेल्या तारखांना तो झाला नाही तर त्यावर बोलणे ही आप्पांची संस्कृती आहे. माझेकडे झाले नाही तुमच्याकडे झाले ही विकृती आहे. दोन सदस्यांमध्ये किती तफावत आहे. संस्कृती आणि विकृती. विद्युतच्या योजनांमध्ये बघितले पाहिजे. सोलर सबसीडी दिली गेली पाहिजे. एक बल्ब बंद तर दुसरा बल्ब चालू असे असते. प्रत्येक कमिशनर आला की, वेगवेगळया योजना असतात.मागेल त्याला पाणी ही योजना चालू केली होती. तुम्ही आलात तुम्ही सुविधा बंद करणार, आणि समोरच्या लोकांनी तुमच्या होमध्ये हो मिळवायचा. लाईट दिली नाही तरी चालेल. तो अंधारात बसेल पाणी पिल्याशिवाय माणूस गप्प बसणार नाही. मागेल त्याला पाणी दिले पाहिजे. गावे समाविष्ठ झाल्यापासून एखादयाने त्यांचे घर बांधलेले असेल त्याचा डाटा आपलेकडे असेल तर त्यांनी आपलेकडे पाण्यासाठी कनेक्शन मागितले तर त्याला ते दिले पाहिजे. येणा-या काळात या गोष्टीसाठी आपण नियोजन केले पाहिजे. पुढे अमेरिकेतून आला सिटी मॉडेल सारखे आपलेकडे असावे असे मला वाटत होते. पहिल्यांदा त्यावर लक्ष केंद्रीत कराल. बाहेरील कंन्ट्रीमध्ये गेलो की सिटी मॉडेल दाखवतात. आपलेकडे असे काही दाखवत नाही. हे मनावर घेतले पाहिजे. कोणत्याही नगरसेवकाला डोळयासमोर ठेवू नये. दादांनी आम्हाला असे कधी शिकविले नाही. शहरात काय काय करतो कुठे कुठे कोणत्या गोष्टी आहेत हे चित्र डोळयासमोर असले पाहिजे. नुसते वॉर्डसाठी बजेट नको या

दृष्टीकोनातून प्रयत्न केले पाहिजे. पुर्वीच्या आयुक्तांनी जेष्ठ नागरिकांना बजेटमध्ये सहभागी करुन घेतले होते. १० हजारांचे बक्षिस दिले होते. यावेळी ज्येष्ठ नागरिकांसाठी काही तरतूद केली गेलेली नाही. कधी कधी वाईट परिस्थिती असते. माणूस आयुष्यात खूप काही करत असतो. ज्यांना कोणी नाही अशा लोकांसाठी योजना अंमलात आणली पाहिजे. पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी तरतूद केली पाहिजे. खूप लोक असे आहेत की, ज्यांचेकडे घराचा टॅक्स भरणेसाठी पैसे नाहीत त्यांना मदत केली पाहिजे. पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी ३४ कोटीची तरतूद केली आहे. अहवाल तयार करीत असताना त्याविषयी विचारले तर २००९-२०१० चा अहवाल झाला नाही व सन २०११- २०१२ चाही अहवाल नाही. विद्युत, स्थापत्य विभागाचाही समावेश असु दया. पर्यावरणाची एफ.डी. जप्त झाली आहे. किती वेळा बोलायचे आणि स्वताला दुखी करुन घ्यायचे. प्रत्येक विभागाला जबाबदार धरले पाहिजे. प्रत्येक विभागाचा अहवाल तयार केला पाहिजे. यावर्षी केला नाही तरी तो पुढील वर्षी केला पाहिजे. काम केले, टेंडर निघाले सर्व झाले अशातला भाग नाही. उद्यान विभागासाठी फक्त 2.5 कोटी दिलेले आहेत. यातून काय होणार. मोठमोठी उद्याने असली तरी आई एकाची, बेटी एकाची. उद्यानाचा नकाशाच बदलून जातो. पूल जुना, फिटींग नवीन, खालचा कलर वेगळा, वरचा कलर वेगळा. सूचना केल्यानंतर नेमके उलटेच करतात अशी सगळीकडे चर्चा चालू आहे. तुम्हाला सांगायचे का नाही हा पहिला प्रश्न आहे. उद्यान विभागाला जबाबदारी द्या. तुम्ही त्यांचे सगळे डिपार्टमेंट हेड काढून टाकलेतरी चांगल्या पद्धतीने पाहीजे तशी कामे करु शकतो. काम करुन घेण्याची हिंमत आहे. सात ते आठ महिन्यांसाठी माझ्या प्रभागातील एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर बदलले. सय्यद साहेब आले ते आठ महिन्यांत रिटायर्ड होणार आहेत. त्यांच्याकडून काम कसे करुन घ्यायचे. मा.जाधव या नगरसेवकांनी सांगितले, इंगळे साहेबांना समजून सांगावे लागले, वर्ष गेले. सय्यद साहेबांना सांगायचे तर ते म्हणाले, मला त्रास देऊ नका. मला सहा महिने कसेबसे काढायचे आहेत. अधिका-यांबाबत ही परिस्थिती नसायला पाहीजे. वास्तविकरित्या बदल्या झाल्या पाहीजेत. पुण्यातील सारसबागेमध्ये गेलो तर सर्वसामान्य कुटूंब पावभाजी खाईल, ज्यूस घेईल. तिथे बसायचे सर्वांचे ठिकाण आहे. तिथे गेलोतर खायला मिळणारच. भक्ती-शक्ती चौकातील सगळ्या गाड्या उचलून नेल्या. काय अवघड परिस्थिती आहे. झोपडपट्टीतील मुले दादागिरी करतात. प्रत्येकाकडून पैसे घेतात. त्यापेक्षा आपण शाळा बांधलेली चांगली. पिंपरी चिंचवड मधील एकतरी गार्डन सांगा, जिथे सर्वसामान्य कुटूंबातील मनुष्य पावभाजी घेऊ शकतो, ज्यूस पिऊ शकतो. सायन्स

पार्क असेल,ऑटोक्लस्टर असेल, ग्रेडसेपरेटर असेल, या पद्धतीने काम करत असताना खूप कष्ट घेतले असले तरी खो घालायला किती मिनिटे लागतात. दुधात मिठाचा एक खडा टाकला तर सगळे दूध नासते. काही लोकांना असेच वाटते. चांगल्या कामासाठी या प्रोजेक्टसाठी खरोखरच खूप त्रास झालेला आहे. खूप कष्ट घेतले आहेत. एलबीटी सुरु झालीतर आपल्याला शासनाकडून पैसे कमी आलेतर आपण काय करणार आहोत. बाकी इन्कम सोर्सेस वाढवले पाहीजेत. वास्तविकरित्या चांगले चालविले पाहीजेत. फुटपाथ पार्कींगसाठी वापरतात, तेथे पैसे घेतले पाहीजेत. फॉरेनमध्ये गाड्या लावण्यासाठी पाचशे रुपये घेतात. ते पगारातून वसूल होतात. आपल्याकडे कोण कुठेही गाड्या लावतो. तुम्ही तुमची प्रॉपर्टी वापरता. तुमचा हक्क आहे. अशा पद्दतीने आपली कामे चालतात. अशा कितीतरी महापालिकांच्या प्रॉपर्टीज् आहेत. लोक वापरतात. यातून आपले उत्पन्न बुडते. बोलण्यासारखे खूप काही आहे. खूप चांगल्या पद्धतीने नियोजन केल्यानंतर उत्पन्न वाढणार आहे. दहा कलमी कार्यक्रम केलातर कोणाची तपासणी करायची. अधिका-यांनी अधिका-यांची तपासणी करायची. कशाशी करायची. माहिती बरोबर खूप हे आपले कर्तव्यच आहे. हे आपण करायला पाहीजे. आपली क्षमता नाही का बांधायला निघालात? जकातीची गाडी गेल्यानंतर पकडली तरी इन्सेनटीव्ह मिळत होता. गाड्या नक्की जकात नाक्यांवर का पकडल्या जात नाहीत. तसे इथे होणार आहे. कार्यालय सुधारणे प्रत्येक अधिका-याचे कामच आहे. तुम्ही योजना आखली. करोडो रुपयांचे बक्षीस आहे. द्यायला काही नाही. कर्तव्ये आहेत. आपले घर स्वच्छ, सुंदर ठेवायला तुम्हीच बक्षीस घेतले. तुम्ही घर छान करायला पाहीजे. यामुळे सगळ्या गोष्टी शिकवल्या जाणार आहेत. कशाला तपासणी पथक, सगळ्या बातम्या लिक होतात. तुमच्या ऑफीसमध्ये तपासणी पथकातील स्कॉड कुठे जाणार हे सांगायला जास्त वेळ लागणार नाही. कौतुक केले पाहीजे. दहा कलमी कार्यक्रम आपले कर्तव्यच आहे. माध्यमातून सेवा उपलब्ध करुन द्यायला पाहीजे. स्वतःला विचारावे. जे दिलेले आहे ते नागरीकांना दिले पाहीजे. या गोष्टी आपण का करत नाही. करोडो रुपये पेमेण्ट देणार. अधिका-यांनी काही केलेले नाही. ही परिस्थिती तशीच आहे. सगळे बजेटमध्ये सहभागी झालेले आहेत. सगळ्यांबरोबरच तुमची सुद्धा तारेवरची कसरत होणार आहे. महापालिका सभेत काही गोष्टी होतात. काही गोष्टी होत नाहीत. बजेटच्या पुस्तकात शून्य तरतूद झाली आहे. आम्ही उपसूचना दिल्यानंतर दुरुस्ती होणार नाही. ज्यांचे काम झालेले नाही, त्यांना पेमेण्ट करायचे नाही. उपसूचना सुद्धा वाया जाणार आहेत. सगळ्यांचे मनापासून आभार मानते.

माझ्याकडून कोणी दुखावले गेले असेलतर वाईट वाटून घेऊ नये. सभागृह सांभाळताना, पिंपरी चिंचवड शहराची कामे करत असताना कोणाला दुखावण्याचा माझा उद्देश्य नव्हता. तुम्हाला बजेटवर खूप चांगले काम करावे लागले अशी अपेक्षा व्यक्त करते.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, निरुत्साही, नाविण्याचा लवलेश नसणारा अर्थसंकल्प म्हणालातरी चुकीचे होणार नाही. सर्वसामान्यांच्या अपेक्षा भंग करणारा, नॉनपरफॉर्मिंग म्हटला तरी चालेल. कारण सन २०१२-२०१३ मध्ये साधारणतः भांडवली खर्चासाठी ७४५ कोटी ५३ लाख अपेक्षित धरुन ६४५ कोटी खर्च केले. मूळ ७४१ कोटी होते. दिनांक २८/२/२०१३ पर्यंतची रक्कम घेतली तर फक्त ३३५.७३ लाख खर्च करु शकलो. ३३२ कोटी खर्च करु शकलो असतो. फार तर २०० कोटीची रक्कम अचिव्ह करु शकतो असे वाटत नाही. सन २०१० – ११ चा भांडवली आलेख पाहिला तर शर्मा साहेब असताना ३२१ कोटी खर्च केले. यावर्षी फक्त ३३२ कोटी आजपर्यंत खर्च झालेला आहे. अशा परिस्थितीत खरेतर ७६९ कोटी ७२ लाख इतके बजेट आहे. त्या मानाने डबल पेक्षा जास्त खर्च महसुलीवर केलेला आहे. भांडवलीवर खर्च केलेला नाही. ही आपली अकार्यक्षमता मान्य केली पाहिजे. दुस-या बाजूला, उत्पन्नाच्या बाजूला, जमेच्या बाजूला बांधकाम परवानगी विभागाकडून ५९-३० टक्के इतके उत्पन्न अपेक्षित धरले आहेत. करसंकलन विभागाकडून १२.३५ टक्के अपेक्षित धरले आहेत. जकात बंद होणार आहे. बिल्डींग परमिशनची काय अवस्था आहे इथे लक्ष दयावे. जेएनएनयुआरएमसाठी २०२४ कोटी इतके बजेट टाकत असताना ९४४ कोटी महसुली खर्च, ९११ कोटी भांडवली खर्च धरला आहे. हे ९४४ कोटी खर्च करताना ख-या अर्थाने शहरातील नागरिकांचे सपने सुहाने करण्यासाठी कोणत्या गतीने बघावे लागेल. मुळात टीमला विश्वासात घ्यावे लागेल. आयुक्त तुम्ही डिस्क्रिशन पॉवर वापरत नाही, एमआरटीपी ऍ़क्ट प्रमाणे दिलेल्या पॉवर वापरत नसाल तर आमच्या अधिका-यांत आणि रेव्हिन्यूच्या अधिका-यांत कृपा करुन तफावत करु नका. तुम्हाला रेव्हिन्यू अधिका-यांवर जास्त विश्वास आहे. आमच्या अधिका-यांवर विश्वास राहिला नाही. प्रत्येक अधिकारी एकमेकांकडे संशयाने पाहात असेल तर महापालिकेचे कामकाज कसे चालणार? आजपर्यंत आमच्या विश्वस्तांनी ही महापालिका चालवली आहे हे विसरून चालणार नाही. आमच्या अधिका-यांची क्षमता कमी असू शकते. पण अनुभव लक्षात घ्या. आमच्या अधिका-यांनी इतकी वर्षे प्रामाणिकपणे काम केलेले आहे. गुप्ता साहेब, बंड

साहेब, शर्मा साहेब यांच्यासारखे उत्तम दर्जाचे आयुक्त या महापालिकेला लाभले. बंड साहेबांनी चांगले निर्णय घेतले. म्हणून त्यांचे नाव घेतो आहोत. तुम्ही ज्या डिसिप्लीनमध्ये अडकवून घेतले आहे. एचओडींची मिटींग १५ दिवसांतून एकदा व्हायला पाहीजे. आठवड्यातून दोन/तीन तास मिटींग चालते. त्यानंतर काय करतात. कधी फोन केला तर एचओडी म्हणतात, मी अमक्या मिटींगमध्ये आहे. तीन/तीन तास मिटींग चालते. नेमक्या कशाला मिटींग घेतात. मिटींग हॉलच्या बाहेर पडणारा अधिकारी निरुत्साही असतो. त्याचे हावभाव बदललेले असतात. अशा मिटींग्ज् घेऊ नका. घेणार असाल तर काम करण्याचा पण मंत्र द्या. २८ मार्च पर्यंत ३३२ कोटी खर्च करु शकलो आहोत. भांडवली खर्चाचे काय करणार. ७०० कोटींच्या ठेवी बँकेत ठेवल्या. भांडवली खर्चातून पैसे वाचवले. तुम्ही २०० कोटींवरुन आज ९०० कोटींपर्यंतच्या ठेवी बँकेत ठेवल्या आहेत. हे पैसे बँकेत ठेवण्यासाठी नाहीत. सर्व गणिते बसवताना सुविधा दिल्या पाहीजेत. आपली आर्थिक स्थिती आत्तातरी चांगली आहे. एलबीटी करत असताना त्याला सुद्धा विरोध होतो. हे करत असताना पहिला उद्योजक जगवा. आपल्या पॉलिसीप्रमाणे शहरातील ६०% इमारतींचे काय होणार ही भिती लक्षात घेऊन सूट वजा करावी लागणार आहे. १ स्क्वे. मी. ला टिडीआर रुपाने वेगळा मोबदला द्या. प्लॅन करुन मिळतो, WBM करु मिळते. जागा ताब्यात येते. पहिल्यांदा त्या रुपाने पैसे हातात मिळतात. ती बिल्डींग बनते. डेव्हलपमेंट चार्जेस मिळतात. १ स्क्वे. मी. बिल्डींगच्या रुपात १ चटई क्षेत्र निर्देशांकातून पैसे मिळतात. अशाप्रकारे एक चटई क्षेत्र निर्देशांकातून तीनदा पैसे मिळतात. मी शहराच्या विकासासाठी काम करतो. इथे काही गोष्टी बोलू द्या. २३ मे पासून आजतागायत २ जानेवारी रोजी टीडीआरची पहिली मिटींग घेतली. टीडीआर मिटींग २ जानेवारीला घेतल्यानंतर नवीन नवीन कॉन्ट्रॅक्टर त्यात होते. रजिस्टर्ड साठे खत चालणार नाही असे सांगितले. त्यावेळी सिनिअर वकील पाठवून दिले. त्यांनी त्याचा अर्ज घेतला नाही. २ महिन्यांपासून या प्रकरणाचा पाठपुरावा झाल्यावर पॅनेल ठेवले. २ जानेवारी रोजी आयुक्त निर्णय घेतात. महापालिकेची समिती निर्णय घेते. मनपात खूप कमिट्या आहेत. त्यात आयुक्त असतात, रेव्हेन्यू ऑफीसर्स असतात, सिटी इंजिनिअर त्यात आहेत. तरीदेखील ५/५ क्लॉजला एक अधिकारी निर्णय घेतात. पॅनेलकडे जातात. २ जानेवारी पासून १९ मार्चपर्यंत फाईल आल्यानंतर कसा कारभार चालणार, कशी डेव्हलपमेंट होणार, कोण डेव्हलपमेंट करणार. शेतक-याने गुंतवणूक केली तरी तो एक वर्षापासून फिरतोय. फेब्रुवारीमध्ये फाईल आली तरी अजून क्लिअर झालेली नाही. शर्मा साहेब ट्रेनिंगला गेले. तुम्ही

आलात, ट्रेनिंगला गेलात. दर महिन्याला टीडीआरची मिटींग घेऊ असे सांगितले होते. तुम्हाला लॅण्ड पॅनल, रेव्हेन्यू पॅनल आहे. बाकी फाईल फिरत बसल्या. रिमार्क स्वतःहून बघून घ्या. फाईल गेली. पटकन क्लिअर झाली असे होते का? मला सांगा, पॅनलमध्ये ज्यांना घेतले त्यांना कालमर्यादा नाही का? तुमच्याकडे मा.लक्ष्मण जगताप चर्चा करुन गेले. तुम्ही मान्य केले नाही. डब्ल्यू.बी.एम. चा चार्ज रु.७० ते ९०/- केला. एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर यांना पत्रातून सांगितले, आम्हाला करु द्या. त्यानंतर आमच्या सन्मा.बिल्डरने, ठेकेदाराने २५ दिवसांत रोड डेव्हलप करुन दिला. त्याचे फक्त रु.५५/- झाले. तुम्हाला जमत नाही. तुमची फाईल अजून क्लिअर होत नाही. त्याचे कारण काय ते तुम्ही सांगू शकाल का? तुमच्याकडे गेलेली फाईल तुम्ही कुठेतरी पाहीली असेल, डिसकस केले असेल. डीपीआर एमआरटीपीमध्ये प्रोव्हिजन आहे का? तुमच्यासारख्या हुशार आयुक्तांनी फाईल्स फेकून दिल्या होत्या. फाईल घेऊन गेलोतर आवाज नाही, सांगून जावे लागते. इतका डिसीप्लीन केलातर ९४४ कोटी खर्च करु शकणार नाही. बेकायदेशीर कामे करु नका. बेकायदेशीर बांधकामाला विरोध केला म्हणून आम्ही तुमचे अभिनंदन केले. तुमच्यामुळे शहराला शिस्त लागली. तुम्ही इथे नांदेड पॅटर्न आणला. सर्वांमध्ये स्पर्धा करताय. We appreciate it. ज्या काही दिरंगाईने होते आहे. Time is more important. Time is more precious. आपल्याकडे या गोष्टींकडे लक्ष देत असताना बीआरटीएस रोड, ब्ल्यू लाईन, रेड लाईन, रेड झोनचा प्रॉब्लेम आहे. यात काम करताना तुमच्याकडून अपेक्षा आहेत. निश्चित तुम्ही करताय, केलेले नाही. बीआरटीएसची परमिशन देत असताना सभागृहाकडून शासनाकडून चूक झाली तर ब्लू लाईन रॅक्टीफाय नाही केले तर हे शहर पुन्हा बकाल होत राहणार आहे. किती दिवस स्ट्रेंथ वाया घालवणार आहोत. You should ractify all those things. टाऊन प्लॅनिंगमध्ये पुण्याचे डायरेक्टर बसतात. आपल्याला सुविधा आहे. एक पत्र चुकीचे दिले तर त्या पत्रावरुन शासनाला विचारतोय. शासन उत्तर देत नाही. बेकायदेशीर काम केले असे म्हणालो तरी तुम्हाला वाईट वाटते. रुल्स् प्रमाणे अक्ट करत नाही. तुम्ही डिसक्रीशन पॉवर वापरत नाही. तुमच्याकडे कधी पर्सनल काम घेऊन आलेलो नाही. जे करणार ते शहराच्या दृष्टीकोणातून करणार आहे. डेव्हलपमेंट सुधारण्यासाठी तुमच्याकडे, राज्य शासनाकडे पाठपुरावा करुन या सर्व गोष्टींकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे. मध्यंतरी ग्रीन बिल्डींग कन्सेप्ट कशी करता येईल, कसे एनकरेज करता येईल हे पहावे. आपल्यासमोर मल्टीस्टोअरेज पार्कींग व मेकॅनाईज पार्किंग या दोन विषयी

तुम्ही मदत करा. आपण काय पाप करतो का? मेकॅनाईज पार्किंग करणार होतो. ते स्वतः जास्त पैसे खर्च करणार होते. स्पेस सोडणार होते. तुमचे रोडचे कंजक्शन कमी करणार होते. How we gone. एफ.एस.आय. वाढवून देताय का? We are doing nothing. सन्मा.सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे तुमचे काम आहे. बघून घ्या. मेकॅनाईज्ड पार्किंग कधी झाले. श्रीकर असताना श्री तेच करा. डेव्हलपमेंटचा टीडीआर कधी मिळेल. चोर आहोत का? डेव्हलपमेंट करण्यासाठी बिल्डर चोर आहेत अशा धूर्त दृष्टीने बघून कामे होणार नाहीत. पुण्यातील बिल्डर इथे इनव्हेस्ट करु पाहतो आहे. पुण्याच्या कामकाजावर नाराज आहेत. ते म्हणतात, आपली महापालिका चांगली आहे. मघाशी सिमाताईंनी कन्सल्टंटचा विषय काढला. किती पैसे घालवतात. ते तपासण्याची वेळ आलेली नाही. यासाठी पैसे खर्च करतोय. त्यापेक्षा महत्वाच्या ट्रिटमेंट प्लाण्टकडे लक्ष देणे गरजेचे आहे. लोकांकडून पैसे रोखीने घेतात, कामे करत नाहीत. खाजगी ठेकेदाराने टेंडर घेतले होते. तो सुद्धा निव्वळ पैसे घ्यायचे काम करतोय. माझ्या वॉर्डात सगळे सांगतात, तुमचे इंटर्नल काम आहे. सरळ सरळ पैसे डिमाण्ड करतात. यावर निश्चित नियंत्रण ठेवावे ही विनंती करतो. जीएमएस (गव्हर्नींग मॉनिटरींग सिस्टीम) – यामध्ये १०० गुण झाले की अधिका-यावर खातेनिहाय चौकशी लावणार. अप्रेशिएबल गोष्टी आहेत. अधिका-याचे मनोबळ खचणार नाही हे पाहीले पाहीजे. आयुक्त आमचे आहेत असे वाटले पाहीजे. वाघाच्या पिंज-यात बसल्य़ासारखे वाटले नाही पाहीजे. हे हे काम आहे. हे काम करुन त्याचा फिडबॅक ताबडतोब द्या, या पद्धतीचे वातावरण आपल्याकडून निर्माण व्हावे अशी अपेक्षा आहे. जीएमएस केले तसे डब्ल्यूएमएस म्हणजे वॉर्ड मॉनिटरींग सिस्टीम ठेवली तर ख-या अर्थाने ही सिस्टीम वापरायची असेल तर, ही यंत्रणा लावायची असेलतर, टेंडर वेळेवर निघावीत. नवीन गावांमध्ये खरोखरच सुधारणा करायची असेलतर बजेटला परमिशन मिळाली तरी इन्स्ट्रक्शन्स देऊन टाका. एक लाख, २० लाख तयार ठेवा. जिथे ८० टक्क्यांपेक्षा जास्त जागा ताब्यात आहेत, तिथले टेंडर ताबडतोब काढावेत. ते बघायचे कारण नाही. अमुक ठिकाणी लोकवस्ती नाही म्हणून तिथे करायचे नाही असे न करता, जिथे जागा ताब्यात आलेल्या आहेत, तिथे रोड करा, स्ट्रीट लाईटस् करा. त्यांचे पैसे वाढले आहेत, डब्ल्यू.बी.एम.चे पैसे वाढले आहेत. रोड झाला, इन्फ्रास्ट्रक्टर डेव्हलप झालेतर तिथे लोक रहायला जातील. शहर बकाल दिसणार नाही. याअनुषंगाने करणे गरजेचे आहे. बाकी इतर सर्व मान्यवरांनी ब-याचशा सूचना केलेल्या आहेत. आऊट सोर्सिंग करणे गरजेचे आहे. बजेट मांडण्यासाठी एकत्र आलोतर बचत गट, महिला मंडळ

यांच्याबरोबर ११ महिन्यांचा करारनामा करुन पैसे खर्च करायचे त्यांच्यावर बंधन टाकावे. मानधन स्वरुपात द्यावे. आऊट सोर्सिंग करायची जबाबदारी त्यांच्यावरच ठेवावी. आपले सर्क्युलर असले तरी आपले वॉचमन थम्ब मारतात आणि निघून जातात. हा वायफळ खर्च कमी करता येईल. ज्येष्ठ नागरीकांबद्दल सांगितले आहे. विधवांबाबत लक्ष घातले पाहीजे. शासकीय नॉर्मस् प्रमाणे ३ टक्के बजेट ठेवले आहे. मा.चंद्रकांता सोनकांबळे यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. बँकेत पैसे ठेवण्यापेक्षा ते खर्च करुन कायमस्वरुपी डोनर करु शकलो तर तुमच्यासाठी भूषणावह होईल. घरी बसून इन्कम देत असाल तर मतिमंदांच्या कार्यक्रमाला, त्यांच्या व्यथा आपण समजून घेतल्या पाहीजेत. आपल्यासारख्या श्रीमंत संस्थेने महिला, अपंगांसाठी निश्चित भरीव तरतूद करुन सर्वांना मदत करावी. अशा प्रकारची सूचना सभेच्या अनुषंगाने करु इच्छितो. एमआरटीपी रुल, एचओडी फाईल्स् कमीत कमी कशा फिरल्या जातील हे पहावे. नुसतेच अक्शन, अक्शन असे व्हायला नको.

टाईम लिमिट पाहीजे. एका ठेकेदाराला त्या ठिकाणी काम केले. साईट उपलब्ध करुन दिली नाहीतर money along without interest limitation द्या. यासाठी जास्त वेळ का घेतो आहोत. एखादी फाईल इनिशिएट आहे. मार्जिन आहे. नाव लावून घेतले आहे. आपला लिगल फिल बघतो. आपण आयुक्त म्हणून असता, सिटी इंजिनिअर असतात. १५ दिवसांत मंजूरी द्या. १५ दिवसांपेक्षा जास्त लागू देऊ नयेत. बिल्डींग लॅण्ड, रोड लॅण्ड आपल्याला स्वतः या बाबतीत लक्ष घालावे लागेल.

**मा.महापौर** – अंदाजपत्रकावरील प्रस्ताव मांडणेत यावा.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ खालीलप्रमाणे मांडतो.

विषय क्रमांक – १

दिनांक – १९.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.लेखा/६/कावि/२९६/२०१३ दि.२५/०२/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३०३६, दिनांक ०८/०३/२०१३

मा.आयुक्तांकडून आलेले संदर्भ क्र.१ नुसारचे पुढीलप्रमाणेचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक "अ" व "क" तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे "प" अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत

प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व म.न.पा. हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक कामीचे अंदाज/प्रस्ताव अवलोकन करणेत आले.

अंदाजपत्रक "अ" "क" "प" व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक

| अ.क्र. | तपशिल | सन २०१२-१३ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु. | सन २०१३-१४ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|---|
| अ) १) | एकूण जमा | २००३,९१,८८,२०० | २०२४,१३,९४,४०० |
| २) | एकूण खर्च | १९०६,०९,८८,२०० | २०२१,७५,६७,१०० |
| ३) | अखेरची शिल्लक | ९७,८२,००,००० | २,३८,२७,३०० |
| ब) १) | भाग-३ एकूण जमा | २६५४,४१,९३,६८३ | २१९७,५६,०६,६८३ |
| २) | भाग-३ एकूण खर्च | २६५४,४१,९३,६८३ | २१९७,५६,०६,६८३ |
| क) १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | १०६५,४०,४४,९१२ | १२६३,००,८४,९१२ |
| २) | जेएनएनयूआरएम एकूण खर्च | ५५३,९९,५५,४९६ | १२५२,०८,७२,००० |
| ३) | अखेरची शिल्लक | ५११,४०,८९,४१६ | १०,९२,१२,९१२ |

वरीलप्रमाणे मा.आयुक्त यांजकडून आलेले अंदाज विचारात घेवुन पुढीलप्रमाणे कमी अधिक करण्यात येत आहे.

सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक

| अ.क्र. | अंदाजपत्रकीय | कामाचे नांव | वाढ/घट |
|---|---|---|---|
| १) | पान क्र. ५४८ अ.क्र. १५ | सिटी सर्व्हेलन्स करीता सी.सी.टी.व्ही. उभारणे. | र.रु. २,००,००,०००/- (घट) |
| २) | पान क्र. ५१२ अ.क्र. १२३ | चऱ्होली प्रभाग क्र.७ अंतर्गत भागातील नियोजित रस्त्यावर प्रकाशव्यवस्था करणे. | र.रु. ५०,००,०००/- (वाढ) |
| ३) | पान क्र. ५१२ अ.क्र. १२४ | मोशी प्रभाग क्र.६ अंतर्गत नियोजित रस्त्यावर प्रकाश व्यवस्था करणे. | र.रु. ५०,००,०००/- (वाढ) |
| ४) | पान क्र. ५०७ अ.क्र. ७० | दिघी विभागाअंतर्गत स्थापत्य विभागामार्फत नव्याने विकसित झालेल्या रस्त्यावर दिवाबत्तीची व्यवस्था करणे. | र.रु. ५०,००,०००/- (वाढ) |
| ५) | पान क्र. ५१२ अ.क्र. १२६ | देहू आळंदी मुख्य रस्त्यालगत डी.पी. रस्त्यावर पोल बसवून LED फिटिंग बसविणे | र.रु. ५०,००,०००/- (वाढ) |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | पान क्र. १९२ अ.क्र. ७ | पाणीपुरवठा विशेष योजना निधीतून शहरासाठी २४X७ पाणी पुरवठा करण्याच्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व इतर अनुषंगिक कामाच्या तरतूदीतून | र.रु. ८,००,००,०००/- (घट) |
| ७) | पान क्र. १९२ अ.क्र. ११ | जेएनएनयूआरएम अंतर्गत ताथवडे येथे २४X७ पाणीपुरवठा करणे. (नविन काम) अ.क्र.११ | र.रु. ८,००,००,०००/- (वाढ) |

वरीलप्रमाणे मा.आयुक्त यांचे सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकात खर्च बाजुचे अंदाजात र.रु. १०,००,००,०००/- अधिक व र.रु. १०,००,००,०००/- कमी करणेत येत आहेत.

त्यानुसार मा.स्थायी समितीचे सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक “अ” व “क” तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे “प” अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व म.न.पा. हिस्सा याबाबतचे पुढीलप्रमाणे तयार करणेत येत असुन त्यास अंतिम स्विकृती देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

अंदाजपत्रक “अ” “क” “प” व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक

| अ.क्र. | तपशिल | सन २०१२-१३ चे सुधारीत अंदाजपत्रक | सन २०१३-१४ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|---|
| अ) १) | एकूण जमा | २००३,९१,८८,२०० | २०२४,१३,९४,४०० |
| २) | एकूण खर्च | १९०६,०९,८८,२०० | २०२१,७५,६७,१०० |
| ३) | अखेरची शिल्लक | ९७,८२,००,००० | २,३८,२७,३०० |
| ब) १) | भाग-३ एकूण जमा | २६५४,४१,९३,६८३ | २१९७,५६,०६,६८३ |
| २) | भाग-३ एकूण खर्च | २६५४,४१,९३,६८३ | २१९७,५६,०६,६८३ |
| क) १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | १०६५,४०,४४,९१२ | १२६३,००,८४,९१२ |
| २) | जेएनएनयूआरएम एकूण खर्च | ५५३,९९,५५,४९६ | १२५२,०८,७२,००० |
| ३) | अखेरची शिल्लक | ५११,४०,८९,४१६ | १०,९२,१२,९१२ |

**मा.राजेंद्र काटे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे फेरबदलाची सूचना मांडतो -

लेखाशिर्ष व्हिजन २००५ पान ११ अ.क्र.८ सेवा वाहिनीचे स्थलांतर करणे सल्लागार फी विद्युत खर्च जलनिस्सारण खर्च व अनुषंगिक कामे करणे तरतूद र.रु.१३५ कोटी ८ लाख केली आहे. या कामाच्या तरतूदीमधून लेखाशिर्ष स्थापत्य विषयक कामे करणे पान क्र. १४१ अ.क्र.९५ प्रभाग क्र.९ संभाजीनगर शाहूनगर येथील बहिरवाडे क्रिडांगणावर प्रेक्षक गॅलरीसाठी लोखंडी शेड करणे तरतूद १५ लाखाऐवजी ३० लाख रुपये करणे व लेखाशिर्ष के.एस.बी. चौक उड्डाण पूलासाठी पान क्र. १६ अ.क्र. १० ला ५० लाखाऐवजी ५ कोटी दर्शविण्यात यावी.

लेखाशिर्ष भूसंपादन निधी पान क्र. ४५० व ४५१ अ.क्र.३ भूसंपादन निधी (नगररचना) तरतूद र.रु.११० कोटी ७ लाख या लेखाशिर्षावरुन प्रभाग क्र.९ संभाजीगर एम.आय.डी.सी. जी ब्लॉक संभाजीनगर आरक्षण क्र. १३४ मध्ये कनव्हेशन सेंटर व कार्यालय बांधणे या कामाचे सन २०१३-२०१४ मूळ अंदाजपत्रकात समावेश करुन सदर कामास र.र..१ कोटींची तरतूद करणेत यावी.

१) लेखाशिर्ष मनपा परीसरात पोहण्याचे तलाव बांधणे पान क्र्. १७ अ.क्र. ६/३ या पानावरील वॉ.क्र.२४ (नविन प्र.क्र.२९) इंद्रायणीनगर से.न.१ महाराष्ट्र कॉलनी शेजारी मोकळा भूखंड क्र.३ मध्ये पोहण्याचा तलाव बांधणे या कामासाठी र.रु.१ कोटीची तरतूद केलेली आहे. या तरतूदीमधून ९० लाख कमी करुन लेखाशिर्ष मुख्यालय नविन कामे पान क्र. १२३ अ.क्र. ६ प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथिल वाचनालय, अभ्यासिका बांधणे, सुशोभिकरण करणे या कामासाठी २५ लाख तरतूद असून या कामावर र.रु. ९० लाख वर्ग करणेत यावी. एकुण तरतूद १ कोटी ४० लाख सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रकात करण्यात यावी.

२) लेखाशिर्ष नविन कामे पान क्र. ३१ अ.क्र.६ मधिल तिरुपती चौक ते विश्वेश्वर चौक व गवळीमाथा ते स्पाईनरोड व परीसरातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी १ कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. या तरतूदीमधून ५० लाख कमी करुन लेखाशिर्ष मुख्यालय नविन कामे पान क्र. १२१ अ.क्र. २९ प्रभाग क्र.९ संभाजीनगर एम.आय.डी.सी. जी ब्लॉक संभाजीनगर मधिल मोकळ्या जागा आरक्षण क्र.६० मध्ये पोहण्याचा तलाव बांधणे या कामातील प्लोरींग,टाईल्स बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे या कामासाठी ७० लाख तरतूद आहे. या कामावर ५० लाख वर्ग करणेत यावेत. एकुण तरतुद १ कोटी २० लाख सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रकात करण्यात यावी.

लेखाशिर्ष भूसंपादन निधी पान क्र. ४५० व ४५१ अ.क्र.३ भूसंपादन निधी (नगररचना) तरतूद र.रु.११० कोटी ७ लाख या लेखाशिर्षावरुन प्रभाग क्र. ३९ ब

संत तुकारामनगर येथिल आरक्षण क्र.५३ मध्ये आरक्षित जागेवर बहुउद्देशीय इमारत बांधणे अथवा commercial center या कामाचे सन २०१३-२०१४ मूळ अंदाजपत्रकात समावेश करुन सदर कामास र.रु.१ कोटीची तरतूद करणेत यावी.

प्रभाग क्र.१६ (आकुर्डी गावठाण) मधील जय गणेश व्हीजन येथील शुभश्री रेसीडेन्सी शेजारी असणा-या २ ***R*** (आय.२.आर.) च्या अनुषंगाने महापालिकेच्या ताब्यात २ एकर जागा आलेली आहे. त्या जागेवर उद्यान विकसीत करण्यासाठी र.रु.१,००,००,०००/- (र.रु.एक कोटी) पर्यंत तरतूद करण्यात यावी. प्रभाग क्र. ६३ (कासारवाडी) येथे सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विभागाच्या कामांमध्ये काही तरतुदी होणे आवश्यक आहेत त्या पुढीलप्रमाणे -

१) प्रभाग क्र.६३ मध्ये सरिताकुंज मागील परिसरामध्ये पेव्हींग ब्लॉक व स्थापत्यविषयक कामे करणे या लेखाशिर्षकाऐवजी शास्त्रीनगर भाजी मंडई याठिकाणी स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह तसेच मांस विक्री करण्यासाठी स्वतंत्र छोटे गाळे उभारणे तसेच सिमाभिंतीची उंची वाढवणे हे लेखाशिर्षक निर्माण करुन सदरील <u>पान क्र.२८४ अ.क्र.९२</u> वरील तरतूद रक्कम रु. दहा लाख वर्ग करावी.

२) प्रभाग क्र.६३ मध्ये शितळादेवी मंदीरासमोरील किरकोळ दुरुस्ती व पेव्हींग ब्लॉकस कामे करणे या लेखाशिर्षकाऐवजी सदर तरतुद प्रभाग क्र.६३ याठिकाणी सर्व सार्वजनिक स्वच्छतागृहे दुमजली करणे या लेखाशिर्षकावर रक्कम रु.१५,००,०००/- पान क्र.२८१ अ.क्र.६१ 'क' प्रभाग स्थापत्य वर्ग करणे.

३) प्रभाग क्र.६३ मध्ये संभाजी चौक ते शिवाजी चौक परिसरात गटर दुरुस्ती व स्थापत्यविषयक कामे करणे या लेखाशिर्षकाऐवजी सदर रक्कम रु.१५,००,००० तरतूद जलतरण तलाव परिसरामध्ये 'बॅडमिंटन हॉल उभारणे' या नवीन लेखाशिर्षकावर क प्रभाग स्थापत्य याठिकाणी वर्ग करावी. (पान क्र.३१८ अ.क्र.३४)

प्रभाग क्र.६३ (कासारवाडी) येथे सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विभागाच्या कामांमध्ये काही तरतुद होणे आवश्यक आहे त्या खालीलप्रमाणे -

*१)* प्रभाग क्र.६३ माने निवास व प्रेक्षितजवळील परिसरात किरकोळ दुरुस्तीची कामे करणे या लेखाशिर्षकाऐवजी सदर <u>पान क्र.३०२ अ.क्र.६३</u> वरील रक्कम <u>वीस लाख रु.</u> तरतुद जलतरण तलाव परिसरात महिला व पुरुषांसाठी नवीन व्यायामशाळा उभारणे या नावाने लेखाशिर्षक तयार करुन 'क' प्रभाग स्थापत्य यांच्याकडे नवीन लेखाशिर्षक निर्माण करुन वर्ग करणे.

२) प्रभाग ६३ मध्ये गुलीस्ताननगर तसेच केशवनगर परिसरात पेव्हींग ब्लॉक व स्थापत्यविषयक कामे करणे या लेखाशिर्षकाऐवजी सदर पान क्र. २८४ अ.क्र.९२ वरील रक्कम रु. पंधरा लाख तरतुद मुस्लीम दफनभूमीमध्ये ईदगाह मैदान तसेच मिनार उभारणे या कामासाठी नवीन लेखाशिर्षक निर्माण करुन 'क' प्रभाग स्थापत्य यांच्याकडे वर्ग करणे.

सन २०१३-१४ अंदाजपत्रकातील पान क्र. अनु.क्र. सध्याची तरतूद, वाढ करावयाची तरतूद व घट करावयाची तरतूदीसह उपसुचना स्विकारण्यात यावी व अंदाजपत्रकामध्ये सोबत जोडलेल्या ३ पत्रकामधील तरतूद समाविष्ट करण्यात याव्यात.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन १३-१४ अंदाजपत्रक पा.क्र. | अनु. क्र. | सध्याची तरतूद | वाढ करावयाची र.रु. | घट करावयाची र.रु. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोरया गणपती मंदीर परिसर व चापेकर स्मारक | पा.क्र.४७४ पुस्तक क्र.३ | ८ | ६०,००,०००/- | ४०,००,०००/- | | १,००,००.०००/- |
| २ | चिंचवड येथे आरक्षण क्र.२११ येथे व्यापारी केंद्र विकसीत करणे. | पा.क्र.१८ पुस्तक क्र.३ | ७ | २५,००,०००/- | ७५,००,०००/- | | १,००,००,०००/- |
| ३ | चिंचवड प्र.क्र.६४ मध्ये भाजीमंडईचे पत्रे बदलणे व इतर स्थापत्य विषयकअनु.कामे करणे. | पा.क्र.१५५ पुस्तक क्र.३ | ३ | ३,००,०००/- | ७,००,०००/- | | १०,००,०००/- |
| ४ | वॉ.क्र.६४ नदी काठी घाट बांधणे. | पा.क्र.१५४ पुस्तक क्र.३ | ४ | २,००,०००/- | १८,००,०००/- | | २०,००,०००/- |
| ५ | प्र.क्र.२२ वॉर्ड क्र.६४ चिंचवड मध्ये घाटाचे विस्तारीकरण करणे. | पा.क्र.१५४ पुस्तक क्र.३ | ५ | ६,००,०००/- | १९,००,०००/- | | २५,००,०००/- |
| ६ | प्र.क्र.२२ वॉ.क्र.६४ चिंचवड मधील चापेकर चौकातील जुनी इमारत पाडून नवीन शाळा इमारत बांधणे. | पा.क्र.८६३ पुस्तक क्र.३ | २९ | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- | | १,००,००,०००/- |
| ७ | चिंचवड येथील पार्वती उद्यानाचे नुतनीकरण करणे व किरकोळ कामे करणे (उद्यानातील | पा.क्र.४५२ पुस्तक क्र.३ | १ | ३,६०,०००/- | १६,४०,०००/- | | २०,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विविध दुरुस्ती कामे व रंगकाम करणे) | | | | | | |
| ८ | चिंचवड येथील आ.क्र.२२२ येथे कंपाऊंड वॉल व उद्यान विकासाची कामे करणे. | पा.क्र.४६४ पुस्तक क्र.३ | १०० | ७,००,०००/- | १३,००,०००/- | | २०,००,०००/- |
| ९ | पवनानगर येथील बॅडमिंटन हॉल शेजारील जागेत विरंगुळा केंद्र उभारणे. | पा.क्र.४६६ पुस्तक क्र.३ | १२७ | ९,००,०००/- | ११,००,०००/- | | २०,००,०००/- |
| १० | चिंचवड येथील पार्वती उद्यानात नैसर्गिक दृष्टया सुशोभिकरण करणे व महाराष्ट्रातील साधु-संतांची व संत साहित्याती माहिती प्रकट करणारे म्युरल्स उभारणे. | पा.क्र.४७० पुस्तक क्र.३ | १७२ | ९,००,०००/- | ११,००,०००/- | | २०,००,०००/- |
| ११ | चिंचवड येथील आ.क्र. २२५ येथे सिमाभिंत, जॉगिंग ट्रॅक, ध्यान केंद्र, उद्यान विकसीत करणे. | पा.क्र.४७० पुस्तक क्र.३ | १७३ | ९,००,०००/- | २१,००,०००/- | | ३०,००,०००/- |
| १२ | चिंचवड येथील आ.क्र. २२२ येथील उद्यानात स्थापत्यविषयक कामे करणे. | पा.क्र.४७० पुस्तक क्र.३ | १७५ | ९,००,०००/- | ११,००,०००/- | | २०,००,०००/- |
| १३ | चिंचवड येथील सिल्व्हर गार्डन उद्यानामध्ये सुशोभिकरण ध्यानकेंद्र व कमान उभारणे. | पा.क्र.४७० पुस्तक क्र.३ | १७६ | ९,००,०००/- | ११,००,०००/- | | २०,००,०००/- |
| १४ | चिंचवड प्र.क्र.२२ मध्ये ठिकठिकाणी रस्त्याच्या हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे | पा.क्र.१८१ पुस्तक क्र.३ | ८९ | ६०,००,०००/- | २०,००,०००/- | | ८०,००,०००/- |
| १५ | प्र.क्र.२२, वॉर्ड क्र.६४ चिंचवड गावठाणमध्ये स्टॉर्मवॉटर गटर करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे. | पा.क्र.१८५ पुस्तक क्र.३ | १९ | ३,००,०००/- | ७,००,०००/- | | १०,००,०००/- |
| १६ | प्र. क्र. २२ मध्ये ठिकठिकाणी स्त्यावरील | पा.क्र.१७३ पुस्तक | ८७ | ५,००,०००/- | ५,००,०००/- | | १०,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ट्रेंचेस क्रॉसकट खड्डे व खडीमुरुम बीबीएम पद्धतीने बुजविणे. | क्र.३ | | | | | |
| १४ | प्र.क्र.२२, चिंचवड येथे अद्ययावत क्रिडांगण उभारणे. | नवीन काम | | | २५,००,०००/- | | २५,००,०००/- |
| १५ | प्र.क्र.२२, चिंचवड येथे अद्ययावत स्पर्धा परिक्षा करिता अभ्यासिका उभारणे. | नवीन काम | | | २०,००,०००/- | | २०,००,०००/- |
| १६ | प्र.क्र.२२, चिंचवड येथे अद्ययावत आर्ट गॅलरी उभारणे. | नवीन काम | | | २०,००,०००/- | | २०,००,०००/- |
| १७ | चिंचवड येथील प्र.क्र.२२ मधील मुख्य रस्ते सेवा वाहिन्या दोन्ही बाजूस स्थलांतरीत करुन विकसीत करणे. | नवीन काम | | | १,००,००,०००/- | | १,००,००,०००/- |
| १८ | चिंचवड पवना नदी वरील कोल्हापुर पद्धतीच्य बंधा-याची डागडुजी, नुतनीकरण व सुशोभिकरण करणे व पवना नदीवर बंधारा ते थेरगांव पुल दरम्यान बोटींग सुरु करणे व त्याकरिता जेटिंग विकसीत करणे. | नवीन काम | | | १,००,००,०००/- | | १,००,००,०००/- |
| | | | | एकूण - | ६,००,००,०००/- | | |

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन १३-१४ अंदाजपत्रक पा.क्र. | अनु. क्र. | सध्याची तरतूद | वाढ करावयाची र.रु. | घट करावयाची र.रु. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ---- | १७४ (पु.क्र.२) | १०-१ | -- | -- | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| २ | ---- | १०६ (पु.क्र.२) | १४ | -- | -- | १०,००,०००/- | १०,००,०००/- |
| ३ | ---- | १०६ (पु.क्र.२) | १२ | -- | -- | १०,००,०००/- | १०,००,०००/- |
| ४ | ---- | १०६ (पु.क्र.२) | १७ | | | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| ५ | ---- | १०८ (पु.क्र.२) | ६ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| ६ | ---- | ११२ (पु.क्र.२) | ८ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ---- | ८६ (पु.क्र.२) | १९ | | | ६०,००,०००/- | ६०,००,०००/- |
| ८ | ---- | ८४ (पु.क्र.२) | ४ | | | ६०,००,०००/- | ६०,००,०००/- |
| ९ | ---- | ७८ (पु.क्र.२) | ५ | | | ४५,००,०००/- | ४५,००,०००/- |
| १० | ---- | २५२ (पु.क्र.२) | २६ | | | १,००,००,०००/- | १,००,००,०००/- |
| ११ | ---- | २१८ (पु.क्र.२) | १८ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| १२ | ---- | २१४ (पु.क्र.२) | १७ | | | १०,००,०००/- | १०,००,०००/- |
| १३ | ---- | २०८ (पु.क्र.२) | १७ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| १४ | ---- | २०४ (पु.क्र.२) | ८ | | | १५,००,०००/- | १५,००,०००/- |
| १५ | ---- | २०४ (पु.क्र.२) | ५ | | | १५,००,०००/- | १५,००,०००/- |
| १६ | ---- | २०२ (पु.क्र.२) | ३७ | | | १०,००,०००/- | १०,००,०००/- |
| १७ | ---- | २०० (पु.क्र.२) | १९ | | | १५,००,०००/- | १५,००,०००/- |
| १८ | ---- | १९८ (पु.क्र.२) | ८ | | | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| १९ | ---- | १९८ (पु.क्र.२) | ९ | | | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| २० | ---- | २०० (पु.क्र.२) | २४ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| २१ | ---- | २०० (पु.क्र.२) | ३५ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| | | | | | एकूण- | ६,००,००,०००/- | |

**१)** स्थापत्य विशेष योजना पान क्र. १३ वर अ.क्र.१चा ६ वर नवीन उपलेखाशिर्ष तयार करणे. कामाचे नाव-पांढरकर चाळ ओढ्यावरील रेल्वे पूलाखालून (मोरीतुन) रस्ता विकसित करणे यासाठी पान क्र. ३३ अ.क्र.१४ चा ७ वरील विशेष तरतुदीमधुन ५,००,००० (५ लाख) वर्ग करणे.

**२)** विशेष योजना पान क्र.१६ अ.क्र.३ मध्ये क्रमांक ११वर नविन उपलेखाशिर्ष तयार करणे कामाचे नाव प्रभाग क्र.२१ मध्ये राधा बळवंत दळवी मार्ग येथील पुल (***C.D.work***) करणेसाठी रक्कम रुपये १० लाख ही रक्कम पान क्र. ३३ अ.क्र.१४ चा ७ मधून वर्ग करणे.

३**)** स्थापत्य विशेष योजना पान क्र. १४ वर अ.क्र.१ मध्ये क्रमांक ११ वर नविन उपलेखाशिर्ष तयार करणे. कामाचे नाव चिंचवड येथील आरक्षण क्र. २०१ या जागेवर हॉकर्स झोन व बसस्टॉप विकसित करणे. या उपलेखाशिर्षासाठी विशेष योजना पान नं. ३३ अ.क्र.१४ चा क्रमांक ७ मधून रक्कम रुपये ५ लाख वर्ग करणे.

**४)** पान क्र. १९४ अ.क्र.९ उर्वरित वॉर्ड क्र.६२ मध्ये डांबरीकरण करणे या उपलेखाशिर्षासाठी पान क्र. २१३ अ.क्र. ६० या कामातील निधीतून ५ लाख वर्ग करणे.

**५)** विशेष योजना पान नं. ५१ अ.क्र.२४ मध्ये क्र.८ नवीन उपलेखाशिर्ष तयार करणे. कामाचे नाव आरक्षण क्र. २७५ येथे प्राथमिक शाळा बांधणेसाठी पान क्र. ५२ अ.क्र. २४ चा क्र.६ मधून रक्कम रुपये २५ लाख वर्ग करणे.

दापोडी प्रभाग क्र.६२ मधील विकास कामे सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकात तरतूद वर्ग (कमी) करणेचा तपशील -

| प्रभाग क्रमांक | कामाचे नांव | पान क्र. | अ.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ६२ | दापोडी आरक्षण क्र.३/५ खेळाचे मैदान विकसित करणे. | २४८ | ३९ | १ लाख |
| ६२ | दापोडी आरक्षण क्र.३/१ आई उद्यान या ठिकाणी वॉटर बॉडी तयार करणे तसेच त्याठिकाणी वासल्याचे प्रतिक म्हणून विविध शिल्पे बसविण्यात यावी. | ४६४ | १०९ | १ लाख |
| ६३ | दापोडी येथे १० लक्ष लिटर पाण्याची टाकी बांधणेत यावी. त्याचा वापर प्र.क्र.६१,६२,६४ या तिन्ही प्रभागासाठी होणार आहे. | ७०५ | २१ | १ लाख |
| ६२ | दापोडी डॉ.आंबेडकर पुतळा ते रेल्वे उड्डाणपूल या ठिकाणी स्ट्रीट लाईटचे नुतनीकरण करणे. | ६३५ | १२ | १० हजार |

पिं.चिं. मनपाच्या २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढीव तरतुद मिळणेस विनंती आहे.

**१)** प्रभाग क्र.१८ किवळे येथील मामुर्डी परिसरात पवना नदीकाठी स्मशानभुमीत शेड व इतर कामासाठी वाढीव तरतुद करावी -रु.२५,००,०००/- (पंचवीस लाख रु. फक्त)

**२)** प्रभाग क्र.१८ किवळे येथील किवळे गावठाणातील पवना नदीकाठचा घाट वाढलून सुशोभिकरणास वाढीव तरतुद करावी. रु.१०,००,०००/- (दहा लाख रु. फक्त)

**३)** प्रभाग क्र.१८ किवळे येथे विकासनगर भागात समाजमंदिरासाठी वाढीव तरतूद करावी. रु.२५,००,०००/- (रु.पंचवीस लाख)

पिंपरी वाघेरे येथील मैलापाणी संप व पंप हाऊस डी.पी. रस्त्यामध्ये येत असल्याने स्थलांतर करणेस व त्यासाठी सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु.५० लक्ष एवढी तरतूद करण्यास मान्यता देणेत येत आहे.

प्र.क्र.६३ संभाजी चौक ते शिवाजी चौक व शिवाजी चौक परिसरात गटर दुरुस्ती व स्थापत्यविषयक कामे करणे प्र.क्र. ३४ पान क्र. ३१८ या लेखाशिर्षक रद्द करुन प्र.क्र.६३ मधील जलतरण तलाव परिसरामध्ये बॅडमिंटन हॉल बांधणे याकामी तरतूद र.रु.१५,००,०००/-. सदर लेखाशिर्षावर 'क' प्रभाग स्थापत्यमध्ये अंदाजपत्रकात वर्ग करणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ***JNNURM*** अंतर्गत नाशिक फाटा वाकड प्रकल्पासाठी सन २०१२-२०१३ चे सुधारित अंदाजपत्रकात पान क्रमांक १७१ वर भांडवली खर्च ३५.८६ कोटी मध्ये ४ कोटीने वाढ करण्यात यावी व अखेरची शिल्लक र.रु.५.०० कोटी मधून ४ कोटी कमी करणेत यावेत. त्याअनुषंगाने सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकात आरंभिक शिल्लक र.रु.४ कोटीने कमी करण्यात यावी व इतर प्रकल्पासाठीचा खर्च ४ कोटीने कमी करण्यात यावा.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे क्रिडा धोरण नव्याने तयार होत असून त्या अनुषंगाने व शासन निर्णय क्र. जीईएन/१०९८/प्रकरण९८/नवि२४ मंत्रालय, मुंबई ३२ दि. ९ मार्च १९९८ नुसार महानगरपालिकांना दरवर्षी एकुण वार्षिक खर्चापैकी ५% खर्च करणेबाबत नमूद आहे. सबब महापालिकेचे एकुण वार्षिक खर्चापैकी ५% खर्च "क्रिडा विषयक सुधारणा" असे स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करुन र.रु.५००००००००/- इतकी तरतूद करण्यात यावी.

लेखाशिर्ष व्हिजन २००५ पान ११ अ.क्र.८ सेवा वाहिनीचे स्थलांतर करणे सल्लागार फी विद्युत खर्च जलनिस्सारण खर्च व अनुषंगिक कामे करणे तरतूद र.रु.१३५ कोटी ८ लाख केली आहे. या कामाच्या राहिलेल्या शिल्ल्क तरतुदीमधून लेखाशिर्ष मुंबई पुणे महामार्गावर दापोडी येथे सबवे बांधणेसाठी र.रु.१ कोटी दर्शविण्यात यावी.

प्रभाग क्र.५६ वैदूवस्ती, सुदर्शननगर, जवळकरनगर, कल्पतरु इस्टेट या परिसरामध्ये १२ ते १३ हजार लोकसंख्या आहे. परंतू त्या ठिकाणी एकही पाण्याची टाकी नाही. तरी त्या ठिकाणी १५ ते २० दशलक्ष लिटर क्षमतेची टाकी व्हावी.

पिंपरी चिंचवड मनपाच्या अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये व शहरातील विविध विकासकामांमध्ये खालील कामाचा समावेश करुन त्याकरिता योग्य आर्थिक तरतूद करण्यात यावी. तसेच खालीलप्रमाणे योग्य तो बदल करणेत येवून या कामांचा समावेश अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये करण्यात येवून संबंधीत विभागाद्वारे कामे व्हावीत. यासाठी खालील उपसुचना स्वीकारण्यात यावी व सर्व कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येवून कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही

व्हावी. सदर कामांकरीता परिशिष्ट अ मधील तरतूदीनुसार अंदाजपत्रकात बदल म्हणजेच वाढ-घट व्हावी व संबंधित कामे व्हावीत.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | सन २०१३-१४ अंदाजपत्रकातील आवश्यक तरतुद | विभाग | तरतुद वर्ग करणेचे काम | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पान क्र. | अ.क्र. |
| १ | पिंपळे सौदागर येथे ४५ मी. रस्त्यावर गोविंद गार्डन चौक येथे ग्रेडसेपरेटर करणे. | २५ लाख | स्थापत्य विशेष योजना | १२ | २४ |
| २ | पिंपळे सौदागर येथे हॉटेल शिवार गार्डन येथे ग्रेडसेपरेटर करणे किंवा सुरक्षित वाहतूक व्यवस्था करणे. | २५ लाख | स्थापत्य विशेष योजना | १२ | २४ |
| ३ | प्रभाग क्र.१६ (आकुर्डी गावठाण) शुभश्री रेसिडेन्सी येथील २ एकर जागेमध्ये उद्यान विकसित करणे. | २५ लाख | उद्यान स्थापत्य | -- | -- |
| ४ | प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील आर्टिफिशियल ग्लायमीबंग वॉलचे नुतनीकरण करणे. | २५ लाख | क्रिडा | -- | -- |
| ५ | स.नं.६ सांगवी येथे उद्यानात उर्वरित विविध विकासाची कामे करणे. | मुळा ५० लाख + २५ लाख | स्थापत्य उद्यान | ४९ | ६ |
| ६ | प्र.क्र.११ सांगवी येथे मुळा नदीकाठी स्पायसर ब्रीज ते राजीव गांधी ब्रीजपर्यंत तटरक्षक भिंत बांधणे. | मुळा २० लाख + ८० लाख | स्थापत्य विशेष योजना | ३१ | १४ |
| ७ | प्र.क्र.५१ मधुबन व प्र.क्र.६० मध्ये मुळा नदीकडेने तटरक्षक भिंत बांधणे. | ४० लाख | स्थापत्य | ४१५ | १० |
| ८ | सांगवी येथील स.नं.६ मधील मैला शुद्धीकरण प्रकल्पाचे मशिनरींचे नुतनीकरण व प्रकल्प नुतनीकरणाचे अनुषंगिक कामे करणे. | ७० लाख | अभियांत्रिकी पर्यावरण | ४१५ | ८ |
| ९ | प्र.क्र.५८ नवी सांगवी येथील बॅडमिंटन हॉल परिसरास कंपाऊंड वॉल बांधणे. | ५ लाख | स्थापत्य | ३०२ | ६९ |
| १० | प्र.क्र.५८ नवी सांगवी येथील बॅडमिंटन हॉलमधील दुरुस्ती व विविध कामे करणे. | १० लाख | स्थापत्य | ३०२ | ७० |
| ११ | सांगवी येथे स्मशानभूमीमध्ये सीएनजी किंवा गॅसदाहिनी बसविणे. | ४० लाख | प अंदाजपत्रक | २१२ | ५३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | प्र.क्र.५९ मधुबन येथे रस्त्यांवर विविध ठिकाणी रस्ता ओलांडणी पथ तयार करणे. | ५ लाख | स्थापत्य़ | ४८ | १३७ |
| १३ | प्र.क्र.५८,५९,६० या ड प्रभागांतर्गत विभागात विविध रोड फर्निचर बसविणे. | १५ लाख | स्थापत्य़ | ३९२ | २ |
| १४ | प्र.क्र.५८ मधील दशक्रिया विधी घाटाचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणे. | २० लाख | प अंदाजपत्रक | २१३ | ६५ |
| १५ | वॉर्ड क्र.५७,५८ पिंपळेगुरवचे रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणे. | १५ लाख | आरोग्य | १७ | १ |
| १६ | वॉर्ड क्र.५९,६० सांगवीतील रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणे. | १५ लाख | आरोग्य | ३१ | १४ |
| १७ | प्र.क्र.५७ पिंपळेगुरव स्मशानभूमी विस्तार करणे व स्थापत्यविषयक कामे करणे. | १५ लाख | प अंदाजपत्रक | ३८५ | १२ |
| १८ | वॉर्ड क्र. ५९,६० सांगवी मधील रस्त्यांना थर्मोप्लास्टचे पट्टे मारणे व तत्सम कामे करणे. | ५ लाख | स्थापत्य | ४८ | १३७ |
| १९ | प्र.क्र.५६,५७,५८,५९,६० या सांगवी विभागात दिशादर्शक नामफलक व विविध सुधारणा करणे. | ५ लाख | स्थापत्य | ४६९ | १६२ |
| २० | प्र.क्र.५६,५७,५८,५९,६० मध्ये रोडफर्निचर करणे, बेंचेस लावणे व इतर कामे करणे. | ५ लाख | स्थापत्य | ७६१ | १३ |
| २१ | प्र.क्र.५६,५७,५८,५९,६० मध्ये रोड फर्निचर करणे. | ५ लाख | स्थापत्य | ७६१ | १४ |
| २२ | प्र.क्र.५९,६० सांगवी व ५७,५८ पिंपळे गुरव येथे विविध ठिकाणी पाणी टंचाई पाहता रेन हार्वेस्टींग करणे. | ५ लाख | स्थापत्य | ३८५ | १४ |
| २३ | प्र.क्र.४७ काळेवाडी मध्ये पवनानदीचे कडील १८ मीटर रस्ता विकसित करणे. | ५ लाख | स्थापत्य | ३८५ | १३ |
| २४ | प्र.क्र.४७ काळेवाडी मध्ये पवनानदीचे कडील १८ मीटर रस्ता विकसित करणे. | ५ लाख | स्थापत्य | ३६ | ३० |
| | | | | ८८७ | ०९ |

<u>परिशिष्ट 'अ'</u>

| अंदाजपत्रक ३ मधील तरतूद कमी करावयाची कामे | | |
|---|---|---|
| पान क्र. | अनु.क्र. | रक्कम |
| १२ | २४ | ५० लाख |
| ४९ | ६ | ५० लाख |
| ३१ | १४ | ५० लाख |
| ३६ | ३० | १५ लाख |
| ८८७ | ९ | १० लाख |
| ४१५ | १० | १० लाख |
| ४१५ | ८ | २० लाख |
| ३९२ | २ | ५ लाख |
| ३८५ | १२ | १० लाख |
| ३८५ | १३ | १० लाख |
| ४२५ | १६ | ५ लाख |
| ४२५ | १७ | ३ लाख |
| ४२५ | १८ | ३ लाख |
| ४२५ | १९ | ३ लाख |
| ७६१ | १३ | २५ लाख |
| ७६१ | १४ | ५ लाख |
| ४६९ | १६२ | २० लाख |
| ३०२ | ६७ | २.५ लाख |
| ३०२ | ६९ | ३ लाख |
| ३०२ | ७० | ५ लाख |
| २१२ | ५३ | २ लाख |
| २१३ | ६५ | ५ लाख |
| अंदाजपत्रकातील (३) तरतूद कमी करावयाची कामे | | |
| पान क्र. | अनु.क्र. | रक्कम |
| १७ | १ | २० लाख |
| ४८ | १३७ | १५० लाख<br>(१ कोटी ५० लाख) |

